आंतरभारतीय पुस्तक माला

संक्षिप्त आत्मकथा : कंदुकूरि वीरेशलिंगमु

आंध्रचे अग्रेसर समाजसुधारक कंदुकूरि वीरेशलिंगमु यांचे हे संक्षिप्त आत्मचरित्र. राजा राममोहनराय यांच्याप्रमाणे बालविवाह, विधवाविवाह, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार यांसारख्या अनेक सामाजिक दुष्ट प्रथांविरुद्ध त्यांनी सतत लढा दिला.

वीरेशलिंगमु तेलुगू भाषेतील विख्यात लेखक होत. अनेक नाटके, कादंबऱ्या, विनोदी लेख इत्यादि साहित्य त्यांनी लिहिले. त्यांचे हे आत्मचरित्र म्हणजे जणू आंध्रवासियांचा सामाजिक इतिहासच होय.

संक्षिप्त आत्मकथा :

कंदुकूरि वीरेशलिंगमु

संक्षेपकार
कोडवटिगंटि कुटुंबराव
अनुवाद
इंदुमती केळकर

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

१९७९ (शके १९००)

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया १९७९

Original Title : Sweeya Charitramu Veeresalingamu (Telugu)
Marathi Translation: Sankshipta Atmakatha
Kundukoori Veeresalingamu

रु. १२.५०

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए ५ ग्रीन पार्क, नवी दिल्ली ११००१६.
मुद्रक : मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस, टिळक पुतळ्याजवळ महाल, नागपूर ४४०००२.

भूमिका

कै. कट्टमंचि रामलिंग रेड्डींसारख्या थोर विद्वानाने श्री. कंदुकूरि वीरेशलिंगमु पंतुलु यांचा 'आधुनिक युगातील सर्वोत्तम आंध्रनिवासी' या शब्दांत गौरव केला आहे. श्री. राजाजी यांनी त्यांचा परिचय करून देताना म्हटले आहे, 'श्री. वीरेशलिंगमु प्रमुख भारतीयांपैकी एक होत. ते गंभीर विवेचक, अपार साहसी आणि असाधारण शक्तिशाली होते. त्यांनी असत्याशी निर्धारपूर्वक सामना तर केलाच शिवाय प्रगतिकारक उपक्रमासाठी संघर्षही केला.' श्री. वीरेशलिंगमु यांचे व्यक्तित्व, त्यांच्या चळवळी, त्यांची विजय परंपरा आणि त्याची वादातीत जनसेवा व देशसेवा या संक्षिप्त आत्मचरित्र यात शब्दांकीत केली आहे.

श्री नार्ल वेंकटेश्वरराव यांनी वीरेशलिंगमु यांच्यासंबंधी एक अतिशय वस्तुनिष्ठ पुस्तक (साहित्य अकादमी, नवी दिल्ली) लिहिले आहे. या पुस्तकासाठी नार्ल यांनी लिहिलेल्या चारित्र्याचा आधार घेतल्याचे अभ्यासकांना दिसून येईल.

आंध्रवासियांचे जीवन आणि त्यांचा सामाजिक दृष्टिकोन यांत गेल्या तीनचार दशकांमध्ये जी परिवर्तने झाली, त्याचे वर्णन या पुस्तकाच्या शेवटच्या पृष्ठांत श्री. वीरेशलिंगमु यांनी केले आहे. पण त्या परिवर्तनामध्ये त्याचा स्वतःचा कसा सक्रिय भाग होता त्याचा उल्लेख मात्र त्यांनी केलेला नाही. श्री. कट्टमंचि रामलिंगा रेड्डी यांनी म्हटल्याप्रमाणे श्री. वीरेशलिंगमु नवयुग निर्मात्यांपैकी एक प्रमुख होते. म्हणूनच त्यांना त्या समाजाचे चित्र प्रतिबिंबीत करता आले. ते समाजाचे लाडके पुत्र होते आणि त्यामुळेच ते त्या समाजाचे एक स्रष्टाही बनू शकले. कारण ज्यांना कालप्रवाहाचे ज्ञान असते तेच असा स्रष्टा बनू शकतात.

खरे म्हणजे वीरेशलिंगमु यांनी कुजक्या नासक्या समाजावर आणि सडलेल्या संस्कारावर हल्ला करण्याआधी त्याच समाजाशी आणि त्याच संस्कृतीशी संलग्न असलेल्या उकीरड्यात आपले जीवन घालवले होते. सामान्यजनांना वायुवेगाने मागे टाकून ते पुढे गेले. आणि त्यात ते स्वतः जनतेच्या छळवणुकीचे भक्ष्यही बनले. शेवटी जीवनाच्या विविध क्षेत्रातील अभ्युत्थानासाठी आवश्यक अशा मार्गांचे त्यांनी दिग्दर्शन केले. त्याच-

प्रमाणे साहित्याच्या क्षेत्रातही त्यांनी आपल्या कृतींचा प्रारंभ अनेक शतकापूर्वीच्या प्रक्रियांसह केला आणि लवकरच तेलुगू साहित्याच्या अग्रभागी ते चमकू लागले. अशा-रितीने समाजाला सुधारीत असताना त्यांनी स्वतःचीही प्रगति केली.

श्री. नार्ल यांनी म्हटल्याप्रमाणे वीरेशलिंगमु हे 'आदर्श दृष्टिकोन असलेले कृतिशील व्यक्ती' होती. जेथे जेथे अनिष्ट सामाजिक रूढी आणि अन्याय दिसला त्या प्रत्येक ठिकाणी त्यांनी ठामपणे त्याचा विरोध केला. चिकाटीने असे अन्याय्य व दोष शोधून काढले. त्याचबरोर आपले अनुयायीही शुद्ध चारित्र्याचे असले पाहिजेत असा आग्रह धरला. आणि त्यांच्या उणीवांची कठोरपणे निंदा केली, त्यांच्यावर प्रहार केले. या बाबतीत गांधीजी आणि वीरेशलिंगमु यांच्यात काहीसे साम्य दिसते.

अशा महान व्यक्तीमध्ये राजकीय ज्ञानाचा अभाव असावा ही गोष्ट गंभीरपणे विचार करता कलंकभूत वाटते. परंतु वीरेशलिंगमु यांच्या काळात राजकारण दहशत-वाद किंवा घोषणाबाजीपुरतेच मर्यादित होते. नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टी असलेले गांधीवादी राजकारण तोपर्यंत देशात सुरू झालेले नव्हते. 'देशाची प्रगती एकांगी असू नये' हे वीरेशलिंगमु याचे मत अगदी खरे आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आता सुटला आहे. तरी देखील वीरेशलिंगमु यांनी ज्या सामाजिक दुष्ट रूढींशी सामना केला, त्या अंधविश्वास, धार्मिक कट्टरपणा, जातीभेद, धार्मिक विद्वेष, अधिकाऱ्यांमधील भ्रष्टाचार, श्रीमंतानी चालवलेले गरीबांचे शोषण, खऱ्या सामाजिक प्रगतीची उपेक्षा, सांस्कृतिक दृष्टीचा अभाव असलेले जनताविरोधी हीन साहित्य इत्यादि रूढी आजही आपल्याला दुर्बल बनवीत आहेत.

वीरेशलिंगमु आणि त्यांच्या चळवळी राष्ट्रीय आंदोलनामुळे कदाचित मागे पडल्या असाव्यात. कारण दुसरे विश्वमहायुद्ध संपेपर्यंत वीरेशलिंगमु यांना लोक विसरले होते. त्यानंतरच्या काळात दृढतापूर्वक आणि विश्वासपूर्वक वीरेशलिंगमु यांचे स्मरण पहिल्या-प्रथम आंध्रप्रांतातील प्रगतिशील लेखकांनीच करून दिले. आज पुन्हा वीरेशलिंगमु यांच्या आवाजाला बळ मिळत चालले आहे. देश प्रगतिपथावर न्यावयाचा असेल तर वीरेशलिंगमु यांनी घालून दिलेले आदर्श पुन्हा अंमलांत आणले पाहिजेत.

वीरेशलिंगमु यांच्या असंख्य ग्रंथामध्ये त्यांच्या आत्मचरित्राला अतिशय वैशिष्ट्य-पूर्ण स्थान आहे. हे पुस्तक त्यांनी लिहलेच नसते तर वीरेशलिंगमु यांनी सामाजिक उद्धारासाठी जे अनुपम कार्य केले ते त्यांच्याच प्रांतात केवळ स्मृतिमान बनून राहिले असते. म्हणूनच या ग्रंथाला 'आंध्रवासियांचा एक प्रकारचा सामाजिक इतिहास, असे म्हणण्यात येते.

आत्मचरित्राचा पहिला भाग डिसेंबर १९२० मध्ये आणि दूसरा भाग एप्रिल १९२५

मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर वीरेशलिंगमु चार वर्षे, २७ मे १९२९ पर्यंत जिवंत होते. अखेरपर्यंत त्यांची धडपड सतत चालू होती. उदाहरणार्थ श्री. गिडुगु राममूर्ति पंतुलु यांनी सुरू केलेल्या 'व्यावहारिक भाषावादा' ला (साहित्यात लोकभाषा किंवा जन-सामान्याची भाषा यांच्या उपयोगावर भर देणारा वाद) वीरेशलिंगमु यांनी पूर्णपणे पाठींबा दिला. 'वर्तमान आंध्रभाषा प्रवर्त समाजा' चे ते पहिले अध्यक्ष होते. खरे म्हणजे वीरेशलिंगमु हे असंख्य सामाजिक आणि सांस्कृतिक आंदोलनातील 'प्रथम' व्यक्ति होते. म्हणूनच त्याच्याविषयी श्री. के. ईश्वरदत्तु यांनी असे म्हटले आहे की, 'आंध्रच्या जीवनप्रवाहाला वीरेशलिंगमु यांनी नवे वळण दिले या कार्यात त्यांचा कोणी मार्गदर्शक नव्हता आणि त्यांच्याशी तुलना करता येईल असे त्यांचे कोणी अनुयायीही नव्हते'

– कोडवटिगंटि कुटुंबराव

अनुक्रमणिका

भूमिका पान नंबर

(भाग पहिला)

१. बालपण १
२. विद्यार्थीजीवन ५
३. १८७० ते १८८० १४
४. १८८० ते १८९० ३१

(भाग दुसरा)

१. १८९० ते १९०० ८१
२. लेखनकार्य काल : १८७० ते १९०० १०४
३. विश्राम काल : १९०० ते १९१० ११७
४. असहाय्य दशा : १९१० ते१९१३ १३८

निवेदन १४८

भाग पहिला

१. बालपण

१६ एप्रिल १८४८ चा दिवस. सूर्योदयानंतर तीन घटकांनी माझा जन्म झाला. भारत वर्षातील प्राचीन नगरांपैकी राजमहेंद्रवरम् हे गोदावरीकाठी वसलेले अतिशय विख्यात नगर होय. त्याच नगरांत आमच्या वडिलोपार्जित घरात माझा जन्म झाला.

राजमहेंद्रवरम्मधील प्रतिष्ठित कुटुंबांमध्ये माझ्या कुटुंबाची गणना होत असे. एवढे मोठे वाडवडिलार्जित घर होते, त्याअर्थी माझे पूर्वज सुस्थितीत असावेत असे स्थूल-मानाने म्हणता येईल, ते घर माझ्या आजोबांनी बांधले होते. काही वर्षे लहान लहान संस्थानिकांकडे त्यांनी दिवाण म्हणून काम केले होते. माझे पूर्वज देखील जमीनदार आणि देशपांडे होते. स्वतःच्या अंगी योग्यता नसताना पूर्वजांच्या मोठेपणाच्या जीवावर माणसाने मानमान्यतेची हाव धरावी हे मला पटत नाही. म्हणूनच माझ्या पूर्वजांच्या मोठेपणाचे वर्णन करावयाचा माझा विचार नाही. माझे आजोबा वीरेशलिंगमु हे अतिशय धार्मिकवृत्तीचे होते. आपली स्वतःची जमीन दान करून त्यांनी नाव मिळवले होते, एवढेच या आत्मकथेच्या संदर्भात सांगणे पुरेसे आहे.

माझ्या लग्नाच्या व अन्य मंगलकार्यांच्या प्रसंगी माझे मोठे चुलते माझी जन्मपत्रिका ज्योतिषांना दाखवीत आणि मुहूर्त ठरवीत. तरी देखील फार पूर्वीच ज्योतिषशास्त्रावरचा माझा विश्वास उडाला होता. म्हणूनच मी माझी जन्मकुंडली पाहण्याचा कधीही खटा-टोप केला नाही. तरीही सुरुवातीला ज्योतिषशास्त्रावर माझा खूपच विश्वास होता, पण पुढे सांगितलेल्या कारणांमुळे माझा विश्वास कमी होत गेला आणि लोकांचे अनुभव ऐकल्यावर तर तो पूर्णपणे नष्ट झाला. जन्मकुंडलीत ज्यांना दीर्घायुषी दाखविण्यात आले होते, त्यांतील बहुतेक लोक अल्पायुषी ठरले होते. जे लोक खूप श्रीमंत होतील असे भविष्य वर्तविले होते ते दरिद्री निघाले. मुले होतील असे भविष्य ज्यांना सांगितले ते जन्मभर निस्संतानच राहिले. ज्या स्त्रियांना अखंड सौभाग्यवती राहाल असे ज्योतिषांनी सांगितले होते, त्यांना तर बालपणीच वैधव्य आले. शास्त्रसंमत मुहूर्त शोधून काढून त्या मुहूर्तावर केलेल्या कार्यांपैकी कित्येक कार्ये अपयशी झाल्याचे दिसून आले. शिवाय ज्योतिषशास्त्राबरहुकुम लग्न करणाऱ्या आपल्या देशांतील लोकांची लग्ने ज्योतिष-

शास्त्रावरती विश्वास न ठेवणाऱ्या पाश्चात्य देशांतील लोकांच्या विवाहांपेक्षा कोणत्या बाबतीत अधिक यशस्वी आहेत असे म्हणता येईल ?

माझ्या आजोबापर्यंतचे माझे पूर्वज लिंगधारी वीरशैव पंथाचे अनुयायी होते. माझे पणजोबा चंद्रमौली यांचा स्मार्त संप्रदायातील मुलीशी विवाह झाला होता. या दांपत्याला झालेला मुलगा, म्हणजे माझे वडील वीरेशलिंगमु यांनी बहुदा आपल्या मामांच्या प्रोत्साहनाने किंवा अन्य काही कारणाने लिंग गळ्यात घालणे सोडले आणि समाज-सुधारणेचा मार्ग पत्करला. मी त्यांचाच कुलदीपक मुलगा, त्यामुळे बालपणीच मलाही सुधारणेचे बाळकडू मिळाले.

माझ्या वडिलांचे जन्मगाव एलूर. तेथे त्यांचा जमीनजुमला आणि घरदार होते. आमच्या आडनावावरून असे दिसते की नेल्लूर जिल्ह्यातील कंदुकूरि या शहरात आम्ही प्रथम राहात होतो, पण पुढे मुसलमानी आमदानीत नोकरीनिमित्त एलूरला आलो.

त्या काळात शेतीला कालव्याचे पाणी मिळण्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे सहाजिकच आमची इनामी जमीन पावसावर अवलंबून असे. एखाद्या वर्षी वेळेवर पाऊस झाला नाही की उपासमार सहन करावी लागे. म्हणून शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून राहणे योग्य नाही असा विचार करून माझे आजोबा राजाच्या आश्रयाला गेले. राजमहेंद्रवरम येथे त्यांनी कायमची वस्ती केली. तेथेच खूप पैसा मिळविला आणि राजमहालाच्या तोडीचा एक विशाल वाडा बांधला. त्याच घरात ते शेवटपर्यंत राहिले.

आजोबांच्या मृत्युनंतर त्यांच्या मागे त्यांची आई अक्कम्मा, पत्नी काममा, मोठा मुलगा वेंकटरत्नम आणि धाकटा मुलगा सुब्बरायुडू एवढी माणसे कुटुंबात उरली. त्या-पैकी धाकट्या मुलाचा मी मुलगा.

माझ्या वडिलांचा विवाह लहानपणीच त्यांच्या आतेबहिणीशी लावून देण्यात आला होता. माझ्या आजोबांच्या बहिणीला एक मुलगी झाली आणि ती वारली. त्या मुलीचे नाव पुन्नमा. मुलीचे पालणपोषण तिची पणजी अक्कमा आणि मामा म्हणजेच माझे आजोबा यांनी केले. शेवटी त्या मुलीचे माझ्या वडिलांबरोबर लग्न लावले. हे जोडपे म्हणजेच माझे आईवडिल.

त्या काळात भूत–पिशाच्च आणि ममंध यांच्यावर लोकांचा अतिशय विश्वास होता. कधी कोणी काही कारणाने आजारी पडला तर तो पहिल्या प्रथम एखाद्या मांत्रिकाकडे किंवा ज्योतिषाकडे धाव घेई. माझ्या आईच्या मनांतही भूतपिशाच्यां विषयीची अंधश्रद्धा रुजलेली होती. आपल्या शरीरात भुताने प्रवेश केलेला आहे या कल्पनेने ती सदैव मनो-मन धास्तावलेली असे. माझ्या आजोबांनी कित्येक मांत्रिक, भगत आणि मंत्र-शास्त्र जाणकार यांच्याकडून आईवर उपचार करून पाहिले, अनेक होमहवने केली, तरीही आई अशक्तच होत गेली. अशा स्त्रीच्या पोटी जन्म घेतल्यामुळे मी देखील बालपण

जरत्कारूच होतो असे म्हणतात. फाटक्या शरीराप्रमाणे मला खोकल्यानेही ग्रासले होते. या खोकल्याने अजूनही माझी पाठ सोडलेली नाही. त्यातच मी सहा महिन्यांचा असताना मला देवी आल्या. त्यावेळी कुटुंबातील साऱ्यांनीच माझी आशा सोडली होती. मी एकदा डोळे मिटले होते असे सांगतात. एक दिवस तर चोवीस तासात मी हातपायही हलवले नव्हते आणि प्राणहीन पुतळ्यासारखा पडून होतो. अशा नालायक दुबळ्या माणसा-कडून काहीतरी काम करवून घ्यायचे कदाचित देवाच्या मनात असावे म्हणूनच मला जिवंत ठेवण्याची त्याने कृपा केली.

मी चार वर्षांचा असताना काकिनाडा येथे माझे वडील निधन पावले. मला माझ्या वडिलांपेक्षा मोठ्या चुलत्याबद्दल जास्त जिव्हाळा वाटे. म्हणूनच त्यावेळी वडिलांच्या वियोगाचे दुःख मला जाणवले नाही. वडिलांची अंत्येष्टी क्रिया वगैरे संपल्यानंतर काही दिवसांनी आम्ही सर्वच काकिनाडा सोडून राजमहेंद्रवरम् येथे स्थायिक झालो.

मुळाक्षरे शिकल्यानंतर मी प्रथम घरापासून फक्त दोनशे हातांवरच्या गोपाळस्वामी मंदिरात भरणाऱ्या शाळेत दाखल झालो. याच पाठशाळेत वर्णमाला, गणित आणि पाढे शिकून हाती पुस्तक घेतले असावे. त्यानंतर घराजवळच्या सोमराजु यांच्या पाठशाळेत मला पाठविण्यात आले. सोमराजु यांना तेलगू भाषा आणि साहित्य यांचे थोडेबहुत ज्ञान होते. विद्यार्थ्यांकडून पुराणे वाचून घेऊन ते त्यांना त्याचा अर्थ समजावून सांगत. मला त्यांनी बालरामायण आणि अमरनिघंटु शिकवले. त्यांचा अर्थही सांगितला. त्यानंतर पाठ्यपुस्तकातला अभ्यास आणि रुक्मिणी–कल्याण, सुमती–शतक, कृष्णशतक तसेच आंध्रनामसंग्रह ही पुस्तके लिहावयास लावून तोंडपाठ करून घेतली.

एवढा अभ्यास झाल्यावर माझ्या वडिलधाऱ्या मंडळींनी झाले एवढे तेलगूचे शिक्षण मला पुरे असे ठरवून टाकले. म्हणून मग सरकारी नोकरीसाठी आवश्यक असलेले शिक्षण घेण्यासाठी त्यांनी मला माझे एक नातेवाईक पोतराजु रघुरामय्या यांच्या ताब्यात दिले. ते तालुका कचेरीत नोकरीला होते. मी रोज आमच्या बोळाच्या टोकाशी अस-लेल्या तालुका कचेरीत जायचो आणि रघुरामय्या जे काही काम सांगतील ते करून घरी परतायचो. या कामात एकदोन वर्षे गेली. त्या काळात सरकारी नोकरीसाठी म्हणून विशिष्ट परीक्षा नसत. सहाजिकच ज्यांना सरकारी नोकरी हवी असे, ते सरकारी कचेऱ्यात जाऊन उमेदवारी करीत. तेथील अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न करीत. ईस्ट इंडिया कंपनीकडून राज्यसंचालनाची सूत्रे महाराणी व्हिक्टोरिया यांनी स्वतः आपल्या हाती घेतल्यानंतरच देशी भाषा तसेच इंग्रजी माध्यमातून सर्वसाधारण आणि विशेष योग्यता प्राप्त करून देणाऱ्या परीक्षा घेण्यात येऊ लागल्या.

इ. स. १८६० मध्ये माझ्या घरच्या लोकांनी मला इंग्रजीच्या शिक्षणासाठी सरकारी शाळेत पाठवले. ब्राह्मणांच्या रिवाजाप्रमाणे वयाच्या सातव्या वर्षी माझी मुंज झाली.

त्यावेळेपासून मी तिन्हीत्रिकाल संध्या करून मोठ्या भक्तिभावाने गायत्रीमंत्राचा जप करीत असे. रोज सायंकाळी गोदावरीच्या काठी जाऊन अस्तमान सूर्याला अर्घ्यदान करीत असे आणि संध्याही करीत असे. प्रदोषकाळात मार्कंडेयस्वामींच्या तसेच वेणु-गोपालस्वामींच्या देवळातही जात असे. एकादशीच्या रात्री खूप वेळ जागत असे. एका वर्षी तर शिवरात्रीच्या दिवशी रात्रभर जागरण केले होते.

माझे रघुवंशाच्या पांच सर्गांचे अध्ययन घरीच झाले होते. त्याबरोबर पुराणही ऐकत असे. त्यामुळे प्रमुख ग्रंथ समजण्याचे बरेचसे ज्ञान मला झाले होते. म्हणून जिज्ञासेने मी घरातील जुन्या ताडपत्रांवरची हस्तलिखिते शोधून वाचायला प्रारंभ केला. आपणही ऋषीमुनींप्रमाणे तपश्चर्या करून मोठे व्हावे असा विचार वारंवार माझ्या मनात येई. इंग्रजी शिक्षणास सुरुवात करण्यापूर्वीच माझ्या मनात अंधश्रद्धेने घर केले होते. मी श्रद्धाळू बनत चालल्याचे पाहून माझी आई वगैरेही मला प्रोत्साहन देऊ लागले.

त्या काळात माझे शारीरिक बळ जितके कमी होते तितकेच माझे मानसिक बळ जास्त होते असे म्हणता येईल. त्या लहान वयातही मला असाधारण ग्रहण-शक्ती आणि धारणाशक्ती लाभली होती. पण त्यापायी काही अंशी माझे नुकसानच झाले असे म्हणता येईल.

२. विद्यार्थी-जीवन

सहामाही परीक्षेच्या वेळी मी शाळेत प्रवेश केला तरी वार्षिक परीक्षेत आमच्या वर्गातील सर्व मुलांपुढे जाऊन मी बक्षीस मिळविले. त्यावेळेपासून शेवटपर्यंत शाळेत प्रत्येक वर्गात मी बक्षिसे मिळवली. दुसऱ्या इयत्तेत गेल्यापासूनच तेलुगुतील पुस्तके वाचण्याची माझी आवड वाढत गेली. शाळेच्या वेळाव्यतिरिक्त उरलेला सारा वेळ मी घरातील ताडपत्रांवरील हस्तलिखिते वाचण्यात घालवीत असे. त्यासाठी माझी आई आणि पणजी मला वारंवार दटावीत असत. एक दिवस आमच्या घराजवळच्या माझ्या गुरुजींकडे जाऊन त्यांनी 'वीरेशलिंगमु घरी इंग्रजी पुस्तक मुळीच वाचत नाही तेव्हा त्याला योग्य ती शिक्षा करा' अशी तक्रार केली तेव्हा 'वीरेशलिंगमु प्रत्येक विषयात पहिला नाहीतर दुसरा येतो', असे सांगून माझ्या गुरुजींनी त्यांना परत पाठविले.

एकपाठी आणि त्रिपाठी माणसांतील तीव्र बुद्धीचा थोडासा अंश माझ्यातही होता. त्यामुळे शाळेत जाताना रस्त्यात एखादा धडा एक वेळ वाचला तरी बिनचुकपणे जसाच्या तसा म्हणून दाखवत असे. माझ्या या असाधारण बुद्धीमुळेच मी बेसावध आणि आळशी बनलो आणि काही प्रमाणात बिघडलो देखील. त्यामुळेच मी जे वाची ते मनात खोलवर रुजत नसे. परिणामी काही दिवसांनी मी मूळपदावर येत असे. आळशीपणा निर्माण करणारी कुशाग्रबुद्धी लाभण्यापेक्षा सतत परिश्रम करीत कार्यरत ठेवणारी मंदबुद्धीच जगाच्या तसेच व्यक्तीच्या दृष्टीने अधिक लाभप्रद असते असे मला वाटते.

या कालखंडात पुराण वाचनाचे माझे वेड वाढतच गेले. कधी एकदा तपश्चर्या सुरू करतो आणि कधी एकदा अलौकिक मोठेपणा मिळवतो या उत्कंठेने मी सदैव भारलेला असे. माझ्या वयाच्या इतर मुलांपेक्षा मी हुशार आणि बुद्धिमान म्हणून ओळखला जात असे. माझ्याविषयी अशी कल्पना करून घेतलेले माझे वर्गबंधू वयाने माझ्यापेक्षा मोठे होते. मी त्यांना तपश्चर्येचे महत्त्व पटवले आणि आम्ही हिमालयावर तपस्येसाठी जायचे ठरवले. त्यासाठी तीन मित्रांना हिमालय यात्रेसाठी तयार केले आणि मग यात्रेला कधी निघायचे असा तगादा ते वारंवार माझ्याकडे येऊन करू लागले. एवढ्या दूरच्या यात्रेला जाण्याचे धैर्य खरे तर माझ्यापाशी नव्हते म्हणून मीच चालढकल चालवली होती. पण एक दिवस सायंकाळी त्यांच्यापैकी दोघे माझ्याकडे येऊन म्हणाले, आपण उद्याच यात्रेला

निघू या. मी असमर्थता व्यक्त केली. त्यावर माझ्याशी एक शब्दही न बोलता ते आल्या-पावली तडक निघून गेले. सायंकाळपर्यंत ते आपापल्या घरी गेले नाहीत तेव्हा त्यांच्या नातेवाईकांनी त्यांचा तपास सुरू केला. या प्रयत्नात तिसऱ्याला मिठापुरमच्या जवळ पकडून घरी परत आणण्यात आले. विजयनगरला पोचल्यानंतर दुसऱ्याचे पहिल्याशी भांडण झाले आणि तो आपल्या कानांतील कर्णकुंडले विकून त्या पैशांनी घरी परतला. पहिला आपला चांदीचा करगोटा विकून जगन्नाथपुरीपर्यंतची यात्रा करून परत आला.

माझी आई आणि मोठे चुलते यांनी माझे लग्न करावयाचे ठरवले आणि आमच्या शहरापासून दोन मैल अंतरावरच्या कातेरू गावच्या अद्दकि कुटुंबातील मुलीशी माझे लग्न निश्चित केले. वराने वधूला आणि वधूने वराला पाहून आपल्या पसंतीने निवड करून स्वतःचे लग्न स्वतः जमवण्याचे भाग्य आज तरी भारतातील ब्राह्मणांना स्वप्नांत देखील लाभणार नाही. कदाचित भविष्यकाळात अशी संधी मिळू शकेल. आमचे लोक सर्व प्रकारच्या रूढी आणि परंपरा यांचे गुलाम आहेत. कर्मकांडरूपी भूत त्यांच्यात संचारले की मग ते दया, धर्म, सत्य, सत्कर्म इत्यादि सर्व गोष्टींचा त्याग करायला तयार होतात.

प्राचीनकाळच्या लोकांना बालविवाह माहीतही नव्हता. बालविवाहाची कल्पना देखील त्यांच्या मनात येऊ शकत नव्हती. बालविवाहाची ही अनैसर्गिक प्रथा आचार-रूपी पिशाच्च अंगात संचारल्यामुळेच सुरू झाली आहे. पण ती विधिविहीन नाही. माझ्या कुटुंबियांनी माझा विवाह करण्याचे ठरवले तेव्हा मी तेरा वर्षाचा होतो. त्या वयात मला विवाहाचा खरा हेतू देखील माहीत नव्हता. माझ्याहून चार वर्षांनी लहान असलेल्या माझ्या पत्नीला तर तो माहीत असणे अशक्यच ! माझ्या वयाच्या तेराव्या वर्षी आणि माझ्या सहधर्मचारिणीच्या नवव्या वर्षी आमचा लग्नसमारंभ बाहुलाबाहु-लीच्या लग्नाप्रमाणे साजरा झाला. माझ्या विवाहात माझ्या कुटुंबियांनी अनावश्यक खर्च काही कमी केला नाही. वेश्याशिवाय लग्नाला शोभा नाही म्हणतात. त्यांना बोलावले नाही तर कलंक लागेल, लोकांमध्ये ताठ मानेने चालणे असंभव होईल असा समज.

माझ्या पत्नीचे लग्नापूर्वीचे नांव बापम्मा होते. पण विवाहानंतर माझ्या आईने ते नाव बदलून आपल्या आईचे म्हणजे माझ्या आजीचे 'राज्यलक्ष्मी' हे नाव ठेवले.

माझ्या लग्नानंतर माझी मोठी चुलती आणि माझी आई यांच्यात भांडण सुरू झाले. दोन बायका एकत्र आल्या की वायफळ तंटा होतोच. आज आपल्या देशात दिसणाऱ्या कलहप्रियतेचे मुख्य कारण स्वार्थापोटी आणि दूरदर्शीपणाभावी आपण स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवतो हे आहे. त्यामुळे त्यांच्या अंगी मंदबुद्धिरूपी भूतबाधेचा दोष शिरतो व त्या कलहप्रिय बनतात. जन्मतः कोमल असलेल्या स्त्रीचा तो नैसर्गिक स्वभाव नव्हे.

या गृहकलहाला माझी आईच कारणीभूत होती असे म्हटले तरी चालेल. ती तशी शांत स्वभावाची नव्हती. मत्सरी होती. कुणी एक बोलायचा अवकाश की त्यावर दहा शब्द बोलायची. भांडणाचे बीज टाकायची व आपल्या मानी स्वभावाची चुणूक दाखवायची. तरी पण ती कनवाळू होती. परोपकारवृत्ती, सत्यप्रियता, धैर्य इत्यादि गुण तिची जणू भूषणे होती. तिच्या अंगच्या अनेक गुणांपैकी काही माझ्यातही आले आहेत. मीही मूळचा शीघ्रकोपीच आहे. कुणाच्या हातून एखादी वाईट गोष्ट घडल्याचे दिसले की, मला माझा संताप आवरता येत नाही. अशावेळी मी तडातडा बोलतो. ही वाईट सवय सोडण्याचा मी कित्येकदा प्रयत्न केला पण हा दुर्गुण मला सोडून जाता जात नाही.

कुटुंबातील भांडणे थांबून आपापसातील जिव्हाळा कायम रहावा यासाठी स्थावर जंगम मालमत्तेची वाटणी करून मला वेगळी चूल थाटून देण्याशिवाय माझ्या मोठ्या चुलत्यांना दुसरा उपाय दिसत नव्हता. १८६२ च्या ऑगस्टमध्ये माझ्या पत्नीचे मामा आणि आणखी एक नातेवाईक यांना त्यांनी बोलावले आणि वाटणीची यादी तयार करून माझा अर्धा वाटा मला दिला. माझ्या हिश्श्याला आलेल्या घरात माझ्या आईने वेगळी चूल मांडली. माझे काका आम्हाला नेहमीच सर्वप्रकारची मदत करीत. मातृप्रेमापेक्षा मानलेले प्रेमसंबंध कितीतरी जास्त असतात ना! निराळे झाल्यामुळे दोन कुटुंबांतील भांडण मिटले. मनःशांती आणि स्वाभाविक प्रेमबंधने पुनश्च अधिक दृढ होत गेली. एकत्र कुटुंबात एकमेकांत भांडणे लागून सुख आणि शांती भंग पावत असेल तर कुटुंबातील माया पुन्हा परत यावी यासाठी विभक्त होणे हाच उत्तम उपाय होय.

याच सुमारास माझ्या हातून एक वाईट गोष्ट घडली. फार दिवस माझ्या मनात ते खटकत राहिले. वसुचरित्र हे तेलुगू काव्यातील सर्वोत्तम काव्य होय असे अनेक लोक सांगत. मला आमच्या घरी ताडपत्रावरची जी हस्तलिखिते होती त्यात वरील काव्य आढळले नाही. ते आपल्याजवळ असावे यासाठी मी बेचैन होतो. एक दिवस धीर करून मी आईला वसुचरित्र विकत घेऊन दे असे अजीजीने म्हटले. ते काही माझे पाठ्यपुस्तक नव्हे असे तिला कळले तेव्हा तिने स्पष्ट नकार दिला. पण मी निराश झालो नाही. काहीही करून ते पुस्तक मिळवायचेच असा मी निश्चय केला. त्या पुस्तकाची किंमत साडेचार रुपये होती. मजजवळ फक्त आठ आणे होते. ते दुकानदाराला द्यावे आणि पुढे दरमहा आठ आणे देण्याच्या बोलीवर पुस्तक मिळवून त्याचे अध्ययन करावे असा एक वाईट विचार माझ्या मनात आला. खरे तर दरमहा आठ आणे देण्याची देखील त्यावेळी माझी ताकद नव्हती. फीसाठी म्हणून दरमहा मिळणारे आठ आणे पुस्तकासाठी खर्च करण्याचे मी ठरवले. पुस्तक वाचण्याच्या लालसेने मी अविचारी बनलो आणि ताबडतोब पुस्तकाच्या दुकानात जाऊन माझी इच्छा मी दुकानदाराला बोलून दाखवली. पुस्तक वाचण्याची माझी तळमळ पाहून दुकानदाराला दया आली

आणि पुस्तकाची पूर्ण किंमत देईपर्यंत मी दुकानात बसून पुस्तक वाचावे या अटीवर त्याने मला पुस्तक दिले. रोज जेवण झाल्यावर शाळेत जाण्याचे मी नाटक करी व घरी परत येई. लबाडी फार दिवस लपत नसते. मी शाळेत गैरहजर राहत असल्याची बातमी पुढील महिन्यात माझ्या आईला कळली. त्यावर ती मला रागावली. तशी मी तिला खरी हकीगत सांगून टाकली. फीचे पैसे खाऊसाठी खर्च न करता पुस्तकासाठी खर्च केले म्हणून ती माझ्यावर काहीशी खुशही झाली आणि दोन महिन्यांचे फीचे पैसे देऊन तिने मला पुन्हा शाळेत पाठवले.

या प्रसंगानंतर थोड्याच दिवसांनी मी आजारी पडलो. माझा आजार दिवसेंदिवस वाढत गेला. लहानपणापासून खोकल्याचा त्रास होताच. त्याचबरोबर अजीर्ण आणि अतिसार यांचाही त्रास सुरू झाला. गोऱ्या डॉक्टराने आणि वैद्याने मला कित्येक महिने अनेक औषधे देऊन पाहिली पण रोग मुळीच हटला नाही. माझ्या शरीरातील रक्त आणि मांस जणू शोषले गेले होते आणि नुसता हाडांचा सापळा उरला होता. सर्व वैद्यांनी माझ्या आजारापुढे हात टेकले आणि निराश होऊन मला औषधे देणे बंद केले. अशाप्रकारे १८६३ अखेरपासून तो १८६४ संपेपर्यंत मी जन्म व मृत्युमध्ये हेलकावे खात होतो. साऱ्या वैद्यांनी आशा सोडलीच होती. शेवटी खिमाणी नावाच्या एका वैद्याने भाजीपाल्याचे औषध सुरू केले. अखेरीला त्याच्याच औषधाने मी पुन्हा बरा झालो.

१८६५ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर मी पुन्हा पूर्वीच्याच शाळेत तिसऱ्या इयत्तेत बसू लागलो. आजारामुळे आधीच्या वर्षी मी तिसरी इयत्ता सोडली होती. या वर्गात मी केवळ सहाच महिने शिकलो. तरी देखील वार्षिक परीक्षेत मी पहिला क्रमांक पटकावला. त्यामुळे पुढील वर्षी मला फी माफ झाली. तेव्हापासून शाळेच्या शेवटच्या इयत्तेपर्यंत म्हणजेच शाळेत शिकत होतो तोपर्यंत शिक्षणासाठी मला फी द्यावी लागली नाही.

त्या काळातील एक प्रसंग मला चांगलाच आठवतो. मी चौथ्या इयत्तेत शिकत होतो. एक दिवस दुपारी आमचे जिल्हा न्यायाधीश हेन्री मॉरिससाहेब आमच्या शाळेची पाहाणी करावयास आले. "तुमच्या शाळेतील सर्वांत चांगल्या वर्तणुकीच्या मुलाचे नाव लिहा," असे म्हणून त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला एकेक कागदाचा तुकडा दिला. विद्यार्थ्यांना परस्परांशी चर्चा करण्याची संधीच नव्हती. त्यामुळे ज्याला जे नाव सुचले ते विद्यार्थ्यांनी लिहिले. सर्व चिठ्ठ्या पाहिल्या तेव्हा बहुतेक विद्यार्थ्यांनी माझे नाव लिहिल्याचे आढळले. न्यायाधीश महोदयांना चांगल्या वर्तणुकीच्या विद्यार्थ्याला बक्षीस द्यावयाचे होते. त्यासाठी त्यांनी नावे लिहावयास सांगितली होती. बक्षीस मला मिळाले हे सांगण्याची गरज नाही. न्यायाधीश साहेबांनी मला पाच रुपये किंमतीची पुस्तके निवडण्यास सांगितले. मी पुढील इयत्तेतील पुस्तके आणि एक शब्दकोष निवडला. त्या शब्दकोषावर न्यायाधीश महा-

राजांची सही होती. ती पाहिली की मला अपार आनंद व्हावयाचा. मला बक्षीस मिळालेली सर्व पुस्तके हरवली आहेत. पण चांगल्या वागणुकीबद्दल मिळालेला शब्दकोष मात्र आजही माझ्या घरी जपून ठेवलेला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये माझ्याविषयी चांगले मत होते. तरी देखील त्या काळात मी कधी खोटे बोललोच नाही असे म्हणता येणार नाही. मी एकदा खोटे बोललो होतो. त्याचा उल्लेख न करणे चुकीचे होईल.

त्या काळात वीस रुपयांपेक्षा जास्त पगाराच्या सरकारी नोकरीस पात्र ठरण्यासाठी एक सामान्य परीक्षा द्यावी लागे. ही परीक्षा इंग्रजी तसेच तेलुगूमध्ये वेगवेगळी घेतली जाई. ही परीक्षा आणि कॉलेजची इंटरमीजिएट परीक्षा उत्तीर्ण झाल्यावरच ती खास परीक्षा देता येत असे. या सामान्य परीक्षेची एक प्रश्नपत्रिका माझ्या पाहण्यात आली. मला ती अगदी सोपी वाटली. तेव्हा ती परीक्षा आपण द्यावी अशी तीव्र उत्कंठा माझ्या मनात उत्पन्न झाली. पण परीक्षेसाठी एक अट होती. अठरा वर्षे पूर्ण झाल्यावरच तिला बसता येत असे. माझे वय त्यावेळी अठरा वर्षांचे नव्हते. तरीही ती परीक्षा द्यायला मी उतावीळ झालो असल्यामुळे अर्जात मी माझे वय एकोणीस वर्षे लिहिले. त्याच वर्षी दोन्ही भाषांच्या परीक्षेत उत्तीर्ण झालो आणि उत्तर सरकार जिल्ह्यात दुसरा नंबर मिळवला. जाणून बुजून हे एकच असत्य मी त्या काळात बोललो होतो.

चौथ्या इयत्तेत आणि वार्षिक परीक्षांमध्ये देखील मीच पहिला नंबर पटकावला. त्या परीक्षांत एकूण ४८० मार्कांपैकी मला ४२० मार्क मिळाले. शाळेचे त्यावेळचे परीक्षक बवर्ससाहेबांना माझ्या बुद्धिमत्तेचे कौतुक वाटले. त्यांनी मला मुद्दाम आपल्या कचेरीत बोलावले आणि जवळ बसवून प्रवेशपरीक्षा पास झाल्यावर मद्रासला जाऊन मी बी. ए. पर्यंत शिकावे असा उपदेश केला.

इ. स. १८६७ मध्ये मी पाचव्या यत्तेत म्हणजेच प्रवेशपरीक्षेच्या वर्गात गेलो. त्या वर्षी माझा अभ्यास चांगला झाला नाही. माझे चुलते आजारी पडून काही महिने अंथरुणाला खिळले आणि अखेरीला त्यातच त्यांना मृत्यू आला. त्यांच्या आजारपणामुळे माझेही मन अस्वस्थ होते. मी शाळेत नियमितपणे जाऊ शकलो नाही की शाळेच्या पुस्तकांतील अभ्यास मला करता आला नाही. शिक्षण सोडून एखादी नोकरी कर असे माझे अनेक नातेवाईक मला सांगू लागले. अखेरीला त्यांनी माझ्या आईमार्फतही मला समजावले. पण शिक्षण सोडण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. तरी देखील नातेवाईकांच्या आणि आईच्या आग्रहामुळे नोकरी करायला मी तयार झालो आणि आमच्या भागाचे न्यायाधीश मॉरिससाहेब यांचेकडे नोकरी मागण्यासाठी गेलो. माझ्या सामान्य परीक्षा झालेल्या होत्या आणि त्या दृष्टीने सरकारी नोकरीला लागणारी पात्रता माझ्यापाशी होती. मला बक्षीस दिल्यापासून मॉरिससाहेब माझ्या शिक्षणाची आणि खुशालीची

नेहमी चौकशी करीत. माझ्याविषयी त्यांना वात्सल्यही वाटे. मी त्यांना भेटलो, तेव्हा त्यांनी माझ्या चुलत्यांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केले. माझे सांत्वन केले आणि मोकळ्या असलेल्या जागांपैकी शेवटच्या जागेवर मला नक्की नोकरीवर घेण्याचे आश्वासनही त्यांनी मला दिले. पण मला मिळावयाची जागा परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या अशा एका माणसाला दिल्याचे दोनचार दिवसानंतर मला कळले. शिरस्तेदारसाहेबांनी शंभर रुपयाची लाच खाऊन ती जागा त्या अपात्र माणसाला दिली होती. खरे तर शिरस्तेदार माझ्याच जातीचा, नारायणप्पा नावाचा आमच्या कुटुंबाचा एक मोठा हितचिंतक माणूस होता. पैशाची ऊब लागली की मग मैत्री आणि नातेगोते यांना कोण विचारतो ?

ती नोकरी मला मिळाली नाही हे माझ्या दृष्टीने चांगलेच झाले. ती नोकरी मी पत्करली असती तर शेंबडात लडबडणाऱ्या माशीप्रमाणे रात्रंदिवस त्याच कामात गुरफटलो असतो आणि माझी दुर्गती झाली असती.

अशाप्रकारे नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नाला अपयश आल्यानंतर भावी काळात कधीही कोर्टात कारकुनी पत्करायची नाही अशी मी शपथ घेतली आणि पुन्हा शाळेत जायला प्रारंभ केला. पण पुन्हा एक विचित्र घटना होऊन माझ्या शिक्षणात विघ्न निर्माण झाले.

त्यावेळचे आमचे मुख्याध्यापक वैयापुरि मुदलियार यांचे इंग्रजीचे विशेष अध्ययन झालेले नव्हते. त्यांना आमच्या पुस्तकांतील इंग्रजी कविता शिकवता येत नसत. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने या मुख्याध्यापकाची बदली करवून एखादा कार्यक्षम माणूस त्यांच्या जागी आणायला लावणे हे आपले कर्तव्य आहे असे माझ्या मनाने पक्के घेतले. माझ्या वर्गबंधूंनी माझ्या या विचाराला पाठिंबा दिला. तात्काळ जिल्ह्याच्या शिक्षण विभाग अधिकाऱ्याच्या नावावर मी एक विनंती अर्ज लिहिला आणि त्यावर वर्गातील विद्यार्थ्यांच्या सह्या घेतल्या. त्यावर इतर वर्गांतील विद्यार्थ्यांच्या सह्या घेण्यासाठी तो अर्ज मी माझा बालमित्र कनपर्ति लक्ष्मणय्याला देऊन एका रविवारी त्याला पाठवून दिले.

कशी कोण जाणे पण या विनंती अर्जाची बातमी आमच्या मुख्याध्यापकांच्या कानी गेली. त्यांनी आमच्या वर्गातील एक विद्यार्थी मोंड्रेटि रामचंद्र याला तो अर्ज आपल्यापाशी आणून देण्यासाठी तयार केले. रामचंद्राच्या सहीसाठी तो अर्ज त्याला दिला तेव्हा अर्जावर सही करतो म्हणून सांगून त्याने तो घरी नेला आणि पाठीमागच्या रस्त्याने आमच्या मुख्याध्यापकांच्या हाती दिला.

दुसऱ्या दिवशी मुख्याध्यापकांनी चौथ्या यत्तेत जाऊन माझ्या मित्राला जबर मारहाण केली. माझ्या मनाला असह्य वेदना झाल्या. त्यावेळच्या माझ्या मनोव्यथेचे वर्णन मला करता येणार नाही. मुख्याध्यापकांचे माझ्या मित्राला केवळ मारून समाधान झाले नाही. त्यानंतर ते माझ्या वर्गात आले आणि अनावर संतापाच्या भरात त्यांनी मला मूर्ख म्हटले. माझी नालस्ती केली. त्यावर मी ताडदिशी उठलो आणि वर्ग सोडून निघून

गेलो. माझ्या पाठोपाठ वर्गांतील सर्व विद्यार्थी बाहेर पडले आणि आपापल्या घरी निघून गेले.

न्याय्य संताप येई तेव्हा माझ्या मनातला उद्रेक आणि हट्ट यांना मर्यादा राहात नसे. अजूनही अशावेळी मी गुरु, नातेवाईक, मित्र किंवा कोणी शक्तिशाली माणूस यांची कुणाचीच पर्वा करीत नाही. उलट आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी शेवटपर्यंत झगडा करतो. मुख्याध्यापकांची बदली होईपर्यंत आपला प्रयत्न चालू ठेवण्याचा मी मनोमन निश्चय केला. शाळेतील अनेक सहाय्यक अध्यापकांनी आम्हाला प्रोत्साहन दिले. त्यामुळे आम्ही सर्वांनी एक होऊन शाळेत जाणे बंद केले. म्हणजेच आम्ही हरताळ पाडला. तेव्हा आमच्या मुख्याध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत आणण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्यांची सर्व खटपट वाया गेली.

आम्ही सर्वांनी दुसऱ्या दिवशी एक सामूहिक अर्ज तयार केला. त्यावर बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या सह्या घेऊन एक प्रत शिक्षण संचालकांच्या नावे मद्रासला आणि दुसरी शाळा तपासनीसांकडे विशाखापट्टणम येथे पाठवली. तसेच त्याचदिवशी शिक्षणाधिकारी कर्नल वाग्डानल्ड आणि शाळा तपासनीस ग्रिगसाहेब यांच्या नावे ताराही पाठवल्या. त्यानंतर थोड्याच दिवसांनी ग्रिगसाहेब राजमहेंद्रवरमला आले. आम्हा सर्व विद्यार्थ्यांना बोलावून चौकशी केली आणि मग आमचे मुख्याध्यापक वैयापुरी मुदलियार यांची बदली करण्याची शिफारस शिक्षणाधिकाऱ्यांना केली. शिक्षणाधिकाऱ्यांनी वैयापुरी मुदलियार यांची बरसापूर येथे बदली केली आणि त्यांच्या जागी चेंगल्व कुप्पुस्वामी शास्त्री यांची नेमणूक केली. तेव्हा मग आम्ही सर्व विद्यार्थी परत शाळेत गेलो.

त्याच काळात मी कविता करावयास सुरुवात केली. त्यावेळी मी मूर्तिपूजक होतो. उपवास, व्रतवैकल्ये इत्यादी देवाला अत्यंत प्रिय असतात अशी माझी श्रद्धा होती. त्यामुळे प्रारंभी मी वेणुगोपालस्वामी आणि मार्कंडेयस्वामी यांच्या स्तुतिपर असे दोनशे श्लोक 'कंद' छंदात रचले. पण ते मला स्वतःलाच आवडले नाहीत म्हणून मी कुठेतरी फेकून दिले. ते पुन्हा कधीच मिळाले नाहीत.

त्याकाळात दर्शनशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांची मला अतिशय आवड होती. मंत्राच्या प्रभावावर माझा खूपच विश्वास होता. मी हजारो वेळा गायत्रीमंत्राचा जप केला होता. हनुमान मंत्र आणि राममंत्र यांची देखील मी संथा घेतली होती. अनेक आठवडे त्या मंत्रांचा मी जप केला होता. मंत्राच्या प्रभावाने भूतप्रेत आणि पिशाच्च यांना पळवून लावता येते असा माझा विश्वास होता. परंतु आपण स्वतः भूतपिशाच्च डोळ्यांनी पाहिले पाहिजे असे वाटे. म्हणून ज्या घरांना भूतपिशाच्चांची बाधा आहे असे कानावर येई त्या सर्व घरी मी जात असे. भगतांच्या मंत्रतंत्रविद्येचा मी अभ्यास सुरू केला. मांत्रिकांकडे जाऊ लागलो. मला एक तरी भूत दाखवा असे मी भूत काढणाऱ्यांना

विनविले पण कोणीही मला भूत दाखवू शकले नाही.

एकदा एका भगताने मला भूत दाखवण्याचे कबूल केले. एक दिवस रात्री शहराबाहेरील वटवृक्षापाशी तो मला घेऊन गेला. "भूत पाह्यलेस तर तू घाबरशील" असे म्हणून स्वतःची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करू लागला. मी त्याला सांगितले, "मी घाबरणार नाही कृपा करून मला भूत दाखव". त्यावर त्याने माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. "तू नसशील घाबरणार पण सरकार मला सजा करील ना !" अशाप्रकारे माझी निराशा करून तो निघून गेला.

मध्यरात्रीच्या वेळी स्मशानात भुतांचा संचार होत असतो असे लोक नेहमी म्हणतात. म्हणून भुते पाहण्याच्या उत्कंठेने अनेक वेळा रात्रीच्या वेळी कुणाला न सांगता मी एकटाच स्मशानात जाई. पण मला पिशाच्चाने कधी पछाडले नाही. ते न पाहताच मी परत येई.

याच सुमारास माझ्या पूर्वीच्या श्रद्धा आणि विश्वास यात बदल होत चालला. कुठून तरी केशवचंद्र सेन यांची भाषणे माझ्या हाती पडली. मी मोठ्या आवडीने ती भाषणे वाचली. ती भाषणे मी वाचली आणि ज्या श्रद्धा मी संपूर्णपणे सत्य आहेत असे समजत होतो त्यांना तडा बसू लागला. याचवेळी बंदन (मच्छलीपट्टणम) हून श्री. आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम हे आमच्या शाळेचे सहाय्यक मुख्याध्यापक म्हणून आले. ते नेहमी आम्हाला ब्रह्म-समाजाचे तत्त्वज्ञान समजून सांगत. त्यांच्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनाने विशिष्ट विषयांची चर्चा करण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांचा एक संघ स्थापन केला. आम्ही पाच-सहा विद्यार्थी श्री. लक्ष्मीनरसिंहम यांच्या घरी अथवा माझ्या घरी जमू लागलो. त्याकाळी चार-पाच जणांनी एकत्र जमून बैठक करणे हा अपराध मानला जात असे. त्यामुळे अशिक्षित आणि मूर्ख लोक आम्ही रस्त्यावरून एकत्र जात असलो की आमच्याकडे बोट दाखवून म्हणत, "अरे, हे तर मिटींग करणारे लोक आहेत."

त्यावर्षी देखील वार्षिक परीक्षांमध्ये मला बक्षीस मिळाले. त्याच वर्षी मी कॉलेजची प्रवेश परीक्षा दिली, परंतु उत्तीर्ण होऊ शकलो नाही.

१८६९ मध्ये पुन्हा आजारपणाने माझा गळा पकडला. पण घरी आराम करून जरा प्रकृती सुधारली की मी कविता करीत असे. लहानपणापासूनच माझ्या कल्पना, शक्याशक्यतेचा विचार न करता हवेत भराऱ्या मारीत असत. आपणही महाकवी व्हावे आणि उत्कृष्ट काव्यरचना करावी असा काव्याचा अभ्यास करताना माझ्या मनांत विचार येई. शुद्ध तेलुगूत एक दोन काव्येच आहेत, 'निराष्टद्य' काव्याची रचना एकाच कवीने केली आहे आणि निर्वचन (गद्यरहित) काव्य देखील एकच लिहिले गेले आहे असे मला दिसून आले. वरील तिन्ही लक्षणे एकाच काव्यात गोवून एक असाधारण काव्यप्रकार सुरू करावा असा संकल्प तेव्हापासून माझ्या मनात निर्माण झाला माझ्या बाबतीत

सामान्यपणे संकल्प करणे आणि तो कार्यान्वित करणे यात फारसे अंतर पडत नाही. जगाचे ज्ञान आपल्या ठायी नाही, पांडित्यातही आपली फारशी गती नाही असा विचार-ही मनात न आणता मी "शुद्धांध्र निरोसूथर्वचन नैषध" (शुद्ध तेलुगू भाषेत पद्य काव्या-च्या स्वरूपातील नैषध) या नांवाचे नलचरित्र लिहिण्याचा संकल्प सोडला आणि तो अंमलातही आणण्याचा निश्चय केला. या दरम्यान 'रसिक मनोरंजनमु' नावाच्या एका संमिश्र प्रबंध काव्याची रचना करण्यासही मी प्रारंभ केला.

त्यावेळी चित्रपु कामराजु नावाचे एक गृहस्थ जिल्हा कोर्टात सरकारी वकील होते. त्यांना इंग्रजी येत नव्हते. त्यांना जिल्हा कलेक्टर आणि अन्य प्रमुख अधिकाऱ्यांशी इंग्रजीत पत्रव्यवहार करावा लागे. दररोज सकाळी तीन तास त्यांच्या घरी जाऊन पत्रव्यवहार इत्यादि लेखनकार्य करण्याचे काम त्यांनी मला दिले. मला दरमहा वीस रुपये पारिश्रमिक मिळणार होते. घरात वेश्या ठेवणे ही प्रतिष्ठेची बाब आहे असे मानणाऱ्या जुन्या संस्कृतीची ते भलामण करीत. पण वेश्यांच्या बाबतीत माझे विचार वेगळे होते. कारण मी आधुनिक संस्कृतीचा पुरस्कर्ता होतो. मी त्या वकील महाशयांच्या घरी काम करायला जाई तेव्हा ती वेश्या वकीलसाहेबांच्या जवळ बसून प्रेमालाप करी हे मला मुळीच आवडत नसे. म्हणून पहिल्याच महिन्यात वेतन घेऊन मी ते काम सोडले.

त्यानंतर राजमहेंद्रवरम्‌मधील विभागीय शाळेचे मुख्याध्यापक श्री. बारी साहेब आणि तुरुंगाधिकारी कॅप्टन हाल्लेट्ट यांना तेलुगू शिकविण्यासाठी माझी नियुक्ती झाली. ते दोघे मला दरमहा पस्तीस रुपये देत असत.

१८६९ मध्ये मी परीक्षेला बसलो नाही. १८७० साली बारी साहेब प्रकाशित करीत असलेल्या 'गोदावरी एज्युकेशनिस्ट' नावाच्या मासिक पत्रिकेत मी तेलुगू भाषांतर करू लागलो. शाळेत अध्ययन न करताच मी १८७० मध्ये विश्वविद्यालयाची प्रवेश-परीक्षा दिली आणि तीत उत्तीर्ण झालो.

३. १८७० ते १८८०

प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काही महिन्यांनी, बहुधा एप्रिल १८७२ मध्ये राजमहेंद्रवरमच्या सरकारी विभागीय शाळेत दरमहा २५ रु. पगारावर सहाय्यक अध्यापक या जागेवर माझी नियुक्ती झाली. त्या जागेवर मी फार दिवस काम केले नाही, तरी त्या काळात मी दोन तीन वर्गांना इंग्रजी, गणित आणि भारताचा इतिहास शिकवीत असे. या शाळेतील विद्यार्थ्यांनासुद्धा माझ्याविषयी श्रद्धा आणि भक्ती वाटे. तसेच माझ्या सहाध्यापकांतही माझ्याविषयी आदराची भावना होती. वेलूरि लक्ष्मीनरसिंहम, दुरिसेटि शेषगिरीराव पंतुलु, वेपा कृष्णमूर्ति पंतुलु वगैरे माझ्या शाळेत चौथ्या इयत्तेत शिकत असत. कृष्णमूर्तीचे भाऊ वेपा राममूर्ति पंतुलु त्या काळात आमच्या शाळेत सहाय्यक मुख्याध्यापक होते. एक दिवस कृष्णमूर्तीने माझ्याशी काहीसे अनादरपूर्ण वर्तन केले, तेव्हा मी त्याला बाकावर उभे केले. चार-पाच मिनिटांनी माझे एक सहाध्यापक माझ्या वर्गात आले आणि 'काही खाजगी' सांगायचे आहे असे म्हणून मला वर्गाबाहेर घेऊन गेले आणि म्हणाले, "तो मुलगा राममूर्ति पंतुलु यांचा धाकटा भाऊ आहे." "होय, मला माहीत आहे" असे म्हणून मी परत माझ्या वर्गात आलो. संध्याकाळी पाच वाजता शाळा सुटल्यावर राममूर्ति पंतुलु स्वतः माझ्याकडे आले. निस्संकोचपणाने मी आपले कर्तव्य बजावल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आणि माझे अभिनंदन केले. कृष्णमूर्ति पंतुलु यांना देखील माझ्याविषयी सदैव आदरच वाटे. कारण पुढे १८७६ मध्ये मद्रासच्या प्रेसिडेंन्सी कॉलेजात शिकत असताना त्यांनी मला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, "आपणाविषयी माझ्या मनात जन्मभर आदराची भावनाच राहील."

परस्वाधीन राहून काम करावे लागू नये आणि स्वतंत्र जीवन जगता यावे यासाठी वकील होण्याचे मी ठरविले. माझे बालपणचे वर्गमित्र आणि नातेवाईक श्री. चलपालि बापय्य पंतुलु माझ्याच शाळेत शिक्षक होते. ते माझे घनिष्ट मित्र होते. शिक्षकाची नोकरी करीत असतानाच आम्ही दोघांनी मिळून वकिलीचे शिक्षण घ्यावयास सुरुवात केली. १८७१ च्या श्रावण महिन्यात आम्ही क्रिमिनल हायरग्रेडच्या परीक्षेला बसलो. परीक्षेचा निकाल १८७२ मध्ये सरकारी गॅझेटमध्ये प्रकाशित झाला. आम्ही दोघे उत्तीर्ण झालो होतो.

आता भूतपिशाच्च, ज्योतिषशास्त्रांतील मुहूर्त, जन्मकुंडली, शकुन इत्यादींवरचा माझा विश्वास पूर्णपणे उडाला होता. या संबधीचा माझा अविश्वास लोकांपुढे व्यक्त करण्याची मला लवकरच संधी मिळाली. माझ्या घराच्या परसदारी एक केळीचा खुंट होता. त्याच्या टोकाला फूल न येता त्याच्या गाभ्याच्या मध्यभागातून फूल फुटून त्याला घड लागला होता. ही गोष्ट अशुभ आहे म्हणून केळीचा खुंट ताबडतोब तोडून टाक असा माझ्या नातेवाईकांनी आणि शेजारपाजाऱ्यांनी मला सल्ला दिला. मी त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले आणि खुंट तोडला नाही. त्याला केळी लागली तेव्हाच तो तोडला. पण रोप उपटावे लागले. कारण रोपाच्या जागी मला वाफा बनवावयाचा होता. त्याच सुमारास माझ्या घराच्या छताच्या पोकळीत मधमाशांनी पोळे बांधले. छतात पोळे लागणे अशुभ आहे म्हणून ते तात्काळ काढून टाकून ब्राह्मणांना शांती करावयास सांग असे त्याहीवेळी सर्वांनी सांगितले. मी स्पष्ट नकार दिला. तेव्हा सर्व-जण नाईलाजाने गप्प बसले.

१८७२ च्या ज्येष्ठ महिन्यात कोरंगी नावाच्या गावी इंग्रजी शाळेत दरमहा तीस रुपये पगारावर माझी मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. शुभ दिवस आणि मुहूर्त पाहूनच मी तेथे जावे म्हणून माझ्या कुटुंबियांनी आणि अन्य लोकांनी आग्रह केला. पण याही त्यांच्या सल्ल्याची मी पर्वा केली नाही आणि ऐन अमावस्येच्या दिवशी नोकरीवर रुजू झालो. तेथील नोकरीच्या काळातच दुय्यम दर्जाची भाषांतरे करण्याची (Translation Lower Grade) इंग्रजी आणि तेलुगू दोन्हीतही एक विशेष परीक्षा दिली आणि दोन्हीत उत्तीर्ण झालो.

माझ्या आईचा भूतपिशाच्चांवर विश्वास होता हे मी मागे सांगितलेच आहे. कोरंगीत राहात असतानाही तिला असा भुताचा भास व्हायचा. एक दिवस गावातील काही लोक एका ब्राह्मण योग्याला घेऊन आमच्या घरी आले. तो चांगला दणकट शरीराचा होता. भूतबाधा काढणारा म्हणून त्याची ख्याती होती. दाढी आणि नखे वाढलेली, पायांत खडावा, हातात काठी, शरीरावर भगवी वस्त्रे, कपाळावर कुंकवाचा पट्टा होता. दिसायला महाभयंकर वाटत होता. तो गांजा पीत असे. मंत्र-तंत्र तसेच भूतप्रेते यांवर माझा विश्वास नव्हता तरीही मी त्याला आपल्या घरी ठेवून घेऊन जेऊ खाऊ घालण्याचे आणि आईची तब्येत सुधारली तर चांगल्यापैकी बक्षीसही देण्याचे त्याला आश्वासन दिले. तो तयार झाला आणि माझ्या घरी येऊन धडकला. आल्या दिवसापासून काही न काही बहाणा करून माझ्याकडून पैसे उकळण्याचा तो प्रयत्न करी. आईची प्रकृती ठीक झाल्यावरच मी पैसे देईन असे सांगून पैसे देण्याचे मी स्पष्ट-पणे नाकारले. तेव्हा तो अतिशय संतापला. लाललाल डोळे करून तुमचे नुकसान करीन अशी त्याने धमकी दिली. मीही भडकलो आणि आमच्या शाळेच्या चपराशाला सांगून

त्याची मानगूट पकडून त्याला बाहेर हाकलून लावले. तेव्हा तो दुसऱ्या मोहल्ल्यात गेला. तेथे एक खोली घेतली. स्वच्छ करून तिला रंग दिला. तेथे बसून काही मंत्रतंत्र केले आणि कुठल्यातरी यंत्राच्या सहाय्याने मला मारण्याची त्याने धमकी दिली. जप करू लागला. माझे मित्र घाबरले. मी त्या योग्याचे पाय धरून त्याची क्षमा मागावी असा त्या सर्वांनी मला सल्ला दिला. मी मात्र त्यांचा हिरमोड केला. तो योगी रात्री-पर्यंत न जेवता अंधारातच 'ही' 'हा' असे काहीतरी ओरडत बसे. पण पोटात अन्न नसल्यामुळे किंवा जाग्रणाने किंवा गांजाच्या नशेमुळे अथवा दुसऱ्या कुठल्या तरी कारणाने म्हणा तो हेलपाटत खाली कोसळला. कुणीतरी आपल्याला ढकलले या विचाराने तो भयभीत झाला. त्यामुळे त्याला नंतर ताप चढला. दुसऱ्या दिवशी सकाळी काही लोक त्याला भेटायला गेले तेव्हा त्यांना त्याने सांगितले की मी त्याच्यावर शरभ सालव मंत्राचा प्रयोग केला असल्यामुळे देवाने येऊन त्याला खाली पाडले आहे आणि देव लवकरच त्याला ठार मारील. मला आधीच ही बातमी कळली होती. पण दोन दिवस मी तिकडे दुर्लक्ष केले. तो योगी दिवसेंदिवस अशक्त होत चालला होता आणि ताप खूप चढला की वातात बडबडताना सारखे माझे नाव घेत होता. तेव्हा मला त्याचा दया आली. मी त्याच्या घरी गेलो. मी तुझे मुळीच वाईट चिंतलेले नाही असे त्याला शपथपूर्वक सांगितले आणि त्याला घरी घेऊन आलो. तो पूर्णपणे बरा होण्यास बरोबर एक महिना लागला.

१८७४ च्या आषाढ महिन्यात कोरंगीची शाळा सोडून राजमहेंद्रवरम जवळ चार मैलावर असलेल्या धवलेश्वरला गेलो. तेथील इंग्रजी शाळेत ४४ रु. दरमहा पगारावर मुख्याध्यापक म्हणून माझी नेमणूक झाली. त्याच सुमारास कोक्कोंड वेंकटरत्नम पंतुलु हे स्त्रीशिक्षणा विरूद्ध 'आंध्रभाषा संजीवनी' नावाच्या नियतकालिकांद्वारे प्रचार करीत असत. मीही त्यांच्या विचारांचे खंडन करणारे व स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करणारे लेख 'पुरुषार्थ प्रदायिनी' या पत्रात लिहावयास सुरवात केली.

१८७५ मध्ये संक्षिप्त लिहिण्यासंबंधीची–सारांश काढण्याची (Precis Writing) परीक्षा उत्तीर्ण झालो. परीक्षा देण्यासाठी मी राजमहेंद्रवरमला गेलो तेव्हा तेथील राज-नीतिशास्त्रशाळेचे अध्यक्ष मेटकाफ साहेब यांच्याशी माझा प्रथम परिचय झाला. संक्षिप्त लेखनाची परीक्षा मी पास झालो असल्यामुळे सबमॅजिस्ट्रेटपदासाठी आवश्यक असलेली पात्रता माझ्यापाशी होती. माझी सिव्हिल हायर ग्रेड परीक्षा झाली असती तर पहिल्या दर्जाचा वकील म्हणून काम करण्यास आणि सबजज्जपदासाठी देखील मी पात्र ठरलो असतो. तथापि कित्येक वकील मित्रांनी मला या पेशात स्वातंत्र्य नाही आणि प्रामाणिकपणे पैसा मिळवणेही शक्य नाही असे सांगितले. तेव्हा वकिली पेशा बाबत माझ्या मनात तिरस्कार निर्माण झाला आणि मी सिव्हिल हायर ग्रेड परीक्षा दिली नाही.

पुढे स्वत:चे विचार मांडण्यासाठी स्वत:ची एक पत्रिका असावी असे मला वाटू लागले आणि १८७४ च्या आश्विन महिन्यापासून 'विवेकवर्धिनी' नावाची चार मोठ्या पानांची एक छोटीसी तेलुगू मासिक पत्रिका मी सुरू केली. भाषेचा विकास आणि देशाची उन्नती असे दोन मुख्य उद्देश ही पत्रिका सुरू करताना माझ्यापुढे होते. भाषेचा विकास साधण्याच्या दृष्टीने तेलुगूत सोज्वळ आणि सोप्या भाषेत गद्य लिखाण करावे असा माझा हेतू होता. देशोन्नतीसाठी राजकीय क्षेत्रात कार्य करण्यापेक्षा जनतेत पसरलेला अनाचार आणि अनीती नष्ट करून तिला विकासाचा मार्ग दाखवणे, तिला चारित्र्यवान बनवून, शिक्षण, सामाजिक जाणीव, नीति, धर्म इत्यादी क्षेत्रांमध्ये सर्वांगीण प्रयत्न करणे आवश्यक होते. देशाच्या उन्नतीचा हाच खरा अर्थ होता. मानवी शरीराच्या हातपाय इत्यादि सर्व अवयवांची योग्य प्रमाणात वाढ होणे म्हणजेच त्याची शारीरिक उन्नती होय. केवळ मस्तक अथवा पाय यांची अवास्तव वाढ होणे म्हणजे काही उन्नती नाही. उलट ते व्यंगच मानले जाते. तीच गोष्ट देशाच्या बाबतीत. नीति, धर्म, आचार इत्यादी सर्व सामाजिक अंगांमध्ये जनतेचा सारखाच विकास झाला तरच देशाची अभ्युन्नती झाली असे म्हणता येईल असे मला वाटते.

त्या काळात सरकारी अधिकाऱ्यांनी पैसे घेणे ही मामूली गोष्ट मानली जात असे. लाच खाणे हा अपराध नव्हे तर नोकरी करतानाचा तो धर्मच आहे असे सर्वांना वाटे. सरकारी अधिकाऱ्यांत पसरलेली ही लाचलुचपत नाहीशी करणे हेही आमचे एक ध्येय होते. लाच देणारी जनता आणि लाच खाणारे अधिकारी यांचा नैतिक विकास झाल्याशिवाय लाचलुचपतीचा अंत होणे अशक्य होते. म्हणून जनतेची नैतिक पातळी उंचावणे हे आमच्या पत्रिकेचे आणखी एक उदिष्ट होते. व्यभिचार आदी करणे म्हणजे अनाचार आणि पाप आहे असे समजले जात नाही तोवर नैतिक विकास कसा होणार ? त्यासाठी सर्व जातीमध्ये रूढ असलेल्या अंध रूढींचा शेवट करणे हे आणखी एक उद्दिष्ट होते. तुळशीमाळा, रुद्राक्षमाळा इत्यादी बाह्यचिन्हांपेक्षा धर्माच्या दृष्टीने सदाचार अधिक श्रेष्ठ होय असे जनता मानीत नाही तोवर या दुराचारांपासून (हे दुराचार म्हणजेच धर्म असे लोक मानू लागतील) धर्माची मुक्तता होणार नाही. यासाठी धर्माच्या विशुद्ध तत्त्वांचा प्रचार करणे जरूर आहे. पत्रिकेचे हेही एक उद्दिष्ट होते. एकूण वरील उत्कृष्ट उद्दिष्टांसाठी आमच्या 'विवेकवर्धिनी'चा जन्म झाला.

लाचलुचपतीला विरोध केला की सरकारी अधिकारी चिडणार, वेश्यागमनाचा निषेध केला म्हणजे वेश्यागमनी नाराज होणार, जुन्या अंधश्रद्धांवर झोड उठवली की अडाणी लोक तुटून पडणार, अनैतिक बाह्यावडंबर माजवणारे धर्मविरोधी होत असे म्हटले की भटभिक्षुक संतप्त होणार हे उघड होते. आपल्या पत्रिकेच्या उद्दिष्टाची पूर्ती करायची असेल तर आपणांस अशा सर्व प्रकारच्या असंतोषाकडे दुर्लक्ष केले पाहिजे

याची आम्हास जाणीव होती.

स्त्रीशिक्षणाच्या आवश्यकतेवर अनुकूल-प्रतिकूल पत्रिकांमधून टीके-प्रतिटीकेची जी लढाई चालली होती तिचा प्रभाव धवलेश्वरमवर पडल्याशिवाय राहिला नाही. स्त्री-शिक्षणप्रसाराच्या आमच्या प्रयत्नाला यशही आले. मुलींनाही शिक्षणाची नितांत गरज आहे याची जाणीव अनेक प्रमुख स्थानिक व्यक्तींना होऊ लागली. या मंडळींनी वर्गणी गोळा करून १८७४ च्या सप्टेंबरमध्ये एक मुलींची शाळा सुरू केली. पुढे त्या शाळेला गावकऱ्यांचाही पाठिंबा मिळाला. आजतागायत ती शाळा अखंड चालू आहे. ज्या काळात पुरुषांमध्ये देखील शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नव्हता अशा परिस्थितीत आणि त्या काळांत एका लहानशा गावी लोकांनी पैसे जमा करून शाळा स्थापन केली ही गोष्ट आपणास विस्मयकारक वाटेल. एखादी चांगली गोष्ट करावयाची ठरवली तर ती करणे कधीच अशक्य नसते असे मला वाटते.

सत्तेने मदोन्मत्त झालेल्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा मी सतत परिस्फोट करीत होतो त्यामुळे माझ्या विरोधकांची संख्या हळुहळू वाढतच गेली. त्या काळात वेश्या-गमनींची संख्या बेसुमार वाढली होती. न्यायखात्यातील वरिष्ठपदांवरील सर्व लोकां-कडे रखेल्या होत्या. या अधिकाऱ्यांच्या घरी कोणी स्वतः उपवस्त्र ठेवणारा गेला की त्याला आदराने वागविले जाई आणि वेश्यागमनाचा तिरस्कार करणाऱ्यांना मात्र अनादराने वागविले जाई. कोर्टातही रखेली बाळगणाऱ्या वकिलांची चलती असे आणि एकपत्नीव्रत पाळणाऱ्या सज्जन वकिलाची उपेक्षा होई. रखेली ठेवण्याचा हा प्रकार इतका वाढला की, राजमहेंद्रवरममध्ये वेश्यांचा दुष्काळ पडला तेव्हा रामचंद्रपुरम आदी इतर ठिकाणाहून नव्या वेश्यांची भरती करावी लागली.

त्या काळात राजमहेंद्रवरममध्ये वेश्यांच्या शाळेला (रंगशाला) 'पाठशाला' म्हणत. अगदी शुद्ध ब्राह्मण, इतकेच काय पण सनातन धर्माचे भक्त देखील सत्ताधाऱ्यांची मर्जी संपादन करण्यासाठी वेश्यांच्या पाठशाळेला दरमहा पाचदहा रुपये वर्गणी देत असत. या शाळेत वेश्यांची नाचगाणी होत. नाचगाणी करणारांचे नायडु, पंतुलु आणि शास्त्री वगैरे आडनावांचे अनेक फड असत. एखाद्याच्या घरी एखादे मंगलकार्य निघाले की या लोकांना आपापला गाण्या-बजावणाऱ्यांचा जत्था घेऊन येण्याचे निमंत्रण जाई. या गलिच्छ व्यवसायाबद्दल संबंधित मातब्बर लोकांवर मी सडकून टीका करीत असे. तेव्हा चिडून काही प्रमुख व्यक्तींनी माझ्या पत्रिकेच्या वर्गणीदारांना पत्रिका विकत घेऊ नका असे सांगण्यास सुरुवात केली. माझी निंदानालस्ती सुरू झाली. तुमचे अमुक करू, तमुक करू अशा मला धमक्या मिळू लागल्या. अशाप्रकारे त्या मंडळींनी मला माझ्या कार्यापासून विचलित करण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्यांना यश आले नाही. सर्व वेश्याशाला लवकरच बंद पडल्या. दुसऱ्या गावांहून आणि वस्त्यांमधून आलेल्या

वेश्यांना आपापल्या घरी ताबडतोब परतावे लागले.

अशारीतीने एका दुबळ्या माणसाने हाती घेतलेल्या त्या प्रश्नाची तड लागली आणि धर्माचा विजय झाला. तरी देखील वेश्यागमनी लोकांचा माझ्यावरचा संताप नाहीसा झाला नाही. तेव्हा कोणाच्या रागालोभाची पर्वा करावी लागणार नाही असा काहीतरी स्वतंत्र पेशा आपण पत्करला पाहिजे या विचाराने माझ्या मनात ठाण मांडले. शाळेतील शिक्षकाची नोकरी सोडून द्यावी आणि पत्रिका चालवीत असतानाच स्वतंत्रपणे लेखनव्यवसाय सुरू करावा असे माझ्या मनाने घेतले.

केवळ पत्रिका चालवून जीवननिर्वाहापुरता पैसा मिळविता येईल अशी मला कधीच आशा नव्हती. वार्ताहरांनी माझ्या लेखनाची प्रशंसा केल्याने माझी काही पुस्तके अभ्यासक्रमांत लावली गेली. त्यामुळे साहजिकच पुस्तके लिहून स्वतंत्रपणे जीवननिर्वाह चालवू शकू असा विश्वास वाटू लागला. मी लिहिलेल्या व्याकरणाच्या पुस्तकाच्या विक्रीतून दोनतीन महिन्यांत मला दोनतीनशे रुपये मिळाले. तसेच माझ्या आणखी एका पुस्तकाच्या–'नीतिचंद्रिका विग्रह तंत्रमु'च्या विक्रीतून एक हजार रुपयांची प्राप्ती झाली.

पत्रिकेच्या व पुस्तकाच्या छपाईसाठी एक छपाई यंत्र घ्यायची माझी तीव्र इच्छा होती. मी धवलेश्वरमला असताना आम्ही सहाजणांनी प्रत्येकी साडेतीनशे रुपये भांडवल घालून राजमहेंद्रवरम येथे छापखाना टाकण्याची योजना आखली होती. पुढे उन्हाळ्याच्या सुटीत मी एकदा मद्रासला गेलो होतो. तेथे सर्वश्री बहुजनपल्लि सीतारामाचार्युलु वगैरे पंडितांनी माझा खूपच आदरसत्कार केला. पच्चयप्प पाठशाळेचे तेलुगू पंडित श्री. कर्मचि सुब्बरायलु नायडु यांनी छापखान्यासाठी आवश्यक त्या सर्व वस्तू माझ्यासाठी मद्रास येथे खरेदी करून राजमहेंद्रवरमला पाठवण्याचा वायदा केला. १८७५ मध्ये मी धवलेश्वरम शाळेतील शिक्षकाच्या नोकरीचा राजीनामा दिला आणि माझ्या गावी, राजमहेंद्रवरममध्ये येऊन राहिलो.

छपाईचा टाईप मिळताच मी माझ्या घरीच छापखाना सुरू केला आणि एप्रिलच्या मध्यास 'विवेकवर्धनी'चे प्रकाशन सुरू केले. आमच्या अपेक्षेप्रमाणे छापखान्यांतून काहीही फायदा झाला नाही. छापखान्याच्या मिळकतीतून आणि 'विवेकवर्धनी'च्या वर्गणीतून मिळालेली सर्व रक्कम एकत्र करूनसुद्धा कर्मचाऱ्यांचा पगार देता आला नाही. या सुमारास माझे मित्र मीर जे. खांसाहेबांनी नरसापूर येथून 'विद्यन्मनोहारिणी' नावाच्या तेलुगू पत्रिकेचे प्रकाशन सुरू केले.

'विवेकवर्धनी' सुरू होऊन एक वर्ष झाल्यानंतर 'विद्यन्मनोहारिणी' पत्रिका त्यात समाविष्ट करण्यात आली. 'विवेकवर्धनी'मध्ये काही साहित्य इंग्रजीत लिहावे असे ठरले आणि इंग्रजी भागाची जबाबदारी खांसाहेबांनी आणि तेलुगू विभागाची जबाबदारी मी सांभाळावी अशी व्यवस्था ठरली.

१८७६ च्या जुलैपासून 'विवेकवर्धनी'चे आम्ही पाक्षिकात रूपांतर केले. 'हास्य-संजीवनी' नावाची एक विनोदी पत्रिकाही 'विवेकवर्धनी'ला जोडून प्रकाशित करू लागलो. तेव्हा सनातन धर्माचे कट्टर समर्थक आणि पाठीराखे श्री. कोक्कोंड वेंकटरत्नमु पंतुलु यांनी 'विवेकवर्धनी'चा उपहास करण्याच्या उद्देशाने 'हास्यवर्धनी' नावाची एक पत्रिका आपल्या 'आंध्रभाषा संजीवनी' नावाच्या पत्रिकेची जोडपत्रिका म्हणून १८७५ च्या अखेरीस सुरू केली. 'हास्यवर्धनी'शी स्पर्धा आणि भांडण करण्यासाठीच 'हास्य-संजीवनी'चा जन्म झाला होता.

'ब्रह्म विवाहमु' हे माझे विडंबनकाव्य आमच्या 'हास्य संजीवनी' पत्रिकेत क्रमशः प्रकाशित होऊ लागले. अशाप्रकारची तेलुगू भाषेतील ही पहिलीच काव्यरचना होती. त्यामुळे त्या काळात 'हास्यसंजीवनी'चे प्रामुख्याने 'बालविवाहमु'चे लोक सामुदायिक वाचन करीत आणि आनंद लुटीत. एकदा मी मच्छलीपट्टणमला गेलो होतो, तेव्हा एका ब्राह्मण मुलीने 'बालविवाहमु' काव्य सुरुवातीपासून शेवटपर्यंत बिनचुकपणे म्हणून दाखवून मला चकित केले. आपल्या वयाच्या दुसऱ्या वर्षीच 'हास्यवर्धनी'चा अवतार संपला. त्याचवेळी आमची 'हास्यसंजीवनी' पत्रिका देखील पुस्तकाचे रूप घेऊन संपली. 'हास्यसंजीवनी'ने 'विवेकवर्धनी'च्या दुराचार निर्मूलनाच्या आंदोलनात अद्वितीय कार्य केले.

१ नोव्हेंबर १८७६ मध्ये राजमहेंद्रवरमच्या सरकारी शाळेत तेलुगू विभागात दर-महा पंचवीस रुपये पगारावर मी नोकरी पत्करली. पूर्वी याच जागेवर मेटकाफ साहेबांनी मला बोलाविले होते पण तेव्हा मी नकार दिला होता. पण माझ्या नाते-वाईकांनी तसेच मित्रांनी माझी समजूत घातली आणि ती नोकरी करण्याचा आग्रह धरला तेव्हा मी स्वतःच गेलो आणि नोकरी देण्याची विनंती केली.

मी आणि श्री बसवराजु गवर्राजु, बुर्रा रामलिंगमशास्त्री, एल्रि लक्ष्मीनरसिंहम एकाच शाळेत काम करीत होतो त्यामुळे आमची चांगली मैत्री झाली. समाजातील दुराचार आणि ते कसे दूर करायचे यासंबंधी पत्रिकेत काय काय लिहायचे याविषयी आम्ही नेहमी चर्चा करीत असू. आमच्या या चारजणांच्या गटाचा मी पुढारी होतो. बाकी तिघे विद्यार्थी व मी त्यांचा शिक्षक. पत्रिकेतील आमचे लेख वाचून ज्यांना मिरच्या झोंबत ते आम्हाला 'दुष्ट चतुष्टय' म्हणत.

'विवेकवर्धनी'ने केलेल्या कामांपैकी दोनतीन प्रमुख कामांचा येथे उल्लेख करतो.

विवाह इत्यादि शुभकार्याच्या प्रसंगी सर्व निमंत्रित प्रतिष्ठीत लोकांकडून वेश्यांच्या नाचगाण्याच्या आणि गाण्याबजावण्याच्या कार्यक्रमासाठी कमीत कमी एक रुपया वसूल करण्याचा रिवाज त्याकाळी आमच्या येथे प्रचलित होता. पानसुपारीला येणारे वेश्येला काही दिल्याशिवाय निघून गेले तर ते अपमानास्पद समजले जाई. गरीब लोकही काही-

बाही बहाणा करून आपल्या मित्र व नातलगांकडील मंगलकार्याला जायचेच टाळीत. परंतु सरकारी अधिकाऱ्यांकडील कार्यांत त्यांना हजर राहावेच लागे आणि वेश्यांना काही ना काही भेट द्यावीच लागे. निमंत्रण मिळूनही एखादा गरीब माणूस अधिकाऱ्यांकडील मंगलकार्याला गेला नाही तर त्या गावी राहणे त्याला कठीण होई. आमच्या शहरात एक न्यायाधीश होता. तो काही ना काही निमित्ताने महिन्यातून दोनदा वेश्यांच्या नाचगाण्याचा कार्यक्रम करी आणि शहरातील लोकांना निमंत्रण देई. कार्यक्रमात एखाद्याने भाग घेतला नाही तर दुसऱ्याच दिवशी त्याच्यावर घरापुढे उकीरडा झाला आहे किंवा घाणेरडे पाणी सडकेवरून वहाते आहे असला खोटा आरोप ठेवून तो न्यायाधीश त्याला कोर्टात बोलावी. त्या बिचाऱ्याला कामधंदा सोडून कोर्टात जावे लागे आणि मग एकाऐवजी चार रुपये दंड भरावा लागे. असेही काही अधिकारी होते की जे आपल्या घरी होणाऱ्या कार्यक्रमांत वसूल होणाऱ्या पैशांतला फक्त अर्धा हिस्सा वेश्यांना देत व या मार्गाने महिन्याकाठी दोनतीनशे रुपये कमावीत. हा भ्रष्टाचार उखडून टाकण्यासाठी सभांद्वारे प्रचार करून आमच्या 'विवेकवर्धनी'ने प्रशंसनीय कार्य केले.

या सभांपैकी शेवटच्या सभेची जानेवारी १८७८ च्या पत्रिकेत आम्ही बातमी छापली होती. तिचे थोडक्यात सार असे– विवाहादी मंगलकार्यांत पानसुपारीला येणाऱ्यांकडून पैसे घेण्याची अनिष्ट चाल नष्ट करणे हे आमचे एक मुख्य कार्य आहे. सभेला उपस्थित असलेल्या सर्व लोकांनी पुढील नियम तयार केले आहेत. आमच्या घरी होणाऱ्या कोणत्याही उत्सवात आम्ही वर्गणी वसूल करणार नाही. वर्गणी देणाऱ्यांना आम्ही आपल्या घरी पानसुपारीला बोलावणार नाही. त्याचबरोबर त्यांच्या घरीही पानसुपारीला जाणार नाही. या नियमांच्या खाली सर्वांनी आपापली मान्यता दर्शविणाऱ्या सह्या केल्या आणि या पत्रिकेच्या मालकाचीच या संस्थेच्या चिटणीसपदावर निवड केली आहे.

या सभेनंतर काही दिवसांनी गावातील एका गृहस्थांच्या घरी उपनयन समारंभ झाला. वरील नियमावलीवर सही करणारे आमच्या मंडळाचे एक सदस्य त्या समारंभाला हजर राहिले आणि त्यांनी नाचगाण्याच्या वेळी वेश्यांना भेट दिली. आमच्या नियमांचा भंग करणाऱ्या त्या सद्गृहस्थांवर मी आपल्या पत्रिकेत टीका केली. त्याचा लगेच चांगला परिणाम झाला. तो गृहस्थ घाबरला. माझ्याकडे येऊन क्षमायाचना करीत म्हणाला, "मी त्या नियमांचा जाणूनबुजून भंग केला नाही. हे नियम कधीपासून अंमलात आणायचे याचा निर्णय झाला नव्हता म्हणून तारीख निश्चित ठरली की त्या दिवसापासून कोणत्याही समारंभात भेट द्यायची नाही असे मी ठरविले होते." आपल्यावरही अशीच टीका होईल या भयाने त्यानंतर त्या नियमांचे उल्लंघन करण्याचे

धारिष्टय केले नाही. हे नियम केल्यामुळे जबरदस्तीने वर्गणी द्यावी लागणाऱ्या लोकांनी सुटकेचा निश्वास टाकला. तसेच आमच्या संघटनेचे सदस्य नसलेल्या लोकांनी देखील हळुहळू वेश्यांना भेटी देणे बंद केले.

त्यावेळी वॉलेस नावाचे एक जिल्हा-जज्ज होते. एक-दोन जिल्हा मुन्सफांनी आपल्या वशिल्याच्या व्यक्तींना वकिली करण्यासाठी अनुमति-पत्रे देण्याबाबत वॉलेस साहेबांकडे शिफारस केली. परंतु या व्यक्ती आवश्यक त्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नव्हत्या. म्हणून जिल्हा जज्जांनी त्यांना योग्यता-पत्रे किंवा अनुमति-पत्रे दिली नाहीत. पुढे त्या कोर्टात एका नव्या शिरस्तेदाराची नेमणूक झाली. त्याच्या अमदानीत अनेक लोकांना वकिलीची प्रमाणपत्रे दिली जाऊ लागली. दोन-चार महिन्यांत जवळजवळ आठ लोकांना ही प्रमाणपत्रे मिळाली. त्यांच्यापैकी एकानेही परीक्षा दिलेली नव्हती. त्यांच्यापैकी बहुतेकांना इंग्रजी येत नव्हते हे गैर होते. तेव्हा आमच्या 'विवेकवर्धनी'मध्ये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्यांना वकिली करण्याचे अनुमति-पत्र देणे अन्याय्य आहे असे आम्ही लिहिले. मग काय विचारता ? सर्वत्र खळबळ उडाली. ही वार्ता उच्चन्यायालयापर्यंत पोचली. तेव्हा १८७८ च्या अखेरीस उच्च न्यायालयाने 'अशाप्रकारे परीक्षेत उत्तीर्ण न झालेल्या लोकांना वकिली करण्याची परवाना-पत्रे कां दिली गेली ? खुलासा करा', असा आमच्या जिल्हा जज्जांना जाब विचारला.

वकिलीच्या प्रमाण-पत्रांबाबत काही गोष्टींबद्दलची माहिती विचारण्यासाठी आमच्या जिल्हा जज्जांनी २३ जानेवारी १८७९ रोजी दुपारी तीन वाजता जिल्हा कोर्टात हजर व्हावे म्हणून माझ्यावर हुकूम बजावला. माझ्याकडून कोर्टाला माहिती हवी होती. त्याची मला बिलकुल कल्पना नव्हती. ही बातमी साऱ्या शहरात पसरली होती. ती ऐकून माझे दोन मित्र मला भेटण्यासाठी माझ्या घरी आले. आम्ही तिघे एक प्रसिद्ध वकील श्री. त्रिर्राबूरि यज्ञान्नशास्त्री यांच्या घरी गेलो. तो हुकुमनामा वाचून श्री. शास्त्री थक्क झाले. पण आम्हाला कोणताच सल्ला त्यांना देता आला नाही. तेव्हा मी न्याया-धीशाच्या न्यायाधीशावर–ईश्वरावर–सारा भार टाकला आणि त्या रात्री निवांत झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी-शाळेत जाऊन दोन वाजेपर्यंत काम केले आणि मग रजा घेऊन सरळ कोर्टात गेलो.

जज्जमहाशय बरोबर तीन वाजता कोर्टात आले. त्यांनी एका खुर्चीवर मला बसायला सांगितले. 'विवेकवर्धनी' पत्रिकेची एक प्रत माझ्या हाती देऊन वकिलीच्या प्रमाण-पत्रा-बाबतचा लेख दाखवून विचारले.

"हा लेख तुम्हीच प्रसिद्ध केलाय का ?"

उच्चन्यायालयाचा शिक्का असलेली ती पत्रिका पाहताच माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

काय करावयाचे त्याचा तात्काळ विचार करुन मी म्हटले, "साहेब, तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी माझ्या नावे हा हुकुमनामा सरकारच्या कोणत्या कायद्यानुसार पाठवण्यात आला आहे ते मला जाणून घ्यायचे आहे."

न्यायाधीश निरुत्तर झाले. पण काही मिनिटांतच त्यांनी स्वतःला सावरले आणि विचारले, "ही पत्रिका तुम्हीच प्रकाशित करता काय ?"

"आपल्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास मी बांधलेला आहे की नाही हे मला कळायला हवं."

माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधलेले आहांत असं मी म्हणू शकत नाही. वाटलं तर तुम्ही जवाब देऊ शकता," न्यायमूर्ती म्हणाले.

"उत्तर देणे माझ्यावर बंधनकारक नसेल तर मला उत्तर देण्याची इच्छा नाही." मी स्पष्ट शब्दांत वजावले.

वरील सर्व प्रश्नोत्तरे लिहून जज्जसाहेबांनी म्हटले, "आपणास आणखी जास्त वेळ इथं ठेवावं असं मला वाटत नाही."

"ठीक आहे." असे म्हणून मी कोर्टाच्या बाहेर निघून आलो. माझे धैर्य बघून माझे एक वकील मित्र माझ्या समवेत कोर्टाबाहेर आले. स्नेहभावाने त्यांनी मला मिठी मारली. मी कोर्टातून घरी जात असताना काही मूर्ख लोक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून आश्चर्याने आणि विस्मयाने माझ्याकडे पाहात होते कारण आता मला तुरुंगात पाठवतील अशी त्यांची कल्पना होती.

पुढे उच्च न्यायालयाने तसेच सरकारने ज्या व्यक्तींना परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय वकिली करण्याची प्रमाण-पत्रे दिलेली आहेत ती परत घेण्यात यावीत असा जिल्हा जज्जाला आदेश दिला.

लाच घेत नाही तो नालायक आणि मूर्ख असे त्या काळात समजले जाई. चपराशापासून तो मंत्र्यांपर्यंत सर्व सरकारी अधिकारी अगदी उघड उघड लाच घेत असत. १८७८ च्या सुरुवातीला पोलूरि श्री. रामुलु नावाचे एक गृहस्थ राजमहेंद्रवरम येथे जिल्हा मुन्सफ म्हणून आले. जिल्हा कोर्टातील सरकारी वकील श्री. चित्रपु कामराजु यांच्या मुलाबरोबर त्यांच्या बहिणीचे लग्न झाले होते. अशा रीतीने जिल्हा मुन्सफ व सरकारी वकील हे दोघे जवळचे नातेवाईक तर होतेच शिवाय घनिष्ट मित्रही होते. श्री रामुलु प्रथमच मुन्सफ पदावर आला होता. पण त्याला आधीपासूनच लाच खाण्याची सवय होती. आता तर लाच खाण्याची पर्वणीच त्यांना मिळाली. वादी-प्रतिवादी, गरीब-श्रीमंत, न्याय–अन्याय या कशाचीच त्याला पर्वा नव्हती. त्यामुळे अग्निहोत्राप्रमाणे सर्व काही तो स्वाहा करू लागला. त्याला मदत करायला चित्रपु कामराजु महाराज एका पायावर उभे होतेच. न्यायाचा विक्रा होऊ लागला. न्याय–विक्रयाची एक नवीन

परिभाषा तयार झाली. या परिभाषेची जी व्यावहारिक बाजू होती, तिच्यामुळे युक्तिवाद करुन मुद्दे मांडण्याचे जे परिश्रम वकिलांना करावे लागत त्याची जरूरीच राहिली नाही. कामही सरळ सोपे झाले. वादीच्या वकीलाने म्हणायचे, "महाराज, आपण १०० व्या कलमाच्या आधारे कृपया न्याय द्यावा," त्यावर प्रतिवादीच्या वकीलाने सुचवायचे, "ते कलम चालणारे नाही. आपण १५०व्या कलमाच्या आधारे न्याय द्यावा." त्यानंतर न्यायविधानाच्या–भारतीय दंड विधानाच्या–१६०, १७०, १८०, १९०, २०० अशा एकामागून एक कलमांचा उल्लेख करीत आणि अखेरीला एखादे जास्त संख्या असलेले कलम निश्चित केले जाई. मग वकील रात्री न्यायाधीशांच्या घरी जाऊन त्या कलमाचा अर्थ दिव्याच्या प्रकाशात दाखवीत मग दुसऱ्या दिवशी कोर्टात त्या पक्षाच्या बाजूने निकाल दिला जाई. कलमांची परिभाषा अशी होती. शंभरावे कलम म्हणजे १०० रु., एकशेपन्नासावे कलम म्हणजे १५० रुपये.

आमचा जिल्हा मुन्सफ पैशाच्या मोहाला बळी पडून खटले चालवण्यास क्रमवारी मोडून मोठी रक्कम मिळणाऱ्या खटल्यांचा निकाल प्रथम करीत असे. तसेच एकाच वेळी दोनतीन खटल्यांची सुनावणी करीत. ते स्वतः एका खटल्यातील साक्षीदारांची साक्ष घेत तर दुसऱ्या खटल्यातील साक्षीदारांच्या जबान्या घेण्याचे काम आपल्या गुमास्त्याला सांगत. एकाचवेळी इतक्या खटल्यातील जबान्या आणि साक्षीदारांच्या साक्षी वाचून निकाल लिहिणे एका व्यक्तीला अशक्य असे. त्यामुळे स्वतः मुन्सफ काही निकाल स्वतः लिहीत तर बाकीच्या निकालांचे मसुदे आपला नातेवाईक व सरकारी वकील चित्रपु कामराजु यांना लिहावयास देत आणि मग फुरसतीच्या वेळी त्या मसुद्यांच्या पक्क्या प्रती तयार करत. अशाप्रकारे वाटेल तसा त्यांचा कारभार चालत असे.

जिल्हा मुन्सफाने चालविलेला हा भ्रष्टाचार उखडून टाकण्यासाठी पुराव्याची आवश्यकता होती. 'विवेकवर्धनी'ने असे पुरावे देणारे साक्षीदार मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. या भ्रष्टाचाराचे भक्ष्य बनलेले लोक आणि त्यांचे वकील नुसत्या तक्रारी करीत. पण त्यांच्यापैकी एकहीजण लाच दिल्याचे किंवा मुन्सफाने लाच घेतल्याचे उघडपणे सांगावयास तयार झाला नाही.

तेव्हा मग एक दिवस मी दिवाणी कोर्टात गेलो आणि गुपचुप एका कोपऱ्यात बसलो. मुन्सफाचे सारे उद्योग नीट पाहून घेतले. कोर्टात मी प्रत्यक्ष गेलो होतो ही बातमी 'विवेकवर्धनीत' प्रसिद्ध झाली. त्याचप्रमाणे मुन्सफावरही जोरदार हल्ला चढविला. मुन्सफाच्या ते वाचनात आले. तेव्हा तो थोडासा हादरला. पण तो लाच खाण्यात शूर होता. त्यामुळे त्याचे लाच खाणे पूर्ववत चालूच होते. जिल्हा कोर्टातील नोकरांपैकी बयेनपुडि वेंकट जोगय्या नावाचे एक गृहस्थ माझे मित्र होते. ते माझ्या बाजूचे होते. त्यांच्याकडून मला कोर्टात चालणाऱ्या गडबडगुंड्यांची माहिती मिळत असे.

त्याचवेळी परमेश्वर आमच्या मदतीस धावून आला. चित्रपु कामराजु मुन्सफासाठी म्हणून निवाड्याचे जे मसुदे तयार करी त्यांच्या पक्क्या प्रती तयार केल्यानंतर कच्या प्रतीचे कागद फाडून ते तुकडे आपल्या घरासमोरील कचऱ्याच्या ढिगात फेकून देत असे. कामराजुच्या घरासमोर राहणाऱ्या एका वकिलांनी मला ते सांगितले. आपणाला ते तुकडे कदाचित उपयोगी पडतील असे वाटून झाडुवाल्याला थोडे पैसे देऊन त्याच्याकडून ते तुकडे उचलून आणवायला मी त्या वकिलाला सांगितले. दोन टोपल्या भरून त्यांनी ते तुकडे माझ्या घरी पोचविले. मोठ्या मुश्कीलीने मी ते तुकडे एकएक करून जोडले. त्यापैकी काही तुकडे काहीही उपयोगाचे नव्हते. तुकडे आणून देणाऱ्या वकिलाने काही तुकडे जुळवले होते. त्यांचे दोन संपूर्ण कागद जोडून झाले. त्या कागदात खटल्याचा निवाडा होता. आपली मेहनत व्यर्थ गेली नाही या गोष्टीचे मला खूप समाधान वाटले.

तो खटला ज्याच्याविरुद्ध गेला होता त्या मुसलमान गृहस्थाला मी बोलावून घेतले आणि त्याच्याशी बोललो तेव्हा कामराजुने माझ्यापाशी लाच मागितली होती पण गरीबीमुळे आपण ती देऊ शकलो नाही, त्यामुळे प्रतिवादीकडून लाच घेऊन न्यायाधीशाने त्याच्या बाजूने निकाल दिला असे त्याने स्पष्टपणे सांगितले. वरील गोष्ट नमूद करून त्या मुसलमानाच्या संमतीने मी जिल्हा न्यायधीशांना उद्देशून एक अर्ज लिहिला आणि त्या निवाड्याच्या मसुद्याचा अर्धा भाग त्याला जोडून जिल्हा कोर्टात दाखल केला. या अर्जाची बातमी लागताच कारस्थानी कामराजुने त्या मुसलमानाला गुप्तपणे बोलावून घेतले आणि जेवढ्या रकमेसाठी त्याने खटला भरला होता त्या रकमेच्या दुप्पट पैसे देऊन त्याच्याकडून खटल्याच्या निवाड्याच्या कागदांचे तुकडे ताब्यात घेतले.

त्या अर्जात ज्या साक्षीदारांची नावे दिली होती त्यात मिर्तिपाटी रामय्या नावाचे एक इसम होते. त्यांच्यामार्फत जिल्हा कोर्टात मी एक अर्ज दाखल करवला. सदर मुसलमानाने चित्रपु कामराजुकडून पैसे घेऊन निवाड्याच्या कागदांचे तुकडे त्याला परत दिले असे त्या अर्जात म्हटले होते. त्याचप्रमाणे कामराजु हा मुन्सफाला लाच द्यायला सांगतो आणि निवाड्यासंबंधीचे मसुदेही तयार करतो; तसेच या गोष्टी सिद्ध करण्याच्या दृष्टीने मजजवळ पुरेसे पुरावे आहेत; त्याचप्रमाणे सदर मुसलमानाच्या बाजूने झालेल्या कोर्टाच्या निवाड्याच्या कागदांच्या कपट्यांपैकी अर्धे कपटे माझ्यापाशी आहेत असेही अर्जात लिहिले.

दरम्यान कामराजुने त्या मुसलमानाला आणखी एक अर्ज दाखल करायला लावला. त्याचा सारांश असा होता–"माझ्या नावे जो अर्ज कोर्टात दाखल झाला आहे. त्याबाबत मला काहीही माहीत नाही. दामराजु नागराजु नावाच्या वकीलाने फसवून माझ्याकडून सही घेतली. म्हणून माझ्या अर्जावर विचार करण्याची आवश्यकता

नाही." परंतु मिर्तिपाटी रामय्या याने पाठविलेल्या अर्जाच्या आधारे जिल्हा न्यायाधिशाने मुसलमानाच्या खटल्याच्या निवाड्याचा अर्धा भाग मागून घेतला आणि उर्वरित अंश हजर करण्याचा आदेश दिला.

त्या दरम्यान आम्ही आणखी तीन-चार निवाड्यांबाबतच्या कागदांचे तुकडे पूर्णपणे जुळवले होते. ही गोष्ट समजताच आपल्या हस्ताक्षरातील निवाड्याच्या कागदांचे तुकडे दिलेत तर तुम्हाला ५०० रुपये देईन असा चित्रपु कामराजुने माझ्याकडे निरोप पाठवला. अर्थातच मी स्पष्ट नकार दिला.

एवढ्या वेळात आम्ही पाच निवाड्यांच्या कागदांचे कपटे जुळवले होते. त्यापैकी एका निवाड्यासंबंधीचे कागद माझ्यापाशी ठेवून बाकी चारांचे कागद एका कागदाच्या पिशवीत घातले व त्यावर लाखेची मोहोर उठवली. मिर्तिपाटी रामय्याला बरोबर घेऊन जिल्हा कोर्टात गेलो आणि निवाड्यांच्या कागदांची ती पिशवी, हे प्रकरण कोर्टात चर्चेला येईपर्यंत न्यायाधीशांनी आपल्या खाजगी पेटीत ठेवावी असा अर्ज रामय्यामार्फत दिला आणि ती पिशवी न्यायाधीशांच्या हवाली केली.

माझ्यापाशी अजूनही टोपलीभर कपटे पडले होते. कदाचित् ते तुकडे जुळविता येतील या आशेने ती टोपली मी दामराजु नागराजु यांच्या घरी नेऊन दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी मला कळले की मुन्सफाने आणि कामराजुने दुय्यम दर्जाच्या एका वकिलाला काही कामानिमित्त नागराजुकडे पाठविले आहे. मी तात्काळ नागराजुकडे गेलो आणि त्या कपट्यांची टोपली उचलून माझ्या घरी पेटीत ठेवली आणि पेटीला टाळे ठोकले. पुढे नागराजुकडून मला समजले की कामराजुने ते कागदाचे तुकडे आपणाला दिले तर पांचशे रुपये देईन असा त्याला निरोप पाठवला होता. पण नागराजुने साफ नकार दिला होता.

ज्याने मला मसुद्याच्या कागदाचे कपटे आणून दिले होते तो वकील दोन-तीन दिवसांनी माझ्याकडे येऊन म्हणाला, "आज मला कोर्टात काम नाही, तेव्हा मसुद्यांचे तुकडे मी चिकटवून देतो." त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मी कागदाची टोपली त्याच्या हातात दिली. ती टोपली तो घरी घेऊन गेला. कामराजुने लबाडीने कपट्यांची टोपली हस्तगत केल्याची बातमी त्या दिवशी संध्याकाळीच गावात पसरली होती. कामराजुपाशी पैसे चारून, स्त्रियांशी संधान बांधून आणि इतर अनेक मार्गांनी आपला कार्यभाग साधण्याची शक्ती होती. मी त्या वकिलाकडे जाऊन कागदांचे कपटे मागितले, तेव्हा त्या टोपलीत एकही उपयुक्त कपटा नसल्याने ते आपण जाळून टाकले असे त्याने सांगितले.

सर्वच मसुद्यांच्या कागदांचे कपटे आता नष्ट करण्यात आले आहेत अशी सर्वांची समजूत होती. माझ्यापाशी आणखी एका निवाड्यासंबंधीच्या मसुद्याचे कपटे मी राखून ठेवलेले आहेत ही गोष्ट माझ्या मित्रांना देखील माहीत नव्हती.

मिर्तिपाटी रामय्याच्या अर्जाच्या सुनावणीसाठी जिल्हा न्यायाधीशांनी २६ जून तारीख ठरवली. पण आश्चर्याची गोष्ट अशी की खटल्याच्या सुनावणीच्या पहिल्याच दिवशी जिल्हा न्यायाधीशांच्या पेटीतले निवाड्यासंबंधीचे कपटे शिरस्तेदाराच्या हाती पडले होते. कोर्टाच्या इमारतीच्या गोदावरीकाठच्या बाजूचा एक दरवाजा उघडलेला दिसला. तसेच शिरस्तेदाराचे व आणखी एका कारकुनाचे डेस्क फोडलेल्या अवस्थेत होते व त्यातील कागदपत्र इतस्ततः फेकलेले होते. एका पेटीपाशी काही पैसे पडले होते. २५ तारखेच्या रात्री हा प्रकार झाला होता. या प्रकारामुळे कामराजूच्या खटल्याबाबतची कागदपत्रे चोरांनी पळविली अशी अफवा पसरली.

२६ जूनलाच निकाल लागणार होता. त्यामुळे साक्षीदार तसेच सामान्य नागरिक सकाळी दहा वाजायच्या आधीच कोर्टात हजर झाले. मीही एक साक्षीदार असल्याने मित्रांसमवेत वेळेआधीच कोर्टात हजर झालो. त्याचवेळी कोर्टाच्या एका खोलीत एक विचित्र घटना घडत होती. शिरस्तेदार आणि क्रिमिनल रेकॉर्डकीपर हे दोघे एका खोलीत दरवाजा बंद करून गुप्तपणे काहीतरी करीत बसले होते. मी आणि माझ्या मित्राने बंद दरवाजाच्या भोकातून खोलीत पाहिले. शिरस्तेदार आणि बोल्लाप्रगड वेंकन्ना कागदांचे तुकडे एका पिशवीत भरीत होते. कदाचित मोहोर करण्यासाठी असेल, वेंकन्नाच्या हातात एक लाखेचा तुकडा होता.

न्यायाधीश आपल्या खुर्चीवर स्थानापन्न झाले. तेव्हा आपण न्यायाधीशांच्या ताब्यात दिलेले कपटे बदलले जात आहेत सबब ते कपटे आपणाला पहावयास मिळावेत असे मिर्तिपाटी रामय्याने निवेदन केले. काही वेळाने शिरस्तेदार आला आणि जुळवलेल्या कागदांचे काही कपटे त्याने न्यायाधीशांच्या टेबलावर ठेवले. रामय्याने ते तुकडे पाहिले आणि कागदाच्या पाकिटात घालून न्यायाधीशांच्या पेटीत ठेवलेले ते हे कपटे नव्हेत; शिरस्तेदाराने ते बदलले आहेत; ते प्रत्यक्ष पाहिलेले साक्षीदारही आपणापाशी आहेत असे सांगितले. परंतु न्यायाधीशाने कपटे हरवले आहेत आणि त्याबाबत आम्ही आता काही करू शकणार नाही असे स्पष्टपणे सांगितले. शिवाय जिल्हा न्यायाधीशांनी मिर्तिपाटी रामय्याला बोलावून म्हटले, "नुकसान झालेल्या प्रतिवादींपैकी तुम्ही नाही म्हणून तुमच्या अर्जावर विचार केला जाणार नाही." त्या दिवशीचे सुनावणीचे काम तिथेच संपले; पण ते प्रकरण मात्र तिथेच संपले नाही.

राजमहेंद्रवरमच्या फौजदाराच्या कानावर ही वार्ता गेली, तेव्हा तो मला जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंटकडे घेऊन गेला आणि त्याने सर्व हकीगत त्यांना समजावून सांगितली. सर्व गोष्टी ऐकल्यानंतर जिल्हा सुपरिंटेंडेंटने जिल्हा न्यायाधीशांना एक पत्र लिहिले. त्यांत त्यांनी कोर्टात झालेल्या कागदांच्या चोरीची चौकशी करण्याची आज्ञा देण्यात यावी अशी विनंती केली. जिल्हा न्यायाधीशाने या पत्राला दिलेल्या उत्तरात कळवले,

"आमच्या येथे काहीही चोरीस गेलेले नाही, म्हणून तपास करण्याची काही आवश्यकता नाही." यावर जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंटने माझ्याकडून सर्व हकीगत लेखी लिहून घेतली आणि स्वतः काकिनाड्याला जाऊन तो जिल्हा न्यायाधीशांना भेटला आणि सर्व वस्तुस्थिती त्यांना समजावून सांगून शिरस्तेदार आणि क्रिमिनल रेकॉर्डकीपर यांना पकडण्याचा हुकूम घेऊन आला. दुसऱ्या दिवशी शिरस्तेदार रोजरियासाहेब आणि क्रिमिनल रेकॉर्डकीपर बोल्लाप्रगड वेंकन्ना न्यायालयात जायला निघाले असता पोलिसांनी येऊन त्यांना पकडले आणि ठाण्यावर नेऊन कोठडीत बंद केले. या बातमीने साऱ्या शहरांत खळबळ उडाली.

विरोधी गटाचे लोक मंडळ-न्यायाधीशांकडे धावले आणि त्यांनी त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. मंडळ-न्यायाधीशांनी शिरस्तेदाराला तात्काळ मुक्त करावे असे पत्र पोलिस सुपरिंटेंडेंटला लिहिले. पण पोलिस खात्याने त्या पत्राची दखल घेतली नाही. उलट त्याच दिवशी सायंकाळी त्या दोघांना नावेतून काकिनाड्याला नेऊन चीफ मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले. मॅजिस्ट्रेटने प्रथम चौकशी करून आम्हा लोकांच्या साक्षी घेतल्या आणि मगच बोल्लाप्रगड वेंकन्ना याला मुक्त केले आणि शिरस्तेदारासंबंधी स्वतः काहीही निर्णय न घेता त्यासाठी त्याला आमच्या मंडळ दंडाधिकाऱ्याच्या कार्यालयात पाठवले. पण मंडळ दंडाधिकारी आणि न्यायाधीश वॉलेससाहेब हे स्वतःच या खटल्यात एक साक्षीदार होते. म्हणून मद्रासच्या उच्च न्यायालयाने या खटल्याच्या सुनावणीसाठी शिरस्तेदाराला कृष्णा जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्याच्या कार्यालयांत पाठविले.

ऑक्टोबर महिन्यात सुनावणी झाली. कृष्णा जिल्ह्याचे दंडाधिकारी केल्सालसाहेब यांनी असा निर्णय दिला की खरे कपटे जिल्हान्यायालयात सादर करण्यात आले होते ही वस्तुस्थिती आहे. परंतु शिरस्तेदारानेच ते कपटे लांबवले हे सिद्ध होईल इतका पुरावा नाही. म्हणून तो निर्दोष आहे. त्यामुळे रोजरियासाहेबाला मुक्त करण्यात आले.

दरम्यान या प्रकरणाविषयी 'विवेकवर्धनी'त प्रकाशित झालेली माहिती पाहून मद्रास सरकारने उच्चन्यायालयाला त्या संबंधात लिहिले. त्यावर उच्चन्यायालयाने या खटल्याची तपासणी करून निर्णय कळवावा असा मंडळ न्यायाधीशाला आदेश दिला. तेव्हा आमचे जिल्हा न्यायाधीश जागे झाले. त्यांनी मला, तसेच या खटल्याशी संबंधित असलेल्या इतर लोकांना बोलावून चौकशी सुरू केली. माझे प्रतिवादी चित्रपु कामराजु वगैरे लोकांना या खटल्याची चौकशी पूर्ण झाल्यावर मला खात्रीने तुरुंगांत पाठवतील असा पूर्णपणे विश्वास वाटत होता. त्यांची अशी समजूत होती की माझ्यापाशी असलेले निवाड्याच्या कागदाचे सर्व तुकडे नष्ट झाले आहेत. ते पळविणारा शिरस्तेदार निर्दोष सुटला आहे. शिवाय विभागीय न्यायाधीशाचेही माझ्याविषयी चांगले मत नाही. या लोकांच्या दृष्टीने अशाप्रकारे सर्व परिस्थिती माझ्याविरुद्ध होती. पण माझे मित्र तसेच शत्रू यांना माझ्या-

पाशी आणखी एका खटल्याच्या निवाड्याबाबतचे कागद आहेत याची कल्पना नव्हती. ते कागद घेऊन मी कोर्टात गेलो.

माझ्यापाशी कामराजुच्या हस्ताक्षरांतला निवाड्याबाबतचा एक मसुदा आहे असे लिहून ती चिठ्ठी सुनावणी सुरू होण्यापूर्वी मी न्यायाधीशांच्या हाती दिली. मसुद्यातील खटल्याची फाईल मागवणार असाल तर मी त्या खटल्याचा नंबर सांगू शकेन असेही चिट्ठीत लिहिले. न्यायाधीशाने खटल्याचा नंबर लिहून द्या अशी परत चिठ्ठी पाठवली. तिच्यावर नंबर लिहून मी ती परत साहेबांकडे पाठवली. त्यावर त्यांनी तात्काळ आपल्या एका चपराशाला बोलावले आणि एक पत्र लिहून त्याच्या हाती दिले व म्हटले, "जिल्हा न्यायाधीशाच्या कार्यालयात पळत जा आणि हे पत्र देऊन उत्तर घेऊन ये." माझ्या आणि साहेबांच्या दरम्यानच्या या पत्रापत्रीची कुणाला कल्पना नव्हती.

चपराशाने अर्ध्या तासात त्या खटल्याची फाईल आणून साहेबांच्या हाती दिली. तेव्हा मी आपल्या खिशांतील खटल्याच्या निवाड्याचा मसुदा आणलेला कागद काढून साहेबांच्या हाती दिला. कामराजु सरकारी वकील होता. त्यामुळे त्याचे हस्ताक्षर सर्वांच्या परिचयाचे होते. मी न्यायाधीशांच्या हाती दिलेल्या कागदात जास्त खाडाखोड होती. फाईलीतला खटल्याचा निवाडा म्हणजे मजजवळील कागदाची एकदम पक्की प्रतिलिपी होती. दोन्ही कागद ताडून पाहिले तेव्हा न्यायाधीशांचे पूर्वीचे मत एकदम बदलले.

मग न्यायाधीशांनी मसुद्याचे कागद कामराजुच्या हातात देऊन म्हटले, "हे हस्ताक्षर नक्कीच तुमचे आहे. (माझ्याकडे बोट दाखवून) न्याय यांच्या बाजूचा आहे. शिरस्तेदाराने आणि तुम्ही, दोघांनी मिळून माझ्या मनात या गृहस्थांविषयी गैरसमज निर्माण केलात. या पूर्वीचे कपटे शिरस्तेदाराला लाच देऊन तुम्हीच बदलवले आहेत. या प्रकरणासाठी मी उद्या तुम्हाला मॅजिस्ट्रेटकडे पाठविणार आहे." असे संतापाने म्हणून शिरस्तेदाराला आणि क्रिमिनल रेकॉर्डकीपरला कामावरून दूर करण्यात येत असल्याचे न्यायाधीशांनी सांगितले आणि त्यासंबंधीच्या हुकूम लिहून वाचून दाखवला.

कामराजुने त्याच रात्री विष पिऊन आत्महत्या केली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या निधनाची बातमी कळली तेव्हा मला अत्यंत विस्मय वाटला आणि दुःखही झाले.

दुष्टांच्या दुष्टप्रवृती विरुद्ध लढत असताना मला अनेकांचे वैर पत्करावे लागले. दूर राहणारी राज्यसत्ता, तिचे प्रतिनिधी, फार काय चक्रवर्ती राजा यांच्यावर टीका करून त्यांना विरोध करणे तितकेसे धोक्याचे नाही. पण आपल्याच शहरातील न्यायाधीशांची आणि पोलिसांची अंडीपिल्ली बाहेर काढून काही लिहिणे बिनधास्त नव्हते. अशी परिस्थिती होती. तरी एखाद्या अधिकाऱ्याने अन्याय केल्याचे समजले तर आमच्या 'विवेकवर्धनी'ने त्याला कधी सोडले नाही. 'विवेकवर्धनी'तून होणाऱ्या परिस्फोटामुळे दुखावलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी पत्रिका बंद पाडण्याचा सुरुवातीला खूप प्रयत्न करून

पाहिला पण त्यांना यश आले नाही. चित्रपु कामराजु प्रकरणात 'विवेकवर्धनी'च्या नावाची भीती निर्माण झाली आणि दुष्ट अधिकाऱ्यांना तिचा वचक वाटू लागला.

'दंड' मार्गाने 'विवेकवर्धनी' बंद करणे अशक्य असल्याचा अनुभव आला तेव्हा काही चतुर माणसांनी त्यासाठी 'साम' मार्गाचा अवलंब करण्याचे योजले. पूर्वी एकदा दरमहा पंचवीस रुपये पगारावर कचेरीत एका कारकुनाची नोकरी देण्याचे आश्वासन दिलेच होते. अनिच्छेने का होईना ती नोकरी त्यावेळी मी स्वीकारली असती तर आतापर्यंत जास्तीत जास्त, कदाचित अव्वल कारकुनाच्या जागेपर्यंत पोचलो असतो. पण त्यापायी मी आपले स्वतंत्र व्यक्तित्व, पारमार्थिक विचार आणि मानसिक शांती मात्र नक्की गमावून बसलो असतो. ती नोकरी पत्करली असती तर मला कसल्या लोकांच्या हाताखाली काम करावे लागले असते त्याची मला जाणीव होती. शाळेत असताना स्वच्छंदपणे हिंडणारे फिरणारे विद्यार्थी नोकरीला जुंपले गेल्यानंतर थोडयाच दिवसांत मिशा काढून, कपाळावर भस्माचे पट्टे ओढून आणि भगवी वस्त्रे धारण करून फिरताना दिसतात. त्यांना ओळखणेही कठीण जाते. माझीही तशीच अवस्था होईल या भयाने माझ्या हितचिंतकांनी सांगूनही मी ती नोकरी पत्करण्यास नकार दिला.

१८६८ मध्ये प्रारंभी माझ्या घरात आम्ही प्रार्थनासमाजाची स्थापना केली. त्यावेळी मी बुर्रा रामलिंगमुराव, बसवराजु गवर्राजु, एलूरि लक्ष्मीनरसिंहम, बचपुनेडि वेंकटजोगय्या, कंतयुरेड्डि, पार्थसारथी नायडु एवढेजण समाजाचे सदस्य झालो. पार्थसारथी नायडु कीर्तन करीत असत आणि मी लहानलहान उपदेशात्मक लेख लिहून वाचून दाखवीत असे.

एका वर्षानंतर आम्ही समाजाचे कार्यालय विजयनगरम महाराजांच्या मुलींच्या शाळेत नेले. अलीकडेच प्रार्थना समाजाची स्वत:ची एक इमारत बांधण्यात आली आहे. प्रार्थना समाजाने अनेक उत्तम कामे केली आहेत. तसेच अनेक व्यक्तींचे आचारविचार सुधारण्यात समाज सहाय्यभूत झाला आहे असे 'निस्संशयपणे म्हणता येईल. गरीबांसाठी रात्रीच्या शाळा सुरू करून समाजाने आपल्या कार्याचा प्रारंभ केला.

४. १८८० ते १८९०

मद्रासच्या कित्येक प्रमुख व्यक्तींनी एकत्र येऊन स्त्रियांच्या पुनर्विवाहाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने १८८० मध्ये एका संघटनेची स्थापना केली आणि त्याबद्दलचे परिपत्रक सर्व जिल्ह्यांना पाठवले. श्रीपल्ले चंचलराव त्या संघाचा चिटणीस होता. दोन वर्षे या संघाने खूपच जोरात कार्य केले. पण नंतर त्याचे नाव देखील ऐकू येईनासे झाले. संघाचे काम चालू होते त्या काळात महामहोपाध्याय श्री. परवस्तु वेंकट रंगाचार्य यांनी स्त्रीपुनर्विवाह शास्त्रसंमत असल्याचे जाहीर केले व १८७५ मध्ये एक छोटीसी पुस्तिका प्रकाशित केली.

व्यभिचार, भ्रूणहत्या इत्यादी अनिष्ट गोष्टीपासून मुक्त होऊन बालविधवांना पुनर्विवाह करून आपल्या नवऱ्याबरोबर सुखाने संसार करता आला पाहिजे असे मला नेहमी मनःपूर्वक वाटायचे मात्र विधवाविवाहाचा कार्यक्रम प्रत्यक्षात उतरण्याची वेळ अद्याप आलेली नाही असे मला वाटे. त्यामुळे विधवाविवाहाचा आग्रहाने प्रचार करावा असे त्यावेळी मला वाटत नव्हते.

माझे वर्गमित्र आणि देशभक्त चलपल्लि बापय्य पंतुल एक दिवस कळकळीने आणि उत्साहाने मला म्हणाले, "आपण विधवाविवाहासाठी काहीतरी भरीव कार्य केले पाहिजे." माझ्यासारख्या सामान्य माणसाने एवढे महान कार्य हाती घेणे फारसे लाभदायक होणार नाही असे मला स्वतःलाच वाटत होते. त्यामुळे या मित्राच्या विचाराला प्रोत्साहन न देता मी दुर्लक्ष करीत राहिलो. तरीही माझ्या मित्राने पुन्हा दोनतीनदा याविषयी मला आग्रहाने सांगितले. तिसऱ्यांदा त्याने हा विषय काढला तेव्हा मी धीर करून विचारले, "तुझ्या भावाने तुझे नाव टाकले, तुझ्या नातेवाईकांनी तुला त्रास दिला तरीही तू शेवटपर्यंत माझ्याबरोबर काम करायला तयार आहेस ?" त्यावर जराही काचकूच न करता ठामपणे त्याने उत्तर दिले, "कितीही संकटे आणि अडचणी आल्या तरी तुझी या कामात साथ सोडणार नाही." तेव्हा मात्र मला वाटले ही दैवी आज्ञा आहे. "ठीक आहे तू विधवा विवाहाविषयीचे एक घोषणापत्र तयार करून घेऊन ये. मी सही करून ते छापतो." मी उत्तर दिले.

माझ्या सहीचे घोषणापत्र प्रसिद्ध होताच शहरातील सर्व विद्वान माझ्यावर तुटून पडले. त्यात लौकिक व्यवहारात भेदभावाने वागणारे सनातन धर्माचे अनुयायी आणि वैदिक संप्रदायाचे पाठीराखेच प्रामुख्याने होते. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी पुनर्विवाहासंबंधी एक पुस्तक लिहिले आहे असे ऐकले होते. पण अद्याप मला ते वाचायला मिळाले नव्हते. माझ्यापाशी केवळ मनुस्मृति, याज्ञवल्क स्मृति आणि पराशर स्मृति एवढेच ग्रंथ होते. पुनर्विवाहासंबंधी 'तत्त्वबोधिनी' मध्ये प्रसिद्ध झालेले एक भाषण आणि 'पुरुषार्थ प्रदायिनी'मध्ये प्रकाशित झालेले आणखी एक भाषण मला मिळाले. उपरोक्त ग्रंथातील कथनाशी माझ्या बुद्धिवादी तर्कांचा समन्वय करून तसेच शास्त्रात सांगितलेल्या गोष्टी आणि पुरावे एकत्रित करून मी एक भाषण तयार केले व ३ ऑगस्ट १८७९ ला स्थानिक बालिका पाठशाळेच्या मैदानावरील जाहीर सभेत ते वाचून दाखवले. माझे भाषण संपते न संपते तोच सिंहाने, बैलावर उडी घ्यावी त्याप्रमाणे अनेक वैदिक पंडित पुढे सरसावले आणि मोठमोठ्याने ओरडून अनेक शब्दांनी त्यांनी माझा निषेध केला. पराशर स्मृतिमधील 'नष्टे मृते' इत्यादि शब्दांचे वेगळेच अर्थ असल्याचे ते सांगू लागले. मला प्रत्युत्तर देण्याचीही संधी त्यांनी दिली नाही. उलट पुढील आठवड्यात माझ्या भाषणाचे खंडन करणारे एक भाषण आम्ही देणार आहोत अशी घोषणा करून सभा सोडून निघून गेले.

या घटनेनंतर आजवर जे लोक तोंड फाटेपर्यंत माझी स्तुती करीत ते आता माझी निंदा करू लागले. माझ्या अनेक मित्रांची मजल तर मला निरुत्साही करण्यापर्यंत गेली. परंतु माझ्या कार्यात बापय्य पंतुलु मला प्रेरणा व प्रोत्साहन देत असत. त्यांना संस्कृतचेही थोडेबहुत ज्ञान होते. त्यांनी अनेक प्रकारांनी मला मदत केली. मी सुमारे तीस स्मृति मागवल्या. माझ्या युक्तिवादाला उपयुक्त ठरतील अशा अनेक गोष्टी मला त्या स्मृतींत सापडल्या. ठरल्याप्रमाणे नंतरच्या आठवड्यात पंडित मंडळींनी आपली बाजू मांडणारे भाषण वाचले. मी त्याला विरोधी असा माझा युक्तिवाद मांडला. पंडितांच्या युक्तिवादात काहीही तथ्य व सत्य नाही आणि विधवाविवाह शास्त्रसंमत आहे असे विचारी व्यक्तींनी माझ्या भाषणानंतर कबूल केले.

जाहीर सभेत पंडित मंडळींना माझा पराभव करता आला नाही, तेव्हा दुसऱ्या मार्गांनी मला वठणीवर आणण्याचा ते प्रयत्न करू लागले. काही मंडळींनी माझी समजूत घालून, काहींनी प्रलोभन दाखवून तर काहींनी धमकी देऊन माझे विचार बदलण्याचा प्रयत्न केला. अखेर शहरातील पंडितांनी विशाखापट्टणम जिल्ह्यातील विद्वानांकडून एक विरोधी प्रबंध लिहून घेतला आणि तो वाचून दाखविण्यासाठी ज्योस्युल पेरिचयननुलु यांच्या घरी एक सभा बोलावली. त्या सभेला विधवा विवाहाविरुद्ध असलेल्या लोकांनाच फक्त निमंत्रण होते. मलाही पूर्वसूचना न

देता जबरदस्तीने तेथे बोलावून नेले. सभेत वर उल्लेखिलेला प्रबंध वाचून दाखविण्यात आला आणि त्यातील विवेचनाला येथल्या येथे उत्तर द्या असे मला त्यांनी सांगितले. तरीही मी एकेक प्रश्न घेऊन त्याला यथायोग्य उत्तर देण्यास प्रारंभ केला. माझी उत्तरे पंडित मंडळी शांतपणे ऐकूनही घ्यावयास तयार नव्हती. एकजण पोटदुखीचा बहाणा करून सभेतून निघून गेला तर दुसऱ्याने पाय दुखत असल्याचे ढोंग केले. अशाप्रकारे एकामागोमाग एक त्या सभेतून निसटू लागले. तेव्हा एक वैष्णव पंडित उठून ओरडला, "हा केवढा अन्याय आहे ? ही सभा तरी कसली ?" तो पंडित जरूर सनातनी होता, परंतु पंडित मंडळींचे वर्तन त्याला असह्य झाले आणि ओरडतच तो सभेतून उठून गेला.

विधवाविवाहाबाबत पहिले भाषण प्रसिद्ध होताच साऱ्या आंध्रांत त्या विषयावर सर्वत्र वादविवाद सुरू झाले. कित्येक विद्वानांनी माझ्या विचाराचे खंडन करणारी पुस्तकें लिहिली. या सर्व पुस्तकांतील मुख्य मुद्यांना उत्तर देण्यासाठी १२ ऑक्टोबरला बालिका पाठशाळेत भरलेल्या प्रचंड सभेत मी दुसरे भाषण केले आणि नंतर ते प्रसिद्धही केले. अनेक पत्र-पत्रिकांनी माझ्या भाषणावर टीका केली. 'विवेकवर्धनी'त मी तिचा समाचार घेत असे. तसेच सवड सापडली की ठिकठिकाणी जाऊन मी त्या विषयावर सभाही घेत असे.

काकिनाडा येथे एका रविवारी हिंदु पाठशाळेच्या इमारतीत माझे पहिले भाषण झाले. त्यात मी विधवाविवाह शास्त्रसंमत कसा आहे ते दाखवून दिले. शहरातील माझ्या विरोधकांनी पुढील रविवारी माझ्या भाषणाचे खंडन करून ते कसे असत्य आहे हे सिद्ध करू असे जाहीर केले. माझ्या भाषणाच्या खंडनार्थ जी टीका करण्यात येईल तिला योग्य उत्तर देण्याच्या हेतूने मी देखील त्या रविवारी काकिनाड्याला गेलो. सभा देवळात बोलावली तर आपणही येऊ असा निरोप पंडित मंडळींनी माझ्याकडे पाठविला तेव्हा मी माझ्या सहकाऱ्यांसह विष्णुमंदिरात सभेसाठी गेलो. सभेत विधवाविवाहाचा निषेध करणाऱ्यांनी माझ्या भाषणाच्या विरोधी एक पुस्तकच वाचायला प्रारंभ केला. त्यातील वेदार्थासंबंधीचा भाग संपता संपता संध्याकाळ झाली. दुसऱ्या दिवशी स्मृतिविषयीचा उरलेला भाग पूर्ण करता करता सकाळ संपून दुपार उजाडली. त्या दिवशी पुन्हा दुपारी सभा भरली. मी माझे भाषण सुरू करणार एवढ्यात मल्लादि अच्चनशास्त्री नावाचे एक प्रकांडपंडित सभेत अवतीर्ण झाले. निःपक्षपाती निर्णय देण्यासाठी आपण मध्यस्थाचे काम करतो असे ते म्हणाले. मी श्रुतीच्या अर्थाचे विवरण करून सांगितले तेव्हा हे शास्त्रीमहाशय आपण आपले निष्पक्ष मत मांडणार आहोत असे सांगून उठले आणि कमरेला खोचलेले कागद काढून ते वाचण्यास प्रारंभ केला. ते विधवाविवाहाला विरोध असणारे भाषण होते. तेव्हा शास्त्रीबुवांची न्यायप्रियता

कोणत्या प्रकारची आहे हे सभासदांच्या लक्षात आले आणि त्यांनी शास्त्रीबुवांना निर्णय देण्यास मनाई केली. तेव्हा काही लोक चिडून सभा सोडून निघून गेले. शास्त्रीबुवाही मग संध्येची वेळ झाली असा बहाणा करून निघून गेले.

विरोधी गटाच्या ब्राह्मण मंडळींनी गडबड माजविण्याच्या उद्देशाने मंदिराच्या दाराजवळ माझ्याशी धक्काबुक्की सुरू केली, पण पोलिसांनी त्यांना आवरले.

विरोधकांनी मला मारहाण करण्याचा प्रयत्न केवळ काकिनाडयातच केला असे नाही. पुढे माझ्या गावी राजमहेंद्रवरममध्येही असाच एकदा प्रयत्न केला. मद्रासमध्ये देखील असा प्रयत्न झाला. तेथील वाटरमेनपेटमध्ये विधवाविवाहाच्या आवश्यकतेवर भाषण करीत असताना काही वैष्णव ब्राह्मण माझ्यावर तुटून पडून मला मारपीट करू लागले. त्यावेळी रावबहादुर श्रीवनप्पाकमु अनंताचार्यलु यांनी मला सोडविले आणि आपल्या गाडीत बसवून मला घेऊन गेले. मद्राससारख्या राजधानीच्या शहरात असे घडू शकते तर एका लहानशा गावात असा अन्याय घडावा यात विशेष आश्चर्यकारक असे काही नव्हते.

विधवाविवाह संघाच्या कार्यामुळे बालविधवांच्या पालकांनी आपल्या विधवा मुलींचा पुनर्विवाह करण्याचा निश्चय केला. आमच्या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी विधवा मुलींशी लग्न करावयास आपण तयार असल्याचे बोलून दाखविले. एका विधवाविवाहाचे वेळी मी आणि बापय्या पंतुलु घरोघर फिरलो आणि भोजनाचे निमंत्रण दिले. तेव्हा तीसाहून अधिक भिक्षुकांनी जेवायला यायचे कबूल केले. एवढेच नव्हे तर निमंत्रणपत्रावर सह्याही केल्या. आम्ही हे कार्य सुरू केले तेव्हा आमच्यापाशी एक कवडीही नव्हती. परंतु काही आठवड्यांतच या कार्यासाठी तीस हजार रुपयांची आश्वासने मिळाली. दोन वर्षे विधवाविवाहाचा प्रचार चालू होता. त्यानंतर पहिला विधवाविवाह झाला. तोपर्यंतचा सर्व खर्च मी स्वतःच्या खिशातूनच करीत असे. माझी वेळोवेळी केलेली भाषणे छापून बहुतेक फुकटातच वाटत असे. ३०–४० स्मृती आणि अन्य धार्मिक ग्रंथ स्वतःच्या पैशानेच खरेदी केले होते. विधवा मुलीबरोबर विवाह करण्याचे वचन देणाऱ्या विद्यार्थ्यांचे भाडे मीच खर्च करीत असे. बालविधवांचा शोध घेऊन माहिती देणाऱ्या, तसेच या बाबतीत प्राथमिक स्वरूपाची मदत करणाऱ्या कार्यकर्त्यांना मीच वेळोवेळी पैसे देत असे. बालविधवांच्या पालकांना भेटण्याकरिता असलांपुरम्, मंडपेट, ताल्लपूडि, काकिनाडा, रामचंद्रपुरम्, वालकोल्लु इत्यादी ठिकाणी मी इतर कार्यकर्त्यांना पाठवीत असे. स्वतः देखील मी काही ठिकाणी जात असे. माझ्या या खटपटीत सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच मला खूप मदत केली.

धनवान राजेमहाराजे देखील या प्रचंड कार्याला पुरे पडणार नाहीत असे हे कार्य होते. असे हे काम पैसा, शिक्षण आणि सत्तेचे बळ नसणाऱ्या माझ्यासारख्या चार-पाच

छोटया व्यक्तींनी आपल्या अंगावर घेतले आणि त्यासाठी आम्ही कष्ट करीत होतो. जगाचा अनुभव असलेल्या आणि उच्चशिक्षित काही व्यक्तींनी आम्हाला अपार प्रोत्साहन दिले आणि आमच्या चळवळीला आश्रय देऊन तिला बळकटी आणली. आम्ही थोडेबहुत शक्तिशाली बनलो. दोन वर्षे विधवाविवाहाच्या प्रश्नावर वाक्-युद्ध करीत होतो. पण क्रियाशून्य वाद निरर्थक आहे असे वाटू लागले. तेव्हा काहीही करून आपण काही विधवा-विवाह घडवून आणलेच पाहिजेत असे ठरवले. त्यासाठी आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम, न्यायाधीश सुब्बाराव पंतुलु कोम्मु रामलिंग शास्त्री, बसवराज गवर्राजु आणि मी असा पाचजणांचा एक गुप्त संघ आम्ही बनविला. आपल्या बेताची वाच्यता करायची नाही अशी आम्ही शपथ घेतली आणि कार्यक्रमाची चर्चा गुप्तपणे सुरू केली.

पण कशीतरी ही बातमी फुटली. आमच्या प्रयत्नांना प्रत्यक्ष कार्यरूप येत असल्याचे पाहून विधवाविवाह विरोधी गट खवळला. एक दिवस मार्कंडेयस्वामींच्या मंदिरात त्यांनी सभा बोलाविली आणि मला सभेला बोलाविले. सभेला जात असताना वाटेत मला मारहाण करण्यासाठी काही ब्राह्मण आले होते. विद्यार्थ्यांना हे समजले तेव्हा सभा सुरू होण्याच्या अर्धा तास आधीच साऱ्या मंदिरात दोन एकशे विद्यार्थ्यांनी गर्दी केली. कित्येक विद्यार्थ्यांच्या हातात लाठ्या होत्या. काही विद्यार्थी मंदिराच्या मध्यभागी माझ्या सभोवार बसले. त्या दिवसापासून दोन गटांमधील वैरभाव वाढत गेला.

विरूपाक्ष पीठाचे शंकराचार्य विजयनगरहून निघून वाटेत भिक्षा मागत आणि पाद्यपूजा स्वीकारीत आमच्या गोदावरी भागात येणार होते. राजमहेंद्रवरममधील विधवाविवाह घडवून आणण्याच्या प्रयत्नांची बातमी त्यांच्या कानी गेली. असा प्रयत्न करणाऱ्या सर्व लोकांना जाती व धर्मातून बहिष्कृत केले जाईल असे ते म्हणाले. या पीठाधिपतीच्या पैसे खाण्याच्या प्रकरणांची 'विवेकवर्धनी'त विस्तृत माहिती छापून आम्ही लोकांना जागे केले. या पीठाधिपतीने नवऱ्याच्या घरून पळून जाऊन जगन्नाथपुरीत राहून व्यभिचारी जीवन घालविणाऱ्या एका कुलटेकडून पैसे घेतले होते आणि वर बायकोला घराबाहेर हाकलल्याचा आरोप ठेवून त्या कुलटेच्या नवऱ्याला बहिष्कृत करण्याची धमकी दिली होती. आणि पैसे दिलेस तर तुला शुद्ध करून घेऊ असे सांगून त्याच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला होता. तसेच बोल्लाप्रगड वेंकन्ना नावाच्या एका म्हाताऱ्यावर पन्नास वर्षांच्या वृद्ध स्त्रीशी व्यभिचार केल्याचा आरोप ठेवून तुला जातीबाहेर काढीन अशी धमकी देऊन त्याच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न केला होता. आपली जात सोडून मुसलमानाशी घरोबा करून अपत्ये जन्मास घालणाऱ्या एका ब्राह्मण कुलकलंकिनीच्या मुलाला याच पीठाधिपतीने आपला शिष्य म्हणून स्वीकारले होते. या साऱ्या कथा आम्ही 'विवेकवर्धनी'त प्रसिद्ध केल्या. त्याचा परिणाम असा झाला की पीठाधिपती आमच्या शहरात आले तेव्हा राजमहेंद्रवरमच्या कोणीही

त्याला भिक्षा घातली नाही. आपल्या शिष्यपरिवारातील कुलटेच्या मुलाला हाकल्यानंतरच स्वामीजींना भिक्षा मिळाली.

थोडेफार शिक्षण झालेल्या काही विधवांची, 'आम्हाला वैधव्याच्या दुःखातून मुक्त करा', अशी माझ्याकडे पत्रे आली होती. वयस्क विधवा स्त्रीपेक्षा एखाद्या लहान विधवा मुलीचा पुनर्विवाह करून देणे अधिक चांगले आणि शिवाय आमच्या आंदोलनालाही त्यामुळे तात्काळ लोकप्रियता मिळेल असे आम्हाला पहिल्यापासून वाटत होते. आपल्या विधवा मुलीचा विवाह करायला तयार असलेले लोक म्हणत की, अगोदर दुसरा एखादा विधवा विवाह होऊ दे मग आमचा दुसरा क्रम लावा. पण पहिले पाऊल टाकण्याचे धाडस दाखविणारा कोणी पुढे येत नव्हता.

याचवेळी कृष्णा जिल्ह्यातील तिरूवूरूचे दुय्यम तहसीलदार श्री. दर्भा ब्रह्मानंदम यांचे ५ नोव्हेंबर १८८१ ला मला एक पत्र आले, "येथे एक बारा वर्षांची ब्राह्मण बालविधवा आहे. तुमच्या शिष्यांपैकी एखाद्याला पाठविलेत तर आपल्या मुलीला तुमच्याकडे पाठवून देण्याचे तिच्या आईने कबूल केले आहे. तेव्हा आपण लवकरात लवकर विश्वासू, निर्भय आणि सच्चरित्र अशा गृहस्थाला माझ्याकडे पाठवा. ही गोष्ट अत्यंत गुप्त रहावी अशी मुलीच्या आईची इच्छा आहे. आपल्या एखाद्या सहकाऱ्याने आपले पत्र घेऊन येथे यावे आणि एक प्रवासी म्हणून मला भेटावे."

या कार्यात सुरुवातीपासून अत्यंत उत्साहाने आमच्याबरोबर कार्य करणारे आमचे मित्र श्री. सोमंचि भानुशंकर राजु यांच्या हाती एक चिठ्ठी देऊन मी त्यांना १५ तारखेला ब्रह्मानंदम यांच्याकडे पाठवले. आम्ही त्या मुलीच्या आईचे नावही त्या मित्राला सांगितले नव्हते. ब्रह्मानंदम यांना भेटा, ते तुम्हाला सर्व काही सांगतील एवढेच त्याला सांगितले होते.

माझा मित्र राजमहेंद्रवरमहून गेल्यानंतर दोनच दिवसांनी ब्रह्मानंदम यांचे आणखी एक पत्र आले. त्यात लिहिले होते, "मी तात्काळ विनुकोंडा येथे तहसीलदार पदावर रुजू व्हावे असा आदेश काल अकस्मात मला आल्याने मी उद्या येथून निघत आहे. पण तुम्ही निराश होऊ नका. रेपूडि गावी जाऊन तुमच्या सहकाऱ्याला बालविधवेच्या आईशी बोलून त्या मुलीला घेऊन यायला सांगा."

माझा तो मित्र तोपर्यंत अर्ध्या वाटेपर्यंत गेला असेल. ज्या गावी त्याला जायचे होते, ते गाव आमच्या शहरापासून दीडशे मैलांवर होते. तेथे जायला रेल्वे नव्हती किंवा तेथे तार ऑफीसही नव्हते. मी माझ्या सहकाऱ्यांशी याबाबत बोललो आणि त्या बालविधवेचे गाव, तिच्या आईचे आडनाव आणि पुढे काय करावयाचे यासंबंधी सूचना असलेले एक पत्र सहकारी मित्राला लिहिले आणि सीलबंद पाकिटात घालून ते एका नोकराबरोबर पाठवून दिले. दरम्यान माझा मित्र ब्रह्मानंदमच्या घरी पोचला. चौकशी

करताना ब्रह्मानंदम कुठेतरी दूरच्या गावी गेला आहे असे त्याला समजले. माझ्या मित्राची फारच विचित्र अवस्था झाली. पुढे कोठे जावे हेही त्याला कळेना. ज्या कामगिरीवर तो आला होता त्याबाबत दुसऱ्याशीही तो बोलू शकत नव्हता. शिवाय खरे म्हणजे आपण कोण आहोत हेही तो कोणाला सांगू शकत नव्हता. पण तो हुषार आणि कार्यचतुर असल्यामुळे घाईघाईत तसाच परतला नाही. माझ्या पत्राची वाट पहात त्याच गावात थांबला. दरम्यान मी पत्र देऊन पाठवलेला नोकर तेथे पोचला आणि त्याने माझे पत्र मित्राला दिले. लगेच ते दोघे ज्या गावी जायचे होते त्या गावाला जायला निघाले.

त्या बालविधवेचे आईवडील उच्चकुलीन ग्रामाधिकाऱ्यांपैकी होते. एक मुलीची आई सोडली तर त्या बाल विधवेचा पुनर्विवाह करणे त्या कुटुंबातील तसेच तिच्या नातेवाईकांपैकी कोणालाही पसंत नव्हते. अशी कठीण परिस्थिती असल्यामुळे माझ्या मित्राने आपण कोणाकडे जाणार आहोत हे गाडीवाल्याला देखील सांगितले नव्हते. रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी ते सर्वजण गावात पोचले. मित्राने मुलीच्या घरी जाऊन तिच्या आईला उठवले आणि आपण काय कामासाठी आलो आहोत ते तिला सांगितले. परंतु ब्रह्मानंदम आल्याशिवाय मी आपल्या मुलीला तुमच्याबरोबर पाठवणार नाही असे मुलीच्या आईने स्पष्ट शब्दात सांगितले. माझ्या मित्राने रात्रभर कसेतरी मुलीच्या आईला समजावले आणि दिवस उजाडण्यापूर्वी त्या मुलीला घेऊन तो गावाबाहेर पडला. पाठीमागून कोणी येऊन आपणाला पकडेल की काय अशी त्याला सारखी भीती वाटत होती. झपाझप प्रवास करून त्याने त्या मुलीला २६ ता. ला माझ्या घरी आणून सोडले. दुसऱ्याच दिवशी ही वार्ता साऱ्या शहरात पसरली. त्या मुलीला पहावयास गटागटाने लोक येऊ लागले.

मग आम्ही वराच्या शोधाला लागलो. पूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी बालविधवांशी लग्न करण्याचा निश्चय केला होता त्यापैकी काहींनी आपल्या आईवडिलांना घाबरून व त्यांच्या दडपणामुळे त्यांच्या इच्छेनुसार विवाह केले होते. त्याच सुमाराला विशाखापट्टणम येथे पोलिस खात्यात काम करणाऱ्या २२ वर्षांच्या एका तरुणाची पत्नी अचानक निधन पावली. लहान असताना कित्येक वर्षे माझ्या घरी तो शिक्षणासाठी राहिला होता. कितीतरी लोकांनी आपल्या मुली त्याला देऊ केल्या पण त्याने स्पष्ट नकार दिला. कितीही संकटे आली तरी विधवेशीच विवाह करायचा त्याचा निश्चय होता. त्याचे ते धैर्य आणि परोपकार वृत्ती प्रशंसनीय होती.

नाळमु कामराजु या गृहस्थांनी या लग्नाच्या खर्चासाठी एक हजार रुपये दिले. वराचे नाव गोगुलपारि श्रीरामुलु होते. तो विधवेशी विवाह करणार ही बातमी जाहीर होताच त्याच्या अनेक मित्रांनी आणि नातेवाईकांनी त्याला तसे न करण्याबाबत

सांगितले. त्याला विविध मार्गांनी परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण अखेर त्यांची निराशा झाली. आता हा विवाह निश्चित होणार असे कळताच शहरात अशी काही खळबळ माजली की जणू वावटळ येऊन आणि तुफान होऊन समुद्रावर तांडव सुरू झाले आहे. या प्रकरणामुळे माझे मित्र देखील माझ्याशी बोलायला घाबरू लागले. ज्या महाशयांनी विधवाविवाह आंदोलनाच्या सफलतेसाठी 'आपण आपल्या प्राणाचीही आहुती देऊ' अशी फुकाची गर्जना केली होती, त्यांच्याविषयी काय सांगावे ? सदर सद्गृहस्थ या लग्नाला तर आले नाहीतच पण माझ्या गल्लीतून जायलाही घाबरू लागले. माझी गल्ली टाळून ते आपल्या घरी जात. माझे नातेवाईक मला वाळीत टाकल्याप्रमाणे माझ्याशी वागू लागले. लग्नाच्या दिवशी तर माझ्या घरात, एवढेच नव्हे तर माझ्या घराभोवती आणि संपूर्ण गल्लीला पोलिसांचा वेढा पडला होता. अशा प्रक्षुब्ध वातावरणात २१ डिसेंबर १८८१ रोजी राजमहेंद्रवरम येथे पहिला विधवा-विवाह पार पडला.

या विवाहाला काही लोक खरोखरच काही अपरिहार्य कारणामुळे येऊ शकले नाहीत तर काही लोक स्वभावतःच भेकड असल्यामुळे आले नाहीत. तरी देखील माझे अनेक धैर्यवान व समाजप्रेमी मित्र विवाहाच्या वेळी केवळ पान सुपारीलाच नव्हे तर जेवायलाही हजर राहिले. त्यापैकी बसवराज गवर्राजु प्रमुख होते. दहा लोक एकदम मेल्यानंतर एखाद्या कुटुंबात जसा कल्लोळ व्हावा तसा हाहाःकार या विवाहाच्या दिवशी बसवराजु यांच्या कुटुंबात माजला. त्यांच्या सासुरवाडची मंडळी तसेच त्यांचे भाईबंद एकदम रडू लागले आणि शिव्याशाप देऊ लागले.

लग्नाच्या भोजन समारंभास आलेल्या सर्वांना गवर्राजुप्रमाणेच त्रास झाला. त्यामुळे कित्येकांनी नंतर प्रायश्चित घेऊन आमच्याशी संबंध तोडले. अर्थात धैर्य खचविणाऱ्या या परिस्थितीतही या लोकांची मी निंदा करणार नाही.

या साऱ्या अनर्थाचे मूळ अर्थातच मीच होतो. त्यामुळे काही दुष्ट लोकांनी मला ठार मारायचा बेत केला. परंतु विद्यार्थ्यांचे तसेच पोलिसांचे मला संरक्षण होते. त्यामुळे माझा काटा काढणे त्यांना जमले नाही. पोलिस खात्याने आम्हाला केलेली मदत अवर्णनीय आहे. संघर्ष किंवा गडबड होऊ नये म्हणून माझ्या घराभोवती राखीव दलाचे पोलिस पहाऱ्यासाठी ठवण्यात आले होते. स्वतः जिल्हा पोलिस सुपरिटेंडेंट तसेच जॉईंट मॅजिस्ट्रेटही बंदोबस्ताची पाहणी करीत होते. त्यामुळे हा विवाह काहीही गडबड गोंधळ न होता सुरळीतपणे पार पडला. पहिला विधवाविवाह अशाप्रकारे निर्विघ्नपणे पार पडल्याची वार्ता जिल्ह्यात सर्वत्र पसरली. त्यामुळे आपल्या विधवा मुलींचा विवाह करू इच्छिणाऱ्या अनेक व्यक्ती स्वयंस्फूर्तीने माझ्याकडे येऊ लागल्या. त्यामुळे पहिल्या विवाहानंतर चारच दिवसांनी दुसराही विवाह पार पडला. आता अशी अनेक लग्ने

होणार असे लोकांना वाटू लागले. या दोन विवाहानंतर नवदंपतींना आशीर्वाद देणारी आणि आमचे अभिनंदन करणारी अनेक पत्रे व तारा चोहोंबाजूंनी येऊ लागल्या.

पहिला विवाह पार पडल्यानंतर चौथ्याच दिवशी बारा वर्षांच्या आपल्या विधवा मुलीला घेऊन तिची आई आमच्याकडे आली. आपल्या पतीने स्वत: मुलीला आपल्याकडे पाठवले आहे असे तिने सांगितले. आम्ही तिच्यावर विश्वास ठेवला आणि प्रवेश परीक्षेला बसलेल्या एका विद्यार्थ्याला ती मुलगी दाखवली. तिच्याशी लग्न करायला तो कबूल झाला. विवाहाची सर्व तयारी झाली. नवरा मुलगा मंगलस्नान करायला बसला, तेवढ्यात मुलाचा बाप रडतरडत लग्नमंडपात धावत आला आणि आपल्या मुलाला ओढून नेण्याचा प्रयत्न करू लागला. आमच्यापैकी काहीजण वरपित्याची विवाह लागेपर्यंत समजूत घालीत होते. अखेरीला त्याची कशीतरी समजूत घालून त्याला विवाहमंडपाबाहेर काढले. दुसऱ्या दिवशी रात्री नवरा-नवरीची वरात निघाली. वरातीत प्रतिष्ठित हिंदू नागरिकच केवळ नव्हते तर डिस्ट्रिक्ट जज्ज, जॉईंट मॅजिस्ट्रेट, कॉलेज प्रिन्सीपल इत्यादी युरोपीय देखील पालखीसमवेत चालले होते.

दुसऱ्या विधवाविवाहातील नवरीला तिच्या बापाची संमती न घेता तिची आई घेऊन आली होती, ही गोष्ट आमच्या विरोधकांना कशी कळली कोण जाणे ! त्यांनी या गोष्टीचा फायदा घेऊन मुलीच्या बापामार्फत आम्हाला अद्दल घडविण्याचे कारस्थान रचले. त्यांच्या या कुटिल कारवायांचा आम्ही वेळीच पत्ता लावला. त्या मुलीच्या आईला सत्य परिस्थिती विचारली आणि लगेच आपल्या पतीला बोलावून आणायला पाठवले. अशाप्रकारे एका बेइज्जतीच्या प्रसंगांतून सहीसलामत सुटलो. तसेच कोर्टकचेऱ्यांच्या भानगडीतूनही वाचलो.

या विवाहानंतर दुसऱ्या दिवसापासूनच काही मूर्ख लोकांनी आम्हास त्रास द्यायला सुरुवात केली. या शुभ कार्याशी थोडाही संबंध आलेल्या भाडेकरूंना घरमालक घरांतून घालवू लागले. त्यांना विहिरीवर पाणी भरू देईनात. पाणी आणण्यासाठी ब्राह्मणांना देखील आपल्या घरांत यायला बंदी केली. मंगलकार्यासाठी या लोकांच्या घरी जाण्यास भटजींना मनाई करण्यात आली. नातेवाईकांनाही त्यांच्या घरांत जायला प्रतिबंध करण्यात आला. हा सर्व त्रास सोसून जे खंबीरपणे आमच्याबरोबर राहिले त्यापैकी काही लोकांना मी माझ्या घरात ठेवून घेतले. हा विवाह झाल्यानंतर काही दिवसांनी जवळपास तीस लोकांना जातिबहिष्कृत केल्याची श्रीशंकराचार्यांची पत्रे आली.

एका बाजूला अशा अडचणी येत होत्या तर दुसरीकडे अनेक ठिकाणाहून आमच्याकडे प्रोत्साहन देणारी आणि अभिनंदनाची पत्रे येऊ लागली. मद्रासमधील कित्येक मित्रांनी, लोकांमध्ये उत्साह आहे तोवर भाषणे देण्यासाठी ताबडतोब मद्रासला यावे असे निमंत्रण दिले. मद्रासलाही दोनचार विधवाविवाह घडवून आणता येतील असे त्यांनी लिहिले

होते. नल्लगोंडा सीता रामय्याला मद्रास पहावयाची इच्छा होती. तुम्ही मला मद्रासला घेऊन गेलात तर मी तुम्हाला स्वयंपाक करून जेवू घालीन असे तो म्हणाला. मी कबूल झालो.

त्या काळात मद्रासला जाण्यासाठी रेल्वे नव्हती. मद्रासला जाण्यासाठी नावेतून कालवा पार करावा लागे. एक दिवसाचा प्रवास करून प्रथम काकिनाडयाला जायचे आणि तेथून आठवडयातून एकदा सुटणाऱ्या जहाजाने दोन दिवस प्रवास करून मद्रासला पोचायचे. जहाज ३० डिसेंबरला सुटणार होते. पण नेमके त्याच दिवशी वादळ सुरू झाले. अशा परिस्थितीत समुद्रप्रवास करू नका असा पैडा रामकृष्णय्या इत्यादि मित्रांनी मला सल्ला दिला. पण एकदा एखादी गोष्ट ठरवली की ती करायचीच असा माझा स्वभाव होता. त्यामुळे वादळ व पाऊस होता तरी मी नावेत चढलो आणि माझ्या सहकाऱ्यांना घेऊन समुद्रातून पाच मैल गेलो आणि जहाजाजवळ पोचलो. परंतु जहाजाच्या कप्तानाने नाव जहाजाच्या जवळ आणणे धोक्याचे आहे असे सांगून जहाजावर चढू देण्यास नकार दिला. भर पावसात नावेत बसल्याने आम्ही दोघे भिजून आखडलो. शेवटी रात्री ८–९ च्या दरम्यान किनाऱ्यावर परत गेलो.

सिंह पाहिल्यावर गाळण उडावी तसे शंकराचार्यांची बहिष्कृत करण्याची पत्रे ज्यांना आली त्यांचे झाले. आमच्या आंदोलनात मिळणारे त्यांचे सहकार्य बंद झाले. आमच्या बाजूचे अनेक लोक सनातन्यांच्या बाजूला गेले, आमचे काही ते ऐकूनच घेईनात. आत्मकूरि लक्ष्मीनरसिंहमने शंकराचार्यांवर केलेला दावा मागे घेतला. दर्भा वेंकटशास्त्रींनी, पहिला विधवा करणाऱ्या गोगुलपाटि श्रीरामुलुची बदनामी केल्याबद्दल काही प्रमुख लोकांवर अब्रुनुकसानीचा दावा लावला. परंतु दाव्याचा निकाल त्यांच्याविरुद्ध झाला. परिणामी या लोकांशी शत्रुत्व निर्माण होण्यापलीकडे त्यांच्या हाती काही लागले नाही. आमच्या विरोधकांनी आपल्या विजयाच्या घमेंडीत आमचा उपहास करावयास सुरुवात केली.

आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम याने दावा मागे घेतला. एवढेच नव्हे तर नंतर वैष्णव पंथ स्वीकारून प्रात्यश्चितही घेतले. विधवाविवाहाचे काम केल्याबद्दल पश्चाताप झाल्यामुळेच लक्ष्मीनरसिंहमने प्रायश्चित घेतले आहे असा विरोधकांनी प्रचार सुरू केला तेव्हा 'विवेकवर्धनी'त लक्ष्मीनरसिंहमने एक पत्र प्रकाशित करून जाहीर केले की वैष्णव मत स्वीकारतांना प्रायश्चित करणे, जरूर असते म्हणून आपण प्रायश्चित घेतले. आणि विधवाविवाहाच्या कार्यात मी पूर्ववत् सक्रिय सहकार्य करण्यास अजूनही तयार आहे. मात्र त्यानंतर झालेल्या विधवाविवाहाच्या कार्यक्रमात त्याने भाग घेतला नाही. तरीदेखील पुढेही विधवाविवाहाच्या कार्यक्रमात त्याची आस्था कायम राहिली.

विधवा विवाह आंदोलनाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे श्री. पैदा राम-

कृष्णय्या हे विधवाविवाह संघाशी संबंध तोडून प्रायश्चित करणार आहेत अशी काही दिवसांनी अफवा पसरली. ही फार अनिष्ट बातमी होती. ती खरी ठरू नये म्हणून मी सर्व प्रकारे प्रयत्न केले. या बाबतीत मी माझे अतिशय जवळचे मित्र काकिनाड्याचे सबजज्ज श्री. कृष्णस्वामीराव पंतुलु यांना एक पत्र लिहिले. माझ्या पत्राला त्यांचे उत्तर आले ते असे :

"पैदा रामकृष्णय्या यांनी आचार्यांचा अधिकार मानण्याचे नक्की ठरविले आहे. ते पहिल्याप्रमाणे विधवाविवाहाच्या कामात सहाय्य आणि सहकार्य करू शकणार नाहीत."

अशा अत्यंत कठिण परिस्थितीत देखील आम्हाला गुप्तपणे मदत करणारे काही सज्जन होते. त्यापैकी श्री. न्यापति सुब्बाराव पंतुलु यांचा सर्वांत प्रथम उल्लेख केला पाहिजे. प्रारंभापासून ते आम्हाला आवश्यक तो सल्ला वगैरे देऊन सर्व प्रकारे मदत करीत. त्यांनी श्री. रामकृष्णय्या यांना प्रायश्चित घेण्यापासून परावृत्त व्हावे असा निरोप पाठवला आणि स्वतः काकिनाड्याला जाऊन त्यांच्याशी ते त्यासंबंधी बोललेही. त्यानंतर त्यांनी मला पत्र लिहिले, "प्रायश्चित घेण्यापूर्वी श्री. रामकृष्णय्या आपणास भेटतील. तसे त्यांनी मला वचन दिले आहे."

श्री. न्यापति सुब्बाराव पंतुलु यांच्या सूचनेप्रमाणे श्री. रामकृष्णय्या प्रायश्चित घेण्याच्या निमित्ताने राजमहेंद्रवरमला आले तेव्हा मला भेटले. मी त्यांना तऱ्हेतऱ्हेने समजावले. ते मला, "आता यापुढे विधवाविवाह होणे मुळीच शक्य नाही. तसा एखादा विवाह होणार असेल तर मी जरूर मदत करीन असे म्हणाले. त्यावर मी त्यांना म्हटले, "किमान एक वर्षभर तरी तुम्ही वाट पाहा. या अवधीत विधवाविवाह होण्याची काही लक्षणे दिसली नाहीत तर प्रायश्चित घ्या." मला स्पष्ट नकार द्यायला त्यांना संकोच वाटल्यामुळे "मी सध्या तरी प्रायश्चित घेणे स्थगित करीत आहे" असे सांगून ते निघून गेले. त्यानंतर काही वेळाने रामकृष्णय्या प्रायश्चित घ्यायला जात आहेत अशी काही विद्यार्थ्यांनी बातमी आणली. मी तडक रामकृष्णय्या यांच्या घरी गेलो. आमच्या विरोधकांचा नेता आणि अनेक वैदिक ब्राह्मण त्यांना गराडा घालून बसले होते आणि प्रायश्चित करण्याचा आग्रह करीत होते. मला पाहताच रामकृष्णय्यांनी त्या लोकांना समजावून तेथून पाठवले. मी माझ्या घरी परत आलो दुसऱ्या दिवशी रामकृष्णय्या बोब्बरलंका गावी गेले आणि तेथे प्रायश्चित घेऊन परत आले. आणि त्याचदिवशी काकिनाड्याला निघून गेले. विधवाविवाह कार्यासाठी होणाऱ्या मासिक खर्चाला मदत देणे त्या दिवसापासून त्यांनी बंद केले. पण मी ही गोष्ट कोणाला कळू दिली नाही. कार्यकर्त्यांना यथाशक्ती वेतन वगैरे देऊन सर्व व्यवहार पूर्ववत चालू ठेवले.

प्रथम विधवाविवाह करणारा गोगुलपारि श्रीरामुलु विशाखापट्टणमला निघून गेला. तेथे थोड्याच दिवसांनी तो संग्रहणीच्या विकाराने आजारी पडला. त्याचा विकार दिवसें-

दिवस वाढतच गेला. जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात माझ्या मित्रांनी मला पत्राने, तसेच तारेने श्रीरामुलुचे प्राण धोक्यात असल्याचे कळवले. या बातमीने माझे मन किती व्याकुळ झाले ते शब्दांत व्यक्त करता येत नाही. पहिला विधवा विवाह करणाऱ्या युवकाच्या प्राणाला विवाहानंतर महिन्याभरातच धोका उत्पन्न झाला, तर लोक त्याचा दोष विधवाविवाहाला देतील. शिवाय यापुढे कोणीही तरूण विधवाविवाह करण्याचे धाडस दाखवणार नाही असा विचार मनात येऊन श्रीरामुलुच्या तब्बेतीची पूर्ण काळजी घ्यावी अशी सूचना देणारी पत्रे मी तात्काळ माझ्या अनेक मित्रांना लिहिली. पुढे माझ्या पुरोहिताला श्रीरामुलुकडे पाठवले आणि त्या मागोमाग आमच्या घरी राहणाऱ्या व नट्लगोंड कोदंडरामय्यालाही पाठवले. २७ जानेवारीला तो विशाखापट्टणमला पोचला. तोवर ईश्वरी कृपेने श्रीरामुलुची प्रकृती सुधारली होती आणि तो पूर्ण बरा होण्याच्या मार्गावर होता.

लक्ष्मीनरसिंहमने आपला दावा मागे घेतला त्याच्या दुसऱ्या दिवशी रात्री विरोधी गटाच्या लोकांनी शंकराचार्यांना मोठ्या दिमाखाने मुद्दाम माझ्या घरावरून नेऊन हजारो दिव्यांच्या प्रकाशांत राजमहेंद्रवरमच्या रस्त्यावरून त्यांची मिरवणूक काढली. स्वामीजींनी राजमहेंद्रवरम येथे तळ ठोकला. रोज सवाद्य मिरवणुकीने साऱ्या शहरात हिंडत. आणि 'भिक्षांदेहि' करीत कित्येक महिने ते राजमहेंद्रवरम येथे मुक्काम ठोकून राहिले. स्वामीजींचा विधवाविवाहाला विरोध असला तरी त्यांचे घोटक ब्रह्मचारी शिष्य मात्र रात्रीच्या वेळी गुप्तपणे परस्परांच्या गळ्यांत नुसता हार घालून मंत्रविधिशिवाय विधवांशी विवाह करीत होते. शाळेतल्या अनेक मुलांनी या गुप्त उद्योगाचा पत्ता लावला. एका ब्राह्मण विधवेबरोबर संसार थाटू पाहणाऱ्या एका ब्रह्मचारी शिष्याला एक दिवस रात्री मुलांनी विधवेसह पकडले. त्यांनी त्या अपूर्व दांपत्याला गल्लीत आणून सर्वांसमोर उभे केले. आणि त्यांची छी:थू केली. या घटनेचा बदला घेण्याचे शंकराचार्यांच्या शिष्यांनी ठरविले.

यानंतर दोन दिवसांची गोष्ट. दुपारी बाराच्या सुमारास स्वामी शंकराचार्यांचे शिष्य गोदावरी नदीवर आंघोळ करीत होते. त्याचवेळी दोन विद्यार्थी आंघोळ करण्यासाठी नदीवर आले. त्यांना पाहताच स्वामीजींच्या शिष्यांनी सर्वच विद्यार्थ्यांचा शिव्या देऊन उद्धार करावयास सुरुवात केली. तेव्हा एक विद्यार्थी संतापला व म्हणाला, " ज्या विद्यार्थ्यांची चूक असेल त्यांना शिव्या घाला, सर्वच विद्यार्थ्यांची नालस्ती करणे सर्वस्वी अयोग्य आहे." त्या विद्यार्थ्यांच्या या बोलण्याचा राग येऊन स्वामीजींच्या शिष्यांनी त्याला जबरदस्त मारहाण केली. दुसरा विद्यार्थी तेथून पळाला. शहरात जाऊन त्याने ही बातमी सर्वांना सांगितली. विद्यार्थी एकत्र जमले आणि त्यांनी स्वामीजींच्या वाह्यात शिष्यांना चांगला धडा शिकविण्याचे ठरविले. त्यानंतर विद्यार्थी येणाऱ्या जाणाऱ्यांच्या

गर्दीत शिरून स्वामीजींच्या समोरच्या गल्लीत फिरू लागले. ते कळताच स्वामीजींचे शिष्य घाबरले. ते आपल्या घरांतून बाहेरही पडेनात. उलट आपल्या दाराशी त्यांनी दोन रखवालदार बसविले. सर्व विद्यार्थी मध्यरात्रीपर्यंत वाट पहात बसले होते. पण स्वामीजींचा एकही शिष्य घराबाहेर आला नाही. अखेरीला वाट पाहून विद्यार्थी त्या दिवशी आपापल्या घरी निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व विद्यार्थी नेहमीप्रमाणे शाळेत गेले होते. विद्यार्थ्यांची गल्लीत गडबड नाही असे पाहिले तेव्हा स्वामीजींच्या शिष्यांनी घराबाहेर पडण्याचा धीर केला आणि तिसऱ्या प्रहराच्या सुमाराला गोदावरी-काठी असलेल्या उंचवट्याकडे ते निघाले. एका विद्यार्थ्याने ते पाहिले आणि बाकीच्यांना सांगितले. नदीवरून परत फिरतांना काठावरच्या धान्य गुदामापाशी स्वामीजींचे शिष्य पोहोचले नाहीत तोच त्यांना समोर काठ्या हातात घेतलेले काही विद्यार्थी दिसले. मग काय विचारता ? शिष्यांच्या तोंडचे पाणीच पळाले. घाबरून पळ काढण्याच्या विचाराने ते इतस्ततः धावू लागले. सर्व बाजूंनी विद्यार्थ्यांनी आपणाला वेढा घातला आहे असे दिसताच बचावाचा काही मार्ग न दिसल्याने त्यांनी धूम ठोकली. विद्यार्थ्यांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडले आणि जोड्यांनी ठोकून त्यांना ठिकाणावर आणले. अखेरीला त्यांना नाकधुऱ्या काढावयास लावून सोडून दिले. पळत सुटलेल्या आपल्या सहकाऱ्यांची दुर्दशा पाहून मागे राहिलेले शिष्य नदीत उतरले. गळ्याएवढ्या पाण्या-पर्यंत गेले. तरीही विद्यार्थ्यांनी त्यांचा पाठलाग सोडला नाही. त्यांना पकडून पाण्यांत डुब्या दिल्या. त्यांच्या मस्तकावर ढोलासारख्या टपल्या मारमारून स्वतःची करमणूक करून घेतली. अशाप्रकारे आपल्या एका सहकाऱ्याला अकारण मारल्याबद्दलचे कर्ज विद्यार्थ्यांनी सव्याज वसूल करून घेतले.

अगदी प्रथम ज्या दोन शिष्यांना मारून विद्यार्थ्यांनी सोडले होते ते स्वामीजींकडे पळत आले. जगद्गुरुंच्या शिष्यांचा झालेला अपमान त्यांनी कथन केला आणि पोलि-सांना बरोबर घेऊन ते घटनास्थळी पोहोचले. परंतु तोपर्यंत दोनशेपेक्षा जास्त विद्यार्थी तेथे गोळा झाले होते. नदीच्या पात्रात शिरलेल्या विद्यार्थ्यांनी पोलिसांना घेऊन काही शिष्य येत असल्याचे पाहिले. तेव्हा पोहत त्यांनी दुसरा किनारा गाठला आणि आपल्या घरी निघून गेले. बाकीच्या शिष्यांना घेऊन पोलिस स्वामीजींकडे परत गेले.

शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वामीशिष्यांना जीवानिशी मारले असा प्रवाद रात्री साऱ्या शहरात पसरला. पण विधवाविवाहाच्या विरोधकांची घराबाहेर पडण्याची हिंमत होत नव्हती. ही घटना घडली त्यावेळी थंड हवेची मजा चाखत मी नदीच्या घाटावर एका नौकेत बसलो होतो. त्यामुळे मला त्यावेळी या घटनेची कल्पना आली नाही. संध्याकाळी घरी पोहोचल्यावर मला ही बातमी कळली. परंतु माझ्यापासून बऱ्याच अंतरावर बसलेल्या आमच्या विरोधी गटाच्या नेत्याला ही बातमी कळली असावी. तो घाबरून

गेला. त्याने आपल्या नोकराच्या हातातला दिवा विझवला. चेहरा झाकून घेतला आणि मुख्य रस्ते टाळून गल्ली-बोळातून तो घरी पळाला. हा नेता पूर्वी आमच्या बरोबर आंदोलनात उत्साहाने काम करीत असे.

स्वामीजींच्या कट्टर पाठीराख्यांपैकी एक देखील त्यांचे सांत्वन करायला रात्री त्याच्या घरी गेला नाही. उलट स्वामीजींनी शहर सोडून तात्काळ निघून जावे असा निरोप त्यांनी पाठविला. दुसऱ्या दिवशी सकाळी विद्यार्थी शाळेतून यायच्या आतच स्वामीजींनी आपले चंबुगबाळे शहरातून हलवले आणि नदी पोहून निघून गेले. त्याचबरोबर भिक्षा घालण्याच्या कटकटीतून आमच्या शहरवासियांची सुटका झाली. स्वामीजींना अशा-प्रकारे शहर सोडून जावे लागल्यामुळे आमच्या विरोधकांची मस्ती जिरली. पुढे काही दिवस आम्हाला फारसा त्रास देण्याची त्यांची हिंमत झाली नाही.

अशाप्रकारे राजमहेंद्रवरममध्ये नाना प्रकारच्या अडचणींना तोंड देत आम्ही काम करीत होतो तर तिकडे मद्रासमध्ये माझे मित्र श्री. पल्ले चेंचल पंतुलु आणि श्री. दिवाण बहादुर रघुनाथराव यांनी आमच्या कार्याला पाठिंबा देण्याचे आवाहन स्थानिक पत्र-पत्रिकांमधून केले होते. त्याचा परिणाम होऊन पंचेवीस-तीस लोकांनी आमच्याबरोबर सहभोजन करण्याची इच्छा व्यक्त केली आणि तशी पत्रेही आम्हाला पाठविली. प्रसिद्ध इंग्रजी दैनिक 'हिंदु'मध्ये दर आठवड्याला अशी तीन-चार पत्रे तरी प्रसिद्ध होत असत.

आम्हास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने मद्रासला सहभोजन आयोजित करण्याची व्यवस्था करून चेंचल राव पंतुलु यांनी आम्हाला निमंत्रण पाठवले. आम्ही निमंत्रणाचा स्वीकार केला आणि ईस्टरच्या सुट्टीत मद्रासला जाण्याचे ठरवून तसे त्यांना कळवले. १२ मार्चला श्री. चेंचला राव पंतुलु यांनी मैलापूर (मद्रास)हून मला लिहिले, "३० एप्रिलपर्यंत आपले येणे स्थगित करावे अशी विनंती आपणास करावयास श्री. रघुनाथरावांनी मला सांगितले आहे. आपण लगेच येण्याचे ठरविले असेल तर मी आपली माझ्याच घरी किंवा एखाद्या स्वतंत्र घरी व्यवस्था करीन."

३० एप्रिलपासून आमच्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी लागणार होती. शिवाय सुट्टी असल्याने मला थोडे अधिक दिवस मद्रासमध्ये राहता आले असते व त्या काळात व्याख्याने देता आली असती. त्यामुळे 'मे' मध्येच मद्रासला जाणे सोयीचे होते. सुट्टी लागताच प्रथम विधवाविवाह केलेल्या दांपत्याला बरोबर घेऊन मी सपत्नीक एका ब्राह्मण स्वयंपाक्यासह मद्रासला जायला निघालो. विशाखापट्टणमला जहाजात बसून चौथ्या दिवशी मद्रासला पोहोचलो. श्री. चेंचल राव पंतुलु यांनी मैलापुर भागातील कच्चपेश्वर मंदिराजवळील एका मोठ्या घरात आमची उतरावयाची व्यवस्था केली होती. पंतुलुजींनी पाठविलेल्या घोडागाडीतून मी व्याख्यानाला जात असे. एकदा वापर-पेट येथे माझे भाषण चालू असताना काही मूर्ख वैष्णवांनी मला घेरून मारहाण कर-

ण्याचा प्रयत्न केला. पण माझे मित्र श्री. वनघाकमु आनंदाचार्यलु यांनी माझा बचाव केला आणि आपल्या गाडीत बसवून दूर घेऊन गेले.

आणखी एकदा पेद्दिनायनिपेट (Black Town) गावीं माझे व्याख्यान होते. व्याख्यानाच्या शेवटी अनेक पंडितांनी मला एक प्रश्न विचारला–विधवेने विवाह केल्यानंतर तिच्या पूर्वीच्या पतीचे श्राद्धकर्म कोण करील ? अशातऱ्हेचे अनेक प्रश्न विचारले गेले. मी त्या सर्व प्रश्नांची शास्त्रसंमत उत्तरे दिली. प्रश्न विचारून ते मला पराजित करू शकले नाहीत; तेव्हा त्यांनी मला विचारले, "तुमचा शास्त्रावर विश्वास आहे काय ?" मी त्यांना उत्तर दिले, "नाही. परंतु माझ्या विचारांच्या समर्थनासाठी आणि शास्त्रांवर विश्वास असणाऱ्यांना पटवून देण्याकरिता मी शास्त्रांतील पुराव्यांचा उपयोग करतो."

या सभेआधी ख्रिश्चन कॉलेजच्या अंडर्सन हॉलमध्ये विधवाविवाहावर माझे व्याख्यान होते. शास्त्रसंमत असे काही पुरावे एका कागदावर लिहून घेऊन मी चेंचलराव पंतुलु यांच्या गाडीतून त्यांच्याबरोबर सभेसाठी निघालो. मद्रासमध्ये ते माझे पहिलेच व्याख्यान होते. विधवाविवाहाविषयी जनतेत गैरसमज पसरविण्याच्या दुष्ट उद्देशाने पंडित मंडळींनी काहीतरी वेडेवाकडे लिहिलेली मोठमोठ्या कागदांवरची हस्तलिखित पत्रके साऱ्या शहरात वाटली. आम्ही गाडीतुन जात असताना कोणीतरी ते हस्तलिखित पत्रक आमच्या गाडीत फेकले. मी ते वाचले. त्यात रांड, छिनाल वगैरे अपशब्द आणि निंदानालस्ती फक्त होती. एकदेखील शास्त्रसंमत प्रमाण दिलेले नव्हते.

सभेच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत मी ते पत्रक वाचून संपवले. माझे रक्त संतापाने उसळले होते. मन अत्यंत प्रक्षुब्ध झाले होते. दोन तास मी माझे विचार आवेशाने सांगत होतो. अनेकदा टाळ्यांच्या कडकडाटाने हॉल दुमदुमला. माझ्या व्याख्यानात पंडितांनी केलेले प्रशंसनीय शास्त्रांश किंवा विशिष्ट युक्तिवाद मुळीच नव्हते. सामान्यजनांना खुलवणारे उपरोधपूर्ण शब्दच अधिक होते. परंतु माझ्या व्याख्यानाला आलेल्या श्रोत्यांनी ही शैलीच अधिक चित्ताकर्षक आहे असे बोलून दाखविले.

अशाप्रकारे वादविवादात आणि चर्चेत आमचा वेळ चालला होता. दरम्यान उपनयन समारंभाच्या निमित्ताने बाहेरगावी गेलेले दिवाण बहादुर मद्रासला परत आले. तेव्हा श्री. रघुनाथराव आणि चेंचलराव पंतुलु या दोघांनी एक दिवस ठरवून त्यादिवशी उपनयन संस्कारानिमित्त होणाऱ्या भोजनास हजर राहण्याचे ज्यांनी आधी मान्य केले होते अशांना जेवायला बोलाविले. परंतु भोजनाच्या निमंत्रणपत्राला उत्तर देण्याइतकीही सवड काही सुधारकांना मिळाली नाही, तर काहींनी अन्य कामांमुळे हजर राहू शकत नाही असे कळवून क्षमा मागितली एकटे सबजज्ज श्री. गणपतय्या मात्र हजर राहिले. नंतर रघुनाथराव आणि अन्य मित्रांनी विचार-विनिमय करून श्रीपार्थसारथी मंदिरातून देवाचा प्रसाद मागविला आणि ते आमच्याबरोबर भोजनाला बसले. विधवाविवाह केलेल्या

दंपतीशिवाय या भोजन समारंभाला एकूण सहा माणसे उपस्थित होती. ती म्हणजे सर्वश्री रघुनाथराव, चेंचलराव पंतुलु, गणपतय्या, दंपूरि नरसय्या, नुन्नव बुच्चय्या पंतुलु आणि मी. जेवणानंतर चेंचलराव पंतुलु यांनी आम्हा सर्वांना भारी किंमतीची नवीन वस्त्रें भेट दिली. शिवाय प्रवासखर्चानिमित्त शंभर रुपये रोख दिले. त्यांचा निरोप घेऊन नंतर जून महिन्याच्या मध्यास आम्ही सर्वजण सुखरूप राजमहेंद्रवरमला परत आलो.

आमच्या समाजापाशी काहीही पैसा नव्हता. किंवा समाजाची मासिक वर्गणीही नव्हती. आम्ही कंचिकृष्णस्वामी यांना आमची अडचण सांगितली, तेव्हा त्यांनी रामकृष्णय्यांना आर्थिक मदत करण्यास प्रवृत्त केले. आणि दिवाण बहादुर रघुनाथराव आणि पल्ले चेंचलराव पंतुलु यांना ट्रस्टी व्हावयास सांगून जूनच्या अखेरी त्यांच्याकडे दहा-हजार रुपये मद्रासला पाठविण्याची व्यवस्था केली. कृष्णस्वामीराव पंतुलु यांनी या कामात आमच्यावर केलेले उपकार आम्ही कधीच विसरणार नाही.

दहा हजार रुपये दिले तेव्हा श्री. रामकृष्णय्यांना यापुढे विधवाविवाह घडतील असे मुळीच वाटत नव्हते. चेंचलराव पंतुलु आणि रघुनाथराव यांना त्यांनी लिहिलेल्या पत्रांत खालील गोष्टी स्पष्ट केल्या होत्या.

"दोन वर्षांत विधवाविवाह झाले नाहीत तर आपले पैसे आपणास परत पाठवले जावेत; विवाह घडलेच तर त्यापैकी मद्रासच्या समाजातर्फे होणाऱ्या दोन विवाहासाठी दोन हजार रुपये खर्च व्हावेत आणि प्रत्येक विवाहासाठी एक-एक हजार रुपये माझ्याकडे पाठविले जावेत तसेच दरमहा खर्चासाठी जूनपासून दर महिन्याला मला ७५ रुपये द्यावेत."

असे प्रोत्साहन मिळाल्यामुळे आम्ही दुप्पट उत्साहाने आणि निर्भयपणे काम सुरू केले. परंतु सुरवातीच्या काळात आमच्या कार्याला यश मिळण्याची चिन्हे दिसेनात. पूर्वी ज्यांनी आपल्या विधवा मुलींचा विवाह करून देण्याची विनंती आम्हाला केली होती, त्यांना आपल्या विधवा मुलींची लग्ने लावून द्यायला तयार असल्याचे आम्ही सांगितले तेव्हा ते उलट आमच्यावरच संतापले आणि आम्ही काहीतरीच बोलतो आहोत असे म्हणून आमचीच निर्भत्सना करू लागले. काही लोकांची तर आम्हाला आपल्या घरात येऊ नका असे सांगण्यापर्यंत मजल गेली.

एक दिवस पेद्दिभट्ल यज्ञान्न आणि एक शिक्षक श्री. ताडूरि रामाराव हे माझ्याशी बोलणे करण्यासाठी राममहेंद्रवरमला आले. यज्ञन्नाला आपल्या बहिणीचे लग्न एखाद्या वैदिक मताच्या माणसाबरोबर करायचे होते. रामरावाने माध्व संप्रदायाच्या विधवेशी लग्न करण्यास आपण तयार असल्याचे सांगितले. आमच्या पाठशाळेत वैदिक संप्रदायातील एक विद्यार्थी होता आणि तो विधवेशी विवाह करावयास तयार होता. माध्व संप्रदायातील एक विधवा मुलगीही होती. माध्व संप्रदायातील एक गृहस्थ उम्मेत्ताल

वेंकटपतिराव यांनी २४ जून १८८२ रोजी मला पत्र लिहून कळविले होते, "माझी मुलगी शनगवरपु लक्ष्मीबायम्मा हिचा पती निधन पावला आहे. ती सोळा वर्षांची आहे. आमच्या संप्रदायातील कोणी युवक विवाह करण्यात तयार असेल तर तिचे लग्न करावयाचे आहे. विवाह खर्चाचा भार आपण माझ्यावर टाकला नाही तर मला अतिशय बरे वाटेल."

हे दोन्ही विवाह होणार इतक्यात ती बातमी त्या विधवा मुलीचे वडील वेंकटपतिराव आणि आपल्या बहिणीचे लग्न करू इच्छिणारे यज्ञन्ना यांच्या नातेवाईकांना कळली तेव्हा ते भ्याले व मागे सरले. वेंकटपतिरावांच्या मुलीने आणि यज्ञन्नाच्या बहिणीने त्या अगोदर मला पत्रें लिहून आपला निश्चिय कळविला होता. म्हणून प्रत्यक्ष त्या बालविधवेशीच पत्रव्यवहार करून आपण काम साधले पाहिजे असा मी निश्चय केला. एक मुलगी पेद्दापुरम येथे होती आणि दुसरी काकिनाडा येथे. त्यांच्या नावाने पोस्टाने पत्रे पाठविली तर विवाहाचा बेत उघडकीस आला असता आणि शिवाय कामही साधले नसते. म्हणून या कामी विधवाविवाहासंबंधी आस्था असणाऱ्या पेद्दापुरम व काकिनाडा येथील दोन कार्यदक्ष मित्रांच्या मदतीची गरज होती. माझे एक निकटचे भाऊबंद श्री. गुम्मडिदल मनोहरम पेद्दापुरम येथे पोलिस इन्स्पेक्टर होते. त्यांची मदत मला मिळाली असती. माझा मित्र गवर्राजूचाही मला उपयोग होणार होता. त्यांना मद्रासला जायचेच होते. त्यांना काकिनाड्याहूनच मद्रासला जावे लागणार असल्याने काकिनाड्याचे काम मी त्यांच्यावर सोपविले.

गवर्राजूचे २४ ऑगस्ट १८८२ रोजी पुढीलप्रमाणे पत्र आले :— "मी लच्चिराजु रामराव इत्यादींना भेटलो. त्या मुलीने तुम्हाला पत्र लिहिलेच होते. आपल्या जातीच्या युवकाबरोबर विवाह करण्यास ती तयार आहे. तरी आता आपण तिची व्यवस्था करावी. ते पत्र रामराव यांच्याकडेच आहे. लग्न याच महिन्यात करता येईल असे मला वाटते. उद्या किंवा पुढच्या शनिवारी तुम्हास भेटावे असे मी वराला सांगितले आहे. असा एखादा विधवाविवाह पुन्हा झाला तर आणखीही अनेक विवाह होण्यांची शक्यता आहे. तुम्ही अत्यंत परिश्रम घेत आहात. काही दिवस पूर्ण विश्रांती घ्या. पुस्तके अनुवादित करण्याचे कामही काही दिवस स्थगित ठेवावे. विवेकवर्धनीचा भार अन्य कुणाच्या तरी हाती सोपवावा."

माझ्या मित्राने म्हटल्याप्रमाणे मी त्यावेळी थोडा आजारी होतो. आणखी श्रम करणे बरोबर नव्हते. पण मनात उसळलेल्या उत्साहाच्या जोरावर मी अनेक प्रकारची कामे करीत होतो. विधवाविवाहाच्या कामाशिवाय मी नवीन पुस्तकेही लिहीत होतो. शिवाय विवेकवर्धनीही चालवीत होतो.

शास्त्र शाळेतील विद्यार्थ्यांनी वर्गणी गोळा करून दिवसभर राबणाऱ्या गरीबांना

शिक्षण देण्याच्या हेतूने पुस्तके, पाटया इत्यादी खरेदी करून गरीबांना मोफत दिल्या. रात्रीची एक शाळाही विद्यार्थी चालवीत असत. पुढे त्या विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्याने ती शाळा सरकारकडे घेतली. मला ती गोष्ट आवडली नाही. तेव्हा मी आपले मित्र आणि अन्य काही जणांकडून वर्गणी गोळा करून दुसऱ्या एका जागी रात्रीची शाळा सुरू केली.

मनोहरम पंतुलु यांचे बंधु गुम्मडिदल सांबाशिवराव हे राजमहेंद्रवरमहून अनेकदा आपल्या वडिलांकडे पेद्दापुरमला जात. तेव्हा ते माझी पत्रे त्या मुलीकडे पोचवत. आणि तिच्या चिठ्ठया माझ्याकडे पोचत्या करीत. अशाप्रकारे त्यांची मला फार मदत होत असे. याच गृहस्थाने पुढे त्या मुलीला चामलीकोटा येथे एका नावेत बसवून राजमहेंद्रवरम येथे पोचवण्याचा बेत रचला. पण तो फसला. तथापि त्या मुलीने स्वतःच तिला तेथून कसे नेता येईल याचे विविध मार्ग सुचविले. त्याप्रमाणे आम्ही पालखी वाहणारे भोई ठरवले. त्यांच्या मदतीसाठी दोन नोकर तयार ठेवले. मनोहरमच्या नावे एक पत्र लिहिले. आणि ते पत्र देऊन दोन नोकरांसह माझे मित्र नल्लकोंड कोदंडरामय्या यांना पालखीतून पेद्दापुरमला रवाना केले. अगोदरच ठरवलेल्या जागी रात्रीच्या वेळी त्या मुलीला भेटून पालखीत बसवावे आणि सकाळपर्यंत माझ्या घरी पोचवावे असे कोदंड-रामय्या यांना सांगितले. कशी कोण जाणे पण ही बातमी त्या मुलीच्या नातेवाईकांना आधीच कळली. शिवाय ते लोक आधीपासून अतिशय सावध होते. त्या मुलीला आणा-वयास पाठविलेल्या लोकांच्या बेसावधपणामुळे आणि मूर्खपणामुळें सर्व बेत फसला. आणि त्यांना हात हलवीत परत यावे लागले.

तेव्हा मग आम्ही आणखी एक उपाय योजला. यावेळी आमच्या मुद्रणालयातील एक अतिशय हुषार कार्यकर्ता मुनिसामी याला पेद्दापुरमला पाठविले. वाटसरू असल्याची बतावणी करून तो रात्री त्या मुलीच्या घराच्या ओट्यावर झोपला. चातुर्याने त्या मुलीला निरोप पाठविला. अमावास्थेच्या रात्रीचा दाट अंधार सर्वत्र पसरला होता. पाऊसही पडत होता. ती वेळ साधून ती मुलगी आईला आणि घरच्या इतर माणसांना चुकवून बाहेर आली. आणि तुमच्या बरोबर यायला तयार आहे असे तिने मुनिसामीला सांगितले. मुनिसामी मुलीला बरोबर घेऊन पावसात भिजत थोडे अंतर पळाला. थोडे अंतर गेल्यानंतर ते चालू लागले. सकाळपर्यंत दहा कोस चालून गेले. मग भाड्याच्या गाडीने दुसऱ्या दिवशी दुपारी माझ्या घरी पोचले.

ती मुलगी घरातून बाहेर पडल्यानंतर ४–५ मिनिटांनीच तिची आई वगैरेंना ते कळले. चोहोबाजूंनी तिला शोधायसाठी लोकांची पळापळ सुरू झाली. अखेरीला निराश होऊन वकिलांच्या सल्ल्याने मुलगी दागिने घेऊन पळाली आहे अशा अर्थाची तक्रार पोलिस चौकीवर नोंदवली. म्हणजे तिच्यावर चोरीचा आरोप लावला. तेवढ्याने त्यांचे

समाधान झाले नाही आणि मुलीला अटक करण्यासाठी आवश्यक वॉरंट देखील त्यांनी त्याच रात्री काढविले. माझे एक पत्र मुलीच्या लोकांच्या हाती पडले असावे. ते वाचून वॉरंट घेऊन जाणाऱ्या पोलिसाने प्रथम काकिनाड्याला जायचे, चारपाच दिवस तेथे राहून रामकृष्णय्या इत्यादींच्या घरात त्या मुलीला लपवले आहे की काय ते पहायचे आणि ती मुलगी काकिनाड्यात नाही अशी पूर्ण खात्री झाली की मग राजमहेंद्रवरमला जायचे असे ठरविले पण ही बातमी गुप्तपणे एका माणसाने मला त्याच दिवशी कळवली.

ती कळताच वॉरंट रद्द करवून घेण्यासाठी मी पोलिस सुपरिंटेंडेंटला भेटावयास गेलो. पण ते काकिनाड्याला गेले असल्याचे समजले. मग मी माझ्या घरात ठेवलेल्या त्या मुलीला एका सुरक्षित ठिकाणी पोचविले. पोलिस इन्स्पेक्टरला भेटलो आणि मी परत येईपर्यंत वॉरंट बजावून मुलीला अटक न करण्याचे त्याच्याकडून कबूल करून घेतले. दुसऱ्या दिवशी दुपारी काकिनाड्याला गेलो आणि चामलीकोट्याला जावयास निघालेल्या सुपरिंटेंडेंटसाहेबांना कालव्यात नावेवर जाऊन भेटलो. सर्व गोष्टी त्यांना समजावून सांगितल्या, तेव्हा मुलीला अटक करू नये असा हुकूम आपण सर्व पोलिस अधिकाऱ्यांना देतो असे त्यांनी मला आश्वासन दिले.

तेथून मी सरळ हिंदुपाठशाळेत गेलो. नवरामुलगा त्या शाळेत शिक्षक होता. त्याला माझ्याबरोबर यायला सांगितले. मुलीवर आरोप लावल्याची बातमी त्याला समजली होती. त्यामुळे भिऊन तो आमच्याबरोबर यायला का-कू करू लागला. काहीतरी निमित्त सांगू लागला. मी त्याच्या सर्व शंकांचे निरसन केले आणि त्याला जबरदस्तीने नावेवर नेऊन माझ्या खोलीत बसविले. नाईलाजाने तो माझ्याबरोबर आला होता. पण दुसऱ्या दिवशी सकाळी मेडपाडुच्याजवळ नावेतून तो पसार झाला. राजमहेंद्रवरमला पोचल्यावर मी काकिनाडा येथील मित्रांना तार केली आणि नवऱ्या मुलाला शोधून पुन्हा पाठवावे अशी पत्रे पाठवून विनंती केली. मुलीला लग्न करायची इच्छा असल्यामुळे केवळ द्वेषबुद्धीने तिच्यावर चोरीचा आरोप करण्यात आला आहे, सबब तिला अटक करू नये असा पोलिस सुपरिंटेंडेंटचा आदेश त्याचवेळी पाठविला गेला. दरम्यान सरकारी डॉक्टरला आपल्या घरी बोलावून मुलीची परीक्षा करवली आणि मुलगी पूर्ण सोळा वर्षांची आहे असे प्रमाणपत्रही घेतले. ईश्वराच्या कृपेने २२ ऑक्टोबर १८८२ रोजी अत्यंत अडचणीच्या परिस्थितीत आम्ही तिसरा विधवाविवाह घडवू शकलो. या विवाहासाठी आम्हाला पहिल्या विवाहापेक्षा दसपट जास्त त्रास झाला. जास्त खर्च करून पहिल्या विधवाविवाहापेक्षा हा विवाह आम्ही अधिक थाटात घडवून आणला. या विवाहामुळे आमच्या विरोधकांची अर्धी घमेंड उतरली आणि त्यानंतर झालेल्या चौथ्या यशस्वी विवाहामुळे तर त्यांचे पूर्णपणे गर्वहरण झाले.

२४ ऑक्टोबरला कलकत्त्याहून ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे इंग्रजीत मला एक पत्र आले त्या पत्राचा भावार्थ असा :

"प्रियवर,

आपण आपल्या पत्रात तिसऱ्या ब्राह्मण कन्येचा पुनर्विवाह घडवून आणल्याचे कळविल्याबद्दल धन्यवाद ! हिंदु विधवाविवाह चळवळीत रुची असणाऱ्या मित्रांना या बातमीने आनंद झाला. विधवाविवाहाचे जे कार्य आपण अविश्रांतपणे चालविले आहे त्यात आपणास सदैव यश येवो."

काकिनाडा येथील दुसऱ्या बालविधवेला देखील पुनर्विवाह करण्याची तीव्र इच्छा होती. त्या विधवेच्या घरासमोरील घरात तंजावूरि चलपतिराव नावाचे एक प्रौढ गृहस्थ राहात असत. त्यांना विधवाविवाहाबद्दल विशेष आस्था होती. म्हणून एकदा ती बालविधवा एकटीच त्यांच्या घरी आली असताना त्यांनी तिला त्याबद्दल विचारले. तेव्हा त्या विधवेने पुनर्विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. त्या कामी तिला मदत करावी अशी आम्ही त्या गृहस्थांना विनंती केली.

एके दिवशी सकाळी ती मुलगी एकटीच चलपतिरावांना भेटून म्हणाली, 'आज रात्री या गल्लीतून लग्नाची एक वरात जाणार आहे. ती संधी साधून मला गल्लीबाहेर पडता येईल. त्यावेळी मला घेऊन जाण्याची व्यवस्था केलीत तर मी राजमहेंद्रवरमला जायला तयार आहे.' चलपतिराव लगेच त्या विधवेशी विवाह करावयास तयार असलेल्या गृहस्थाला भेटले. पालखी आणि भोईही तयार ठेवले. ज्या माणसाने मुलीला पालखीत नेऊन बसवावयाचे ठरले होते त्याला ती मुलगी अगोदर दाखवून ठेवली.

त्याच दिवशी रात्री नऊ वाजता शहरात एके ठिकाणी जादूचे प्रयोग होणार होते. त्यासंबंधीच्या जाहिरातीही वाटल्या गेल्या होत्या. चलपतिरावांनी मुलीच्या भावांना व मामाला जादूचे प्रयोग पाहण्याचा आग्रह केला. त्याप्रमाणे ते गेले. इकडे रात्री दहाच्या सुमारास लग्नाची वरात त्या मुलीच्या घरापुढे आली. ठरल्याप्रमाणे मुलीला घेऊन जाणारी पालखी रस्त्यावरून जात होती. ठरवून ठेवलेला माणूस पालखी जवळूनच चालत होता. पालखी मुलीच्या घरापाशी आली त्यावेळी घरातील स्त्रिया अंगणात उभ्या राहून वेश्यांचे नाचगाणे पाहण्यात दंग होत्या. त्या गोंधळात ती मुलगी घराबाहेर पडली आणि तिची वाट पाहणाऱ्या त्या माणसाबरोबर थोडा वेळ चालून पालखीत जाऊन बसली. लगेच भोई पालखी घेऊन निघाले. सकाळी पालखी माझ्या घरापुढे आली. आम्ही त्या मुलीला घरात नेले आणि सुरक्षित जागी ठेवले.

मुलीची शोधाशोध त्याच रात्री सुरू झाली. मुलगी राजमहेंद्रवरमला गेली असली पाहिजे असा मुलीच्या मामांनी कयास केला. राजमहेंद्रवरम येथे त्यांचा एक तहसीलदार नातेवाईक होता. त्याला आणि पोलिसठाण्याला त्याने तारा पाठविल्या. पण त्यापैकी

कोणीच या प्रकरणी दखल घेतली नाही, उलट स्वस्थ बसून राहिले. तिसऱ्या दिवशी दुपारी मुलीचा भाऊ, आई तसेच मामा माझ्या घरी येऊन धडकले. आई रडूनभेकून आपल्या मुलीला घरी परत चल म्हणून सांगू लागली. मुलीने ठामपणे नकार दिला. एखादा चांगला मुलगा पाहून मुलीचा विवाह करू असे मुलीच्या मामाने मला एकीकडे नेऊन समजावले. परंतु अखेरीला निराश होऊन आपली बहीण आणि भाचा यांच्यासह परत गेले. खरे तर मुलीच्या मामाने तिचा पुनर्विवाह करण्याविषयी माझ्याशी कितीकदा चर्चा केली होती. पत्रव्यवहारही केला होता. पण जातीबहिष्कृत होण्याच्या भीतीने त्याला धीर होत नव्हता.

पुलपर्ति शेषय्या नावाच्या एका वैदिक संप्रदायाच्या विद्यार्थ्याशी ३ जानेवारी १८८३ रोजी त्या मुलीचा विवाह झाला. लोकसेवेच्या कामात अत्यंत उत्साहाने मला मदत करणाऱ्यांमध्ये तोही एक होता. त्यानंतर कित्येक विधवाविवाह झाले. दहावा विधवा-विवाह करणारा नल्लकोंड कोदंडरामय्या देखील माझ्या सहकाऱ्यांपैकीच होता. अनेक विद्यार्थ्यांना शाळेची फी वगैरे देऊन मी नेहमी मदत करीत असे. त्या काळात विद्यार्थ्यांनी आम्हाला जी मदत केली ती अविस्मरणीय होय. जनतेच्या भल्यासाठी अग्नि-कुंडात उडी घे सांगितले तर उडी घेण्यास तयार होणारेही काही विद्यार्थी होते. त्यांना काहीही सांगा ते बिनबोभाट करून येत. अशा लोकांच्या सहाय्यामुळेच आम्ही किती-तरी कामे निर्विघ्नपणे पार पाडू शकलो.

बालविधवा आणि त्यांच्या पालकांना भेटून त्यांना विधवाविवाहास तयार करण्या-साठी तसेच या प्रकारच्या सुधारणा आंदोलनाचा प्रचार करण्यासाठी मी दरमहा आठ रुपये पगारावर प्रचारक म्हणून वेंकन्ना नावाच्या एका गृहस्थाला नियुक्त केले. आपण अमुक एका विधवेशी चर्चा केली, तमक्या विधवेबरोबर बोलणी केली, अमकीच्या पाल-काला तयार केले, तमकीच्या पालकाची समजूत काढली असे मला तो नेहमी सांगायचा. असे सांगून ऑक्टोबरपासून तीन महिन्यांचा पगार त्याने घेतला. तो सांगत होता त्या विधवांची गोष्टच सोडा, त्याची स्वतःचीच १८ वर्षांची विधवा मुलगी चार महिन्यांनी एकदा माझ्याकडे आली, आणि आपला पुनर्विवाह करून आपणाला पती मिळवून देण्याची तिने मला विनंती केली. त्या मुलीच्या पाठोपाठ तिचा बापही माझ्या घरी आला आणि माझ्या मुलीला घरी परत पाठवा, कारण मला स्वयंपाक करून जेऊ घाल-णारे कोणीच घरी नाही असे रडून सांगू लागला. स्वयंपाक करून जेऊ घालण्यासाठी एखादी स्वयंपाकीण ठेव नाहीतर नोकरी करणाऱ्या आपल्या मुलाकडे जाऊन रहा असे सांगून त्याच दिवशी मी त्याला कामावरून दूर केले आणि त्याच्या मुलीला घरी ठेवून घेऊन त्याला हाकलून दिले.

मंजुलूरि वेंकटरामय्या प्रायश्चित घेऊन जाताना आपल्या २० वर्षांच्या गोपाळ

नावाच्या धाकट्या भावाला माझ्या घरी ठेवून गेले होते. त्या मुलाला मी छापखान्यात जुळारी म्हणून कामावर लावून घेतले. आणि दरमहा ६ रुपये पगार देऊ लागलो. आपले लग्न करून द्या अशी तो नेहमी विनवणी करीत असे. त्याचा पगार वाढवून ८ रु. केला आणि माझ्याकडे आलेल्या आणखी एका विधवा कन्येबरोबर ३० जानेवारी १८८३ रोजी गोपाळचे लग्न करून दिले.

त्यावर्षी गोदावरीत पुष्कर पर्वणी होती. पुष्कर मेळ्याच्या दिवशी विधवांचे पालक आपल्या सकेशा बालविधवांना राजमहेंद्रवरमला आणून गोदावरीवर त्यांचे वपन करून त्यांना कुरूप बनवतात. या प्रथेनुसार १७ वर्षांच्या एका वैदिक संप्रदायातील विधवेला तिची आई आणि भाऊ राजमहेंद्रवरमला घेऊन आले. आणि गोदावरीकाठी असलेल्या एका धर्मशाळेत उतरले. सकाळी त्या विधवेचे केशवपन होणार होते. म्हणून आदल्या रात्रीच आपला भाऊ आणि आई यांना चुकवून ती माझ्याकडे आश्रयाला आली. आपल्या या दयनीय अवस्थेमुळे आपण गरीबातल्या गरीब मुलाशीही लग्न करायला तयार आहो असे करुण शब्दात तिने सांगितले.

आमचा जुना पुरोहित प्रायश्चित घेऊन पळून गेल्यामुळे चेस्कूरि नारायण मूर्ति नावाचा एक विधुर माझ्या घरी मी नेमला होता. त्याच दिवशी २३ वर्षे वयाचा त्याचा अमलापुरचा भाचा काकिनाड्याला जाताना राजमहेंद्रवरमला आपल्या मामाला भेटायला आला होता. मामाने आपल्या भाच्याला विधवेशी विवाह करतोस का असे विचारले. तो तयार झाला. माझ्याकडे एक बालविधवा विवाह करण्यासाठी आलेली आहे हे माझ्या पुरोहिताला माहीत होते. त्या विधवेशी आपणाला अथवा आपल्या भाच्याला कोणालाही लग्न करता येईल असा त्याच्या मनात विचार आला आणि आपली इच्छा त्याने बोलून दाखविली. मी त्या दोघांचा त्या युवतीशी परिचय करून देऊन विचारले, "हा पुरोहित आणि दुसरा एक ब्राह्मण स्वयंपाकी आहे. या दोघांपैकी कोणाशी लग्न करण्याची तुझी इच्छा आहे ?" ती म्हणाली, "दुसरा माणूस तरूण आहे, त्याच्याशीच मी लग्न करीन." शतमान करून त्याच रात्री मी त्यांचा विवाह लावला. हा सहावा विवाह होता. १३ मार्च १८८३ रोजी तो झाला.

पाचवा विवाह झाला त्या सुमारास माझा ब्राह्मण स्वयंपाकी पळून गेला होता. त्यामुळे माझ्या पत्नीलाच नदीवरून पाणी आणणे, स्वयंपाक करणे वगैरे सर्वच कामे करावी लागत आणि कष्ट पडत. माझ्याप्रमाणे माझ्या पत्नीला देखील या कामांची आवड होती. त्यामुळे या कामांत होणारे कष्ट ती आनंदाने सहन करून माझे अनुकरण करी. सहधर्मचारिणी शब्द ती खऱ्या अर्थाने सार्थक करीत होती. त्या विधवा मुलीचे स्वयंपाकी श्रोतीय ब्राह्मणाशी लग्न लावून दिल्यामुळे एक स्वयंपाकी घरात आला आणि गावातील स्वयंपाक्यांची गरज उरली नाही.

ब्राह्मण विधवांचे विवाह होत असल्याचे पाहून एक दिवस वैश्य परिवारातील एक विधवा आपल्या दहा वर्षांच्या बालविधवेला घेऊन माझ्या घरी आली आणि माझे पाय धरून तिचे लग्न लावून देण्याची विनंती करू लागली. मला लग्न करायचे आहे असे वारंवार माझ्याकडे येऊन सांगणाऱ्या २० वर्षांच्या श्रीरामुलु नावाच्या एका वैश्य युवकाबरोबर ११ एप्रिल १८८३ ला त्या मुलीचा विवाह केला. वैश्य समाजातील हा पहिलाच विवाह होता.

वरातीमधील पालख्यांच्या सभोवार पोलिस पहारा असूनही पहिल्या एकदोन विधवा-विवाहांच्यावेळी वरातीवर दगडफेक झाली होती. पण आता बराच बदल झाला होता. त्यामुळे वर उल्लेखिलेला सातवा विवाह फक्त विद्यार्थ्यांच्या सहाय्याने पार पाडता आला. पोलिसांच्या मदतीची गरज भासली नाही. रात्री बिनधास्तपणे नवरा नवरीची वरात काढणे शक्य झाले.

राजमहेंद्रवरममध्ये धडाधड विधवाविवाह होत असल्याचे पाहून माझे मित्र श्रीपल्ले चेंचलराव आणि दिवाण बहादुर रघुनाथराव यांनी मद्रासमध्येही एकदोन विवाह घडवून आणण्याची मला विनंती केली. त्यांचा आदेश शिरोधार्य मानून तसा प्रयत्न करण्याचे मी आश्वासन दिले.

राजमहेंद्रवरमचा एक नवविवाहित ब्राह्मण विद्यार्थी अचानक मरण पावला. त्याची मोठी बहीण नेहमी माझ्या घरी येत असे. एकदा मी तिला विचारले, "तुझ्या भावाची बायको कुठे असते ?" तेव्हा तिने ती गुंटुर जिल्ह्यातील एका छोट्याशा गावी असल्याचे आणि तिची धाकटी बहिणही विधवा असल्याचे सांगितले. त्या बालविधवांची लग्ने का करीत नाहीस असे मी तिला विचारले. जाण्यायेण्याचे भाडे आणि वरखर्चाला थोडेसे पैसे मिळाले तर आपण त्या मुलीच्या आईशी बोलणी करून त्यांना घेऊन येऊ असे तिने सांगितले. मी वाटखर्चाला पैसे दिले. तेव्हा मुलीच्या आईला ती घेऊन आली. तिच्याशी प्रथम बोललो आणि तिची संमती मिळाल्यावरच तिच्या दोन विधवा मुलींना राजमहेंद्रवरमला बोलावले.

तणुकु चलपतिराव आणि बेतपूडि प्रकाशराव नावाचे दोन वर त्या आधीपासून माझ्या घरी राहात होते. त्या दोन बालविधवांपैकी एकीचे वय १२ आणि दुसरीचे १० वर्षांचे होते. या दोन्ही मुलींची लग्ने माझ्याकडे राहणाऱ्या नवऱ्यामुलांबरोबर मद्रासमध्ये करण्याचे ठरविले. मद्रासमधील मित्रांना ही शुभवार्ता कळवली आणि दोन वर, दोन वधू, पुरोहित, ब्राह्मण स्वयंपाकी इत्यादी बरोबर घेऊन सपत्निक जहाजावर बसण्यासाठी काकिनाड्याला गेलो. विवाहाच्या वेळी आपल्या संप्रदायाच्या ब्राह्मणांनी स्वयंपाक केला तरच आपण लग्नात भोजन करू असे रघुनाथरावांनी आधीच मला पत्र पाठवून कळविले होते. म्हणून काकिनाडा येथील एका माध्व दांपत्याला मद्रासला येण्या-

साठी तयार केले. माझे पत्र मिळताच चेंचलरावाने मला काकिनाडयाच्या पत्त्यावर तार केली. रघुनाथरावांचे पत्र मिळेपर्यंत मद्रासला यायला निघू नका असे तारेत कळविले होते. त्यामुळे त्या दिवशीच्या जहाजाने पुढे न जाता एक आठवडाभर काकिनाडयात राहिलो. दरम्यान रघुनाथरावांचे इंग्रजीत लिहिलेले पत्र मिळाले. त्यातील मजकुराचा आशय असा :

प्रिय महोदय,

आम्ही समितीच्या सदस्यांची एक खास बैठक बोलावली होती. बैठकीला तीस सदस्य हजर होते. त्यापैकी अठरा सदस्य ब्राह्मण होते. त्या सर्वांची विवाहसमारंभाला आणि पानसुपारीला हजर राहण्याची इच्छा होती. शूद्रांनी लग्नांतील भोजन समारंभाला येण्यात तशी काहीच अडचण नाही. पण त्यामुळे आपला उद्देश सफल होण्यात मात्र अडचण येईल, कारण शूद्र येणार असतील तर फारच कमी ब्राह्मण सदस्य जेवायला येतील म्हणून मद्रासमध्ये विधवाविवाह करणे फारसे शहाणपणाचे नाही. तरीही कमी लोक हजर राहिले तरी चालतील असे आपणास वाटत असेल तर यायला हरकत नाही. आम्ही आपल्या स्वागतास तयार आहोत. आपल्याला राहण्यासाठी घर इत्यादींची व्यवस्था अगदी सहज करता येईल.

या पत्राचे मी लगेच उत्तर पाठविले आणि ३ जूनला पुढीलप्रमाणे तारही केली— "आज जहाजाद्वारे आम्ही तेरा जण मद्रासला येण्यासाठी निघालो आहोत. घराची व्यवस्था करा." त्याचदिवशी सायंकाळी आम्ही जहाजातून निघालो. चार तारखेला सकाळी मद्रासला पोचणारे जहाज दुपारी दोन वाजता पोचले. आम्हाला घेण्यासाठी जहाजावर कोणीही आले नव्हते. आम्ही स्वतःच नाव केली आणि किनाऱ्यावर उतरलो. तेथेही आमच्या स्वागतासाठी कोणी आले नव्हते. आमच्यासाठी घराची व्यवस्था करण्यात आली आहे की नाही, आम्हाला कोठे जायचे आहे, काय करायचे आहे याची काहीच कल्पना नव्हती. बाकीच्यांना तेथेच सोडून मी जवळच असलेल्या चेंचलराव पंतुलु यांच्या कचेरीत गेलो आणि त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले आणि दुःख झाले. रघुनाथरावांच्या घराशेजारीच आमची उतरण्याची व्यवस्था केली असल्याचे त्यांनी सांगितले आणि माझ्या मदतीसाठी एका नोकरालाही बरोबर पाठवले.

आमच्या मुक्कामासाठी जे घर ठरवले होते ते मोठे असले तरी अनेक महिने मोकळे असल्याने उंदीर-कोळीष्टकांमुळे भयाण झाले होते. आम्ही आमचे सामान आणले. घर स्वच्छ केले. स्वयंपाक करून जेवण केले. तोपर्यंत रात्रीचे आठ वाजले होते.

आलो त्या दिवशी म्हणजे चार तारखेला रघुनाथरावांचे तोंडही दिसले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना भेटायला गेलो तर दारावरच्या नोकरांनी ही त्यांची भेटायची

वेळ नाही असे सांगितले. म्हणून परत आलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा रावसाहेब पूजा करीत आहेत; ही त्यांना भेटायची वेळ नाही असे सांगून त्यांना भेटू दिले नाही. म्हणून त्याही दिवशी मी निराश होऊन परतलो. ७ तारखेला परत भेटायला गेलो तेव्हाही पहारेकरी काही ना काही बहाणे सांगू लागला परंतु यावेळी मी त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले आणि आत घुसून जिना चढून रघुनाथ-रावांच्या खोलीत गेलो.

मला पाहताच रावसाहेब उठले आणि माझ्याजवळ येऊन त्यांनी मला आदरपूर्वक बसवले आणि नम्रपणे म्हटले, "तुम्ही आल्याचे मला कळले. पण काही अत्यावश्यक कामात गुंतून पडल्यामुळे गेल्या तीन दिवसांत तुम्हाला भेटू शकलो नाही, याबद्दल मला वाईट वाटते. क्षमा करा." त्यानंतर आम्ही मद्रासला कशाकरिता आलो होतो त्याची त्यांना आठवण करून दिली आणि म्हटले, "उद्याच विवाह समारंभ करण्याचे योजले आहे. निमंत्रणपत्रे आपल्या सहीने पाठवावयाची आहेत. पण आपली हरकत असेल तर मी माझ्या नावाने पाठवीन." यावर थोडावेळ विचार करून त्यांनी स्वतःच निमंत्रणपत्र लिहिले आणि सही करून स्वतःच्या छापखान्यात पाठविले. माझे काम झाले होते. मी घरी परतलो. चेंचलराव पंतुलु दररोज माझ्या मुक्कामाच्या ठिकाणी येऊन माझ्याशी गप्पा मारून जात असत. छापील निमंत्रणपत्रांवरून रघुनाथरावांचे नाव गायब झाले होते. विवाह समारंभाला सहपरिवार यावे अशी विनंती समाजाचे सर्व सदस्य करीत आहेत एवढेच छापलेले होते. पण शहरातील पत्रपत्रिका, मित्र आणि प्रतिष्ठित व्यक्ती यांना रघुनाथरावांनी स्वतः निमंत्रणपत्रे पाठविली. मंडप तयार करणे, तोरणे बांधणे इत्यादी सर्व कामे रघुनाथरावांनीच करवून घेतली. त्यांनीच भांडघाकुंडघांची व्यवस्था केली. पदार्थही त्यांनीच आणून दिले.

१३ ऑगस्टला दुसरा वैश्य विवाह पार पडला. संख्येच्या दृष्टीने हा नववा विवाह होता. पुढे डिसेंबर १८८३ मध्ये वैदिक संप्रदायातील एक वृद्ध विधवा माझ्यापाशी आली आणि म्हणाली, 'मी सांभाळलेली १३ वर्षांची माझी एक विधवा नात आहे. त्या अनाथ मुलीचे लग्न करून देऊन मी तिच्याजवळ राहणार आहे." मी त्या वृद्धेबरोबर पुलपर्ति शेषय्याला तिच्या गावी ताटिपाकाला पाठवले. रात्रीच्या वेळी लोकांची नजर चुकवून तिचे सर्व सामानसुमान व नात यांना वाहून नेणारा हमाल शोधणे कठिण होते. काम तर व्हायलाच पाहिजे होते. तेव्हा शेषय्याने एक कावड विकत घेतली. आणि तिच्यावर आजीनातीला बसवून कित्येक कोस चालून स्वतः शेषय्यानेच त्यांना माझ्या घरी वाहून आणले. ५ जानेवारी १८८४ ला या मुलीचा नल्लकोंड कोदंडरामय्याशी विवाह झाला. वर नियोगी संप्रदायाचा तर वधू वैदिक शाखेची होती. पंथभेद मोडून केला गेलेला हाच पहिला विवाह होता. प्रथम विवाह केलेल्या दंपतीला वगळता बाकी

सर्वांना आम्ही राहाण्यासाठी घरे दिली होती.

मच्छलीपट्टण (बंदर)चे एक वकील चेरूवु सुब्रह्मण्यम शास्त्री यांनी मला १८८४ च्या एप्रिलमध्ये आपण विधवेशी विवाह करायला तयार आहोत असे पत्राद्वारे कळविले. या गृहस्थांनी अगोदरपासून माझ्याशी याबाबतीत पत्रव्यवहार केला होता. आपणाला स्वतःला आर्थिक मदतीची गरज नाही. परंतु दुसऱ्या एका दांपत्याला पैशाच्या मदतीची आवश्यकता आहे असे लिहिले होते.

माझी प्रकृती बरी नाही, तसेच सध्या भयानक उन्हाळा आहे तेव्हा मी प्रवास करू नये असे माझ्या मित्रांनी मला सांगितले. परंतु अन्य ठिकाणी देखील समाज सुधारणेची बीजे पेरण्याची संधी मिळत असता ती दवडणे योग्य नव्हे असे मला वाटले म्हणून सुब्रह्मण्यम शास्त्र्यांना स्वतःच येत असल्याचे मी कळविले. आणि त्या भयानक ग्रीष्म ऋतूत वालुकामय रस्त्याने व खेडेगावच्या गाड्यांतून सहपरिवार मच्छलीपट्टणमला जायला निघालो.

मच्छलीपट्टणमला पोचण्यापूर्वीच माझ्या आगमनाची बातमी सर्वांना मिळाली होती. त्यामुळे साऱ्या शहरात खळबळ माजली. विधवेशी विवाह करायला तयार असल्याचे ज्या सुब्रह्मण्यम शास्त्र्यांनी मला लिहिले होते, त्या माणसाने बालविधवे-बरोबर लग्न करण्याची गोष्ट सोडाच, पण मी त्याचे घर कसेतरी शोधून काढून पोचलो तेव्हा घाबरून चारचौघात माझ्याशी बोलायचेही टाळले. मला एका स्वतंत्र खोलीत नेऊन म्हणाला, "सध्या मी आजारी आहे. तूर्त तरी विवाहाचा विचार मी सोडला आहे. पूर्ण बरा झाल्यावर विवाह करावयाचे ठरविले तर तुम्हाला जरूर कळवीन."

मी त्यामुळे निराश झालो नाही. एवढ्या लांब आलो तर काही न करता परत फिरणे योग्य वाटेना. काही व्याख्याने देण्याचे ठरविले. माझे पहिले भाषण वल्लूर जमीनदारांच्या विशाल सभागृहात झाले. माझे भाषण ऐकण्याच्या उत्सुकतेमुळे आणि मला पाहण्याच्या इच्छेमुळे कितीतरी लोक सभेला आले होते. सभागृह भरले होते. सर्वांनी शेवटपर्यंत माझे भाषण शांतपणे ऐकले.

त्या शहरांतील विधवाविवाह आंदोलनाच्या विरोधी गटाचे नेते वड्लमन्नाटि वेंकटा-चलम पंतुलु हे होते. त्यांनी एका फार मोठ्या विद्वानाकडून विधवाविवाह विरोधी हस्तपत्रकांना उत्तर देणारी एक पुस्तिका लिहवून घेतली. मी एक दिवस सकाळी त्यांना भेटायला गेलो. ते पूजा करीत होते. त्यांनी मला आत बोलावून आपल्याजवळ बसवून घेतले आणि सांगितले, "केवळ व्याख्यानांना काय अर्थ? शास्त्रार्थ झाला पाहिजे. विद्वानांची सभा बोलावणे आवश्यक आहे." त्यांचे म्हणणे मलाही पटले. म्हणून विद्वज्जनसभेत शास्त्राविषयी वादविवाद करणे फायद्याचे होईल असे मी सुचविले.

वेंकटाचलम पंतुलु यांनी माझी सूचना मान्य केली. त्यांनी दुसऱ्याच दिवशी दुपारी

आपल्या घरात सभा ठरविली आणि उभय पक्षांच्या प्रतिष्ठित आणि विद्वान मंडळींना निमंत्रणे पाठविली. माझ्याशी वादविवाद करण्यासाठी विरोधक माझ्यासमोर येऊन बसले.

मी म्हटले, "कलियुगाच्या दृष्टीने पराशरस्मृतीच अतिशय प्रमाण आहे. म्हणून 'नष्टे, मृते', या श्लोकाच्या अर्थाचा निर्णयच प्रथम झाला पाहिजे." या गोष्टीस शास्त्र्यांनी मान्यता दिली आणि ते श्लोकाचा अर्थ सांगू लागले. त्यांनी सांगितलेल्या अर्थाचा मग मी पूर्वपक्ष करू लागलो. पंधरा मिनिटे शास्त्रार्थाचा विचार चालला. मग माझे प्रतिस्पर्धी शास्त्री क्षणभर गप्प राहिले आणि सभासदांना उद्देशून म्हणाले, "सज्जनहो, यांनी आपले सारे जीवन याच कामासाठी वेचून या विषयाचा खास अभ्यास केला आहे. मला थोड्या दिवसांचा अवधी दिला तरच मी यांच्याबरोबर वादविवाद करू शकेन."

असे म्हणून स्वामीजी गप्प बसले. तसे तर मी अनेक शहरात अनेक पंडितांबरोबर वादविवाद आणि शास्त्रार्थ केला होता. पण आपला कमकुवतपणा मान्य करून सत्याविषयी आदरभाव दाखविणारा एवढा एकच सज्जन मला भेटला.

मच्छलीमट्टणमहून परतल्यावर मी आपल्या मित्रांबरोबर विचारविनिमय केला आणि विधवाविवाहाचे समर्थन करणाऱ्या मित्रांना एकत्र जमवून २२ जून १८८४ रोजी एका नव्या समाजाची स्थापना केली. रामकृष्णय्या, मी, गवर्राजु, आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम, न्यापति सुब्बाराव पंतुलु वगैरे सोळाजणांनी समाजाच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता. समाजाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते : पूर्वीच्या समाजाशी हा समाज संलग्न राहील. परंतु समाजाच्या नेतृत्वाखाली विवाह करणाऱ्या सर्वांना या समाजाचे सदस्यत्व दिले जाईल. समाजाची कार्यकारिणी सात सभासदांची असेल. त्यापैकी सहा सदस्यांची निवड समाजाचे सदस्य करतील आणि सातवा सभासद मात्र विधवाविवाह करणारे सभासद दरवर्षी निवडतील.

रघुनाथराव आणि चेंचलराव यांनी मद्रासमध्ये झालेल्या विवाहप्रसंगीच्या जेवणावळीत भोजन केले नव्हते. तरी देखील मद्रासेत आठवा विवाह झाल्यानंतर माध्वसंप्रदायाचे लोक त्यांना सतावू लागले. त्यांचे गुरू उत्तरेकडचे मठाधिपति हे मद्रासला येऊन काही काळ राहिले होते. या दरम्यान चेंचलराव पंतुलु यांनी मला एक पत्र लिहिले, "एका किरकोळ कारणासाठी आम्हाला प्रायश्चित्त करावे लागत आहे. तथापि यथाशक्ति मी तसेच रघुनाथराव विधवाविवाह आंदोलनासाठी शक्य तेवढे सहाय्य करीत राहू." मी याविषयी रघुनाथरावांना लिहिले पण त्यांनी उत्तर दिले नाही.

त्याच वर्षी उन्हाळ्याच्या सुटीत मी पुन्हा मद्रासला जाऊन रघुनाथरावांना भेटलो. मला पहाताच त्यांनी चिडून म्हटले, "मी प्रायश्चित्त घेतले असे कुठल्या मूर्खाने तुम्हाला

कळविले ? माझे गुरु सध्या इथेच आहेत. या क्षणी विधवाविवाह करावयास तयार असलेले वर-वधू मिळत असतील तर मी त्या दुष्ट माणसाच्या घरापुढे लग्नसमारंभ करून त्याला चांगला धडा शिकविला असता."

त्यांच्या मुद्रेवरचा संताप आणि आवेश पाहून मी भयचकित झालो. मनात आले यांच्या ठायी जेवढा उत्साह आहे त्याच्या एक चतुर्थांश जरी माझ्या ठायी असता तरी मी जास्त काम केले असते.

मी घरी आलो तेव्हा काही विद्यार्थी मला भेटायला आले. कोणी वृद्ध ब्राह्मण मला शोधत फिरतो आहे असे ते सांगू लागले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते विद्यार्थी त्या वृद्ध ब्राह्मणाला माझ्याकडे घेऊन आले. चित्तूर जिल्ह्यातील एका गावी दोन बालविधवा आहेत; त्यांचा विवाह करण्यास त्यांच्या मातापित्यांची संमती आहे आणि त्या मुलींशी लग्न करावयास वरही तयार आहेत असे त्या वृद्ध ब्राह्मणाने सांगितले.

त्यावर मी विचारले, "तर मग तुम्ही त्या लोकांना चेंचलराव आणि रघुनाथराव यांच्याकडे नेऊन विवाह का करत नाही ?"

"ते लोक बडबड तर खूप करतात पण कृतीमात्र नाही." वृद्ध ब्राह्मणाने उत्तर दिले.

त्यावर मी विचारले, "मी तुम्हाला काय मदत करू ? सांगा."

"फक्त पंचवीस रुपये दिलेत तर चित्तूरला जाऊन दोन वधू, त्यांचे मातापिता आणि वर यांना घेऊन येईन; मग हे विवाह आपण लावू शकू", असे तो म्हणाला.

लगेच मी त्या ब्राह्मणाला माझ्या गाडीत बसवून चेंचलराव यांच्या घरी घेऊन गेलो. सर्व सांगून त्या ब्राह्मणाला पंचवीस रुपये द्यायला सांगितले. तेव्हा हे लोक फसवतात, काम करीत नाहीत असे चेंचलरावांनी उत्तर दिले. तेव्हा तसे झाले तर मी तुमचे पैसे परत देईन असे मी त्यांना आश्वासन दिले. शेवटी चेंचलरावांकडून त्याला पैसे देववून रवाना केले.

त्यानंतर मी सरळ श्री. रघुनाथरावांच्या घरी गेलो, आणि म्हटले, "तुम्ही म्हणाला होता वर-वधू मिळाले तर स्वामीजींच्या घरासमोरच विवाह करू. परमेश्वराने आपली इच्छा पूर्ण होण्याची संधी लगेच उपलब्ध करून दिली आहे. मी आताच वर-वधूला आणण्यासाठी एक माणूस पाठवला आहे." माझे वाक्य पूर्ण होते न होते तोच त्यांचा चेहरा उतरला. त्यांनी हात जोडून मला नमस्कार करत स्पष्टपणे म्हटले, "विधवा विवाहाचे काम करण्याखातर आजवर मी खूपच त्रास सोसला आहे. यापुढे या समाजाशी संबंध ठेवण्याची माझी इच्छा नाही. मला क्षमा करा."

यानंतर ४–५ दिवसांनी तो वृद्ध ब्राह्मण दोन वधू, त्यांचे आईबाप आणि दोन वर घेऊन आला आणि त्यांना माझ्या हाती सोपवून आल्या वाटे निघून गेला. मागाहून चौकशी केल्यावर तो वृद्ध ब्राह्मण म्हणजे त्या मुलींचे आजोबा होत असे कळले. नंतर

चेंचलराव पंतुलु आणि रघुनाथराव यांनी माझ्यापाशी येऊन विनंती केली, "कृपा करून आपण मद्रासमध्ये विवाह करू नका. आम्ही तुमचा पक्ष सोडला आहे असे लोकांना कळले तर तुमचे नुकसानच होईल. म्हणून आमचे हे रहस्य गुप्त ठेवण्यासाठी अन्य शहरांमध्ये हे विवाह करावे आणि अपमानित होण्यापासून आमचा बचाव करावा." मीही त्यांच्या इच्छेप्रमाणे वागायचे ठरवले.

माझी सुट्टीही संपायला आली होती. म्हणून मी माझ्यावर लोभ करणाऱ्या दुसऱ्या शहरांतील लोकांना पत्र लिहिले, "आपण आपल्या शहरांत विधवाविवाह करावयास तयार आहात काय ?" बल्लारीहून राव बहादुर सभापति मुदलियार यांनी उत्तर लिहिले, "प्रचाराचा सर्व खर्च करून मी लग्ने करीन." १२ फेब्रुवारी १८८२ रोजी १५ वर्षांच्या वधूशी चित्तूरि सुब्बाराव याचा आणि १२ वर्षांच्या लहानग्या वधूशी जटप्रोलु रामाराव याचा बल्लारीमध्ये विवाह झाला. रामकृष्णय्याने दिलेल्या पैशांतून आम्ही केलेला हा ११ वा आणि १२ वा विधवाविवाह होता.

हे सर्व विवाह श्री पैदा रामकृष्णय्यांनी मोठ्या औदार्याने आमच्या समाजाला १० हजार रुपये देणगी दिली म्हणून होऊ शकले. त्यांचे आर्थिक साहाय्य नसते तर आम्हांस एक देखील विवाह घडवून आणता आला नसता. पहिल्या आणि दुसऱ्या विवाहासाठी खर्च केला होता. शिवाय या दांपत्यांची कीर्ती जगात कायम रहावी या हेतूने त्यांना राहण्यासाठी काही घरे देखील समाजाच्या स्वाधीन केली होती.

आता आम्हाला विवाह खर्चासाठीच नव्हे तर, मासिक खर्चासाठीही पैसा हवा होता. आमच्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी सुरू होताच मी निधी गोळा करण्यासाठी सह-परिवार मद्रासला गेलो. भाड्याच्या गाड्या करून मी थोरामोठ्यांच्या घरी जाऊन निधी गोळा करू लागलो. पिठापुरमच्या राजाच्या दत्तकपुत्राने दोनशे रुपये दिले. चार सद्‌गृहस्थांनी प्रत्येकी पंचवीस रुपयेप्रमाणे शंभर रुपये दिले. तसेच तिघांनी अनुक्रमे २०, १५, १० रु. दिले. मी एका श्रीमंत माणसाकडे गेलो. तो अतिशय सधन होता. आणि विधवाविवाहाविषयी त्याला विशेष आस्था होती. मी कधीही त्याच्याकडे गेलो की तो मला आदराने वागवी. त्या गृहस्थाकडे गेलो आणि मी माझ्या नावाची चिठ्ठी आत पाठवली. अर्धा तास वाट पाहिल्यावर तो गृहस्थ बाहेर आला. आपण जरूरीच्या कामांत व्यस्त असल्याचे सांगून उभ्याउभ्या दोनतीन मिनिटे बोलला आणि पुन्हा आत निघून गेला. त्याला महत्त्वाचे काम असेलही. पण मला ते अपमानास्पद वाटले आणि मी संतापून परत आलो. मला फक्त अधिकार गाजवायचे माहीत आहे. याचना करण्याची मला सवय नाही. यापुढे कोणाही पाशी हात पसरायचा नाही असा मी तत्क्षणी निर्णय घेतला. त्या-नंतर मी शहरात आणखी कोणाकडे गेलो नाही. जहाजाने सरळ राजमहेंद्रवरमला परत आलो.

आमच्या समाजाच्या सदस्यांपैकी काही जणांनी मासिक निधीशिवाय उदारपणे मोठ्यामोठ्या देणग्या दिल्या. आमचे निवेदन वाचून मदत पाठवणाऱ्यांपैकी बेंगलोरच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. ए. रामचंद्र अय्यर यांनी प्रत्येक विवाहासाठी रोख शंभर शंभर रुपये तर पाठवलेच शिवाय अर्धवार्षिक देणगी म्हणून शंभर रुपये वेगळे देण्यास सुरवात केली. रावबहादुर श्री. ए. सभापति मुदलियार प्रत्येक विवाहासाठी शंभर शंभर रुपये पाठवीत. २० डिसेंबरला झालेल्या तेराव्या लग्नासाठी रामकृष्णय्याने गुप्तपणे ३०० रुपये पाठवले.

विवाहासाठी मद्रासला नेलेली पण विवाह न झाल्यामुळे परत आणलेली एक विधवा होती. ती तणुकु चलपतिरावाची मेहुणी होती. मुलीच्या आईने कोम्माराजु गोपाल नावाच्या नियोगी शाखेच्या एका ब्राह्मण युवकाला वर म्हणून आणले आणि त्याच्याबरोबर आपल्या मुलीचा विवाह लावून द्या असे सांगितले. तो मुलगा शिकलेला नव्हता. शिवाय आईवडलांची उपेक्षा करीत होता व मवाली बनला होता. म्हणून त्याचा विवाह करण्यास मी विरोध केला. त्यावर ती स्त्री आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम यांचे पैदा रामकृष्णय्यांसाठी एक पत्र घेऊन काकिनाड्याला गेली. त्या संदर्भात रामकृष्णय्याने मला लिहिले.

"विधवा मुलीची आई माझ्याकडे आली आहे. तिच्या मुलीचा विवाह करण्यास माझी संमती आहे. यासाठी किमान किती पैशांची गरज लागेल ? कृपया कळवावे. या विवाहानंतर तूर्त तरी विवाह घडवून आणण्याचे काम आपणास थांबवावे लागेल."

तीनशे रुपये लागतील असे मी रामकृष्णय्यांना कळविले. ३ मार्च १८८६ च्या रात्री विवाह करायचे ठरवले आणि निमंत्रणे पाठविली. सर्व निमंत्रित व्यक्ती आल्या. पण नवरामुलगाच न आल्याने लग्न झाले नाही. ठरवलेल्या लग्नात विघ्न येऊन विवाह मोडण्याचा हा काही पहिला प्रसंग नव्हता. मद्रासमधील एका लग्नात सुद्धा असेच विघ्न निर्माण झाले होते. राजमहेंद्रवरम येथील हे लग्न पूर्णपणे मोडले नव्हते. नंतर हे लग्न झालेदेखील. पण त्यावेळी रामकृष्णय्या मात्र हयात नव्हते.

१७ मार्चला रामकृष्णय्या यांचे मला एक पत्र आले, "प्रिय मित्र, माझ्या मानेला गळू झाले आहे. त्यामुळे गेले १५ दिवस अतिशय यातना सहन करतो आहे."

मला पत्र मिळण्यापूर्वी दोनतीन दिवस आधीच त्यांचे निधन झाले होते.

त्या काळात खूप लोक माझ्याकडे येत. आम्ही विधवा मुलींना घेऊन येतो असे सांगत. वाटखर्चासाठी पैसे द्या असा बहाणा करून माझ्याकडून पैसे घेऊन जात आणि मला फसवीत. मूर्खपणापोटी कोणी असे केले तर त्याला क्षमा करता येईल, दुष्ट स्वभावामुळे कोणी दगा दिला तर ते देखील काही प्रमाणात क्षम्य मानता येईल पण आपणास जगहितकारी, निस्वार्थी सेवक आणि समाजसुधारक म्हणवून घेऊन पैशाच्या

लोभाने जे दुष्कर्म करतात त्यांना क्षमा करता येणार नाही.

जानेवारी १८८४ पर्यंत म्हशजे नल्लकोंड कोदंड रामय्याचा विवाह होईपर्यंत समाजाचे सदस्य आणि असे आदर्श विवाह करणारे यांच्यांत कधीच फूट पडली नाही. परंतु कोदंडरामय्याच्या विवाहानंतर दोनतीन महिन्यांतच भांडणे सुरू झाली. माझ्या दृष्टीने या भांडणाचे मूळ पैशाच्या लोभात होते.

विधवाविवाह आंदोलन सुरू करताना मी जुनाट सनातनी सामान्य जनता आणि विरोधी गटाचे नेते यांच्याकडून होणारी निंदानालस्ती आणि छळ हे सर्व सहन करण्याची तयारी ठेवूनच या कार्यास हात घातला होता. तथापि माझा फायदा घेऊन आणि समाजहितासाठी आपण किती कष्ट सहन केले हे सतत उगाळून माझा मानसिक छळही करण्यात येईल असे माझ्या स्वप्नातही आले नव्हते.

माझ्याच गल्लीतल्या चयन महाशयांचे घर आम्ही खरेदी केले तेव्हा त्या घरात तीन बिऱ्हाडे ठेवायचे मी ठरविले. त्या घरातील कोदंडरामय्याने मागितली ती जागा प्रथम मी त्याला दिली. स्वयंपाकघर, जेवण्याची आणि झोपण्याची खोली एवढा भाग कोदंडरामय्याने घेतला. दुसऱ्या एका भागात तणुकु चलपतिराव याच्या कुटुंबाला ठेवले. आणि बैठकीकडचा भाग चेबोल वेंकय्या यांच्या कुटुंबाला दिला. कोदंडरामय्याने आपल्यापासच्या भागाच्या दुरुस्तीसाठी पैशाचा तगादा सुरू केला. त्यावर मी मार्चमध्ये ६ रु. आणि जुलैमध्ये ५ रु. दिले. दुसऱ्या कुणालाही मी दुरुस्तीचा खर्च दिला नव्हता.

परंतु नल्लकोंड कोदंडरामय्या या साऱ्या गोष्टीं विसरून गेला. त्याचवेळी गोदावरीला पूर आला आणि शहरातील गल्ल्यांतून पाणी वाहू लागले. वेळेवर दुरुस्ती न केल्यामुळे कोदंडरामय्याच्या जागेची भिंत कोसळून पडली. तेव्हा मी त्याच्या जागेची दुरुस्ती केली नाही असा त्याने माझ्यावर आरोप केला. तसेच फेब्रुवारी १८८८ रोजी माझी बदनामी असलेले एक तक्रारीचे पत्र कार्यकारी समितीला पाठवले. त्याच महिन्याच्या २६ तारखेला या प्रकरणाची चौकशी झाली. मी कोदंडरामय्यांना दुरुस्तीकरता दिलेल्या पैशांचा हिशेब आणि त्यांनी दिलेल्या पावत्या समितीपुढे ठेवल्या. त्यावर समितीने पुढील निर्णय घेतला.

"अनेक अशिक्षित मूर्ख मिळून जेवढे नुकसान करतात त्याच्या शंभरपट अधिक नुकसान एक सुशिक्षित माणूस करीत असतो. आपल्या देशात प्राचीन काळापासून याचनावृत्ती त्याज्य नाही असा एक रिवाज चालत आलेला आहे. परिश्रम केल्याशिवाय आरामात बसून राहणे मोठेपणाचे लक्षण समजले जाते. त्यामुळे सर्व भीक मागून शक्य तेवढा जास्तीत जास्त पैसा जमवण्याचा प्रयत्न करतात. अपंग वगळून बाकी सर्वांनी शरीरश्रम केले पाहिजेत असे माझे मत आहे. जे लोक शारीरिक श्रम करीत नाहीत अशांना दान देऊन त्यांचा आळशीपणा वाढवणे हे महान पाप आहे." मी स्वतः श्रम

करतो. इतरांनीही श्रम करावेत अशी माझी अपेक्षा आहे. पाचव्या विवाहातील नवरा-मुलगा मंजुलूरि गोपालम हा शरीरश्रमाची महती जाणत नव्हता. तो मला म्हणाला, दुसऱ्या आणि चौथ्या विवाहांमधील रामचंद्रराव आणि शेषय्या यांना मिळतात तसे मला दरमहा आठ रुपये वेतन दिले जावे, मीही मुद्रणालयात काम करीन. त्याला मी स्पष्ट सांगितले, ते दोघे शिकत आहेत म्हणून त्यांना देत असतो. तू अशिक्षित असलास तरी शरीराने मजबूत आहेस. पण तुला मेहनत करायला नको. म्हणून मी तुला काहीही देणार नाही. पगार बंद झाल्यानंतर त्याला फाके पडू लागले. तेव्हा काकिनाडयाला जाऊन त्याने रामकृष्णय्यांना आपली दुरवस्था ऐकवली. थोडेसे पैसे देऊन त्यांनी त्याला परत पाठवले. काही दिवसांनी रामकृष्णय्या राजमहेंद्रवरमला आले असता मला समजावू लागले, "आपल्या समाजाचे सदस्य बनलेल्या मंडळीनी आपले ऐकले नाही तरी देखील अडचणीच्या वेळी आपण त्यांना मदत केलीं पाहिजे." त्यावर मी स्पष्ट सांगितले, "सोपवलेले काम धडधाकट असूनसुद्धा जे करीत नाहीत व आळशीपणात ज्यांना जीवन घालवावेसे वाटते त्यांना माझ्या पैशांनी मी मदत करणार नाही."

कोणी विनाकारण मला काही विचारले म्हणजे शांतपणे मला उत्तर देताच येत नाही. उलट मी अशा लोकांना तुम्ही स्वार्थी आहात, अयोग्य करीत आहात असे तोंडावर रागाने सांगतो. माझा हा सर्वात मोठा दोष आहे. कोणी खरोखरच अडचणींत सापडले असेल तर त्यांनी न मागताच मी त्यांना सहाय्य करतो. एकदा गोपाळरावांच्या पत्नीला देवी आल्या. त्यांची असहाय्य स्थिती बघून मी त्यांच्या घरी गेलो. जरूर त्या खर्चासाठी चार रुपये दिले. त्यांच्या आजारी बायकोची सेवाशुश्रूषा करायला एक शूद्र बाई दिली. जरूरीच्या सर्व वस्तू खरेदी करून दिल्या. ती बाई बरी होऊन स्नान करीपर्यंत मी रोज जाऊन चौकशी करीत होतो.

अशिक्षितांच्या इच्छा फार मोठ्या नसतात. अल्प पैशानेही ते संतुष्ट होतात. शिक्षित माणसांच्या इच्छा अमर्याद असतात. अशा प्रकारची एक दोन उदाहरणे येथे नाईलाजाने सांगावी लागत आहेत याचे मला फार वाईट वाटते.

तिसरा विधवाविवाह करणाऱ्या रामरावाला मी १०० रुपये देण्याचे वचन दिले होते, पण मी आणलेला सर्व पैसा विवाह करण्यातच खर्च झाला. त्यामुळे त्याला पैसे देता आले नाहीत, रामरावाच्या समक्ष मी माझी असमर्थता रामकृष्णय्यांना सांगितली. त्यावर राम-रावांना घर देण्याचे रामकृष्णय्यांनी कबूल केले. सप्टेंबर १८८५ मध्ये रामरावांनी मला लिहिले, सुमारे तीन वर्षे होत आली तरी रामकृष्णय्याने आपले वचन पाळलेले नाही. त्याच महिन्याच्या १३ तारखेला अन्य गोष्टींबरोबर याबद्दल देखील मी रामकृष्णय्यांना लिहिले. त्यांचे पुढील उत्तर आले.

'आपण आपसात ठरविल्याप्रमाणे मी त्याला कित्येकदा जेवण, बऱ्याचशा वस्तू आणि

पैसे दिले. त्याच्या लग्नानंतर मी त्याला खूप ऐसपैस जागेवर बांधलेले एक घरही दिले. तेवढ्या जागेत किमान आणखी दोन चांगली घरे बांधता येतील एवढी ती जागा आहे.'

ते पत्र मिळेपर्यंत रामकृष्णय्यांनी रामरावसाठी एवढे पैसे (१५०५ रु.) खर्च केले आहेत याची मला कल्पना नव्हती. येथे राजमहेंद्रवरममध्ये राहणाऱ्या नवऱ्यामुलांमागे प्रत्येकी एवढा खर्च करण्याइतका पैसा आमच्या समाजाकडे नाही. असला तरी देखील अशाप्रकारे आम्ही वारेमाप खर्च करणार नाही. आमच्यामध्ये अशाप्रकारे थोडीशी कटुता आलेली पाहताच आमच्या समाजाचेच काही लोक माझ्या विरोधकाकडे सल्ला घ्यायला गेले. आमच्या समाजातल्याच एक-दोन विधवाविवाहित तरुणांना हाताशी धरून इतरांना आपल्या बाजूस ओढण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला. माझ्यावर काहीतरी आरोप करून समाजाकडे तक्रारी पाठविण्यासाठी त्यांना चिथावले. माझ्याशी वैर करून मला त्रास देणारे लोक दोन प्रकारचे होते. माझ्या विधवाविवाह आंदोलनाला विरोधी असल्यामुळे माझा द्वेष करणाऱ्या लोकांचा एक प्रकार आणि ज्यांच्या दुष्कर्माची 'विवेकवर्धनी' मधून मी निर्भत्सना केल्यामुळे जखमी नागासारखे माझा मूड घेण्यासाठी डूख धरून बसलेल्यांचा दुसरा प्रकार. अशा लोकांमध्ये आमच्या समाजाचेही एक-दोन सदस्य होते.

विधवाविवाह केलेल्यांपैकी आमच्या येथील अनेक सुशिक्षित मुलांना, त्यांना जो थोडा-बहुत त्रास सोसावा लागत असे तो हजारपट वाढवून सांगण्याची सवय होती. त्यांनी सोसलेल्या अडचणी विशेष दखल घ्यावी अशा नव्हत्या हे निश्चित. यापैकी कुणालाही पूर्वीचे स्वतःचे घर नव्हते. या सर्वांना आम्हीच रहावयाला घरे आणि कामासाठी नोकर दिले होते. जरूर तेव्हा हे नोकर स्वयंपाक करून जेवायलाही घालीत. भोजनखर्चाशिवाय शाळेची फी, पुस्तके आणि कपड्यांचा खर्चही दिला जात असे. औषधांचा तसेच बऱ्या वाईट प्रसंगी होणारा खर्च देखील समाज करीत असे.

कोणाचीही कसलीही मामुली अडचण असे तेव्हा मी व गवर्राजु त्यांच्या घरी जाऊन विचारपूस करीत असू आणि ताबडतोब हवी ती मदत पाठवत असू.

मित्रांच्या मदतीने व कष्ट करून राजमहेंद्रवरममध्ये विधवाविवाहरूपी बीज रोवले, त्यातून वेल फुलली व ती पसरली. बालविधवांच्या दुर्दैवाने या कामांतील आमचे आश्रय-दाते श्री. पैदा रामकृष्णय्या यांचे २८ मार्च १८८६ रोजी अचानक निधन झाले. त्यांनी पहिल्या दोन विवाहासाठी केलेला खर्च, तसेच नंतर दान दिलेले दहा हजार रूपये, बांधलेली घरे आणि अन्य खर्च हे सर्व मिळून वीस हजार रुपये झाले होते. त्यांनी प्रथम आंदोलनाच्या प्रचारासाठी तीस हजार रुपये देण्याचा वायदा केला होता. पैकी वीस हजार तर अशारितीने दिले होते. उरलेले दहा हजार रुपये लवकरात लवकर देण्याचे वचन दिले होते. मृत्यूपूर्वी चार दिवस श्री. आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम त्यांना भेटले होते. त्यांना त्यांनी समितीतर्फे विश्वस्त नेमले आणि मृत्युपत्रात समाजाला दहा हजार रुपये

देऊन आपले वचन पूर्ण केले.

रामकृष्णय्यांनी दोन मृत्युपत्रे केली होती. पहिल्या मृत्युपत्रात 'राजमहेंद्रवरमचा विधवाविवाह समाज' असा आणि विश्वस्त म्हणून लक्ष्मीनरसिंहम यांचा उल्लेख नव्हता. विधवाविवाह समाज सर्वत्र एकच होता म्हणून राजमहेंद्रवरमचा खास उल्लेख करण्याची गरज नव्हती. परंतु विश्वस्त म्हणून आपल्या नावाचा उल्लेख करावा असे लक्ष्मीनरसिंहम यांनी रामकृष्णय्यांना पत्र लिहिले. पण ते मिळण्यापूर्वीच रामकृष्णय्यांचा मृत्यु झाला.

दुसऱ्या मृत्युपत्राला जोडलेल्या यादीत राजमहेंद्रवरमला झालेल्या पहिल्या आणि शेवटच्या विधवाविवाहांतील वरांची नावे वगळता उरलेल्या दांपत्यांची नावे लिहिलेली होती आणि त्यांच्याकडे असलेली घरे त्यांना दिली होती.

रामकृष्णय्यांच्या देहांतानंतर श्री. लक्ष्मीनरसिंहमने विधवाविवाह समाजाच्या नावे लिहिलेली दोन्ही मृत्युपत्रे समाजाकडे आणून दिली. परंतु श्री. लक्ष्मीनरसिंहम समाजाचे खजीनदार असल्यामुळे ती त्यांच्याजवळच ठेवण्यात आली.

३ एप्रिल १८८६ ला समाजाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत "स्वर्गीय रामकृष्णय्या यांनी संस्थेसाठी केलेली मृत्युपत्रे रजिस्टर्ड करावीत" असा ठराव मंजूर झाला.

या ठरावानुसार दोन्ही मृत्युपत्रे सब-रजिस्ट्रारच्या कचेरीत रजिस्टर करावयास हवी होती; म्हणून समाजाचे सहाय्यक सचिव श्री. सोमंचि भीम शंकरम यांनी श्री. लक्ष्मीनरसिंहम यांच्याकडे मृत्युपत्रांची मागणी केली. लक्ष्मीनरसिंहम यांनी दहा हजार रुपयांचा उल्लेख असणारे मृत्युपत्र आपल्यापाशी ठेवून दुसरे मृत्युपत्र तेवढे दिले. त्यामुळे भीमशंकरम यांनी ते एकच मृत्युपत्र ८ मे १८८६ रोजी सब-रजिस्ट्रारच्या कचेरीत जाऊन सदर मृत्युपत्र रामकृष्णय्यांनीच लिहिले आहे अशी साक्ष दिली.

त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच २७ जूनला झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत दुसरे मृत्युपत्रही रजिस्टर करावे असे ठरविण्यात आले. या ठरावावर सर्वश्री न्यापति सुब्बाराव पंतुलु, आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम, मी, सोमंचि भीमशंकरम, बसवर्राजु आणि माकर्ण वेंकट सुब्बाराव नायडु यांनी सह्या केल्या.

श्री. आत्मुरि लक्ष्मीनरसिंहम यांनी खरे तर श्री. रामकृष्णय्यांचे दहा हजार रुपयांचा उल्लेख असलेले मृत्युपत्र रजिस्ट्रेशनसाठी न देण्याचे मनाशी ठरविले होते. तरीही ते न कळू देता कार्यकारिणीच्या प्रस्तावावर त्यांनी सही कां केली हे सांगितले पाहिजे.

मी चौथ्या इयत्तेत शिकत होतो तेव्हा लक्ष्मीनरसिंहम माझे शिक्षक होते. ते माझे गुरू होते. मी त्यांचा अतिशय लाडका विद्यार्थी होतो. त्यामुळे ते मला ब्रह्मसमाजाचे तत्त्वज्ञान समजून सांगत. मी माझ्या घरी विद्यार्थ्यांच्या बैठकी बोलावीत असे. त्यांत भाग घेऊन ते मला प्रोत्साहन देत. या झाल्या लहानपणच्या गोष्टी. पण पुढे ते पुन्हा

राजमहेंद्रवरमला परत आले तेव्हा देखील विधवाविवाहाच्या कामात विविध तऱ्हेने ते मला मदत करीत. हे सर्व असले तरी स्नेहापेक्षा मी न्यायाला अधिक महत्त्व देतो. त्यांना विरोध करण्याची वेळ आली आहे असे मला वाटले.

त्या काळात विधवाविवाहाच्या कार्यात विशेषेकरून माझा वेळ जात असला तरी त्याबरोबरच शहर सफाईच्या कामाची तपासणी, पत्रिकेचे संपादन, प्रकाशन, लेखन-वाचन, व्याख्याने इत्यादींचीही मला खूपच आवड असल्याने या कामातही माझा सतत वेळ जात असे. मी संपादन-करीत असलेली 'विवेकवर्धनी' दुश्चरित्र लोकांच्या डोळ्यात काट्यासारखी सलत असे.

उच्चन्यायालयाने लाच खाण्यात पटाईत असलेल्या एका जिल्हा मुन्सफाची आमच्या राजमहेंद्रवरमला नेमणूक केली होती. या मुन्सफाची लाच खाण्याची पद्धत श्री. पोलूरि श्रीरामुलु यांच्या पद्धतीपेक्षा वेगळी होती. हे गृहस्थ नियमाप्रमाणे साक्षी वगैरे व्यवस्थित घेत; पण निवाडा देण्यापूर्वी दोन्ही बाजूंकडून शक्य असेल तेवढी लाच तो मागून घेई. खटल्याची फाईल नीट वाचून ज्याची बाजू न्याय्य असेल त्या पक्षाने दहा रुपये दिले तरी समाधान मानी आणि त्याच्याच बाजूने निकाल देई. पण नंतर अन्याय्य पक्षाने दोनशे रुपये दिले तर पहिल्याचे पैसे परत करी. त्यामुळे त्याने दिलेला निवाडा अन्याय्य होता असे कोणीही म्हणू शकत नसे. या लाचखाऊ मुन्सफाच्या लाचखोरी विरुद्ध 'विवेक वर्धनी'ने शस्त्र उगारले. या मुन्सफावर 'हास्यसंजीवनी' नेही पूर्वी टीका केली होती. त्यामुळे न्यायाधीशांनी लाच घेणे बंद केले. त्यांनी सहा महिन्यांची रजा घेतली आणि बदलीची खटपट केली. पण उच्चन्यायालयाची मंजूरी मिळाली नाही. तेव्हा परत राजमहेंद्रवरममध्येच त्यांना यावे लागले. काही काळ नीट वागले पण लवकरच गुपचुप लाच घेऊ लागले. तेव्हा मग 'विवेकवर्धनी'नेही आडून आडून टीका सुरू केली. तेव्हा तो घाबरला आणि पुन्हा रजा घेऊन गेला तो पुन्हा आमच्या शहरात आला नाही.

'विवेकवर्धनी' वर काही मित्र अशी टीका करीत की आम्ही इतर लोकांचे दोष उघडकीस आणतो पण आपल्या पक्षाच्या अनाचाराबाबत मात्र लिहीत नाही. वास्तविक आमच्या पत्रिकेने जाणूनबुजून आमच्या पक्षाची दुष्कृत्ये लपविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. लहान सहान दोषांकडे मात्र जरूर दुर्लक्ष्य केले होते. त्यामुळे कोणीकोणी स्वच्छंदपणे वागू लागले, त्यांना भीती वाटेनाशी झाली. म्हणून 'विवेकवर्धनी'ने मनुष्य स्वभावास अनुसरून चुका केल्या होत्या हे नाकारण्याचे धाडस करता येणार नाही.

श्री आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम प्रत्यक्ष लाच घेत नसत पण ते ज्यांचे कोर्टातील काम करीत त्यांच्याकडून अगदी कमी किंमतीत धान्य वगैरे विकत घेत. आपल्या कामासाठी आपल्या पक्षकारांकडून पैसा घेत. त्यांचे स्वतःचे त्यांच्या गावी एखादे काम निघे तेव्हा, त्या गावाच्या वाटेवरच्या किंवा जवळपासच्या गावातील जमिनीवगैरेचा एखादा तंटा

आहे का पहात आणि ती जागा आपणाला स्वतःला पहावयास हवी असे पक्षकारांना सांगत. आणि अशातऱ्हेने आपला व कुटुंबाचा पालख्यांतून जाण्यायेण्याचा वाटखर्च पक्षकारांकडून वसूल करीत. लक्ष्मीनरसिंहम यांच्यात दोन मुख्य दोष होते. एक दंभ आणि दुसरा सर्वांनी आपणाला मान दिला पाहिजे ही इच्छा. ३१ मार्च १८८६ च्या 'विवेकवर्धनी'त 'दंभाचार्य विलसन' या प्रहसनाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. त्यातील प्रमुख पात्रे होती–दंभाचार्य, त्याचे मित्र जंबुकेश्वरशास्त्री व स्वामीशास्त्री. या पात्रांच्या स्वभावाची चितारलेली दोनतीन लक्षणे श्री. लक्ष्मीनरसिंहम यांच्या स्वभावातही होती.

वरील प्रहसन प्रसिद्ध झाल्यानंतर देखील लक्ष्मीनरसिंहम नेहमीप्रमाणे माझ्याशी बोलत असत. तसेच त्यांनी मला श्री. रामकृष्णय्याची मृत्युपत्रे दाखवली तेव्हा विश्वस्तांमध्ये आणखी दोनतीन व्यक्तींना घेऊन काम करा असे मी त्यांना सुचवले तेव्हा त्यांनी माझा हा सल्ला मोठ्या सहृदयपणे मान्य केला. ६ एप्रिलच्या 'विवेकवर्धनी' मध्ये रामकृष्णय्यांसंबंधी लिहिलेल्या मृत्युलेखातही मी उपरोक्त सल्ल्याचा उल्लेख केला होता.

त्याच सुमारास मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात 'सत्यकामी' या नावाने कोणा व्यक्तीने 'विवेकवर्धनी'त एक पत्र लिहिले. त्यात म्हटले होते, "या शहरातील एका प्रतिष्ठित व्यक्तीने, रामकृष्णय्या यांनी आपल्या मृत्युपत्राद्वारे समाजासाठी दिलेली दहा हजार रुपयांची रक्कम श्री वीरेशलिंगमु मागत आहेत अशी अफवा पसरवली आहे. या अफवेत कितपत सत्य आहे याचा आपण आपल्या पत्रिकेतून खुलासा करावा."

हे पत्र आणि त्याला मी दिलेले उत्तर १९ मे च्या विवेकवर्धनीत प्रकाशित केले.

"सत्यकामी यांनी उल्लेखिलेली गोष्ट कोणी सद्गृहस्थ काहीतरी वाईट हेतूने पसरवीत आहेत. पण त्यात एक टक्का देखील सत्य नाही. 'विवेकवर्धनी'त प्रकाशित झालेल्या मजकुरातील भावना ध्वनित होतील अशारीतीने मी एकदा श्री आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम यांना त्यांचा हितचिंतक या नात्याने तसेच समाजहित लक्षात घेऊन बोललो होतो. विश्वस्तांच्या समितीत माझे नाव मुळीच घालू नका असेही मी त्यांना म्हणालो होतो. याबाबतीत कोणाच्या मनात काही शंका असल्यास श्री लक्ष्मीनरसिंहम यांना विचारून खात्री करून घेता येईल. याविषयी ते कधी खोटे बोलणार नाहीत. –कुंदुकूरि वीरेशलिंगमु."

वरील पत्र येण्याच्या आणि माझ्या उत्तरासह ते प्रकाशित करण्याच्या दरम्यान ९ मे १८८६ रोजी एक विचित्र घटना घडली.

श्री लक्ष्मीनरसिंहम यांचा तो मित्र कोर्टात जाई तेव्हा त्याचे वकील मित्र त्याची "जंबुकस्वामी येत आहेत. जंबुकस्वामी काय खबर आहे ?" असा उपहास करीत. तेव्हा तो मित्र आणि इतर अनेक आगलावे लोक एक दिवस लक्ष्मीनरसिंहम यांच्या घरी

जाऊन म्हणाले, "महाराज, 'दंभाचार्य विलसनमु' हे प्रहसन तुम्हाला पुढे ठेवूनच लिहिले आहे. तुम्ही स्वस्थ बसणे अपमानास्पद आहे." अशाप्रकारे लोकांनी लक्ष्मीनरसिंहमला चिथावले. श्री लक्ष्मीनरसिंहम भडकले आणि ते प्रहसन प्रसिद्ध झाल्यानंतर चाळीस दिवस गप्प राहिल्यावर एक दिवस अचानक 'दंभाचार्य विलसनमु' हे प्रहसन ज्या अंकात प्रसिद्ध झाले होते त्या 'विवेकवर्धनी'च्या अंकाची एक प्रत त्यांनी मोठ्या अद्भुत रीतीने जाळून टाकली.

त्याच्या दुसऱ्या दिवशी मी आपल्या प्रकाशकांमार्फत त्यांना एक पत्र पाठवले. त्यावरून खरी हकीगत कळू शकेल.

"नमस्कार, श्री आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम चेट्टियार यांना 'विवेकवर्धनी'चे मुद्रक आणि प्रकाशक श्री कूरेल्लरामय्या यांचे निवेदन आहे की, या महिन्याच्या ७ तारखेच्या सायंकाळी आपण 'विवेकवर्धनी'ची एक प्रत उंच बांबूला लटकावून त्याबरोबर जुना जोडा आणि झाडूही बांधला आणि 'विवेकवर्धनी'चे प्रकाशक, मुद्रक आणि लेखक यासह 'विवेकवर्धनी'च्या बेगरय्यामहाल या जागी जाळण्याची धमकी देऊन आमची अतिशय नालस्ती केलीत आणि ज्या लोकांना हे दृश्य पहावयाची इच्छा आहे त्यांनी हजर राहावे असेही जाहीर केलेत. शिवाय आपल्या कोर्टामधील छापखान्यातील अनेक नोकर, आपले अन्य सेवक आणि सहकारी यांनी शिवीगाळ करून पत्रिकेचे प्रकाशक आणि पत्रिकेचे मालक यांचा अपमान करण्याच्या तसेच त्यांच्या प्रतिष्ठेला कलंक लावण्याच्या दुष्ट हेतूने गल्ली बोळातून ढोल वाजवला आणि ही सारी अयोग्य कृत्ये आपल्या आदेशानुसार केली जात आहेत असे हस्तपत्रिकांतून प्रसिद्धही केले. म्हणून मी कायदेशीर मार्गाने योग्य ती दाद मागत आहे. म्हणून चार दिवसांच्या आत आपला याच्याशी कितपत संबंध आहे ते आपण मला कळवावे."

या पत्राचे लक्ष्मीनरसिंहम यांनी इंग्रजीत उत्तर दिले !

"आपण पाठविलेल्या रजिस्टर्ड पत्राच्या उत्तरादाखल मी आपणास कळवू इच्छितो की, पत्रात तुम्ही जे काही म्हटले आहे ते संपूर्ण चौकशीअंती खरे नाही असे दिसून आले आहे. आपण आपल्या पत्रात अपमानजनक गोष्टी लिहल्या आहेत. आपण आणि आपले एकदोन शिष्य आमची निंदानालस्ती करीत आहेत अशीही माहिती आम्हास कळली आहे. सबब आजपासून पंधरा दिवसांच्या आत माझी माफी मागितली नाहीत तर आपण आणि आपले शिष्य यांच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करणे आम्हास भाग पडेल."

राजमंडी आपला

१६ मे १८८६ ए. एल. नरसिंहम

वरील पत्राचे उत्तर इंग्रजीतच दिले.

"आपल्या पत्राचे उत्तर म्हणून मी असे सांगू इच्छितो की माझ्या पत्रांत तुम्ही म्हणता

त्याप्रमाणे मी कुठल्याच निंदापूर्ण आणि अपमानकारक गोष्टी लिहिलेल्या दिसल्या नाहीत. आपली मी कधी कोठे नालस्ती केल्याचे मला स्मरत नाही 'माझे एक अथवा दोन शिष्य' असे जे आपण म्हटले आहे ते पूर्णपणे चुकीचे आहे. सबब मी माफी मागण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. त्यातूनही आपणास कोणावर कायदेशीर इलाज करावयाचा असेल तर बेलाशक करू शकता."

आपला

२० मे १८८६ रामय्या

'विवेकवर्धनी' जाळण्याच्या प्रकरणी गुन्हा दाखल करून शेवटपर्यंत खटला लढण्याचे मी ठरवले. साक्षी तयार ठेवल्या. सर्व दृष्टीने तयारी केली. मध्यंतरी आम्हा दोघांच्या मित्रांनी आमच्यात तडजोड घडविण्याचा प्रयत्न केला. कोर्टकचेरी करणे आम्हास शोभत नाही, आपापसातील भांडणामुळे विरोधकांत आमचे नाव बद्दु होईल, शिवाय आम्ही हाती घेतलेल्या महान् कार्याचीही हानी होईल असे सांगितले. परंतु पहिल्यापासून माझा स्वभाव जिद्दी आहे. म्हणून लक्ष्मीनरसिंहमने लेखी क्षमा मागितली तरच तडजोड होईल असे मी स्पष्टपणे सांगितले. अशारीतीने काही काळ तडजोडीचा प्रयत्न चालू होता. अखेरीला ६ ऑगस्ट १८८६ रोजी लक्ष्मीनरसिंहम यांनी खालीलप्रमाणे माफीपत्र पाठवले.

"११ मार्चला 'विवेकवर्धनी'च्या अंकातील हास्यसंजीवनी या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या मजकुराविषयी माझ्या काही मित्रांनी एका विशिष्ट व्यक्तीला डोळ्यापुढे ठेवून ते प्रहसन लिहिले आहे असे सांगितले. म्हणून संतापाच्या भरात ९ मे ला 'विवेक वर्धनी'चा तो अंक मी जाळला, त्याबद्दल मला अतिशय खेद वाटतो. माझ्या नोकरांनी या बाबतीत आपली नालस्ती केली असे आपण म्हटले आहे. त्यांच्यामार्फत आपली निंदा करावी असा माझा मुळीच विचार नव्हता. मी त्यांना जाब विचारला आहे... त्यासाठी मी माफी मागतो..."

त्यानंतर ८ डिसेंबर १८८६ रोजी 'विवेकवर्धनी'च्या टीपेसह श्री लक्ष्मीनरसिंहम यांचे हे क्षमायाचना पत्र त्याआधीच्या सर्व पत्रव्यवहारासह मी पत्रिकेत प्रसिद्ध केले.

अशाप्रकारे कलहाग्नी पूर्णपणे विझला. मी अनेक लोकांच्या दुष्कर्मांवर वारंवार टीका करीत असल्या कारणाने माझ्या शत्रूंची संख्या वाढली होती. हे सारे लोक लक्ष्मी-नरसिंहमना सल्ला देऊ लागले, माफी मागणे अपमानकारक आहे म्हणून झाल्या गोष्टीचा सूड घेतला पाहिजे. या लोकांनी अशाप्रकारे लक्ष्मीनरसिंहमना भडकवण्यास सुरवात केली. लक्ष्मीनरसिंहम आणि त्यांची मित्रमंडळी यांनी खलबत करून असे ठरवले की रामकृष्णय्या यांनी विधवाविवाह समाजासाठी म्हणून जे दहाहजार रुपये दिले आहेत ते विवाहासाठी खर्च न करण्याचे बंधन घातले तर विधवाविवाह थांबतील किंवा कायमचे बंदच पडतील. आणि अशा मार्गाने माझा सूड घेता येईल. वाहव्वा ! काय हे

बुद्धिचातुर्य ! विधवाविवाह झाले नाहीत तर ते काय मला एकट्यालाच लज्जास्पद होते ? खरे तर माझा सूडच घ्यायचा असेल तर तो माझ्यावर उपकार करून घेतला पाहिजे. अनाथांच्या रक्षणासाठी चाललेल्या सामाजिक हिताच्या कार्यात विघ्न निर्माण करणे हा कुठला न्याय ?

आपल्या स्वार्थासाठी विधवाविवाह केलेले काही लोक या दुष्ट कार्यात मदत करू लागले. श्री लक्ष्मीनरसिंहम यांनी विधवाविवाह केलेल्या आणि राजमहेंद्रवरमध्येच राहणाऱ्या जोडप्यांना दहा हजार रुपयांचे जे व्याज मिळेल ते तुम्हाला देईन असे प्रलोभन दाखवून आपल्या बाजूला वळवून घेतले. तसेच त्यांनी आणखीही एक चलाखी केली. रामकृष्णय्यांच्या मृत्युपत्रांतील 'विवाह करणाऱ्या विधवा, त्यांचे पती तसेच त्यांची मुले यांच्या पालनपोषणार्थ' या वाक्याला लक्ष्मीनरसिंहम यांनी नवी पुस्ती जोडली– या आधी विवाहबद्ध झालेल्या लोकांसाठी हा पैसा खर्च केला जाईल. पण खरे म्हणजे त्याच मृत्युपत्रात 'विधवांचे विवाह लावण्यासाठी' असेही लिहिले होते. पण त्याकडे लक्ष्मीनरसिंहमनी मुद्दाम दुर्लक्ष केले आणखी असा प्रचार सुरू केला की रामकृष्णय्या यांनी आपल्या मृत्युपूर्वी आपणाला खाजगीरित्या तोंडी असे सांगितले होते की "या अगोदर विवाहबद्ध झालेल्या दांपत्यांच्या पोषणासाठी आणि अन्य लहानमोठ्या आकस्मिक कामांसाठी दहाहजारांचे व्याज खर्च केले जावे." अशाप्रकारे मृत्युपत्राचा एक नवाच अर्थ लावून लक्ष्मीनरसिंहम यांनी ५ ऑक्टोबर रोजी आपल्या सूचनेसह एक पत्र इतर ठिकाणच्या विधवाविवाहितांकडे पाठवून दिले.

लक्ष्मीनरसिंहमचे हे पत्र प्रथम विधवाविवाह करणाऱ्या गोगुलपाटि श्रीरामुलु याला मिळाले. त्याने खालीलप्रमाणे उत्तर दिले. "देणगी देणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे दहा हजार रुपयांवर मिळणारे व्याज पूर्वी विधवाविवाह केलेल्या वरांमध्ये सारखे वाटले जावे याबाबत माझे मत विचारणारे पत्र पाठवलेत याबद्दल आपणास मनापासून धन्यवाद देतो. परंतु देणगीदाराने वर उल्लेखिलेली आपली इच्छा आपल्यापाशीं केव्हा व्यक्त केली ही गोष्ट आपल्या पत्रातून कळत नाही. याबाबतचा कोणताच पुरावा दिसत नाही. मृत्युसमयी दात्याची अशीच इच्छा होती आणि त्याची पूर्तता करावी असे आपणास वाटते असे आपण मनापासून सांगत आहात पण विधवाविवाह करणाऱ्या वरांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न आपण कशासाठी करत आहात ? ही गोष्ट माझ्या लक्षात येत नाही. आपण या वरांचे विचार समजून घेण्याच्या बाबतीत जी तत्परता दाखवत आहात त्यामुळे खरोखरच देणगीदाराची इच्छा तशी होती की नाही याविषयी मला शंका वाटते. दहा हजारांवर मिळणारे व्याज आपण १२ कुटुंबात वाटून दिले तर यापुढे आपणास आणखी विधवाविवाह करता येतील काय ? म्हणून वरील रक्कम एकाहून अधिक व्यक्तींच्या नावावर बँकेत ठेवावी आणि मूळ पैशावर मिळणारे व्याजही त्यातच जमा करावे. एखाद्या विधवाविवाहिताला

कधी काही अडचण आली तर त्याला व्याजाच्या रकमेतूनच मदत द्यावी आणि व्याजाच्या उरलेल्या रकमेचा उपयोग विधवाविवाहाचे कार्य चालू ठेवण्यासाठी करावा."

श्रीरामुलु आणि इतर विधवाविवाहितात किती फरक होता हे वरील निवेदनावरून कळून येते. मोठमोठ्या पदांवर नोकऱ्या करणाऱ्या कोदंडरामय्या, शेषय्या वगैरेंनी सर्व व्याज आपापसांत गिळंकृत करण्यासाठी ही नवी योजना बनवली होती. पुढे विधवाविवाह होवोत न होवोत पण आपल्याला पैसा मिळाला पाहिजे एवढीच त्यांची इच्छा होती. त्यानंतर तर लक्ष्मीनरसिंहमनी रामकृष्णय्या यांनी आपल्या मृत्युपत्रात ज्या विधवाविवाह समाजाचा उल्लेख केला आहे तो हा राजमहेंद्रवरम येथील समाज नव्हे असेही म्हणण्याचे धाष्टर्य केले. मूळ मृत्युपत्र तर राहोच पण त्याची नक्कल देखील समाजाच्या कोणत्याही सदस्यापाशी नव्हती. म्हणून १७ डिसेंबरला झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीने खालील प्रस्ताव मंजूर केला.

"श्रीरामकृष्णय्या यांच्या दहा हजार रूपयासंबंधीच्या मृत्यूपत्राच्या प्रती छापून प्रबंध समितीच्या सदस्यांना दिल्या जाव्या."

त्याचप्रमाणे लक्ष्मीनरसिंहमने आपल्या वैदिक मुद्रणालयांत मृत्युपत्राच्या प्रती छापून सदस्यांना दिल्या.

विधवाविवाह समाजाच्या नावाचा मृत्युपत्रात केलेला उल्लेख राजमहेंद्रवरम समाजासंबंधी असू शकेल काय ? पैदा रामकृष्णय्या यांच्या पैशाचा उपयोग करण्याचा उत्तम मार्ग कोणता ? या दोन प्रश्नांची चर्चा करण्यासाठी ७ जानेवारीला कार्यकारी समितीची खास बैठक बोलावण्यात आली. परंतु त्या बैठकीला श्री. लक्ष्मीनरसिंहम गैरहजर राहिले म्हणून ती १३ तारखेपर्यंत स्थगित करण्यात आली. १३ तारखेलाही लक्ष्मीनरसिंहम हजर राहिले नाहीत. तरी देखील त्यांच्या गैरहजेरीत बैठक झाली. आणि पुढील निर्णय घेण्यात आले. दहा हजार रूपयांच्या संदर्भात पैदा रामकृष्णय्या यांच्या मृत्युपत्रात उल्लेखिलेला विधवाविवाह समाज राजमहेंद्रवरमचाच समाज होय, त्या पैशातून मिळणाऱ्या व्याजाची रक्कम पूर्वीचा विवाहित दांपत्यें, सध्या काम करणारे पुरोहित, वल्लरि पुन्नमा आणि तिचा भावी पती व मुले यांच्यासाठी खर्च करावी आणि उरलेल्या रकमेचा विनियोग प्रामुख्याने विधवाविवाहाचे कार्य आणि विवाहखर्च यासाठी करावा.

त्याच दिवशी सायंकाळी विधवाविवाह समाजाचे मित्र आणि हितचिंतक यांनी एक सभा घेतली आणि तीत वरील अर्थाचा निर्णय घेतला. जानेवारी १८८७ च्या १५, १६ व २२ असे तीन दिवस सर्वसाधारण बैठक झाली. तिसऱ्या दिवसाची बैठक अतिशय महत्वपूर्ण होती. त्या बैठकीत खालील ठराव करण्यात आले. त्यांचा भावार्थ असा :

'निधिसंरक्षक मंडळाचे सदस्य श्री. ए. एल. नरसिंहम यांनी निधिसंरक्षक मंडळाच्या दोन अन्य सदस्यांना दहा हजार रुपयांच्या निधीची चांगल्यारितीने व्यवस्था करण्याच्या

कामी सहकार्य करावे. त्या दोन निधिसंरक्षक सदस्यांपैकी एक, पदसिद्ध सदस्यांमधून निवडण्यात यावा आणि दुसरा (तो पदसिद्ध असला तरी) सध्याच्या विधवाविवाह समितीच्या सदस्यांमधून निवडावा अशी श्री. ए. एल. नरसिंहम यांना विनंती करण्यात येत आहे.

सभेच्या शेवटी लक्ष्मीनरसिंहम उभे राहिले व म्हणाले, "सन्माननीय सदस्य, मी आपला सल्ला अवश्य घेत जाईन पण त्याचे पालन करण्याचे बंधन मजवर नाही."

२२ जानेवारी १८८७ च्या बैठकीत मंजूर झालेले चारही प्रस्ताव निधिसंरक्षक श्री लक्ष्मीनरसिंहम यांनी धुडकावून लावले. समाजाच्या दुर्बल स्थितीचा फायदा घेऊन लक्ष्मीनरसिंहम यांनी वर उल्लेखिलेली रक्कम खर्चून त्रिचूर जिल्ह्यात एक गाव खरेदी केले आणि स्वतःला राजा हे नामाभिधान लावून घेतले. आपल्या हयातीत दहा विधवाविवाहित दांपत्यांना ते दरवर्षाला तीनशे रुपये पाठवीत असत.

१८८६ आणि १८८७ मध्ये समाजातर्फे एकही विधवाविवाह झाला नाही. या काळात समाजाला काही अडचणींना तोंड द्यावे लागले. एप्रिल १८८८ मध्ये दुसरा विधवाविवाह करणारा रामचंद्रराव मृत्यू पावला. त्याच महिन्याच्या २३ तारखेला चौथा विधवाविवाह करणाऱ्या शेषय्याची पत्नी शेषम्मा मरण पावली आणि त्याच महिन्यात प्रथम विधवाविवाह करणाऱ्या गोगुलपाटि श्रीरामुलुने ख्रिश्चनधर्म स्वीकारला.

जुलै १८८८ मध्ये कोम्मराजु गोपालन याने विधवाविवाह केला. त्याची पत्नी वल्लूरि पुन्नम्मा हिला विवाहासाठी रामकृष्णय्याने मृत्युपूर्वी तीनशे रुपये दिले होते. १७ ऑक्टोबर १८८९ ला कोदंडरामय्याचे दुसरे लग्न झाले. त्याला पूर्वीच घर दिले असल्यामुळे पुन्हा देण्याची गरज नव्हती. पहिल्या पत्नीचे दागिने होतेच. त्याने समाजाच्या मदतीशिवाय स्वतंत्रपणे आपण आपला विवाह करू असे सांगितले. तरीही समाजाकडून ७५ रु. उसने घेतले. त्यातूनच त्याने लग्नखर्च केला. पण समाजाकडून घेतलेले उसने पैसे मात्र कधीच परत केले नाहीत. याशिवाय सभापति मुदलियार यांनी प्रत्येक विवाहासाठी समाजाला द्यायचे कबूल केलेले शंभर रुपयेही आपल्या विवाहाचा खर्च आपण स्वतःच केला आहे असे खोटे सांगून कोदंडरामय्याने लक्ष्मीनरसिंहम यांच्या मध्यस्थीने मिळविले.

कोदंडरामय्या एवढेच करून थांबला नाही, त्याने तक्रारीवर तक्रारी केल्या. तो रहात असे त्या घराचा एक भाग गोदावरीच्या पुरामुळे कोसळला, तेव्हा आत्मूरि लक्ष्मीनरसिंहमने दोन हिस्से केले. खरे म्हणजे रामकृष्णय्यांनी मृत्युपत्रानुसार तीन हिस्से पाडले होते. पण कोदंडरामय्या असे म्हणू लागला की संपूर्ण घर आपणाला दिलेले आहे, त्याचे हिस्से केलेले नाहीत. तेव्हा घराचे हिस्से करून दिलेले नाहीत हे म्हणणे

खोटे आहे असा कार्यकारी समितीने निर्णय दिला. त्यावर आपण कोर्टात जाऊ अशी कोदंडरामय्याने धमकी दिली. आपणास विवाहासाठी दिलेले उसने पैसे परत करण्याची मुळीच गरज नाही असेही म्हणू लागला. पैसे दिले नाहीत तर आपण विधवाविवाह-वाल्यांचा पक्ष सोडून प्रायश्चित्त घेऊ असे भय दाखविले. समाजाला प्रतिस्पर्धी असा एक नवा समाजही त्याने स्थापन केला, पण तो अल्पायु ठरला. कोदंडरामय्याने आणखी अशीही धमकी दिली की मला जे आर्थिक सहाय्य करणार नाहीत किंवा माझ्या बाजूने बोलणार नाहीत, त्यांचा समाचार घेण्यासाठी मी एक पत्रिका काढीन. अशाप्रकारचे अनेक दुष्ट उद्योग त्याने माझ्या विरोधकांच्या चिथावणीने एक-दोन लोकांच्याबरोबर केले. माझी व समाजाची बदनामी करण्याचाहीं थोडाफार प्रयत्न केला.

राजमहेंद्रवरममधील नव्वद टक्के प्रमुख व्यक्ती स्थानिक विधवाविवाह समाजाच्या सदस्य होत्या. तरी देखील पूर्वी उल्लेखिलेल्या दोन विवाहाव्यतिरिक्त पाच वर्षांच्या अवधीत एकूण नवा विवाह झाला होता. २९ मार्च १८८९ मध्ये हा विवाह झाला. वर-वधू वैश्य होते. त्यानंतर होणाऱ्या विधवाविवाहाच्या दांपत्यांना द्यावयास घरे शिल्लक नव्हती. घरे बांधून द्यावयाची तर पैसे नव्हते. काही लोकांनी वार्षिक वर्गणी देणे बंद केले. वार्षिक वर्गणी ६ रु. जास्त आहेत असे वाटल्यामुळे ३ रु. केली. त्यानंतर तीनाची एक केली. ही एक रुपया वर्गणी देखील अनेकजण नियमितपणे देत नसत. अशा परिस्थितीत सेवकांचा मासिक पगार देणे कठीण होऊ लागले आणि त्यामुळे पुरोहित आणि स्वयंपाकी ब्राह्मण यांना कामावरून दूर करणे भाग पडले.

यानंतर मी स्वतःच माझ्या शक्तीप्रमाणे समाजासाठी पैसा देऊ लागलो. १८९२ आणि १८९३ मध्ये प्रत्येकी दोन विवाह केले. अशा रीतीने मी मद्रासला जाईपर्यंत म्हणजे १९०६ पर्यंत दहा लग्ने लावली. पूर्वीप्रमाणे या नवविवाहित दांपत्यांना घरे, दागिने इत्यादी दिले नाही. जोडवी, मंगळसूत्र, पानसुपारी, वाजंत्री, जेवणावळ इत्यादीं-साठी जो खर्च होई, तो फार तर १००रु. पर्यंत खर्च होई. या विवाहानंतर मी मद्रासला गेलो. तेथे ३५ वे लग्न होणार होते. मद्रासमध्ये श्री. आत्मूरि लक्ष्मीनरसिंहम मला भेटायला आले. बोलता बोलता मी त्यांना सांगितले की हे सत्कार्य पैशाभावी मोठ्या प्रमाणात होत नाही. तरीही रामकृष्णय्यांच्या पैशातून जेवढे विवाह लावले, त्याच्या दुप्पट विवाह त्यांच्या पैशाची मदत बंद झाल्यावरही लावले गेले. एवढेच नव्हे तर पैसे मिळत नाहीत म्हणून अलीकडे लागलेल्या विवाहांतील नवऱ्यामुलात असमाधानही नाही. तसेच त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा त्रास मला होत नाही. लग्नखर्च मी शंभरावरून पन्नासावर आणि पन्नासावरून वीसावर आणला आहे. आताच्या काही विवाहांचा खर्च तर स्वतः नवऱ्यामुलांनीच केला आहे.

१८८१ ते १८९० या दहा वर्षांत मी दम्याने हैराण झालो होतो. तरी देखील रोज

सकाळी दहा वाजता शाळेत जाई आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत काम करून परत येई. विद्यार्थीसंघामध्ये जाऊन व्याख्याने देत असे. त्याशिवाय इन्नीसपेट आणि शहरातील आणखी एका शाळेच्या कार्यकारी समितीवर सदस्य म्हणूनही मी काम करीत असे. मुसलमानांच्या विनंतीवरून इस्लाम शिक्षण संघाचा चिटणीस म्हणून मी काम करीत असे आणि मुस्लीम विद्यार्थ्यांचे वसतिगृह चालवीत असे. शहराचीं नगरपालिका, तेलगु बोर्ड, डिस्ट्रीक्ट लोकल फंड बोर्ड सदस्य म्हणून काम करीत होतो. त्या काळात नगरपालिकेचे कित्येक सदस्य केवळ लाच खाऊन चैनीत रहात असत. नगरपालिकेचे सदस्य रस्त्यावरील दिव्यांचे खांब जरूर तेथे न लावता आपल्याच घरासमोर लावून घेत. रस्त्यामधील व बाजारामधील दिव्यांमध्ये कमी तेल घालून काही सदस्यांच्या घरातील दिवे लावले जात. गल्ल्या-बोळ तसेच हमरस्ते यांच्या दुरुस्तीप्रित्यर्थ दरवर्षी मंजूर होणारा जनतेचा अधिकांश पैसा या लबाड सदस्यांच्या थैल्यांत आणि तिजोऱ्यांत जात असे. प्रतिष्ठित लोक नगरपालिकेच्या रस्त्यांवर अतिक्रमण करून घराचे ओटे, नव्या खोल्या व दिवाणखाने बांधीत असत. त्यामुळे रस्ते अरुंद होत चालले होते. नगरपालिकेच्या स्वच्छतेसंबंधींच्या नियमांचा गरीबांना उपद्रव होत होता तर श्रीमंत लोक हे नियम धाब्यावर बसवीत होते. नगरपालिकेच्या इस्पितळावर खूपच पैसा खर्च केला जात होता. परंतु रोग्यांना नियमानुसार योग्य ते जेवण दिले जात नव्हते. इस्पितळासाठी मंजूर झालेल्या पैशांतला निम्मा पैसा लहानमोठ्या अधिकाऱ्यांच्या खिशात जात होता. हा भ्रष्टाचार व अन्याय थांबविण्याचा प्रयत्न मी सुरू केला. त्या संदर्भातील दोन-तीन घटनांचा येथे उल्लेख करतो.

एक दिवस मी इस्पितळाच्या तपासणीसाठी गेलो होतो. तेव्हा रोग्यांना रोजचा आहार म्हणून नियमानुसार दूध आणि पाव न देता फक्त कांजी व थोडासा भात दिला जातो असे दिसून आले. मी रोग्यांची चौकशी करीत होतो ते पाहून इस्पितळातील एका नोकराने पळत जाऊन इस्पितळाचे वैद्य रंगय्या नायडु यांना बोलावून आणले. आपली खरी लबाडी उघडकीस येईल अशी भीती वाटून वैद्याने ताबडतोब दारे बंद करावयास लावून मला आत येऊ दिले नाही. मी नगरपालिकेला याबाबत रिपोर्ट केला. तेव्हापासून तो वैद्य माझा द्वेष करू लागला. पुढे एक दिवस रात्री शहरातील एका प्रमुख गृहस्थाच्या घरी झालेल्या सभेस तो आला असता माझ्याकडे डोळे फाडून पहात होता. जणू माझ्यावर हल्ला करायचा त्याचा विचार होता. ही गोष्ट लक्षात येऊन त्या घराच्या मालकाने नोकरांकरवी त्या वैद्याला बाहेर घालविले. या घटनेविषयीही मी नगरपालिकेला कळविले. तेव्हा नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मद्रासच्या जनरल इस्पितळाच्या मुख्य अधिकाऱ्याला सदर वैद्याची बदली करण्यात यावी अशी विनंती केली. त्याप्रमाणे त्याची राजमहेंद्रवरमहून बदली करण्यात आली.

एक दिवस मी शाळेत जात होतो तेव्हा शहराच्या मुख्य रस्त्याच्या चारपाच फूट जागेवर बेकायदा कब्जा करून पटनाल वीरेशलिंगम नावाचा एक सोनार घरचा पाया पुढे सरकवून भिंत बांधत होता. अशाप्रकारे सडकेवर बेकायदा अतिक्रमण करणे योग्य नाही, प्रथम नगरपालिकेला अर्ज करून तिची परवानगी घ्यावी लागते, परवानगी मिळाल्यावरच ही भिंत बांधता येईल. नाहीतर जुन्या प्लॅनप्रमाणेच घर बांधावे लागेल असे मी त्याला समजून सांगितले त्याने माझे ऐकले आणि गवंड्यांना परत पाठवले. सायंकाळी त्याच रस्त्यावरून घरी परत जात असता घराचे बांधकाम पुन्हा चालू झाल्याचे मला दिसले. मी विचारल्यावर त्याने खुलासा केला, "मी नगरपालिकेच्या सदस्यांना (Ward Councilors) यासंबंधी विचारले तेव्हा तुम्हाला (म्हणजे मला) हे बांधकाम थांबविण्याचा काहीही अधिकार नाही, तुमचे घर आमच्या वॉर्डात आहे, म्हणून घराच्या बांधकामाची परवानगी देण्याचा आम्हालाच अधिकार आहे, असे त्यांनी सांगितले." दुसऱ्या दिवशी मी याबाबत नगरपालिकेकडे मेमो पाठविला. त्याची चौकशी होण्यापूर्वीच घर बांधून पूर्ण झाले होते. आणि घराच्या सर्व जुन्या खुणा नष्ट केल्या होत्या. नगरपालिकेच्या नंतरच्या एका बैठकीत या बेकायदा कब्जा प्रकरणावर मी टीका केली. सोनाराला भिंत बांधण्यास संमती देणारे सदस्यही त्या बैठकीला हजर होते. पण ते काही बोलले नाहीत. अखेरीला मेनरोडवरील जेवढ्या भागावर सोनाराने आक्रमण केले आहे तेवढे हटवले जावे असा प्रस्ताव संमत झाला. पालिकेतर्फे मी त्या जागी गेलो आणि कब्जा केलेल्या जागेवर बांधलेल्या भिंती आणि ओटे कुदळीने खोदून पाडून टाकविले. आपण पालिकेच्या त्या सदस्यांना आधीच २५ रु. दिले होते आणि तुम्ही हरकत घेतल्यानंतर पुन्हा ७५ रु. घेऊन त्यांनी परत संमती दिली असे सांगून सोनाराने आपले दुःख बोलून दाखविले.

नगरपालिकेचे अध्यक्ष नागोजीराव पंतुलु शाळा तपासनीस बनून अध्यक्षपदावरून निवृत्त झाल्यानंतर राजमहेंद्रवरमचे सब कलेक्टर हाम्मोटसाहेब याने नगरपालिकेचे अध्यक्ष पद मिळविण्याची खटपट चालविली. आमच्या शाळेचे प्रधानाध्यापक मेट्काफ-साहेब यांनी नगरपालिकेच्या अध्यक्षपदासाठी हाम्मोट साहेबाच्या नावाची शिफारस करणारे एक पत्र सहीसाठी माझ्याकडे पाठवले. त्यावर स्थानिक स्वायत्ततेचा अधिकार देण्यात सरकारचा उद्देश नगरपालिकेच्या सदस्यांना स्वतंत्रपणे काम करता यावे हाच आहे, सरकारी अधिकारी नगरपालिकेचा अध्यक्ष झाला तर नगरसेवकांना निर्भयपणे काम करणे शक्य होणार नाही, म्हणून मी आपल्या पत्रावर सही करू शकत नाहीच, उलट अध्यक्षीय निवडणुकीत मी हाम्मोटसाहेबांच्या विरूद्ध माझे मत देईन असे मी स्पष्ट-पणे बजावले. त्याप्रमाणे हाम्मोटसाहेबाच्या अध्यक्षपदीय उमेदवारीला मी नगरपालिकेच्या बैठकीतही विरोध केला. आणि कोणा दुसऱ्या व्यक्तीला निवडावे अशी सूचना केली.

परंतु इतर नगरसेवकांना सबकलेक्टरच्या विरूद्ध मत देण्याचे धैर्य झाले नाही. त्यामुळे हाम्मोटसाहेबच अध्यक्ष झाले.

हाम्मोटसाहेब नगरपालिकेचे अध्यक्ष झाले पण करवसूली आणि फौजदारी कायद्या-संबंधींची कामे यांतच त्यांचा वेळ जात असे. त्यासाठी वारंवार दौऱ्यावर जावे लागत असे त्यामुळे त्यांना नगरपालिकेच्या कामांमध्ये विशेष लक्ष घालता येईना. तेव्हा आपला एक प्रतिनिधी नियुक्त करण्याचे त्यांनी ठरविले. या कामासाठी योग्य माणसाचे नाव सुचवायला त्यांनी मेट्काफसाहेबाला सांगितले. मेट्काफसाहेबांनी माझे नाव सुचविले. त्यावर हाम्मोटसाहेबांनी मला विचारले. सर्व विषयांच्या बाबतीत मला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले तरच मी हे पद स्वीकारीन नाहीपेक्षा माझा नकार समाजावा असे मी सांगितले. हाम्मोटसाहेब त्याला तयार झाले. आणि नगरपालिकेच्या सदस्यांची संमती घेऊन त्यांनी आपले सर्व अधिकार मला दिले.

मी आपली जबाबदारी पार पाडण्याचा यथाशक्ती प्रयत्न करीत असे. आणि महत्त्वाच्या विषयांच्या बाबतीत हाम्मोटसाहेबांची संमती घेत असे. लाचलुचपतीच्या भुताचे उच्चाटन करण्याचा तसेच नगरपालिका कचेरीच्या कामांत गती आणण्याचा आणि पालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा मी खूप प्रयत्न केला. त्याआधी घरपट्टीआकारणी-साठी ठरविल्या जाणाऱ्या घरांच्या किंमती बरोबर लावल्या गेल्या नव्हत्या. काहीच्या कमी तर काहींच्या जास्ती. त्यामुळे वास्तविक ज्या घरांची किंमत कमी होती त्यांच्यावर जास्त कर लावला होता. मी प्रत्येक घराची पाहणी केली. काही श्रीमंत लोकांच्या घरांची किंमत वाढविली आणि गरीबांच्या घरांची कमी केली. असे करून नगर-पालिकेचे उत्पन्न वाढविण्यात यश मिळविले.

माझ्या विधवाविवाह कार्यांला विरोध करणारे वैदिक ब्राह्मण मी त्यांची घरपट्टी वाढवीन या विचाराने घाबरले. पण श्री चल्लपल्लि रंगय्या पंतुलुच्या जवळ माझी स्तुती करताना याच लोकांनी नंतर सांगितले की मी त्यांच्या घरावरचा कर वाढवला नाही, उलट काही प्रकरणी कमीच केला आहे. ही गोष्ट मला श्री चल्लपल्लि रंगय्या पंतुलु यांनीच सांगितली.

हाम्मोट साहेबांची राजमहेंद्रवरमहून जेव्हा बदली झाली त्यावेळी १७ सप्टेंबर १८८६ रोजी त्यांनी मला इंग्रजींत पत्र लिहिले. त्याचा थोडक्यात अर्थ असा :

"तुम्ही काही काळ नगरपालिकेचा कारभार ज्या दक्षतेने केलात, त्यासाठी जे अथक परिश्रम घेतलेत आणि मला जी मदत केलीत त्याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे. तुम्ही मला एवढे प्रभावित केले आहे की माझ्या बदलीमुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदासाठी आपण सर्व दृष्टीने योग्य आहात असे मला वाटते. पण मतपत्रिकांद्वारे होणाऱ्या निवड-णुकीत नेहमीच योग्य माणूस निवडला जातो असे नाही हे आपणास माहीत आहेच."

हाम्मोटसाहेबांची प्रशंसा मिळावी म्हणून मी सर्व बाबतीत त्यांच्या इच्छेनुसार काम करीत असे, असे मात्र समजता कामा नये. काही बाबींमध्ये त्यांच्या तोंडावर मी त्यांचे विचार चुकीचे असल्याचे सांगून विरोधही केला. भावी काळातील परिणामाची पर्वा न करता तसेच समोरचा माणूस भारतीय आहे की परदेशी आहे, हिंदू आहे की युरोपियन आहे याची तमा न करता जी गोष्ट चांगली आणि योग्य वाटत असे ती मी त्यांच्यापुढे स्पष्टपणे मांडत असे. जे काम निर्भयपणे करणे जरूर असे ते मी बिनदिक्कत करतो असे समाधान मात्र मला मिळे. त्यामुळे माझे मित्र देखील माझे शत्रू होत आणि माझा द्वेष करू लागत.

आपल्या देशवासियांमध्ये अधिकाऱ्यांच्या मताविरूद्ध मत व्यक्त करण्याच्या धैर्याचा अतिशय अभाव आहे. एकदा आजारी असल्यामुळे तालुका बोर्डाच्या एका बैठकीला मला हजर राहता आले नाही. बैठकीनंतर काही सदस्य माझ्याशी विचारविनिमय करण्यासाठी आले. मी सहज विचारले, "काही विशेष बातमी ?" त्यांच्यापैकी एकाने सांगितले, "साहेबाने कधी आमचे विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे का ? त्यांनी घेतलेले निर्णयही आम्हास सांगितलेले नाहीत."

यानंतर पुढील महिन्यात झालेल्या तालुका बोर्डाच्या बैठकीचे अध्यक्षही मोबर्लीसाहेब होते. याच साहेबाविषयी काही सदस्यांनी मागील बैठकीनंतर वरील तक्रार केली होती. एका प्रकरणावरून माझ्या आणि अध्यक्षांमध्ये थोडा वाद निर्माण झाला. अखेरीला साहेबाने आपला आग्रह सोडून माझ्या म्हणण्यास दुजोरा दिला आणि त्याप्रमाणे ठराव संमत केला.

त्यावेळीं मी दोन शाळांच्या कार्यकारी समितीचा तसेच इन्नीसपेटच्या बालिकापाठशाळेच्या कार्यकारी समितीचाही कार्याध्यक्ष होतो. बालिका पाठशाळेच्या विद्यार्थिनी फी देत नसत. त्यामुळे ती पाठशाळा चालवणे कठिण झाले होते. म्हणून निधी गोळा करून व नगरपालिका आणि सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत यांतूनच आम्ही पाठशाळा चालवत होतो. २ मार्च १८८५ ला नगरपालिकेच्या अध्यक्षांनी मला इंग्रजीत पत्र लिहिले. "पुढील वर्षीच्या नगरपालिकेच्या निधीत आपल्या पाठशाळेच्या वेतनाच्या खात्यावर सरकारने अनुदान द्यायचे अमान्य केले आहे."

मद्रास इलाख्याचे शिक्षण संचालक त्यानंतर लगेच राजमहेंद्रवरमला आले होते. त्यांना भेटून मी याबाबत बोललो. त्यांच्यामार्फत आमच्या बालिका पाठशाळेबद्दल त्यांच्याकडून चांगली शिफारस करविली; तेव्हा मग सरकारने नगरपालिकेच्या देणगीत नेहमीप्रमाणे आमच्या पाठशाळेला आर्थिक मदत देण्याचा आदेश दिला.

सुरवातीपासूनच स्त्रीशिक्षणाबाबत मला फार आस्था होती. स्त्रियांची परिस्थिती सुधारल्याशिवाय देशाची स्थिती सुधारणार नाही असे माझे मत होते. साप्ताहिक

'विवेकवर्धनी' बरोबर 'सतीहितबोधिनी' नावाची स्त्रियांसाठी एक मासिक पत्रिका देखील तीन वर्षे मी चालविली. तसेच स्त्रियांसाठी 'सत्यवती चरित्रमु' 'चंद्रमति चरित्रमु' 'सत्यसंजविनी' 'पत्नीहितसूचनी' 'देहारोग्य धर्मबोधिनी' इत्याही स्त्रीविषयक पुस्तके लिहिली.

वरील पुस्तकांशिवाय १८८१ ते ९० च्या दरम्यान 'चमत्कार रत्नावलि' आणि 'रागमंजरी' ही इंग्रजी नाटकांची तेलगू रूपांतरे लिहिली. 'रत्नावलि' आणि 'मालविका अग्निमित्र' या संस्कृत नाटकांचा अनुवाद केला. 'प्रल्हाद नाटक' 'दक्षिण गोग्रहणमु' 'सत्य हरिश्चंद्र नाटकमु' अशी अनेक स्वतंत्र नाटके, कथा, प्रहसने आणि 'आंध्रकवुल चरित्रमु' नावाचा एक मोठा ग्रंथ देखील रचला. तसेच अनेक निबंध आणि प्राचीन साहित्यकृतींचे संशोधन करून काही पुस्तके लिहिली.

आमच्या शहरात व्यवस्थितपणे चालणाऱ्या संस्थांच्या देखरेखीखालील शाळांशी स्पर्धा करण्याच्या तसेच पैसा आणि प्रतिष्ठा मिळविण्याच्या हेतूने काही प्रतिष्ठितांनी आस्तिक पाठशाला, महाराष्ट्र पाठशाला, स्वदेशाभिमानी पाठशाला इत्यादि मोठमोठ्या नावांनी नव्या पाठशाळा सुरू केल्या होत्या. या नव्या पाठशाळांना काही नियम नव्हते की पैसा नव्हता, की देणग्या मिळत नव्हत्या. विद्यार्थ्यांकडून मिळणारी महिन्याची फी एवढाच त्यांचा एकमेव आधार होता. व्यवस्थितपणे चालणाऱ्या पाठशाळांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पाठशाळांत यावे यासाठी या पाठशाळांच्या संचालकांनी अनेक उपाय केले. विद्यार्थ्यांकडून कमी फी, जे विद्यार्थी अधिक नवे विद्यार्थी नव्या पाठशाळेत आणतील त्या विद्यार्थ्यांना फी माफी, विद्यार्थ्यांना वरच्या वर्गांत प्रवेश देणे असे अनेक उपाय ते करीत. या मार्गाने गोळा होणाऱ्या पैशांतील आपला वाटा समितीचे अध्यक्ष काढून घेत आणि उरलेली रक्कम अध्यापकांना त्यांच्या योग्यतेनुसार वाटून देत. तसेच शिक्षकांना मासिक वेतन १०, १५ असले तरी हिशेबाच्या वहीत २०, ३०, ४० किंवा ५० रु. दाखवीत. आणि त्यांच्याकडून या रकमेच्या पावत्या घेतल्या जात. आपण जणू काही पदरचेच खर्च करीत आहोत असे खोटे हिशेब दाखवून पाठशाळेचे संचालक सरकार-कडून खास अनुदान किंवा मदत मिळवीत. असा भ्रष्टाचार करून शिक्षकच अनैतिकता वाढवीत असताना विद्यार्थी नीतिमान होतील अशी आशा कशी करता येईल ? या प्रकारामुळे विद्यार्थ्यांना नैतिकतेची शिकवण तर राहू देच पण धड शिक्षणही मिळत नसे. त्यामुळे राजमहेंद्रवरममधील विद्येची आणि विद्यार्थ्यांची दशा अतिशय शौचनीय होती. म्हणून पाठशाळांच्या कार्यवाहक समितीचे अध्यक्ष मेट्काफसाहेब यांनी समितीच्या सदस्यांशी चर्चा केली आणि पुढील निर्णय घेतले. सर्व पाठशाळांची एकच कार्यवाहक समिती बनवून तिच्या नियंत्रणाखाली सर्व पाठशाळा आणाव्या, प्रत्येक पाठशाळेच्या संचालकाने आपल्या पाठशाळेसाठी नियम बनवावेत व ते मान्य केले जावेत. त्यांनी

ठरविलेल्या पगारावर त्यांच्या त्यांच्या पाठशाळांतील शिक्षकांची नियुक्ती केली जावी. यापैकी एका पाठशाळेचे अधिकारी श्री. येलूरि लक्ष्मीनरसिंहम यांना मुख्याध्यापकपदी नियुक्त करावे.

वरील सर्व कामें मी अत्यंत उत्साहाने करीत होतो, तेव्हा त्या काळात श्री बसवराजु गवर्राजु हा माझा उजवा हात होता. त्यांना माझ्याविषयी केवळ स्नेहभावच नव्हे, तर आदरभावही होता. डोळ्यांतील बुबुळाप्रमाणे ते माझा सांभाळ करीत. माझ्या सर्व मित्रांनी माझा संबंध सोडल्यानंतरही ते माझ्या पाठीशी उभे राहिले. दुर्भाग्याने १६ जुलै १८८८ ला बसवराजु गवर्राजु यांचे अचानक निधन झाले. अशा सद्गुणी मित्ररत्नाच्या निधनामुळे माझा उत्साह मावळला. मी कायमचा रोगी आहे. जास्त काळ जिवंत राहणार नाही, तरीदेखील मी जे महान कार्य हाती घेतले आहे ते माझ्यामागे बसवराज गवर्राजु जरूर पूर्ण करील अशी मला आशा होती. पण दुर्दैवाने माझ्या आशेचे निराशेत रूपांतर झाले. आणि विरक्ती येऊन मी नगरपालिका आणि अन्य स्थानिक समित्यांच्या सदस्यत्वाचा राजिनामा देऊन टाकला.

गवर्राजूने आपल्या मृत्यूच्या चार पाच महिने आधी माझे चरित्र लिहण्याच्या दृष्टीने आवश्यक साधन सामग्री मागितली. मी त्याला मोडता घातला आणि म्हटले, 'लिहावयाचेच असेल तर माझ्या मृत्यूनतर लिही'. पण काही महिन्यांनीच माझे चरित्र लिहावयाची इच्छा असणाऱ्या त्या माझ्या मित्राचेच चरित्र लिहून मला नगरपालिकेने आयोजित केलेल्या सभेत वाचावे लागले.

गवर्राजूच्या नंतर माझे कार्य पुढे चालवणाऱ्यांपैकी सत्तिराजु मृत्युंजयराव याच्यावर माझा मोठा विश्वास होता. देशिराजु पेद बापय्या हा आणखी एक होता. पण दैवदुर्विलास असा की याही दोघांचा देहांत झाला. हे तिघेही बी. ए. पदवी घेतलेले होते; देशभक्त, निस्वार्थी, सेवाभावी, परोपकारी, उत्साही, साहसी आणि कार्यदक्ष होते. पण त्या तिघांनाही त्यांच्या तरुणपणीच मृत्यू आला.

१. १८९० ते १९००

इ. स. १८७९ मध्ये विधवाविवाह या विषयावर मला एक व्याख्यान द्यावयाचे होते. पण व्याख्यानाला जागा मिळवणे फारच कठिण वाटू लागले. म्हणून त्या दिवसापासून सार्वजनिक कामासाठी आपणच एक सभागृह बांधावे असा विचार माझ्या मनात घोळू लागला. १८८० मध्ये मद्रास इलाख्याचे शिक्षणाधिकारी कर्नल मॅक्डोनल्ड यांच्या नावाने एक नगरभवन (टाऊन हॉल) बांधण्याची कल्पना मांडली. कर्नल मॅक्डोनल्ड आंध्रच्या उत्तर जिल्ह्यांमध्ये बराच काळ विभागीय शिक्षणाधिकारी म्हणून काम करीत होते. आंध्राबद्दल त्यांना विशेष प्रेम होते त्यामुळे माझा हा प्रयत्न काहीसा सोपा झाला. त्याचवर्षी १५ ऑगस्टला एक जाहीर सभा घेतली. मॅक्डोनल्ड साहेबांच्या नावाने नगरभवन बांधण्यात यावे असा या सभेत निर्णय करण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन झालेल्या समितीचा चिटणीस म्हणून माझी नेमणूक झाली. वर्गणी जमा करण्याचे ठरले. सभेतच ५०० रु. पर्यंतची कागदी आश्वासने मिळाली. पण पुरेसा पैसा मिळेल असे चिन्ह दिसेना, म्हणून त्यावेळी ते काम तसेच थांबले. तरीही मी निराश झालो नाही. नगरभवनासाठी शहराच्या मध्यभागी श्री. दामराजु नागराजु यांच्या नावाने एक जागा खरेदी करून ठेवली. त्यानंतर मी पुन्हा एक सभा बोलाविली आणि तीत पुढील प्रस्ताव मांडला. "१८८७ मध्ये व्हिक्टोरिया महाराणीच्या ज्युबिलीच्या मुहूर्तावर नगरभवन बांधण्यात यावे." ठराव मंजूर झाला. ५००–६०० रु. वर्गणी जमा झाली. पिठापुरमच्या राजाने एक हजार रुपये दिले. तथापि एवढा पैसा पुरेसा नव्हता, म्हणून योजना पूर्ण व्हावी यासाठी त्यानंतर मी अनेक सभा घेतल्या. या सभांमधून हजर असलेल्यांपैकी जे दहा रुपये वर्गणी देखील द्यावयास तयार नव्हते ते भवनाच्या कामांत निरनिराळ्या मार्गांनी खीळ घालण्याचा प्रयत्न करू लागले. कोणी म्हणे, एक लाख रुपये खर्चून एक सुंदर भवन बांधायला हवे. काही लोकांनी भवनासाठी निवडलेल्या जागेला नावे ठेवली. काही जणांनी तर उद्यानालाही उपयोगी पडेल अशी शहराच्या मध्य वस्तीतील जागा भवनासाठी निवडावी असे सुचविले. सर्वजण अव्यवहार्य व विचित्र अशा सूचना मांडू लागले.

२६ मार्च १८८९ रोजी मी खालील छापील इंग्रजी पत्र वर्गणीदारांकडे पाठवले–

"सार्वजनिक वर्गणी गोळा करून नगरभवन बांधणे कधी शक्य होईल असे अनेक कारणांनी मला वाटत नाही, तेव्हा यापूर्वीच घेऊन ठेवलेल्या जागी स्वतःच्या पैशाने भवन बांधण्याचा मी निर्धार केला आहे. माझी पुस्तके विकून तसेच पुस्तकांतून मिळालेले पैसे खर्चून नगरभवन बांधण्याचे काम लवकरात लवकर संपविण्याचा माझा विचार आहे. नगरभवनासाठी मी जे पैसे उसने घेतले आहेत, ते भवन बांधून होताच परत केले जातील. राजमंडीतील नागरिकांना सार्वजनिक कार्यक्रमासाठी हे भवन दिले जाईल."

अशाप्रकारे मी समितीबरोबरचा संबंध तोडला. दोन-तीन हजार रुपयांत एक छोटेसे भवन बांधण्याचा माझा विचार होता. त्यानुसार मी काम सुरू केले. माझ्या कामाला प्रोत्साहन म्हणून श्री. न्यापति सुब्बाराव पंतुलु यांनी मला ५०० रु. बिनव्याजी उसने दिले. या नऊशे रुपयांमध्ये शक्य तेवढ्या स्वस्तात विटा आणि लाकडे खरेदी केली. मजूर लावून स्वतःच्या देखरेखीखाली काम सुरू केले. सर्व जनतेस उपयुक्त अशा या कामात मला ईश्वराचा अनुग्रह देखील मिळाला. सुदैवाने या वर्षी माझ्या पुस्तकांच्या विक्रीचे १००० रुपयांहून अधिक पैसे मिळाले. तसेच त्याच वर्षी विश्वविद्यालयातर्फे माझी परीक्षक म्हणून नेमणूक झाली. मद्रास इलाख्याच्या शिक्षणाधिकाऱ्याने माध्यमिक पाठशाळांच्या परीक्षांचा परीक्षक म्हणून माझी नियुक्ती केली. त्याचेही पैसे मला मिळाले. अशाप्रकारे अचानक धनप्राप्ती झाल्यामुळे ज्या भवनासाठी मी तीन हजार खर्च करणार होतो, त्यासाठी अधिक खर्च करायचे ठरवून मी सात हजार रुपये खर्च केले. या कामात ज्या दोन मित्रांनी आवश्यक ती मदत मला केली त्यांचे हार्दिक आभार मानावयास हवेत.

ऑक्टोबर १८९० मध्ये मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजमधील संस्कृतचे प्राध्यापक रावबहादुर रंगाचार्यलु, एम. ए. यांनी नगरभवनाचे उद्घाटन केले आणि गृहप्रवेश महोत्सवाच्या प्रसंगी माझ्याविषयी २३ तारखेला इंग्रजीत एक व्याख्यान दिले. त्यानंतर कलकत्त्याच्या ब्रह्मसमाजाचे मुख्य प्रचारक पं. शिवनाथ शास्त्री, एम. ए. हे राजमहेंद्रवरम येथे आले असता १५ नोव्हेंबर रोजी त्यांची सभा झाली. त्या सभेतील आपल्या भाषणात ते माझ्याविषयी थोडे स्तुतीपर बोलले आणि शेवटी या नगरभवनामध्ये राजमहेंद्रवरमचे नागरिक कोणतीही अडचण न येता सभा वगैरे घेऊ शकतील अशा शब्दांत नगरभवनाचे उद्घाटन केले. वरील दोन्ही सद्गृहस्थांनी माझ्याबाबत जे सांगितले त्यात प्रशंसेव्यतिरिक्त खास असे काही नसल्यामुळे येथे त्याची जास्त चर्चा करण्याची गरज नाही.

नगरभवन बांधण्यासाठी घेतलेले उसनवार पैसे १८९६ पर्यंत सर्वच्या सर्व चुकते केले. नगरभवनाला माझे नाव द्यावे असे काही लोकांनी सुचविले. काही लोकांच्या मते

निधिसंरक्षक मंडळाचा सदस्य या नात्याने माझे नाव असणे आवश्यक होते. पण मी कोणाचेच ऐकले नाही. मद्रासला जाण्यापूर्वी म्हणजे डिसेंबर १८९७ मध्ये निधिबाबतचे व्यवस्थापत्र लिहून रजिस्टर केले आणि नगरभवन विश्वस्तांच्या स्वाधीन करून निघून गेलो.

नागरिकांच्या उपयोगासाठी नगरभवन बांधायच्या माझ्या कामात नागरिकांनी मला मदत केली असेल असे कदाचित आपणास वाटेल. ते पाप त्यांनी केले नाही. उलट माझा हा प्रयास यशस्वी होऊ नये असाच प्रयत्न झाला. उदाहरणार्थ, नगरभवन बांधायला प्रारंभ होण्यापूर्वीच भवनासाठी घेतलेल्या जागेवरून माझ्यावर चार खटले भरण्यात आले. पण चारही नंतर काढून टाकण्यात आले. याच सुमारास आणखी एक मजेदार घटना घडली. १८८९ च्या सप्टेंबरमध्ये नगरभवनासाठी खाजा अहम्मदुल्ला खाँ यांच्या मालकीची काही जमीन आम्ही खरेदी केली; आणि त्या जागी पाया घालण्यास सुरुवात केली. एका सद्‌गृहस्थाने खाजा अहम्मदुल्ला यांच्या दूरच्या नातेवाईकाला चिथविले आणि पाया घेताना त्या जागेवरील त्याच्या आजोबांची कबर मी खोदली असा त्याच्याकरवी माझ्यावर आरोप केला. त्या नातेवाईकाने एका खड्ड्यातून हाडे बाहेर काढून दाखविली. तेव्हा पोलिसांनी सरकारी डॉक्टराकडून त्यांची तपासणी करून घेतली. डॉक्टराने ती हाडेच असल्याचा निर्णय दिला. पुढे अन्य लोकांकडूनही तक्रारी करवण्यात आल्या. हा आरोप खोटा असून एलूरि लक्ष्मीनरसिंहम यांच्या चिथावणीमुळे तो करण्यात आला आहे असा अखेरीला निर्णय करण्यात आला.

माझे बालमित्र आणि स्नेही श्री. एलूरि लक्ष्मीनरसिंहम यांनी माझ्यावर असा खोटा आरोप का करावा असे आपणास वाटेल. त्याला एक कारण होते. त्यांनी आस्तिक पाठशाळेच्या स्थापनेनंतर ती शाळा चालविण्यासाठी जे उद्योग केले ते मला मुळीच पसंत नव्हते. त्यानंतर त्यांची माझी जेव्हा जेव्हा भेट झाली तेव्हा तेव्हा मी त्यांच्यावर टीका केली होती. 'विवेकवर्धनी' मध्ये याविषयी लिहीन अशी धमकी दिली होती आणि त्याप्रमाणे लिहिलेही होते. त्यामुळे माझ्यावर नाराज होऊन ते आपल्या 'गोदावरी न्यूज' नावाच्या पत्रिकेत माझ्याविरूद्ध लिहू लागले.

दरम्यान राजमहेंद्रवरम हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून लक्ष्मीनरसिंहम यांची निवड झाली त्याच सुमारास नेप्पलेरामब्रह्मम नावाच्या एका गृहस्थांच्या घरावर वारंवार कोणीतरी दगड फेकीत होते. रामब्रह्ममची भावजय शंकरम्माने शेजारीपाजारी आणि जवळपास राहणाऱ्या लोकांकडे त्याविषयी तक्रार केली. पण कोणीही या प्रकारची चौकशी करावयास पुढे येईना. या प्रकाराच्या मुळाशी रामब्रह्ममचा तिसरा जावई होता. त्याची पत्नी १५ वर्षांची होती. हा द्वाड पोरगा एलूरि लक्ष्मीनरसिंहम यांचा हस्तक बनून मवालीपणा करीत हिंडत असे. मुलीला सासरी पाठवा, मी वेगळा राहून

संसार करीन असा तो आपल्या सासरच्या लोकांना वारंवार तगादा करीत असे. परंतु जावयाला रहावयाला घर नव्हते की एखादी नोकरीही नव्हती. त्यामुळे आपल्या बायकोचे पालन-पोषण करणे त्याला शक्यच नव्हते. त्यामुळे रामब्रह्मनी आपल्या मुलीला नवऱ्याकडे पाठवायचे नाकारले. तेव्हा रागावून जावई सासऱ्याच्या घरून पळाला आणि लक्ष्मीनरसिंहमकडे राहू लागला. तो लक्ष्मीनरसिंहमच्या पूर्णपणे अधीन होता. लक्ष्मीनरसिंहमने नगरपालिकेच्या ताब्यातील कंभम कुटुंबियांच्या धर्मशाळेत त्या मुलाच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था केली. त्या तरुणाच्या वडिलांनी आपल्या मृत्युसमयी मुलासाठी ५०० रु. सेव्हिंग खात्यांत ठेवले होते. नरसिंहम यांनी सेव्हिंग खात्याचे पुस्तक आपल्याजवळ ठेवून घेतले.

तो तरुण घरातून पळून गेल्यानंतर कित्येक महिने त्या घरावर दगड पडत होते. ते लोक त्याबद्दल कोणाला काही सांगू शकत नव्हते आणि दिवसाढवळ्या घरावर होणारा दगडांचा वर्षावही त्यांना सहन होत नव्हता. म्हणून एक दिवस कडक उन्हात शंकराम्मा रडत रडत माझ्या घरी आली आणि लक्ष्मीनरसिंहम आपल्या भावाच्या जावयाला हाताशी धरून आमच्या घरावर दगडफेक करवीत आहे तेव्हा कसेही करून या आपत्तीतून मला वाचवा असे करुणपणे विनवू लागली. तिचे ते दुःख ऐकून माझे हृदय द्रवले. आपल्या घराच्या अंगणात पडलेले विटांचे तुकडे दाखवून ती मला म्हणाली, हे तुकडे दुग्गिरालाच्या घराच्या मागून फेकले आहेत. तुकडे पावसात भिजले आणि शेवाळले होते. दुग्गिराला यांच्या घराच्या मागील बाजूस जाऊन मी पाहिले. तेथे विटांच्या तुकड्यांचा हिरवे गवत उगवलेला ढीग पडला होता. दुग्गिराला यांच्या घरात लक्ष्मीनरसिंहम यांच्या विशेष मर्जीतील व त्यांच्याच पाठशाळेतील वेंकटप्पय्या आणि तिरूपतिराजु या नावाचे दोन ब्राह्मण अविवाहित शिक्षक भाड्याने राहात होते. या ब्रह्मचारी शिक्षकांच्या प्रोत्साहनानेच दगडफेक होत असली पाहिजे हे माझ्या लक्षात आले. लगेच मी त्या घराचे मालक दुग्गिराला प्रकाशराव यांना भेटलो. त्या ब्रह्मचारी शिक्षकांना आपल्या घरातून हाकलून लावा असे मी त्यांना सांगितले आणि पुन्हा रामब्रह्मच्या घरी परत आलो. आम्ही तेथे उभे होतो तेवढ्यात गल्लीच्या बाजूने एक दगड आमच्या बाजूला येऊन पडला. दगड काळा होता. चिन्नस्वामीच्या घरावरून तो फेकला आहे असे शंकराम्मा म्हणाली तेव्हा तेथे जाऊन पाहिले तो काळ्या दगडाचे तुकडे तेथे पडलेले दिसले. चिन्नस्वामींचा दुसरा मुलगा तेथे होता. त्याला मी दम भरला. तेव्हा धीटपणाने मलाच त्याने विचारले, 'लक्ष्मीनरसिंहमचा धोबी भरदिवसा रामब्रह्मच्या घरावर दगड फेकतो तेव्हा त्याला मात्र आपण काही बोलला नाही. मग आम्हालाच का दम भरता ?'

दगडफेकीच्या या प्रकारामागे लक्ष्मीनरसिंहम यांचा हात असल्याची आता माझी खात्री झाली. मला संताप आवरेना. मी सरळ त्यांच्या पाठशाळेत गेलो. लक्ष्मीनरसिंहम यांचे

घनिष्ट मित्र निडमर्ति दुर्गाप्रसाद रायुडु तसेच त्यांचे सहाध्यायी शिक्षक दामराजु बसवराजु त्यावेळी लक्ष्मीनरसिंहम यांच्या खोलीत बसले होते. मी विचारले, 'तुम्ही रामब्रह्ममच्या जावयाला आश्रय देऊन त्याच्या घरावर दगडफेक करवीत आहात असे लोक म्हणतात त्यात कितपत तथ्य आहे ?' त्यांनी स्पष्टपणे सांगितले, 'मला याबाबत काही माहीत नाही'. मी सरळ घरी निघून गेलो. पण या प्रकरणातून काहीतरी अनपेक्षित घडू शकेल या विचाराने लक्ष्मीनरसिंहम घाबरला. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच तो आपला मित्र मादिरेड्डी नारायणस्वामी नायुडु याच्याकडे गेला. आणि त्याने त्याच्याशी याविषयी चर्चा केली. त्यानंतर नायुडुचा मला निरोप आला. मी गेलो तेव्हा त्यांनी या प्रकरणासंबंधी विचारले मी त्यांना सर्व सांगितले. धोबी वगैरेंची नावेही सांगितली. तेव्हा त्यांनी सर्वांना बोलावण्यासाठी माणसे पाठविली. पण त्यापैकी काहीजण आले नाहीत. अखेरीस वेंकटप्पय्या आणि तिरूपतिराजु यांना दुग्गिराला यांच्या घरातून घालवून द्यावे असा निर्णय झाला.

वीरास्वामी नायुडु यांच्या घरी तडजोड झाल्यानंतर दोन दिवसांनी रामब्रह्मम धावत माझ्याघरी आला आणि त्याने तक्रार केली, "पुन्हा दगड येत आहेत. कसेही करून दगडफेक बंद करा आणि आमचे रक्षण करा." मी पोलिस इन्स्पेक्टरला घेऊन रामब्रह्ममच्या घरी गेलो. इन्स्पेक्टरला सर्व सांगितले आणि हा भयंकर प्रकार थांबवा अशी विनंती केली. पोलिस पहारा बसवितो आणि दगड फेकणाऱ्यांना पकडण्याचा प्रयत्न करतो असे त्याने मला आश्वासन दिले.

मी दुग्गिराला यांच्या घराच्या मागील बाजूने घरी परतत असताना वेलुरि वेंकटरामय्या घराबाहेर आला आणि त्याने मला सर्व हकीगत सांगितली. त्याच्या शेजारपाजारच्यांनी येऊन याप्रकरणी माहिती सांगितली. आम्ही सर्व वेंकटरामय्याच्या घराच्या ओट्यावर बसून सर्वांच्या तक्रारी ऐकत होतो. तेवढ्यात लक्ष्मीनरसिंहम यांचे मित्र बयपुनेडि वेंकटजोगय्या बाहेर आले आणि त्यांनी सारा वृत्तांत सांगितला. सर्व बोलणे लक्ष्मीनरसिंहम यांच्यासमक्ष झालेले बरे असे त्यांनी सुचविले आणि ते स्वतः लक्ष्मीनरसिंहम यांच्या घरी जाऊन त्यांना घेऊन आले. हा सारा उपद्व्याप आपणच करीत आहोत अशी आपल्याविषयी कोणालाच शंका वाटत नाही असे लक्ष्मीनरसिंहम म्हणाले. तेव्हा नाइलाज होऊन जोगय्यांनी लक्ष्मीनरसिंहमला बजावले, "बहुतेकांची तुमच्याविरूद्ध तक्रार आहे. तेव्हा तुम्ही तुमची वर्तणुक चांगली ठेवली पाहिजे." त्यादिवसापासून रामब्रह्ममच्या घरावरची दगडफेक थांबली. माझ्या प्रयत्नांमुळे एक कुटुंब संकटमुक्त झाले या विचाराने मी अत्यंत प्रसन्न झालो.

पुढे सुमारे एक वर्षाने लक्ष्मीनरसिंहम याने 'प्रतिष्ठित लोकांसमोर मी त्यांची निंदानालस्ती केली, तसेच त्यांचे वर्तन योग्य नसून ते दुसऱ्यांच्या घरावर दगडफेक करवतात असा मी त्यांचेवर आरोप केला' या आरोपाखाली १५ जुलै १८९० रोजी माझ्याविरूद्ध

स्थानिक जिल्हान्यायालयात अब्रुनुकसानीचा गुन्हा दाखल करून ३००० रुपये नुकसान-भरपाई मिळावी असा खटला भरला. तसेच त्यांची नालस्ती केली या आणखी एका आरोपाखाली २९ जुलै १८९० रोजी डेप्युटी मॅजिस्ट्रेटच्या फौजदारी कोर्टात एक दावा दाखल केला.

वरील दाव्याचा निकाल विभागीय न्यायाधीशांनी दिला तो असा—

"फिर्यादीवर ज्या काळात आरोप केला गेला होता, त्यावेळी फिर्यादीची अत्यंत नाचक्की झालेली होती याविषयी मला मुळीच संशय नाही. या वस्तुस्थितीची फिर्यादीला कल्पना आली तेव्हा त्याने आपल्या प्रतिवादीविरूद्ध संयुक्त मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात अपील करावयाचे ठरविले. कारण तेथपर्यंत त्याच्या वर्तनाची बातमी पोचलेली नव्हती. म्हणून तेथे यश मिळाले तर वस्तुस्थिती प्रगट होऊ नये यासाठी आपणास अपील परत घेता येईल असे त्याला वाटले असेल."

वर अगोदर उल्लेखिलेल्या फिर्यादीबरोबरच मी माझे 'महारण्यपुराधिपत्यमु' हे प्रहसन त्यांनाच पुढे ठेवून लिहिले या आरोपाखाली लक्ष्मीनरसिंहम यांनी माझ्यावर आणखी एक खटला भरला. या सर्व खटल्यांचे कामकाज पाहता यावे म्हणून मी शाळेतून एक वर्षाची रजा घेतली. फिर्यादी पक्षाचे वकील दुर्गाप्रसाद रायुडु यांनी मला सजा देवविण्याचा निश्चय करून मोठ्या चिकाटीने काम केले. न्यायपति सुब्बाराव पंतुलु यांनी माझे वकीलपत्र घेतले आणि मला सजा होऊ नये म्हणून दसपट जास्त चिकाटीने काम केले. पंतुलु यांनी माझ्यासाठी जे श्रम केले त्यांचे शब्दांनी वर्णन करता येणार नाही. काम करताना त्यांनी अन्नपाणी आणि झोप याची पर्वा केली नाही. त्यांना माझी जेवढी काळजी वाटत होती त्याच्या षोडशांशही मला नव्हती. ते मला वरचेवर रात्री आपल्या घरी बोलावीत. मी जेवण करून त्यांच्या घरी जात असे. ते अतिशय काळजी-पूर्वक खटल्याबाबतची कागदपत्रे वाचीत आणि मी अंथरूणावर पडून आरामाने झोपत असे. त्यांना आश्चर्य वाटे आणि मला जागे करून घरी जावयास सांगून म्हणत, "एवढे सारे खटले डोक्यावर असताना तुम्हाला झोप तरी कशी येते ?" त्यांनी माझ्यावर केलेल्या उपकाराबद्दल एक लाख रुपये दिले तरीही त्या ऋणातून मला मुक्त होता येणार नाही.

काही दिवस दावा चालल्यानंतर माझे विरोधक अब्रुनिशी कशी सुटका करून घेत। येईल याचा विचार करू लागले. अनेक प्रतिष्ठित लोकांना उभय बाजूंमध्ये तडजोड घडवून आणावी असे वाटत होते. पण माझ्या निर्बुद्ध हट्टीपणामुळे त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. आमच्या पाठशाळेचे मुख्याध्यापक मेटकाफसाहेबांनी अनेक तऱ्हेने मला समजावले. ते म्हणाले, "तुम्हाला माफी मागण्याची किंवा आपल्या कृतीबद्दल खेद प्रकट करण्याची देखील आवश्यकता नाही. अगोदर मला त्यांचे वर्तन चांगले नाही

असे वाटत होते पण आता ज्याअर्थी सर्व लोक त्यांचे वर्तन चांगले आहे असे सांगत आहेत त्याअर्थी मी माझे शब्द परत घेतो', एवढे म्हटलेत तरी पुरे होईल."

तेव्हा त्यांची इच्छा अवमानून मी म्हटले, "त्यांचे वर्तन चांगले नाही असे याक्षणी देखील मला ठामपणे वाटते. म्हणून मी असे काहीही मोघम लिहून देणार नाही." माझे वकील सुब्बाराव पंतुलु यांनी देखील माझे ऐका आणि तडजोड करून टाका असे हर तऱ्हेने समजावले. तरीदेखील मी आपला हट्ट सोडला नाही. मला जे योग्य वाटते तेच मी करतो. दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणे मी कधीच वागत नाही असा माझा स्वभाव आहे. आपण करतो त्याच्या परिणामाचीही भीती मला वाटत नाही.

२७ जुलै १८९१ रोजी मॅजिस्ट्रेटने निकाल दिला आणि माझ्यावरील दोन्ही आरोप नाशाबित ठरवले. माझ्या विरूद्धपक्षाबाबत त्यांनी आपल्या निकालपत्रात लिहिलेल्या काही वाक्यांचा भावार्थ असा--

"फिर्यादी गृहस्थ गैरवर्तनी व अविश्वासू असल्याची त्याच्या सर्वसाधारण चारित्र्याविषयी तक्रार आहे. त्यांच्याकडे दिलेल्या पैशांचा त्याने दुरूपयोग केला आहे. जी सोसायटी धर्म, नीती इत्यादि उत्तम आदर्शाचा आणि तत्त्वांचा प्रचार करते त्या थिऑरेटिक सोसायटीच्या अनेक शाळांतून एजंट आणि मॅनेजर अशा जागांवर याने काम केले आहे. या सर्व शाळा त्याच्या खाजगी मालमत्तेसारख्या आहेत. त्या सोसायटीच्या कधी बैठका होत नाहीत की तिचे कोणतेही नियम नाहीत आणि निधीही नाहीत. तिचे हिशेबठिशेब पाहण्याचा कुणालाही कसलाही अधिकार नाही. फिर्यादी म्हणत असतो, "माझ्या शाळांना मी माझ्या संपत्तीचाच एक भाग मानतो," सबब या गृहस्थाला निष्कलंक म्हणावयास कोणताही आधार नाही. उलट अविश्वासार्ह आणि दुराचारी ठरविता येईल यासाठी मात्र अनेक पुरावे आहेत."

घरांवर दगडफेक करविण्यासंबंधीच्या माझ्या दुसऱ्या तक्रारीबाबत विभागीय न्यायाधीशांनी इंग्रजीत दिलेल्या निवाड्याचा काही भाग पुढीलप्रमाणे--

"रामब्रह्ममच्या घरावर ऑगस्ट १८८९ पर्यंत थोड्या अंतराने दोन्ही दिशांनी कित्येक महिने दगड फेकण्यात आले. रामब्रह्मम आणि त्या घरांतील वडिलधारी स्त्री-त्याची भावजय हे त्यांचा जावईच दगड फेकत असल्याची आणि आरोपी त्याला भडकावीत असल्याची तक्रार करीत होते. सदर तरूण सध्या आरोपीच्या देखरेखीखाली एका धर्मशाळेत स्वतंत्रपणे राहतो. शंकरय्याने आरोपीविरूद्ध निसंदिग्धपणे तक्रार केली आहे. आरोपीने आपल्या जावयाला आपल्या घरावर दगडफेक करण्यासाठी चिथावले याबद्दल तिला शंका नाही. कारण शंकरय्याने आपली मुलगी आपल्या जावयाबरोबर स्वतंत्रपणे राहण्यासाठी त्याच्याबरोबर पाठविण्यास नकार दिला होता. म्हणून आरोपीनेच दगड फेकण्याचा बदसल्ला त्या तरूणाला दिला."

१५ जुलै १८९० रोजी विभागीय न्यायालयात सुरू झालेला, अब्रुनुकसानीबद्दल ३००० रुपये देण्यासंबंधीचा माझ्यावरील खटला रेंगाळत राहिला. सुमारे ३॥ वर्षे हा खटला चालला. शेवटी १० मार्च १८९३ रोजी त्याचा निकाल लागला. निवाड्यात न्यायाधीशांनी जवळजवळ सर्व बाबतीत माझ्या बाजूने निकाल दिला. पण 'विवेक-वर्धनी'त मी जे लिहिले होते, "घरावर दगडफेक करावयास लावणारे लोक प्रतिष्ठित समजले जातात." त्याबाबत न्यायाधीशांनी माझ्याविरुद्ध निकाल दिला. आणि वादीची प्रतिष्ठा भंग करण्याच्या गुन्ह्याबद्दल मला एक आणा दंड केला. आणि कोर्टाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा असा निर्णय दिला.

या खटल्यांचे निकाल लागल्यानंतर देखील लक्ष्मीनरसिंहम माझ्याविषयी सद्भावना दाखवीत आणि कधी भेट होई तेव्हा मला नमस्कार करून गप्पाही मारीत.

नगरभवन बांधले तेव्हा त्याबरोबरच बांधलेल्या प्रार्थना मंदिराबाबत थोडेसे येथे सांगावयाचे आहे. प्रार्थना मंदिर बांधण्यासाठी आलेला सर्व खर्च मी केला नाही. आमच्या विभागाचे भूतपूर्व डेल्टा सुपरिंटेंडेंट श्री. टी. शेषाचलमु नायुडु यांनी १८७४ मध्ये आपल्या मृत्युपत्रात राजमहेंद्रवरमच्या प्रार्थनासमाजाला शंभर रुपये देण्यात यावेत असे लिहून ठेवले होते. त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या भावाने माझ्याकडे ते शंभर रुपये पाठवून दिले. हे पैसे एखाद्या कायम स्वरूपाच्या कामात गुंतवावेत असा मी विचार करीत असतानाच ईश्वरी प्रेरणेने प्रार्थना मंदिर बांधण्याचा विचार मला सुचला. मी तात्काळ माझ्या मनातील संकल्प राजा गोडे नारायण गणपतिराव बहादुर सी. ए. यांना बोलून दाखविला. आणि आर्थिक मदतीची मागणी केली. त्यांनी तीनशे रुपये दिले. मी माझे दोनशे रुपये घातले आणि समाजाच्या मित्रांनाही विनंती केली. तेव्हा सर्वश्री न्यापति सुब्बाराव पंतुलु, कनपर्ति श्रीरायुलु, आर वेंकटरत्नमु नायुडु तसेच रायसमुवेंकटशिवुडु यांनी प्रत्येकी ५० रु. देणगी दिली. अशाप्रकारे मला अगदी सहजासहजी मित्रांचे सहाय्य मिळाले.

प्रार्थनामंदिर बांधण्याच्या माझ्या संकल्पाची बातमी ऐकून तीन स्त्रियांनी न मागता मोठ्या भक्तीने आणि श्रद्धेने प्रत्येकी तीन, पाच व पाच रुपये माझ्याकडे पाठवले. श्रीमंत व्यक्तींनी दिलेल्या शेकडो रुपयांपेक्षा पराधीन अबलांनी दिलेले तीन आणि पाच-पाच रुपये देवाला जास्त प्रिय होत.

मंदिराच्या बांधकामात माझ्याबरोबर राहून मला मदत करणाऱ्या रेब्बाप्रगड पापय्या यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच ! हे मंदिर बांधण्याकरता जवळजवळ १५०० रु. खर्च आला. मी मंदिरासाठी जमीन दिली होती. शिवाय देणग्यांतून मिळालेल्या पैशां-व्यतिरिक्तचा बाकीचा सारा खर्च मीच केला होता. वार्षिकोत्सवाच्या दिवशी मछली-पट्टणमहून श्री. आर. वेंकटरत्नमु नायुडु यांनी येऊन मंदिराचे उद्घाटन केले आणि

१७ एप्रिल १८९७ ला गृहप्रवेशाचा मोठा उत्सवही साजरा झाला.

१८९३ च्या प्रारंभी नवीन वर्षाच्या पदवीदानात हिंदुस्थान सरकारने मला, "राव-बहादुर" पदवी दिली. या पदवीस मी पात्र आहे की नाही कोण जाणे ! परंतु अनेक प्रांतांतील माझ्या परिचितांनी तसेच अपरिचितांनी माझे अभिनंदन करणारी पत्रे पाठवली. शंभराहून अधिक संख्येने आलेल्या पत्रांपैकी दोनचार येथे उद्घृत करतो

"आपणास मिळालेल्या या नवीन सन्मानाबद्दल आपले मनापासून अभिनंदन! माझ्या माहितीप्रमाणे या पदवीसाठी आपल्यापेक्षा जास्त योग्य व्यक्ती शोधूनही मिळाली नसती.

ई. पी. मेटकाफ एम्. ए.
प्रिन्सिपल राजमंडी कॉलेज"

"आपणास मिळालेल्या सन्मानाच्या विचाराने मन आनंदाने भरून येते. आपण या सन्मानास सर्वस्वी योग्य आहात. हा सन्मान मिळविलेल्या लोकांच्या लांबलचक यादीं-पैकी फारच थोडे लोक त्यास पात्र आहेत असे मला वाटते."

एस. रंगय्या रोही बी. ए.
तेलुगु ट्रान्सलेटर, मद्रास सरकार.

"आपल्याशी आमचा परिचय नाही तरीही भारत सरकारने आपला जो सन्मान केला त्याबद्दल आम्ही आपले हार्दिक अभिनंदन करतो. आम्ही आपल्या विचारांशी आणि विवाह जमविण्याच्या आणि विवाह करण्याच्या पद्धतिसारख्या सामाजिक सुधारणांशी सहमत नाही. तरी देखील सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात आपण एकट्याने जे कार्य करून दाखवले आहे, त्या कार्याची आम्ही अतिशय तारीफच करतो.

एम्. पट्टाभिरामाराव
टि. वरदराव, कालिकत."

"व्यक्तिशः माझा व आपला परिचय नाही. तरीही आपल्याविषयी मी बरेच ऐकले आहे. भारत सरकारने आपल्या सन्मानार्थ जी पदवी दिली त्याबद्दल मी मोठ्या प्रसन्न मनाने आपले अभिनंदन करतो.

एन. व्ही. श्रीनिवास अय्यंगार
हेडमास्तर, हायस्कूल,
कोलार ("म्हैसूर संस्थान")

तेलुगु भाषेच्या आणि साहित्याच्या विकासाच्या क्षेत्रात आणि सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात मी जे थोडेसे काम केले त्याची महान कार्य या शब्दांत माझे अभिनंदन करणाऱ्या बहुतेक लोकांनी प्रशंसा केली. कितीतरी समाजांनी आणि संस्थांनी माझ्या अभिनंदनाचे ठराव करून माझ्याकडे पाठवले. त्यापैकी एक असा:

"भारत सरकारने 'रावबहादुर' ही प्रतिष्ठित पदवी देऊन आपणास गौरविले त्याचा

आम्हा काकिनाडा साहित्य समितीच्या सदस्यांना अतिशय आनंद वाटतो. आपण केलेल्या आपल्या देशाच्या अनुपम सेवेची आपणास पावती मिळाली आहे. त्याबद्दल आम्ही आपले हार्दिक अभिनंदन करतो.

भारत सरकारची ही निवड सुयोग्य तर आहेच, परंतु त्याचबरोबर सरकारने स्वकर्तव्याविषयी प्रारंभापासून जागरूक असलेल्या आणि व्यक्ती, धर्मसुधारणा, भाषा व साहित्याचा विकास या क्षेत्रांत कामगिरी करणाऱ्या एका व्यक्तीची निवड केली ही अभिमानाची आणि समाधानाची अशी गोष्ट आहे. जनसामान्यांना शिक्षण देण्याच्या तसेच समाजात स्त्रियांना योग्य ते स्थान मिळवून देऊन त्यांच्या उत्थानाच्या कार्यात आपण केलेल्या अपार व उच्च कोटीच्या त्यागाचे सदैव स्मरण राहील.

आपण ही उदात्त कार्ये सदैव करीत राहावे यासाठी परमेश्वराने आपणास दीर्घायू द्यावे अशी आम्ही त्या सर्वशक्तीमान ईश्वराला प्रार्थना करतो.

आम्ही आपले हितचिंतक आणि विश्वासू सेवक,
दुरिशेहि शेषगिरीराव, अध्यक्ष वगैरे.

इंग्रजी आणि तेलुगु वृत्तपत्रांतून माझे अभिनंदन करणारे कित्येक लेख प्रसिद्ध झाले. 'आंध्र प्रकाशिके'त प्रसिद्ध झालेला लेख खाली उद्धृत करीत आहे.

"राजमहेंद्रवरम येथील गव्हर्नमेंट फर्स्ट ग्रेड कॉलेजचे मुख्य तेलुगू पंडित कंदुकूरी वीरेशलिंगमु पंतुलु यांना या वर्षाच्या प्रारंभी इंडिया गव्हर्नमेंटने 'रावबहादुर' ही पदवी दिली आहे. सांप्रतच्या सर्व इंग्रजीशिक्षित नागरिकांमध्ये ते श्रेष्ठ आहेत. यांचे नीतिनिष्ठ चरित्र अतिशय असाधारण आहे. तेलुगू वाङमयाच्या विकासाच्या बाबतीत त्यांनी बजावलेली कामगिरी असामान्य आहे. गेली वीस वर्षे सामाजिक सुधारणांच्या कार्यांशी त्यांचा संबंध आहे. विधवाविवाह कार्यांत त्यांनी आपला वेळ, पैसा आणि शक्ती खर्च केली आहे. या कार्यांमुळे देशभक्त, चारित्र्यसंपन्न आणि बुद्धिवादी लोकांमध्ये ही महान् व्यक्ती अतिशय लोकप्रिय आहे. प्रसिद्धीच्या लोभाने नव्हे तर ईश्वरावरील श्रद्धेमुळे त्यांनी ही सत्कार्ये केली. ती करणे हे ते आपले कर्तव्य समजतात. अशाप्रकारची चांगली कामे करतांना त्यांचा निर्धार आणि धाडस दिसून येते. त्याचबरोबर सर्व तऱ्हेची पापयुक्त कामे आणि ढोंगीपणाचा त्यांना तिटकारा आहे. सदैव लोकहितकारी कामांतच ते व्यग्र असतात. तेलुगू भाषेत त्यांची गद्यकाव्य, पद्यकाव्य, नाटक, निबंध, शास्त्र इत्यादी संबंधींची सुमारे ८० पुस्तकें प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्या पुस्तकांची भाषाशैली सोपी, सुबोध आणि मृदुमधुर आहे. त्यांच्या सर्व साहित्यातून नीतिमत्तेचे शिक्षण तर मिळतेच, पण शिवाय हिंदु धर्मातील दुराचाररूपी रोगांवर इलाज म्हणूनही त्या पुस्तकांचा उपयोग होतो. सनातनी धर्मनिष्ठ आणि अन्य काही मत्सरी लोक त्यांचा तिरस्कार करीत असले तरी त्यांच्यामुळे ज्यांच्या आयुष्यातील वनवास संपला,

त्या वीस विधवा तसेच देशभक्त व्यक्ती, तेलुगू शिक्षण विकासासाठी झटणारी मंडळी आणि आधुनिक संस्कृतीचे समर्थक यांचा मात्र त्यांना आशीर्वाद लाभला आहे.

पंतुलु यांना ही पदवी देऊन सरकारने फार मोठे काम केले आहे. परंतु या पदवीला ते फारसे महत्त्व देत नाहीत याची जाणीव त्यांना ओळखणाऱ्यांना आहे. या सद्-गृहस्थांना ही पदवी मिळाल्याने त्या पदवीलाच शोभा प्राप्त झाली आहे. आपल्या देशात असंख्य लहानमोठे अधिकारी व उच्चशिक्षित व्यक्ती आहेत. परंतु पंतुलुसारखी साहसी, धैर्यशाली आणि अनेक संकटांनी वेढले असूनही केवळ ईश्वरावर भार ठेवून काम करणारी व्यक्ती विरळी ! दक्षिण हिंदु देशाचे 'विद्यासागर' असा गौरव प्राप्त झालेल्या या महान व्यक्तीला ही नवी पदवी मिळालेली पाहून काही मूर्खांना द्वेष वाटेल. आम्ही सर्वशक्तीमान परमेश्वराची प्रार्थना करतो की त्याने त्यांना अनेक वर्षे परोपकार करण्यासाठी चिरायू बनवावे." ('आंध्र प्रकाशिका' १४ जानेवारी १८९३).

राजमहेंद्रवरमच्या सरकारी कॉलेजचे प्रिन्सिपॉल मेटकाफसाहेब यांच्या अध्यक्षते-खाली नगरभवनात माझे अभिनंदन करण्यासाठी एक सभा झाली. त्यानंतर मद्रास राज्याचे शिक्षणाधिकारी डंकनसाहेब राजमहेंद्रवरम येथे आले असता कॉलेजच्या सभागृहात बोलावण्यात आलेल्या सभेत शिक्षक व विद्यार्थी यांच्यासमक्ष सरकारने दिलेली पदवी मला देण्यात आली.

विधवाविवाह आंदोलनाच्या प्रारंभिक काळात बड्या नागरिकांपेक्षा विद्यार्थ्यांनीच मला अधिक साहाय्य केले. माझे विचार त्यांनी ग्रहण केल्यामुळेच ते या कार्यात अधिक सक्रिय होते. सत्कार्यरूपी बीजे हृदयरूपी भूमीमध्ये रोवून ती फलदायी करण्या-साठी बाल्यावस्थाच अत्यंत उपयुक्त होय. मुलांमध्ये भगवद्भक्ती आणि परोपकाराची गोडी उत्पन्न करणाऱ्या पाठशाळा निघतील तर अल्पकाळात देखील देशाची उन्नति होऊ शकेल असे सुरुवातीपासून मला वाटत आले आहे. असा विश्वास असल्यामुळेच येलूरि लक्ष्मीनरसिंहम यांनी आस्थिक पाठशाळा स्थापन करण्याचे ठरविले तेव्हा मी त्यांना प्रोत्साहन दिले. वरील पाठशाळा १८८९ पर्यंत चालू होती. तथापि तिची उद्दिष्टे साध्य झाली नाहीत. केवळ नावाने उद्दिष्टे साधली जात नाहीत. शाळेची उदात्त उद्दिष्टे बालकांच्या मनात ठसविण्यासाठी आवश्यक अशी क्षमता, श्रद्धा व भक्ती असलेल्या शिक्षकांची त्यासाठी गरज असते. माझ्या भूतपूर्व विद्यार्थ्यांतून असे शिक्षक मिळवून मी त्यांना आस्तिक पाठशाळा स्थापण्यासाठी राजी केले. १८९३ मध्ये बी. ए. पदवीपरीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर रायसमु वेंकटशिवुडु आणि सत्तिराजु मृत्युंजयराव हे दोघे एल. टी. (प्रशिक्षण) परीक्षेच्या अभ्यासानिमित्त सैदापेट (मद्रास) येथे गेले. पुढील वर्षी सैदापेटच्या प्रशिक्षण कॉलेजात (टीचर्स ट्रेनिंग कॉलेज) जाण्यासाठी आणखी दोन पदवीधरांना मी तयार केले.

पाठशाळेसाठी एक इमारत हवी होती. त्यासाठी राजमहेंद्रवरममधील इन्नीसुपेटच्या मध्यभागी असलेली एक मोठी बाग वाड्रेवु श्रीरामालु यांनी १६०० रुपयांत विकत देण्याचे कबूल केले. ती घेण्यासाठी श्री न्यापति सुब्बाराव पंतुलु तेवढी रक्कम देण्यास तयार झाले. काकिनाड्याचे श्री गंजामु वेंकटरत्नमु यांनी एक हजार रुपये पाठवले. पण सरकारी कॉलेजच्या अध्यक्षांच्या मदतीची देखील या कामी आवश्यकता होती. त्यांच्या सहकार्याने अलिकडेच सर्व पाठशाळांचे एकत्रीकरण करून मी एक हायस्कूल स्थापन केले होते. सरकारने ते पुढे ताब्यात घेतले. त्याच्या शाखा म्हणून दोन तीन माध्यमिक पाठशाळा सुरू करण्याचा सरकार स्वतःच प्रयत्न करीत होते. अशा स्थितीत आपणच एखादी पाठशाळा स्थापन केली तर आपणाला प्रतिस्पर्धी पाठशाळा काढली जात आहे असे साहेबांना वाटण्याची शक्यता होती. म्हणून नव्या पाठशाळेमागे कोणता उद्देश आहे ते मेटकाफसाहेबांना मी पत्राने कळविले आणि त्यात असेही म्हटले की नवे हायस्कूल काढणे शक्य होणार नसेल तर सैदापेट येथे प्रशिक्षणासाठी गेलेल्या वेंकटशिवुडु आणि मृत्युंजयराव यांना राजमहेंद्रवरमच्या माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून घेण्याचा आपण प्रयत्न करावा.

मेटकाफसाहेबांनी मला नवे हायस्कूल स्थापन करण्याची परवानगी दिली नाही तथापि फक्त माध्यमिक शाळा काढणार असाल तर नगरभवनासमोरील इमारत देईन असे आश्वासन दिले. वेंकटशिवुडु माध्यमिक पाठशाळेत काम करावयास तयार होईना त्यामुळे पुन्हा एक प्रश्न निर्माण झाला. हायस्कूल स्थापन करण्यास मेटकाफसाहेबांनी परवानगी न दिल्यामुळे गंजामु वेंकटरत्नमना मी त्यांचे एक हजार रुपये परत केले आणि हायस्कूल काढण्याचा प्रयत्न त्यावेळेपुरता सोडून दिला. त्याचवेळी सत्तिराजु मृत्युंजयराव आणि गोरेटि कनकराजु यांनी कमीत कमी पगारावर परोपकाराच्या भावनेतून माध्यमिक पाठशाळेत काम करण्याची तयारी दाखवली. याच सुमारास एल. टी. परीक्षेचा निकाल जाहीर झाला. मृत्युंजयराव उत्तीर्ण झाले पण वेंकटशिवुडु यांना यश मिळाले नाही. माझ्या विनंतीवरून मेटकाफसाहेबांनी मृत्युंजयरावला सरकारी पाठशाळेत एकदम १०० रु. ची नोकरी दिली.

गंजामु वेंकटरत्नमु नावाचे काकिनाड्यात एक वकील होते. त्यांनी वकिलीत खूप पैसा मिळविला होता. मद्रास राज्याच्या विधानसभेचेही ते सदस्य होते. १८८६ मध्ये त्यांनी माझ्या नावे काकिनाडा कॉलेजात छात्रवृत्ती सुरू करण्यासाठी आपली २००० रुपयांची विमापॉलिसी मजकडे पाठविली. माझ्यापेक्षा अधिक योग्य व्यक्तिच्या नावे छात्रवृत्ती सुरू करावी असे मी उत्तरादाखल लिहिले. त्यावर माझ्या पत्राला त्यांनी उत्तर पाठवले ते असे —

खूप विचारांती मी हा निर्णय घेतला आहे. माझ्या आयुष्यात यापेक्षा अधिक प्रभावी सूचना माझ्यासमोर आल्याचे मला आठवत नाही. अशाप्रकारचे आपले स्मारक व्हावे हे

आपणास पसंत नाही आणि तसे स्मारक आपल्यादृष्टीने आवश्यकही नाही याची मला जाणीव आहे. पण आपण आपल्या प्रशंसकांनी केलेला सन्मान नाकारू नये. मी माझ्या लहानपणी आपला किती प्रशंसक होतो आणि आपल्या आदर्श जीवनाने माझ्या सार्वजनिक जीवनावर कसा प्रभाव पाडला आहे त्याची कल्पना आपणास येणार नाही. वाढत्या आयुष्याबरोबर मी आपला अधिकच प्रशंसक बनत असल्याचे मला दिसून येते. अलिकडच्या काळांत आपल्या देशातील सुशिक्षित समाजात देशभक्तिची भावना वाढत गेली आणि समाजाच्या दृष्टिपथातून आपले महान त्यागी जीवन अस्पष्ट होत गेले. आपण कृपा करून माझी सूचना मान्य करावी आणि छात्रवृत्तीबाबतचे नियम ठरवून द्यावेत अशी विनंती आहे."

१८९८ मध्ये मद्रास सरकारने माझी सदस्य म्हणून निवड केली. माझी प्रकृती बिघडू लागली त्यामुळे मी 'विवेकवर्धनी' चे प्रकाशन बंद केले. १८९१ मध्ये न्यापति सुब्बाराव पंतुलु यांनी 'चिंतामणि' नावाची एक तेलुगू मासिक पत्रिका सुरू केली. आमच्या विवेकवर्धनीच्या मुद्रणालयातच ती छापली जाई. मीही त्या पत्रिकेत नेहमी लिहित असे.

अलीकडे काही वर्षे मद्रासला रहावयास जावे असे मला वाटत होते. शेवटी १८९४ च्या उन्हाळी सुट्टीमध्ये मी मद्रासला गेलो. परशुवाकमुमध्ये एक जुने घर खरेदी केले आणि ते पाडून नवे घर बांधले. आपले जन्मगाव आणि बालमित्र सोडून दूरच्या शहरी स्थायी व्हावे असे दोन कारणांसाठी मला वाटले. एक म्हणजे आपली सर्व पुस्तके मद्रासमध्ये राहून बांधणीमध्ये छापायची होती आणि दुसरे म्हणजे राजधानीत सामाजिक सुधारणेचे कार्य करावयाची माझी इच्छा होती.

मी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली होती. त्यांची राजमहेंद्रवरमसारख्या लहानशा शहरात सुबक छपाई करणे शक्य नव्हते. या कामासाठी खूप खर्च येणार होता. पण माझ्या हातात कधीच पैसा राहत नसे. पुस्तके दुसऱ्या छापखान्यात छापायची तर त्यासाठी हजारो रुपये लागले असते म्हणून आपणच मद्रासमध्ये एक छापखाना टाकावा असे ठरवले. त्यासाठी पैशाची आवश्यकता होती. म्हणून मी आपले 'विवेकवर्धनी' मुद्रणालय श्री. चित्रपु नरसिंहराव यांना विकले. शिवाय श्री. न्यापति सुब्बाराव पंतुलु यांच्याकडून एक हजार रुपये कर्जाऊ घ्यावे लागले. माझ्या सल्ल्याशिवाय आणि सहकार्याशिवाय 'चिंतामणि' पत्रिका चालवणे कठिण आहे हे जाणून सुब्बाराव पंतुलु यांनी सदर पत्रिका मद्रासहून चालविण्यासाठी मला दिली. मी इंग्लंडहून वाफेवर चालणारे एक मुद्रणयंत्र मागवले आणि 'चिंतामणि मुद्राक्षरशाला' या नावाने छापखाना सुरू केला.

राजमहेंद्रवरममध्ये सुरवातीच्या काळात हायस्कूल नव्हते. त्यामुळे शिक्षणाचा फारसा प्रचार नव्हता. बरीच वर्षे रेल्वेमार्ग नसल्याने आधुनिक संस्कृतीपासून ते शहर दूर

होते. पण पुण्यनदी गोदावरीच्या किनारी ते शहर असल्याने अंधविश्वासू आणि धार्मिक ब्राह्मणमंडळीचा शहरात भरणा होता. अशा एका शहरात मी सामाजिक सुधारणेचे कार्य सुरू केले. वास्तविक राजमहेंद्रवरम नवीन संप्रदायांचे द्वेष्टे म्हणून प्रसिद्ध होते. एखाद्या पडीक जमीनीत मेहनत करणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणे, या शहरातील माझ्या प्रयत्नांना पुरेसे यश आले नाही. मद्रासमध्ये माझ्या प्रयत्नांना अधिक फळ मिळेल या विश्वासाने मी तेथेच कायमचे वास्तव्य करण्याचे ठरविले.

मी राजमहेंद्रवरम सोडणार असल्याची बातमी कळताच माझ्या विचारांशी सहमत नसणारे देखील माझ्याविषयी आदर व्यक्त करण्यासाठी जमले. त्यांनी भाषणे केली व आपल्या पूर्वीच्या वर्तनाविषयी खेद प्रदर्शित केला. माझी स्तुती करणारी काव्ये केली, मेजवान्या दिल्या. अशा रीतीने अनेक प्रकारांनी आदर व्यक्त केला. अनेक संस्थांच्या आणि समाजांच्या कार्यकर्त्यांनी माझ्यासह छायाचित्रे काढली. माझी प्रशंसा करणारे लेख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले. काकिनाडच्याच्या नागरिकांनी देखील माझा सत्कार करून मला निरोप दिला. १८९७ च्या अखेरीला मी सहपरिवार मद्रासला गेलो.

मी राजमहेंद्रवरम सोडीपर्यंत २७ विधवाविवाह झाले होते. त्यांतील विसावा विवाह आदिपूडि सोमनाथराव याचा होता. त्याने ज्या बालविधवेबरोबर विवाह केला होता ती गंजाम जिल्ह्याच्या आसिको (आस्को) गावची राहणारी होती. एकदा तिचा भाऊ वृत्तपत्रांतील राजमहेंद्रवरममधील विधवाविवाहाची बातमी वाचीत होता. ती तिने ऐकली. नंतर एकदा गप्पा मारताना तिने चुकून आपल्या भावजयीला म्हटले, "राजमहेंद्रवरमला बालविधवांचा विवाह करतात असे ऐकीवात आहे." तिच्या भावजयीने तिला टरावले, "अहं. असं बोलू देखील नको. असं बोलणं अपराध आहे." त्यानंतर ती बालविधवा पुन्हा कधी कोणाशी विवाहाबाबत बोलली नाही. परंतु आपल्यासारख्याच अल्पवयात विधवा झालेल्या दुसऱ्या एका विधवेला भेटून तिच्याशी तिने विचारविनिमय केला. आणि त्या दोघींनी राजमहेंद्रवरमला जाण्याचा निश्चय केला. एक दिवस सर्वांची नजर चुकवून त्या दोघी विजयनगरजवळ पोचल्या. वाटेत दुसऱ्या मुलीचा धीर खचला. ती तेथेच थांबली. तथापि आस्कोगावची मुलगी मात्र एकटीच निघाली. अंगावरचे दागिने विकून तिने एक भाड्याची गाडी केली. काही अंतर गाडीने तर काही अंतर पायी चालून न थांबता कशीतरी ती राजमहेंद्रवरमला पोचली. आणि माझ्या घरी आश्रयाला आली. तिची इच्छाही पूर्ण झाली. तिच्यासारख्या एका अनाथ मुलीने लहान वयात एकटी बाहेर पडून लोकांना तोंड देत शेकडो मैल प्रवास करणे ही अतिशय आश्चर्याची आणि साहसाची गोष्ट होती. तिचे ते साहस प्रशंसनीय होते. या मुलीशी २८ जून १८९३ रोजी सोमनाथरावाने लग्न केले. डिसेंबर १८९७ मध्ये मी मद्रासला गेलो. परशुवाकमच्या स्वतःच्या घरात राहू लागलो. तेथेच चिंतामणी मुद्रणालय सुरू

केले. माझ्या ग्रंथांची छपाईही सुरू केली. या कामाला दोन वर्षे लागली. माझी सर्व पुस्तके दहा मोठ्या मोठ्या कातडी बांधणीत बांधली होती. माझे शरीर आणखीच दुर्बल झाले होते. त्यामुळे एका वर्षानंतर चिंतामणीचे प्रकाशन बंद करावे लागले.

याच काळात 'समाज सुधार संघ' आणि 'दक्षिण हिंदुस्थानी ब्रह्मसमाज' या संस्थांच्या अध्यक्षपदावर माझी निवड झाली. मद्रासच्या देशभाषा पाठ्यपुस्तक संघाने मला आपल्या कार्यकारी समितीवर घेतले. तसेच विश्वविद्यालयाने आपल्या द्राविडीभाषा अध्ययन सभेवर सदस्य म्हणून मला घेतले. शेवटची गोष्ट म्हणजे सरकारने डेप्युटी कलेक्टर इत्यादींसाठी घेण्यात येणाऱ्या सोप्या तेलुगू परीक्षेचा परीक्षक म्हणून माझी नियुक्ती केली.

मी मद्रासला पोचलो तेव्हा समाज सुधारणा संघामार्फत वरचेवर सहभोजने होत असत. मलाही एकदा सहभोजनाचे निमंत्रण आल्यामुळे मी गेलो. नगरभवनातील एका खोलीत सहभोजन आयोजित केले होते. एका दाक्षिणात्य ब्राह्मणाने स्वयंपाक करून वाढले. सहभोजनास आठ माणसे आली होती. त्यांत दोन ब्राह्मणेतर होते. दाक्षिणात्य जेवण मला आवडले नाही म्हणून उपाशीपोटी मी घरी परतलो आणि जेवलो.

शांत मनाने विचार करून देखील सहभोजनाचे महत्त्व माझ्या लक्षात आले नाही. पुढे पुन्हा एकदा सहभोजनाचे निमंत्रण आले त्यावेळी मी अगोदर घरी जेवण करून तेथे गेलो. जेवताना मी माझ्या शंकांचे निरसन करून घेण्यासाठी चर्चा सुरू केली. मी विचारले, "या भोजनाचा उद्देश काय?" मला उत्तर देण्यात आले, "ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांनी एकाच पंक्तीत जेवणे हाच प्रमुख उद्देश आहे." मी पुन्हा विचारले, "या सहभोजनात भाग घेणाऱ्यांची नावे पत्रिकांमध्ये प्रसिद्ध केली जातात काय?" उत्तर मिळाले, "नावे छापली तर हा कार्यक्रमच बंद पडेल." ते ऐकून मला अतिशय राग आला. ढोंगीपणाची स्वभावतःच मला चीड असल्याने मी संतापून म्हणालो, "आपली नावे जाहीर करण्यास भिणाऱ्या महान शूराने आजचे सहभोजन यशस्वीपणाने पार पाडले! अशाप्रकारे लोकांना फसवण्यात काय अर्थ आहे?" त्यानंतर पुन्हा कधी मला सहभोजनाचे निमंत्रण मिळाले नाही आणि याविषयी मी कधी पत्रिकांमध्ये वाचलेही नाही.

मद्रासला पोचल्यानंतर थोड्याच दिवसांनी समाज सुधारणा समितीच्या एका बैठकीत केवळ बाह्य प्रचाराने काही होणार नाही, काहीतरी भरीव काम करायला पाहिजे असे मत मी मांडले. तेव्हा विधवाश्रम स्थापण्याचा मोठ्या उत्साहाने समितीने निर्णय घेतला. श्री एस्. के. रामस्वामय्या यांनी उदारपणे आश्रमासाठी घर घेण्यास लागणारा पैसा कर्जाऊ देण्याचे कबूल केले. वर्गणीरूपाने घरासाठी पैसा जमा करण्याचा समितीने निश्चय केला. तोपर्यंत रामस्वामय्यांकडून दरमहा दरशेकडा बारा आणे व्याजाने

आवश्यक तो पैसा घेऊन घर खरेदी करावे असेही ठरले. सोयीस्कर असे घर मिळविण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. समितीच्या या निर्णयाने मला अतिशय समाधान वाटले. मी माझ्या घराजवळ बेल्लाल स्ट्रीटवरील २० नबरचे घर ३८०० रुपयांत घ्यायचे ठरवले आणि त्या घराबाबतचे साठेखत करून टाकले.

ठरल्याप्रमाणे रामस्वामय्यांकडे कर्जाऊ पैसे मागितले तेव्हा ते म्हणाले, "पैसा तर माझ्या भावाच्या वाटयाला गेला आहे. सबब प्रॉमिसरी नोटेशिवाय मी कर्जाऊ पैसे देणार नाही." त्यावर आम्ही खरेदी करणार असलेल्या माझेही घर गहाण ठेवतो असे मी त्यांना सुचविले. माझे म्हणणे त्यांना पटले नाही. नंतर घराच्या किंमतीचे पैसे दिले नाहीत म्हणून घरमालकाने माझ्याकडे वकीलामार्फत नोटीस पाठविली. तेव्हा समाज सुधारणा संघाची मी बैठक बोलावली आणि सर्व परिस्थिती निवेदन केली. घरमालकाला कोर्टात दावा दाखल करू द्यावा; त्याचा निकाल लागायला किमान एक वर्ष तरी लागेलच, त्या दरम्यान काहीतरी करता येईल असे सदस्यांनी सुचविले.

उगीच कोर्टाच्या भानगडीत पडणे मला मुळीच पसंत नव्हते. मी घरमालकाच्या वकीलाशी बोललो आणि ताबडतोबीने ५०० रु. द्यायचे व उरलेली रक्कम तीन महिन्यांच्या आत चुकती करून घर ताब्यात घ्यायचे; या अवधीत पूर्ण रक्कम चुकती झाली नाही तर दिलेले ५०० रुपये घरमालकाला मिळतील अशी तडजोड करून टाकली. परीक्षकाचा मेहनताना म्हणून मला मिळालेल्या रकमेतून या तडजोडीनुसार ५०० रुपये विसार म्हणून दिले. तीन महिन्यांच्या आत मला बाकीचे ३३०० रुपये चुकते करावयाचे होते. त्यासाठी बाहेरगावच्या मित्रांना कर्जाऊ पैसे देण्यासंबंधी पत्रे लिहिली. माझ्या प्रयत्नांना प्रतिसाद म्हणून मद्रासच्या बुच्चेय्या पंतुलु यांनी ५००, डॉक्टर सी. बी. रामारावनी ५००, काकिनाडयाहून दुग्गिराल प्रकाशराव यांनी ५००, न्यापति सुब्बाराव पंतुलु यांनी ५००, पोलवरमु जमीनदाराने १०० रुपये कर्ज देऊन माझी या संकटातून मुक्तता केली. त्या सर्वांना माझे कृतज्ञतापूर्ण प्रणाम. पोलवरमु जमीनदाराने लिहिले होते, "कृपया विधवाश्रमासाठी माझी ही मदत स्वीकारा आणि मला उपकृत करा." पाठशाळेत माझ्यापाशी अध्ययन करीत असताना हे जमीनदार माझ्याशी विनयाने आणि आदराने वागत असत. त्यांनी माझे एक तैलचित्र राजमहेंद्रवरमच्या नगरभवनास भेट म्हणून दिले.

मी माझ्या घरीच विधवाश्रम चालवला होता. चार विधवा माझ्या घरीच राहात होत्या. मी त्यांचे शिक्षण, शाळेची फी, अन्नवस्त्र आणि औषधपाणी यांचा खर्चही करीत असे. माझ्या घरी दहा विधवाविवाह झाले. त्यापैकी तिसऱ्या आणि दहाव्या विवाहाच्याबद्दल प्रामुख्याने सांगितले पाहिजे.

काकिनाडयाहून आलेली महालक्ष्मम्मा नावाची एक तरुण मुलगी मद्रासला माझ्या

घरी दोन वर्षे राहात होती. ती सुंदर, शिकलेली तसेच हुशार होती. तिच्या पूर्व-चारित्र्याविषयी काही अफवा ऐकीवात होत्या. पण स्वतः मला तिचे चरित्र संशयातीत वाटत होते. त्यावेळी ती वीस वर्षांची होती. एखाद्या पदवीधर तरुणाबरोबर लग्न करावयाचा तिचा निश्चय होता. एका पदवीधर विधुराने तिच्यावर मोहित होऊन तिच्याशी लग्न करण्यास मान्यता दिली. लग्न जवळजवळ ठरल्यानंतर तिच्याविषयी काही नव्या गोष्टी माझ्या कानावर आल्या. त्या गोष्टी ऐकल्या तेव्हा तो संबंध तोडावा असे मला वाटू लागले. दोन-तीन वेळा पत्रव्यवहार झाल्यानंतर नियोजित वराने त्या लग्नास पत्रद्वारे नकार कळविला.

त्यानंतर थोड्या दिवसांनी माझे परम मित्र श्री न्यापति सुब्बाराव पंतुलु यांचा, वयाला चाळीस वर्षे पूर्ण झालेला धाकटा भाऊ शेषगिरीराव पंतुलु माझ्याकडे येऊन म्हणाला, "मी विधुर आहे. विधवेशी विवाह करावयाची माझी इच्छा आहे. तुमच्या माहितीत चांगली मुलगी असली तर सांगा." त्यावेळी माझ्या संपर्कात असलेल्या दोन तरुणींपैकी वर उल्लेखिलेल्या तरुणीबरोबर विवाह करण्याची इच्छा शेषगिरीराव पंतुलु यांनी व्यक्त केली. तेव्हा त्या तरुणीसंबंधीच्या अफवांची मी सविस्तरपणे त्याला कल्पना दिली. पूर्वी एका गृहस्थाने मोहित होऊन विवाह करण्याचे ठरवले होते. पण तिच्या-सबंधीच्या अफवा ऐकल्यावर आपला विचार बदलला हेही सांगितले. माझ्याकडे त्या युवतीच्या चारित्र्याबाबत आलेली पत्रेही शेषगिरीरावला दाखवली. शेवटी वर आणि वधूनी परस्परांशी चर्चा करून विवाह करावयाचे ठरविले. मीही मान्यता दिली. पण प्रथम ही गोष्ट आपले बंधू न्यापति सुब्बाराव पंतुलु यांना अगोदर सांगावी, ते देखील मान्यता देतील असे शेषगिरीरावला स्पष्ट बजावले. परंतु आपण एकवार आपले बंधू न्यापति सुब्बाराव पंतुलु यांना विवाहाबाबत सल्ला विचारला असता त्यांनी अशा प्रकारचे विवाह तापदायक ठरतात म्हणून ते करणे बरे नाही असे सांगून आपणास निरुत्साही केले आहे असे शेषगिरीरावांनी मला सांगितले. विवाह होणार असल्याची बातमी आपल्या बंधूंना अगोदर कळली तर विवाहच होऊ शकणार नाही असेही शेषगिरीराव म्हणाले. परंतु न्यापति यांना कळविले नाही तर हा विवाह होणार नाही; ते या विवाहाला नक्की मान्यता देतील, त्यांनी संमती दिली नाही तरी मी हे लग्न घडवून आणीन असे मी शेषगिरीरावांना सांगितले. त्यावर राजमहेंद्रवरमला जाऊन आपल्या भावाशी बोलेन आणि पत्र लिहीन असे शेषगिरीरावाने कबूल केले आणि तुम्ही पत्र लिहू नका असे मला सांगितले. दरम्यान शेषगिरीरावाची रजा संपली. त्यांना बोब्बिलीला जाऊन कामावर रुजू व्हावयाचे होते. ठरल्याप्रमाणे राजमहेंद्रवरमहून त्यांचे पत्र आले नाही. वधूला घेऊन तुम्ही सरळ बोब्बिलीला यावे, अशी बोब्बिलीहून त्याची तार आली.

शेषगिरीरावांनी आपल्या भावाची संमती घेतली असेल अशा समजुतीने मी माझ्या परिवारासह वधूला घेऊन विजयनगरला गेलो. शेषगिरीरावाचे नोकर विजयनगरला आले होते. त्यांनी आम्हाला गाडीने गणपतीनगरला नेले. शेषगिरीराव त्याआधीच तेथे पोचले होते. विवाहाची सर्व तयारी त्यांनी केली होती. त्यांची भेट होताच मी पहिला प्रश्न केला, 'भावाची संमती घेतलीत काय?' त्यांनी उत्तर दिले, 'अजूनपर्यंत मी आपल्या भावाला ही गोष्ट कळविलेली नाही.त्यांना विवाहाचे निमंत्रण गेलेच आहे तेवढे पुरेसे आहे.' त्यांचे उत्तर ऐकून मला जे दुःख झाले ते शब्दात व्यक्त करणे शक्य नाही. एवढे दूर आल्यानंतर विवाह पार पाडल्याशिवाय परत फिरणेही बरोबर होणार नाही असा विचार करून २६ फेब्रुवारी १९०० रोजी विवाहसमारंभ उरकला आणि पत्नीसह मी राजमहेंद्रवरमला परत आलो. त्याच दिवशी सायंकाळी नगरमंदिरात गेलो आणि सुब्बाराव पंतुलु यांना त्यांच्या भावाच्या द्वितीय विवाहाची वार्ता स्वतः सांगितली. त्यांचा चेहरा विवर्ण झालेला दिसला. पण ते रागावलेले दिसले नाहीत. तेथे क्षणभरही न थांबता ते गाडीने सरळ घरी निघून गेले. दुसऱ्या दिवशी मी सुब्बाराव पंतुलु यांच्या घरी गेलो असता ते मला काही वेडेवाकडे बोलले नाहीत पण माझ्याशी नीट वागले नाहीत. ते रागावलेले असावेत. मी त्यांचा निरोप घेतला. मनात आले, विवाहाच्या आधी त्यांना कळवले नाही हे बरेच झाले. अगदी सुरवातीपासून विधवाविवाहाच्या कार्यात अत्यंत आस्थापूर्वक लक्ष घालून मला सर्वप्रकारे सहकार्य देणाऱ्या सुब्बाराव पंतुलुंनी आपल्या धाकट्या भावाने विधवाविवाह करताच एवढे संतापावे याचे मला आश्चर्य वाटले. त्यांचा संताप लवकरच मावळेल आणि आम्हा दोघांमध्ये पूर्ववत स्नेहभाव निर्माण होईल, मात्र आपली मैत्री पूर्वपदावर येण्यास बराच काळ लागेल असा विचार करून मी शांत झालो. आपला सर्वोत्कृष्ट मित्र परमेश्वरच असतो, त्याच्या आज्ञेचे पालन करीत असताना कोणतेही संकट पुढे आले तरी घाबरता कामा नये या विचाराने मन शांत झाले. सुब्बाराव पंतुलु यांच्या माझ्यावरील या अकस्मात रागाचा माझ्या सामाजिक सुधारणेच्या कामावरही परिणाम झाला.

कालप्रवाहात केवळ बाह्यवस्तूच नव्हे तर अत्यंत कठोर हृदये देखील कोमल बनतात. सुब्बाराव पंतुलु आणि माझ्यात काही दिवस बोलणेचालणे बंद होते. परंतु पुढे मद्रास विश्वविद्यालयाच्या शिक्षणपरिषदेच्या वेळी ते स्वतः माझ्याकडे आले आणि मोठ्या सहृदयतेने त्यांनी माझी विचारपूस केली. त्यानंतर आमची मैत्री पूर्ववत झाली. राजमहेंद्रवरमला मी परतल्यानंतरही दोनतीनदा माझ्याकडे येऊन त्यांनी माझे क्षेमकुशल विचारले.

पुढे एकदा सुब्बाराव पंतुलु यांनी हिंदू समाजाच्या एका सभेत माझे स्वागत करताना म्हटले, 'आज आपल्या सभेला एक प्रसिद्ध पुरुष आला आहे.' ही हिंदु समाज संघटना केव्हा आणि कशी स्थापन झाली असे तुमच्या मनात येईल. पंतुलुचा माझ्यावर राग झाला होता

त्या काळात समाज सुधारणा संघाला विरोधी म्हणून त्यांनी हिंदु समाजाची स्थापना केली आणि 'इंडियन प्रोग्रेस' नावाची एक पत्रिकाही चालू केली. देशाच्या परंपरा सांभाळून सामाजिक सुधारणा हळूहळू कराव्यात असे या समाजाचे मत होते. ज्यांनी आपल्या लग्नाला आईवडिलांची संमती मिळवलेली आहे अशी लग्ने लावून द्यावयास हरकत नाही असे काही लोकांचे म्हणणे होते, तर काही लोक विधवाविवाह पूर्णपणे बंद करावेत असे म्हणत होते. बालविवाह झाले नाहीत तर बालविधवाही होणार नाहीत, म्हणून योग्य वय झाल्यानंतरच मुलींची लग्ने केली जावीत असा युक्तिवाद काहीजण लढवू लागले. हा हिंदू समाज राजमहेंद्रवरममध्ये सुरू झाला पण मद्रासपर्यंत त्याचा प्रचार झाला आणि त्याची अधिवेशनेही झाली. ॲनी बेझंट बाईंच्या अध्यक्षतेखाली झालेली एक मोठी सभा हा त्या समाजाचा शेवटचा कार्यक्रम. त्यानंतर या समाजाचे कोणतेही कार्यक्रम झाले नाहीत. हिंदु समाजाचे चिटणीस नेहमी असे सांगत की आपल्या वयाच्या मुलीशीच तरुणांनी विवाह करावा. तसे झाले तर विधवाविवाहाचा प्रश्न उरणार नाही. परंतु याच महाशयांनी आपली मुलगी सात वर्षांची असतांना तिचा विवाह केला. त्यामुळे त्या समाजाविषयी लोकांच्या मनांत अविश्वास निर्माण झाला आणि त्या समाजाचा शेवट झाला.

विशाखापट्टणमचे महाराज गोडे गजपतिराव दक्षिण हिंदुस्थानी ब्राह्मसमाजाला दरसाल ५० रु. देत असत. हे पैसे त्यांनी पुढे बंद का केले कोण जाणे ! ब्राह्म समाजाच्या लोकांनी त्यांनी स्मरणपत्रे पाठवली पण काही उपयोग झाला नाही. वेंकटरत्नमु नायुडु इत्यादि प्रतिष्ठित मंडळी त्यांना प्रत्यक्ष भेटायला विशाखापट्टणमला गेली तरीही काही उपयोग झाला नाही. पुढे मी ब्राह्मसमाजाचा अध्यक्ष झालो. मी त्यांना देणगी देण्याची विनंती केली तेव्हा त्यांनी ५०० रु. माझ्याकडे पाठवले. त्यानंतर ते दरवर्षी ५०० रु. पाठवीत असत. ५०० रु. कायमचे मिळत राहतील अशी काहीतरी व्यवस्था करा अशी मी त्यांना विनंती केली. तेव्हा त्यांनी आपल्या मृत्युपत्रात ५०० रु. देण्याची कायम व्यवस्था करून टाकली.

महाराज गजपतिराव यांना माझ्याविषयी फार आदर होता. मी एकदा नवरात्राच्या दिवसांत सहपरिवार विशाखापट्टणमला गेलो होतो. त्यावेळी मी महाराजांच्याच बंगल्यात राहिलो आणि त्यांचा पाहुणचार मला लाभला. त्या मुक्कामातच दसऱ्याच्या दिवशी मला आणि माझ्या पत्नीला भेट म्हणून देण्यासाठी त्यांनी अत्यंत मौल्यवान वस्त्रे आणवली. मला असल्या वस्त्रांची गरज नाही असे मी नानाप्रकाराने सांगितले पण त्यांनी माझे ऐकले नाही. म्हणून विजयादशमीच्या दिवशी सकाळीच त्यांचा निरोप न घेता मी पत्नीसह राजमहेंद्रवरमला परतलो. त्यांची भेट स्वीकारण्याचे माझ्या मनात नव्हते. म्हणूनच मी लगोलग राजमहेंद्रवरमला निघून गेलो. अन्यथा आणखी एखाद दुसरा दिवस तेथे राहिलो असतो. हे त्यांच्या लक्षांत आले तेव्हा त्यांना फार वाईट वाटले. त्यानंतर दुस-

न्याच दिवशी त्यांनी २०० रु. देऊन दोन माणसांना माझ्याकडे पाठवले. नाईलाजाने मी ते घेतले आणि नगरभवनातील ज्युबिली वाचनालयाला देऊन टाकले.

राजमहेंद्रवरम कॉलेजातून निवृत्त होऊन पेन्शन घेत होतो. मद्रासला राहून आजीवन सुधारणेचे कार्य करण्याचा मी संकल्प केला. परंतु त्यात बाधा आली. तत्कालीन शिक्षणाधिकारी डंकनसाहेब यांचा माझ्यावर लोभ होता. विश्वविद्यालयाच्या शिक्षण समितीच्या बैठकांचे वेळी ते मला वारंवार भेटत असत. एका भेटीत त्यांनी मला विचारले, "तुम्हाला मद्रासमध्ये काम करणे आवडेल ?" मी त्यांना सांगितले, माझ्या गावी परत जाण्याची मला इच्छा नाही. येथेच राहून काम करावे असे वाटते. नंतर एक दिवस शिक्षणाधिकाऱ्यांचे एक पत्र पोस्टमनने माझ्या हाती दिले. राजमहेंद्रवरमहून मद्रासच्या प्रेसिडन्सी कॉलेजात माझी बदली करण्यात आली आहे आणि माझ्या जागी श्री कोक्कोंड वेंकटरत्नमु पंतुलु यांना राजमहेंद्रवरम कॉलेजात नियुक्त केले आहे असे ते पत्र होते. डंकनसाहेबांची देखील कसेही करून मला मद्रासला बोलवावे अशी इच्छा होती. म्हणून कोक्कोंड वेंकटरत्नमु पंतुलु यांना इंग्रजी येत नाही त्याचे निमित्त करून त्यांनी त्यांची बदली करून त्या जागेवर माझी नेमणूक केली.

मी माझ्या नव्या जागी रूजू होण्यापूर्वी प्रेसिडन्सी कॉलेजचे प्रिन्सिपल स्टुअर्टसाहेबांनी मला विचारले, "तुम्ही तुमच्या नव्या जागी केव्हा रूजू होणार आहात ?" माझी रजा संपताच रूजू होईन असे मी त्यांना सांगितले तेव्हा श्री कोक्कोंड वेंकटरत्नमु पंतुलु यांनी आपणास मद्रासमध्येच ठेवावे असा अर्ज केल्याची बातमी त्यांनी मला दिली. परंतु त्यांचा तो अर्ज शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठवण्याची आपली इच्छा नाही, तेव्हा तुम्ही तात्काळ कामावर रूजू व्हा असेही ते म्हणाले. मीच त्यांची बदली करवली असे कोक्कोंड वेंकटरत्नमु पंतुलु यांना वाटले. त्यामुळे राजमहेंद्रवरमला पोचताच त्यांनी मला लिहिले, "तुमच्या कृपेने मला गोदावरी नदीत स्नान करण्याचे पुण्य लाभले आहे."

माझे घर कॉलेजपासून तीन मैलांवर होते. म्हणून पहिल्याप्रथम मी एक छोटीशी घोडागाडी खरेदी केली. नंतर ती विकली आणि एक मोठा घोडा आणि मोठी गाडी खरेदी केली. शेषगिरीराव बोब्बिली यांनी तो मोठा घोडा विकण्यासाठी माझ्या सुपूर्द केला होता. आपल्या प्रथम पत्नीच्या मृत्यूला तो घोडाच कारण आहे अशी त्यांची भावना होती. म्हणून त्यांना तो विकून टाकायचा होता. त्याच्या भुवया चांगल्या नव्हत्या, म्हणून तो कोणी विकत घेत नव्हते. मी कितीतरी वेळा तो लिलावात विकण्यासाठी पाठवला पण कोणीच ५०।६० रुपयांपेक्षा जास्त किंमत बोलेना. एकदा मी स्वतःच लिलावाच्या जागी जाऊन १०० रु. बोली बोललो. शंभर रुपयांपेक्षा अधिक बोली बोलायला दुसरा कोणी पुढे झाला नाही. घोड्याच्या भुवया चांगल्या नसल्या की काय

निवृत्त झाले पाहिजे असा मात्र मी निश्चय केला. माझा सारा वेळ नोकरीत खर्च होत असे. कॉलेजात दहा वाजता पोचण्यासाठी मला आठ वाजताच जेवून तयार व्हावे लागे. सायंकाळी पाचापूर्वी घरी जाता येत नसे. पाचच्या नंतर काही करता येत नसे. शाळेतील चार वर्गांना पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त भाषांतरही मलाच शिकवावे लागे. विद्यार्थ्यांचे भाषांतराचे पेपर घरी नेऊन तपासावे लागत. माझे शरीर रोगग्रस्त होते. शरीर दुर्बल झाले होते आणि कामही खूप करावे लागे. त्यामुळे मला फारसे सामाजिक कार्य करता येत नसे.

शक्य तेवढ्या लवकर शिक्षणकार्यांतून मला मोकळे व्हायचे होते. म्हणून काम करण्यास अपात्र असल्याचे प्रमाणपत्र मी डॉक्टरांकडून मिळवले. शिक्षणाधिकाऱ्याने नाईलाजाने मला कार्यमुक्त केले. पेन्शन घेऊन जवळजवळ दीड वर्ष मी मद्रासमध्येच राहिलो. या काळात घर इत्यादि स्थावर मालमत्ता विकली आणि १९०५ मध्ये पुन्हा माझ्या जन्मगावी--राजमहेंद्रवरमला परत आलो.

२. लेखनकार्य कालखंड : १८७० ते १९००

मी शाळेत अगदी चौथ्या इयत्तेत शिकत होतो तेव्हाच तेलुगूमध्ये मला हुशार समजत असत. माझे तेलुगु शिक्षक श्री. पुलिपाक गुरुहारी मलाच वर्गातील तेलुगूचा धडा शिकवायला सांगत. अर्धशिक्षित लोकांमध्ये पंडित बनून आपल्या अल्प ज्ञानाचे प्रदर्शन करण्याच्या हेतूने मी काहीतरी लिहिण्याचे योजले. त्या काळात गद्य लेखकांपेक्षा काव्य करणाऱ्यांनाच जास्त मानत. म्हणून छंद शास्त्र शिकलो आणि दीर्घ समासांनी युक्त अशा कविता करू लागलो. माझ्यातील त्यावेळच्या भोळसट भक्तिभावामुळे मी 'मार्कंडेय शतक' आणि 'गोपाल शतक' ही दोन काव्ये लिहली.

ही शतके वाचली तेव्हा माझ्या मित्रांनी माझ्या काव्याची तारीफ केली. त्यांच्या प्रशंसेमुळे उत्साह वाढला आणि अवघड शैलीत काव्यरचना करण्याचा संकल्प केला. त्याप्रमाणे "शुद्धांध्रनिरोष्ठ्य निर्वचन नैषध" नावाचा एक काव्यग्रंथ लिहला. विश्व-विद्यालयाने हे काव्य बी. ए. ला पाठ्यपुस्तक म्हणून लावले आहे. त्याचप्रमाणे 'रसिक मनोरंजन' हे पाच 'आश्वासा'चे विशुद्ध तेलुगू प्रबंध काव्य लिहिले. आजही विद्वान मंडळी या प्रबंधकाव्याची प्रशंसा करीत असले तरी असले शृंगारप्रधान प्रबंध मला आवडत नाही. आता मी असली काव्यरचना मुळीच करत नाहीत.

त्यानंतर मी "शुद्धांध्रोत्तर रामायण" रचले. संपादक, समीक्षक, तसेच विद्वानांनी या रचनेची प्रशंसा केली. 'पुरुषार्थ प्रदायिनी' पत्रिकेच्या मे १८७२ च्या अंकात म्हटले आहे—

"या सुंदर कविता अतिशय दक्षतेने आणि रसमयतेने रचलेल्या आहेत. रचनाकार आहेत प्रतिभाशाली कवी श्री कंदुकूरि वीरेशलिंगमु. काव्याची थोडीफार गोडी असलेल्या प्रत्येकाला या कविता आवडतील."

कोरंगीला राहात असताना मी 'संग्रह व्याकरण' आणि 'नीति दीपिका' ही काव्ये प्रकाशित केली. त्याआधी शालेय विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने शिकविता येईल असे एकही तेलुगू व्याकरण नव्हते. तोपर्यंतची व्याकरणाची सर्व पुस्तके जुन्या शैलीत लिहिलेली होती.

ब्राडासाहेब हे त्यावेळी उत्तर जिल्ह्यातील शाळांचे तपासनीस होते. ते फार संतापी होते. आपल्या सहकाऱ्यांना तसेच शिक्षकांना पावलोपावली दटावीत असत. मुख्याध्यापक पदावर माझी नियुक्ती झाल्यानंतर काही दिवसांनी एकदा ते धवलेश्वरम शाळेची तपासणी करायला आले. माझा एक सहाध्यायी शिक्षक एका वर्गात बीजगणित शिकवत होता. त्या वर्गात जाऊन ब्राडासाहेबांनी विद्यार्थ्यांना एक गणित घातले आणि ते पाटीवर सोडवायला सांगितले. पण विद्यार्थ्यांना गणित सोडविता आले नाही, तेव्हा सायंकाळी तुम्ही फळ्यावर ते सोडवून दाखवा असे साहेब मला म्हणाले. मी म्हटले, हे काम माझ्या सहकाऱ्याचे आहे माझे नव्हे. त्यावर ओरडून त्यांनी मला फर्माविले, " नाही, तुम्हाला ते करावेच लागेल." मी ठामपणे नकार दिला. वरील प्रसंग त्यांनी आपल्या आठवणीच्या पुस्तकात लिहिला आहे. या घटनेच्या आधी आणखी एक प्रसंग घडला होता. शाळातपासणीच्या वेळी साहेबांनी एकट्याने बसायचे व बाकीच्यांनी उभे रहावयाचे असा रिवाज होता. मी हा रिवाज मोडून खुर्ची मागवली आणि साहेबांच्या बाजूला बसलो. अर्थातच साहेबांना हे माझे वर्तन आवडले नाही, पण माझा स्वतंत्र बाणा पाहून ते खुश झाले. पुढे त्यांनी शाळेला लावायच्या पाठ्यपुस्तकांच्या यादीत माझ्या व्याकरणाच्या पुस्तकाचा समावेश करण्याचा आदेश दिला. त्यामुळे माझ्या व्याकरणाच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती अल्पावधीतच विकली गेली.

'शुद्धांध्र महाभारत' या नावाने महाभारत शुद्ध तेलुगूत लिहिण्याचा मी संकल्प केला. सभापर्वाचा काही भाग 'आंध्रभाषा संजीवनी' या मासिकात क्रमशः प्रकाशितही केला. परंतु मग माझा विचार बदलला. ज्याला तेलुगू भाषेतील गद्यग्रंथ म्हणता येईल असा चिन्नसूरी कृत ' नीति चंद्रिका' हा एकमेव ग्रंथ होता. तोही संपूर्ण नव्हता. पद्यापेक्षा गद्यकाव्य लिहिणे जास्त उपयुक्त आहे असे मला वाटले. म्हणूनच मी 'नीतिचंद्रिका'चा उत्तरार्ध लिहावयास घेतला.

मद्रासच्या ख्रिश्चन कॉलेजात समर्थ रंगय्येशेट्टी बी. ए., नावाचे गणितशास्त्राचे एक प्राध्यापक होते. त्यांनी माझे पुस्तक कॉलेजसाठी पाठ्यपुस्तक म्हणून लावले. त्यांचा माझा आधीचा परिचय मुळीच नव्हता. मला दिलेल्या उत्तेजनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे पत्र मी त्यांना लिहिले. उत्तरादाखल रंगय्येशेट्टींनी ८ फेब्रुवारी १८७५ रोजी मद्रासहून मला लिहिलेले पत्र असे –

"आपले पुस्तक पाठ्यपुस्तकांच्या यादीत मी घातले हा आपल्यावर मी मोठा अनुग्रह केला असे वाटण्याचे कारण नाही. मी काही आपल्यावर उपकार केलेला नाही. उलट ते पुस्तक त्याच्या गुणवत्ततेमुळेच निवडण्यात आले आहे. तेलुगू साहित्यातही अशी उत्कृष्ट कृती आहे याचा मला अभिमान वाटतो. आपण तेलुगू भाषेत एखादी मौलिक कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न का करीत नाही ?"

मद्रासच्या विद्वान मंडळींना माझी ही साहित्यकृती इतकी आवडली की त्यांनी मला मद्रासला बोलावून माझा सत्कार केला आणि एक पात्र भेट म्हणून दिले. विश्वविद्यालयानेही हे पुस्तक इंटरमिजीएट परीक्षेसाठी पाठ्यपुस्तक म्हणून नेमले. त्यामुळे पुस्तकाची रॉयल्टी म्हणून त्यावर्षी मला एक हजार रुपये मिळाले.

रंगय्ये शेट्टी यांनी मला तुम्ही तेलुगू भाषेत एक कादंबरी का लिहित नाही असे लिहिले त्याचवेळी कादंबरी लिहिण्याचा विचार माझ्या मनात आला. प्रथम एखाद्या इंग्रजी कादंबरीचा तेलुगुत अनुवाद करून कादंबरीलेखन कसे करावे हे माहीत करून घ्यावे आणि मग मौलिक कादंबरी लिहावी असा मी विचार केला. त्या दृष्टीने गोल्डस्मिथच्या 'व्हिकार ऑफ वेकफील्ड'चा अनुवाद करण्यास प्रारंभ केला. दोन-तीन प्रकरणांचे भाषांतरही केले. पण नंतर परकीय कथांचे भाषांतर आपल्या वाचकांना आवडणार नाही असे वाटले आणि उरलेला अनुवाद करण्याचे काम मी थांबविले. नंतर मग 'राजशेखर चरित्रमु' ही कादंबरी लिहावयास घेतली. या कादंबरीतील कथेचा इंग्रजी कथेशी फारसा संबंध नाही. हिंदु समाजातील अंधविश्वास दूर करण्याच्या उद्देशाने ती कादंबरी लिहिली आहे. १८७८ मध्ये प्रथम 'विवेकवर्धनी'त ती क्रमशः प्रकाशित केली आणि नंतर पुस्तकरूपाने छापली. तत्कालीन शिक्षणाधिकारी मॅक्डोनल्डसाहेब यांना ती कृती अर्पण केली होती. मॅक्डोनल्डसाहेबांचा माझ्यावर विशेष लोभ होता. त्यांनी मला प्रेसिडेन्सी कॉलेजच्या दुय्यम पंडिताची जागा देऊ केली पण मी ती स्वीकारली नाही.

'राजशेखर चरित्रमु'ची संपादकांनी आणि समीक्षकांनी विशेष प्रशंसा केली. माझ्या या साहित्यकृतीविषयी २५ डिसेंबर १८८१ रोजी इंग्लंडहून मला एक इंग्रजीत पत्र आले. त्याचा भावार्थ असा :

प्रिय महोदय,

नॅशनल इंडियन असोसिएशनच्या चिटणीस मिस म्यूनिंग यांनी भारतातील उत्तम कथा साहित्य क्रमशः आपल्या पत्रिकेत प्रसिद्ध करण्याची योजना आखली आहे. 'राजशेखर चरित्रमु' या आपल्या कादंबरीचा अनुवाद प्रकाशित करणे कदाचित आपल्या योजनेच्या दृष्टीने योग्य होईल असे मी मिस म्यूनिंग यांना सुचविले आहे. आपला विचार समजून घेण्यासाठी हे पत्र लिहित आहे. आपली कादंबरी पत्रिकेत क्रमशः प्रकाशित करण्याची कल्पना आपणास पसंत आहे काय ? की आपणच स्वतः कादंबरीचा इंग्रजी अनुवाद पाठवाल ?

त्यावेळी मी विधवाविवाहाच्या कार्यात गुंतलेला होतो. त्यामुळे 'राजशेखर चरित्रमु' कादंबरीचा इंग्रजी अनुवाद करून तो इंग्लंडच्या पत्रिकेत छापण्यासाठी पाठवणे मला जमले नाही. अमेरिकन ख्रिश्चन पाद्री रेव्हरंड हचिन्सन यांनी माझ्या अनुमतीने

होते हे पहावे या काहीशा हेतूनेच तो घोडा मला खरेदी करावयाचा होता. मद्रास सोडून राजमहेंद्रवरमला परत येईपर्यंत तो घोडा माझ्यापाशीच होता. त्याने फारच चांगले काम केले.

१८९८ मध्ये मद्रासमध्ये हिंदूंची अखिल भारतीय महापरिषद झाली. या परिषदेबरोबर साऱ्या देशाची हिंदी संघाची परिषदही भरवण्यात आली. माझी त्या परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. या परिषदेत श्री. महादेव गोविंद रानडे यांनी मला, 'दक्षिण हिंदुदेश विद्यासागर' अशी पदवी दिली. त्यानंतर १४ जून १९०२ मध्ये काकिनाडा येथे मद्रासप्रांतीय परिषद झाली. तिचाही मीच अध्यक्ष होतो. त्यावेळी मी केलेल्या भाषणांतील बराचसा माग रेव्हरंड मडदि साहेबानीं आपल्या पुस्तकात उद्घृत केला आहे.

गुंटुरचा पहिला विधवाविवाह १९०२ मध्ये झाला. तो विवाह यशस्वीपणाने पार पाडण्यासाठी तेथील डिस्ट्रिक्ट मुन्सफ श्री. विश्वनाथशास्त्री यांनी मला निमंत्रण धाडले. मी पत्नीसह गुंटूरला गेलो व त्यांच्याच घरी उतरलो. माझ्या आगमनाने खूप खळबळ उडाली. विश्वनाथशास्त्रींचा ब्राह्मण स्वयंपाकी पळून गेला. कोणत्याही परिस्थितीत हा विधवाविवाह आपल्या घरी होता कामा नये असे विश्वनाथशास्त्रींच्या पत्नीने निक्षून सांगितले. माझी निराशा होईल या कल्पनेने विश्वनाथशास्त्री दुःखी झाले पण आपल्या वचनाला चिकटून राहिले. ठरल्याप्रमाणे ११ ऑक्टोबरला त्यांच्याच घरी विधवाविवाह यशस्वीपणे साजरा झाला. वर बेतपूडि जोगी प्रकाशराव आणि वधू राजमहेंद्रवरमची रहिवासी वेंकटरमणय्या होती. श्री. उन्नव लक्ष्मीनारायण लग्नाच्या मेजवानीस हजर राहून विधवाविवाहाच्या पक्षात सामील झाले. त्यानंतर गुंटूरमध्ये झालेले सर्व विधवाविवाह श्री. उन्नव लक्ष्मीनारायण यांच्या नेतृत्वाखालीच झाले. वर उल्लेखिलेल्या विवाहाच्या दुसऱ्या दिवशी आणखी एक विवाह घडवून आणण्यासाठी राजमहेंद्रवरमला परत गेलो.

१४ ऑक्टोबर १९०२ रोजी राजमहेंद्रवरममध्ये एक विधवाविवाह झाला. प्रसिद्ध लेखक श्री. चिलकमर्ति लक्ष्मीनरसिंहम यांचा सहकारी शिक्षक तिरूमेल्ल वेंकट सुब्बाराव हा वर होता. तो राजमहेंद्रवरमचाच रहिवासी होता. तिरुवल्लूर जवळील अविच्चेरी गावचे तिरुमलाचार्य यांची मुलगी वेंकट लक्ष्मम्मा ही वधू होती. आपल्या मुलीला वैष्णव संप्रदायाचाच वर मिळाला पाहिजे असा प्रारंभी तिरूमलाचार्य यांचा आग्रह होता. पण सुयोग्य वर मिळेना. तेव्हा त्यांनी माझी सूचना मान्य केली आणि वैष्णवेतर वराबरोबर आपल्या मुलीचा विवाह करावयास ते तयार झाले. हा विवाहही यशस्वीपणे पार पडला. त्यानंतर मी सपत्नीक मद्रासला गेलो.

मी या अगोदर राजमहेंद्रवरमला एक नगरभवन आणि मद्रासला समाजसुधारणासंघाची इमारत बांधलीच होती. त्याशिवाय मद्रासमध्ये राहात असतानाच १२०० रुपये

खर्च करून राजमहेंद्रवरमला स्त्रियांसाठी एक प्रार्थनामंदिर बांधले. १९०७ च्या उन्हाळ्यात मी पत्नीसह बेंगलूरला गेलो असता अरूलपेटच्या ब्राह्मसमाजाच्या सदस्यांनी माझे स्वागत केले. समाजगृहात समाज सदस्य दिवसा हातमागावर कपडे विणण्याचे काम करीत आणि रात्री तेथेच उपासनेचा कार्यक्रम करीत. हे लोक सुशिक्षित आणि श्रीमंत नव्हते, तरी भाविक मात्र जरूर होते. या लोकांना आपण एक प्रार्थनामंदिर बांधून द्यावे असे मी आणि माझ्या पत्नीने आपसात विचार करून ठरवले. त्यानंतर एक वर्षाने त्या मंडळींनी ५०० रुपयात एक घर विकत मिळत असल्याचे कळविले. लगेच पैसे पाठवून आम्ही ते घर खरेदी केले.

मद्रासमध्ये माझ्या घरी राहणाऱ्या विधवांना मी एम्मूरमधील स्त्रियांच्या शाळेत शिकवायला पाठवीत असे. काही स्त्रिया सायंकाळी उशीरा घरी येत. आम्ही कारण विचारले की अनेक सबबी सांगायच्या. याचवेळी एकदा त्यांच्यापैकी एका स्त्रीला ताप आला. ती विव्हळू लागली. तेव्हा मी तिला औषध दिले. पण अनेक दिवस औषध घेऊनही ती स्त्री बरी होईना. तेव्हा मी तिला एका स्त्री डॉक्टरकडे पाठवले. आणि तिला काय होते आहे ते विचारले. तेव्हा तिला दिवस गेले आहेत असे स्त्री डॉक्टरने लिहून कळवले. माझे मन खिन्न झाले. एम्मूरच्या शाळेत बालविधवांना पाठवणे योग्य नाही असे माझ्या मनात आले. माझ्यापाशी दोन तरूण होते. पण त्यापैकी एक देखील शाळा चालवण्यास योग्य नव्हता. वील्पाक भागातील एक बाग विक्रीस निघाली होती. ९०० रुपयांना माझ्या पत्नीच्या नावे ती मी खरेदी केली. नंतर झाडे-झुडपे उपटून एक घर बांधले परंतु विधवांना तेथे ठेवायचे तर त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी कोणीतरी तेथे राहणे आवश्यक होते. हे काम कोणी करता काय असे समाज सुधारणा समितीच्या कैक सदस्यांना विचारले. पण कोणीही तयार झाले नाही. हळूहळू त्या घराला वाळवी लागली आणि तेथे गाढवे राहू लागली. माझ्या घरी राहणाऱ्या विधवांपैकी चाळीस वर्षांपुढच्या दोन स्त्रियांना मी त्या घरी रहावयास पाठवले. मी दररोज जाऊन देखभाल करीत होतो.

मला मदत करायला कोणी तयार नव्हते. पण विधवांना तेथे ठेवले म्हणून माझ्यावर टीका करायला मात्र लोक पुढे आले. मद्रास सोडून जावे असे मला वाटू लागले. मद्रास-मध्ये मला कोठूनही पैशाची मदत मिळत नव्हती. माणसांची मदत तर मुळीच नव्हती. स्वत:चाच पैसा मी समाजात खर्च करीत होतो. माझ्या सर्व कामात मला मदत करणारे बुच्चय्या मरण पावले होते. विधवाश्रमात फक्त आंध्रातल्याच विधवा आश्रयासाठी येत. लगतच्या मद्रास इलाख्यातील तामिळ विधवा येत नसत. त्यामुळे राजमहेंद्रवरमला गेलो तर पहिल्यापेक्षा जास्त कार्य करता येईल असे मला वाटू लागले.

राजमहेंद्रवरमला जायचे की नाही ते मागाहून पाहता येईल पण प्रथम नोकरीतून

भाग दुसरा

'राजशेखर चरित्रमु'चा इंग्रजी अनुवाद केला आणि मद्रास ख्रिश्चन कॉलेजच्या पत्रिकेत १८८६ मध्ये क्रमशः प्रसिद्ध केला आणि नंतर १८८७ मध्ये 'फॉरच्यून्स व्हील' नावाने ती कादंबरी पुस्तकाच्या रूपात चित्रासह लंडन शहरात प्रसिद्ध केली. मॅक्डोनल्ड साहेबांनी कादंबरीला प्रस्तावना लिहिली होती. या कादंबरीविषयी ३० सप्टेंबर १८८७ च्या 'लंडन टाइम्स'ने लिहिले होते :

" 'फॉरच्यून्स व्हील' हा हिंदू कादंबरीचा एक अद्भुत नमुना आहे. या कादंबरीत हिंदू कुटुंब जीवनाचे चित्रण, हिंदूंचे धार्मिक विचार, पूजा पद्धती, अंधविश्वास, त्यांच्या स्त्रियांची स्थिती इत्यादींचे चांगल्या प्रकारे वर्णन केले आहे. तसेच सुंदर चित्रांनी हे पुस्तक सजविलेले असल्याने ते वाचकांना अतिशय उपयुक्त झाले आहे. तद्देशीय जनतेच्या सामाजिक उत्थानाची आकांक्षा लेखकात दिसून येते. या आकांक्षेशी सहमत असणाऱ्यांना हे पुस्तक विशेषेकरून आकर्षक वाटेल."

मद्रासहून प्रसिद्ध होणाऱ्या हिंदू या इंग्रजी दैनिकात १८७८ मध्ये माझ्या या साहित्य-कृतीचे जे परीक्षण प्रसिद्ध झाले त्याचा काही अंश असा:

" ' राजशेखर चरित्रमु'चे लेखक आपल्या देशबांधवाशी समरस झालेले आहेत आणि समाजाच्या सर्वांगांचे सजीव चित्रण करण्याचे त्यांच्यात सामर्थ्य आहे. त्यांच्या 'राजशेखर चरित्रमु' ने तेलुगू साहित्याच्या इतिहासात एका नव्या अध्यायाचा शुभारंभ केला आहे असे आपण म्हणू शकतो. तेलुगू भाषेतली ही पहिली कादंबरी आहे. आणि तीमुळे एक नवीन भावभूमी प्रस्थापित झाली आहे. ही एक यशस्वी कादंबरी आहे असे म्हणता येईल. या कृतीद्वारे तेलुगू साहित्याच्या एका युगात आपणास आपलेच प्रतिबिंब पहा-वयास मिळते. जेव्हा आपण मागे वळून अभिमानाने पाहू तेव्हा बाकीच्या साध्याभोळ्या आणि अशिक्षित लोकांमध्ये आपण एकटेच आहोत असे आपणास वाटेल. आधुनिक साहित्याचा पाया घालणाऱ्या आणि भाषेची गुप्त शक्ति विकासाच्या मार्गावर प्रगत करणाऱ्या या महान समर्थ कृतीबद्दल आपणास आश्चर्य वाटेल."

'राजशेखर चरित्रमु' नंतर दोनच महिन्यांत 'संग्रह महाभारत' लिहिले व मद्रासला पाठवले. विश्वविद्यालयाने याही पुस्तकाचा पाठ्यपुस्तकांमध्ये समावेश केला.

'नीतिचंद्रिका'च्या 'विग्रह'चा अनुवाद केल्यानंतर 'संधि' प्रकरणाचा देखील 'विग्रह'च्या शैलीत अनुवाद केला. हा अनुवाद मेटकाफसाहेबांना अर्पण केला होता. हा अनुवादही विश्वविद्यालयाने अनेकदा पाठ्यग्रंथ म्हणून लावला. भाषेचे प्रयोजन काय ? परस्परांच्या विचारांची देवघेव करणे. शब्दबद्ध ग्रंथाचा उपयोग काय ? आपल्या भावना दूरस्थांना आणि भावी पिढ्यांना सांगणे. 'विग्रह'सारख्या पुस्तकांद्वारे हा उद्देश सफल होणे शक्य नाही, अशा पुस्तकांतील अवघड शब्दांचा अर्थ समजण्यासाठी निघंटुची (शब्दकोषाची) आणि विद्वानाच्या मदतीची अत्यंत गरज असते. कोणतीही साहित्यरचना सुगमही असली

पाहिजे. यापुढील पुस्तके सोपी, सुबोध आणि सुगम व्हावीत या दृष्टीने मी लिहू लागलो' हे माझे विचार पत्रिकांतूनही व्यक्त केले. पण विद्वानांना ते पटले नाहीत. साधी, सरळ आणि सुबोध पुस्तके लिहिली तर भाषेची प्रतिष्ठा घटत जाईल, रूचिपूर्ण नसल्यामुळे रसिक वाचकांना ती आवडणार नाहीत आणि त्यांचे महत्त्वच संपुष्टात येईल असा त्यांचा युक्तिवाद होता.

माझ्या बुद्धीप्रमाणे मी वागतो. इतरांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून मी सोप्या भाषेत संवादाच्या स्वरूपात 'ब्रह्मविवाह' नावाची एक रचना केली आणि हास्य-संजीवनीच्या पहिल्या अंकात तिचा काही भाग प्रकाशित केला. त्यापूर्वी रामायण शैलीमध्ये पुस्तके लिहिली गेली नव्हती. त्यामुळे अथवा विषयाच्या नाविन्यामुळे स्त्रीपुरुष, विद्वान-सामान्यजन, लहानथोर सर्वच अत्यंत आवडीने माझी ही रचना वाचीत असत. प्रकाशित झाल्यानंतर कित्येक दिवसपर्यंत आपल्या घरापुढील ओटयावर बसून लोक हे पुस्तक वाचून मोठयाने हसत असत. पहिल्या अंकानंतर दुसरा अंक प्रकाशित करण्याआधी मला ग्राहकांची यादी परिशिष्ट म्हणून प्रसिद्ध करावी लागली. हे पुस्तक केवळ मनोरंजनासाठी लिहिले नव्हते. बालविवाह, जरठ विवाह, हुंडा इत्यादि सामाजिक कुरीतींपासून जनतेला परावृत्त करण्याच्या विचाराने ते लिहिले होते.

'हास्यसंजीवनी'मध्ये 'ब्रह्मविवाह' संपूर्णपणे प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामीण भाषेत 'व्यवहारधर्म बोधिनी' हे आणखी एक प्रहसन लिहून प्रसिद्ध केले. 'ब्रह्मविवाहा'तील पात्रांप्रमाणेच या रचनेतील अनेक पात्रे वास्तव आहेत. यात वर्णिलेले विषय देखील वस्तुस्थिती-निदर्शक आहेत. या पुस्तकालाही मोठा वाचकवर्ग लाभला. या प्रहसनाला लोक 'प्लीडर नाटक' म्हणत. 'व्यवहार धर्मबोधिनी' या प्रहसनाचा एका मुलींच्या शाळेत करमणुकीसाठी पहिला प्रयोग झाला. त्या प्रयोगास शेकडो लोक हजर होते. शहरातील ज्या वकिलांसारखी पात्रे या प्रहसनात घातली होती, त्या वकिलांपैकी काही वकीलही उपस्थित होते. एका वकिलाचा भाचा त्या वकिलासारखे कपडे घालून बोलू लागला तेव्हा प्रेक्षक त्या वकीलाकडे पाहून खदाखदा हसू लागले.

मद्रासचे दिवाण बहादुर वल्लूरि जगन्नाथराव पंतुलु यांनी ३ ऑगस्ट १८८० रोजी मला एक पत्र लिहिले ते असे–

"आपण राजमंडीच्या लोकांमधील वैगुण्याचा निर्दयपणे परिस्फोट करीत असल्याचे मी पहात आहे. कडवट लिहण्याने कधी कधी चांगले होण्यापेक्षा हानीच अधिक होणे शक्य असते. अधिकाऱ्यांनी भाषागत पत्रिकांची घोषणा करणे सोडून दिले आहे. तुम्ही त्याचे चांगले चित्रण केले आहे. कथावस्तू आणि रूपरेखा खचितच उत्तम आहे."

गळू झाले की ते फोडून त्यावर इलाज केलाच पाहिजे. गळू झालेच नाही असे ढोंग करण्यात काही अर्थ नाही." माझ्या उपायांनी लोकांचा खूपच फायदा झाला आहे असे

मला वाटते.

१८८० मध्ये धारवाड शहरातील एका नाटक मंडळीने आमच्या शहरात एक फार मोठा मंडप घालून त्यात आपल्या नाटकांचे कार्यक्रम केले. त्या कंपनीचे कार्यक्रम संपल्यावर त्याच रंगमंचावर आपलेही एखादे नवे नाटक करावे या हेतूने मी श्री हर्ष कृत 'रत्नावली'चा आणि महाकवी शेक्सपियरकृत दुसऱ्या एका नाटकाचा अगदी थोड्या दिवसांत अनुवाद केला आणि त्याच रंगमंदिरात यशस्वीरीत्या त्याचे प्रयोग सादर केले.

१८८० मध्ये विधवाविवाह या विषयावर 'विवेक दीपिका' नावाचे एक तीन अंकी नाटक लिहिले. पण ते पूर्ण करू शकलो नाही.

१८७५ मध्ये महाकवी कालिदासरचित 'अभिज्ञान शाकुंतल' चा तेलुगूत अनुवाद करावयाचे ठरवले. कलकत्ता, मुंबई इत्यादि अनेक प्रदेशात प्रकाशित झालेली छापील नाटके, तसेच एका विद्वान व्यक्तिकडील एक हस्तलिखित मिळवून ते वाचायला प्रारंभ केला. हे सर्व वाचतांना मला असे दिसून आले की नाटकातील श्लोकांमध्ये केवळ पाठभेदच नाहीत तर नवे श्लोक देखील जोडलेले आहेत. कलकत्त्याच्या प्रतीत असे नवे श्लोक घातलेले आढळले. दरम्यान तेलुगू लिपीत लिहिलेले 'शाकुंतल' मद्रासहून प्रकाशित झाले. मी त्याची प्रत मागविली आणि त्याचे रूपांतर १८८३ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले.

'काव्येशु नाटकम् रम्यम्, नाटकेषु शकुंतला' असे आमच्या पूर्वजांनी म्हटले आहे. अशा रमणीय नाटकाचे रूपांतर करणे वास्तविक माझ्यासारख्याचे काम नव्हे तथापि रूपांतर करण्याची आपली इच्छा मी दाबून ठेवू शकलो नाही. माझ्या शक्तिनुरूप मी ते केले. माझे रूपांतर वाचलेल्या विद्वानांनी ते सुंदर उतरले आहे असे मत प्रदर्शित केले. या रूपांतराच्या अनेक आवृत्या निघाल्या, 'मालविका अग्निमित्र' या संस्कृत नाटकाचा अनुवाद हा मी केलेला दुसरा अनुवाद होय. १८८५ मध्ये तो प्रकाशित झाला. 'प्रबोध चंद्रादेह' हे माझे आणखी एक नाटक १८९१ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यात अद्वैतमताचे प्रतिपादन केलेले असून ते एक तत्त्वज्ञानविषयक नाटक आहे. त्याआधी एका नाटच समाजासाठी 'प्रल्हाद' नावाचे एक नाटक लिहून प्रसिद्ध केले. त्यानंतर 'रागमंजिरी' नावाचे आणखी एक नाटक लिहिले. शेरिडिनकृत 'ड्यूयाना' नाटकावर ते आधारलेले आहे. त्याशिवाय १८८५ मध्ये महाभारताच्या विराटपर्वातील 'दक्षिण गोग्रहण' ही कथा नाटचरूपात लिहून प्रसिद्ध केली. 'हरिश्चंद्रोपाख्यान' नाटक प्रथम 'विवेकवर्धनी' मध्ये क्रमशः प्रसिद्ध करून १८८९ मध्ये पुस्तकरूपाने ते छापले. 'सत्यहरिश्चंद्र' हे माझे दुसरे एक नाटक मद्रास विश्वविद्यालयाने पाठचपुस्तक म्हणून नेमले. या पुस्तकाच्या आजवर सात आवृत्त्या निघाल्या आहेत.

१८८९ मध्ये मी 'तिर्यग्विद्वन्महा सभा' आणि 'महारण्य पुराधिपत्यमु' नावाची दोन

प्रहसने लिहिली. माझे मित्र श्री बसवराजु गवर्राजु यांना त्यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नातेवाईकांनी खूपच यातना दिल्या. या लोकांचा दुष्टपणा उघडकीस आणण्याच्या हेतूने यापैकी पहिले प्रहसन लिहले. ते एक टीकाप्रधान प्रहसन होते. हे प्रहसन महाभारतातील 'गृध्रजंबुकोपाख्यान' या कथेच्या आधारे लिहिले आहे. या प्रहसनाला जोडून 'भूषकासूर विजय' लिहिले आणि जनावरांच्या पायांची चित्रे घालून ते छापले. श्री. एलूरि लक्ष्मीनरसिंहम यांनी माझ्यावर भरलेल्या खटल्यात कित्येक विद्वानांनी दिलेल्या साक्षीत ती पात्रे आपणास डोळ्यापुढे ठेवून रंगवलेली आहेत असे म्हटले होते.

'महारण्य पुराधिपत्यमु' नाटकही टीकात्मक आहे. पंचतंत्रातील एका कथेवर ते आधारलेले आहे. समाजातील कुप्रथांचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने मनोरंजक शैलीत ते लिहिले आहे. हे नाटक आपल्याला पुढे ठेवून लिहिले असल्याचा श्री. एलूरि लक्ष्मीनरसिंहम यांनी माझ्यावर आरोप केला.

माझे शेवटचे नाटक 'कल्याण कल्पवल्ली' हे होय. ते शेरिडिन या इंग्रज नाटककाराच्या 'दी रायव्हल्स' नाटकाचे तेलुगू रूपांतर आहे. १८९४ मध्ये ते प्रकाशित झाले.

स्त्रीशिक्षण आणि महिलांच्या अभ्युन्नतिविषयी मला विशेष आस्था होती. स्त्रियांना सध्याच्या अवस्थेत ठेवून पुरूषजातीची उन्नती होणे शक्य नाही असे माझे मत होते. पुरुषांना आपला अभ्युदय साधायचा असेल तर स्त्रियांचीही उन्नती करून त्यांच्यासमवेतच समानरूपाने अभ्युदय साधला पाहिजे. स्त्रियांना अध्ययनासाठी उत्तम साहित्य नाही हे लक्षांत घेऊन १८८३ मध्ये 'सतीहितबोधिनी' नावाची एक मासिक पत्रिका सुरू केली. त्याचवर्षी 'सत्यवती चरित्रमु' नावाचे एक छोटेसे गद्यकाव्य लिहिले. त्यांच्या वाचनाने अनेक स्त्रिया आनंदित झाल्या. कित्येक मातांनी आपल्या मुलीचे नाव 'सत्यवती' ठेवले. हे गद्यकाव्य तामिळ, कन्नड तसेच इंग्रजीत अनुवादित झाले आहे.

१८८४ मध्ये स्त्रियांसाठी 'चंद्रमती चरित्रमु' तसेच १८८७ मध्ये 'सत्यसंजीवनी' हे नीतिबोधपर पुस्तक रचले. या पुस्तकाची कथावस्तू मी एका इंग्रजी पुस्तकावरून (मला त्या पुस्तकाचे नाव आता आठवत नाही) घेतली. पुस्तक वाचताना एका मुलीला आपण खोटे बोलल्याच्या एका प्रसंगाचे स्मरण झाले आणि पुस्तक खाली ठेवून ती रडू लागली.

स्त्रियांवर पुरुषवर्गाने केलेले अत्याचार आणि अन्याय उघडकीस आणण्याच्या हेतूने 'सत्यराज पूर्वदेश यात्रलु'चा पहिला भाग लिहून प्रसिद्ध केला. 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' वाचतांना आपल्या समाजातील अंधविश्वासांवर अप्रत्यक्षपणे झोड उठवणारे असे एक पुस्तक लिहावे असा माझ्या मनात विचार आला. इंग्रजी न जाणणाऱ्या आपल्यापैकी अनेकजणांना कल्पित कथा आणि वास्तविक इतिहास यातील फरक समजत नाही. हे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर सत्यराजूचा पत्ता लिहून कळवा अशी अनेकांची मला पत्रे आली. हे पुस्तक इंग्रजी आणि कन्नडमध्ये अनुवादित झाले आहे.

१८९७ मध्ये स्त्रियांना उपयुक्त असे व्हिक्टोरिया महाराणीचे सचित्र चरित्र प्रकाशित केले. त्यावेळी व्हिक्टोरिया राणी जिवंत होती त्यामुळे त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या काळाचे चित्रण त्यात झालेले नाही.

१८९३ मध्ये चित्रमय 'नीतिकथामंजिरी' चे दोन भाग प्रसिद्ध केले. ते पुस्तक इसापच्या कथांवर आधारलेले आहे. १८८२ मध्ये स्त्रियांना अतिशय आवश्यक असे स्त्रीशरीर स्वास्थ्याची माहिती करून देणारे 'देहारोग्यधर्म बोधिनी' हे पुस्तक प्रकाशित केले. १८८८ मध्येच 'सतीहित बोधिनी' मध्ये छापलेल्या प्रमुख लेखांचे संकलन करून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. त्याआधी 'स्त्रीनीतिदीपिका' नावाचे मुलींना उपयुक्त असे शतक लिहिलेच होते. त्यानंतर 'सत्या-द्रौपदी संवाद' 'मातृपूजा' 'पितृपूजा' इत्यादी स्त्रियांना उपयुक्त अशी पुस्तके तेलुगूमधील सरल छंद द्विपदमध्ये लिहिली.

स्त्रियांच्या मनोरंजनार्थ लॅम्बने लिहिलेल्या शेक्सपियरच्या नाटकांवर आधारलेल्या गद्यकथांपैकी सोळा कथा सुलभ शैलीत लिहल्या. या कथांतील पात्रांची नावे मूळ कथेतीलच असली तरी कथा शक्य तेवढ्या सोप्या आणि सरस बनविण्याचा मी प्रयत्न केला.

जनतेत रूजलेल्या अंधरूढी दूर करण्याकरता निसर्गशास्त्राच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. तेलुगूमध्ये असे ज्ञान देणारे ग्रंथ उपलब्ध नाहीत ही कमतरता दूर करावी या हेतूने १८७८ च्या पूर्वीच मी 'पदार्थ विवेचक शास्त्र' या पुस्तकाचे प्रश्नोत्तर रूपात रूपांतर करून प्रकाशित केले होते. त्यावेळच्या "दि सोशल रिफॉर्म असोशिएशन'चा सदस्य असलेल्या माझ्या एका मित्राने 'पदार्थ विवेचक शास्त्र' या पुस्तकाचे रूपांतर करून ते प्रकाशित करण्यासाठी आवश्यक ती तयारी केली. आणि तसे असोसिएशनला कळवले तेव्हा असोसिएशनने माझ्या अनुमतीने माझ्या मित्राला ते पुस्तक लिहिण्यासाठी नियुक्त केले आणि शरीरशास्त्रावरचे पुस्तक लिहिण्याचे काम माझ्यावर सोपवले. नेमणुकीनंतर २० वर्षे माझा मित्र जिवंत होता पण 'पदार्थ विवेचक शास्त्रा' वरील आपले पुस्तक पूर्ण करण्याआधीच त्याचा मृत्यू झाला.

१८८८ च्या अखेरीला प्रकाशित झालेल्या 'शरीरशास्त्र' या माझ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील थोडासा भाग येथे उद्धृत करता येईल.

"तेलुगू भाषेत प्राकृतिक शास्त्राविषयीचे ग्रंथ नाहीत. ही उणीव दूर करण्याचा संकल्प करून प्रथम या 'शरीरशास्त्र' ग्रंथाने शुभारंभ केला. आणि काही अंशी ती उणीव भरून काढली. शिक्षणखात्याचे तसेच उदार व्यक्तींचे उत्तेजन मिळाले तर अन्य शास्त्रांसंबंधीचे सोप्या भाषेत लिहिलेले सचित्र ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. 'ज्योतिषशास्त्रा' वरील पुस्तक लिहिण्यास याआधीच सुरवात केली आहे. इंग्रजीत उपलब्ध असलेली शरीरशास्त्रासंबंधींची अनेक पुस्तके मी वाचली. काही भाग असा आहे

की ज्यांचे ज्ञान प्रयोगाद्वारेच प्राप्त करता येईल. म्हणून इस्पितळात सहाय्यक डॉक्टर म्हणून काम करणाऱ्या माझ्या एका मित्राला मी विनंती केली. त्याने मला मोठ्या मेहेरबानीने बकरीचे हृदय, श्वासकोश इत्यादि सर्व भाग वेगवेगळे करून दाखविले. त्यामुळे अवयवांचे स्वरूप आणि प्रक्रिया यांचे ज्ञान प्राप्त करता आले.

त्यानंतर काही पैसे देऊन मानवी शरीराचा संपूर्ण सापळा मी मिळवला. माणसाचे हृदय आणि श्वासकोश इत्यादी बारकाईने पाहून त्याची माहिती करून घेणे फार उपयुक्त होईल असे वाटले. म्हणून शवपरीक्षेसाठी एखादे नवीन प्रेत आले की मला कळवा आणि माझ्या समक्ष त्याचे विच्छेदन करून मला त्याची संपूर्ण माहिती सांगा अशी मी इस्पितळाच्या मुख्य डॉक्टरांना विनंती केली. एकदा मुख्य डॉक्टरांनी मला बोलावून माझ्यापुढे ते एक शव कापू लागले. ते पाहून मला चक्कर आली. मी बेशुद्ध होऊन खाली कोसळलो. डॉक्टरांनी माझ्या तोंडावर पाणी मारले आणि मला शुद्ध येताच घरी पाठवले.

या पुस्तकासाठी आवश्यक असलेल्या बावीस चित्रांचे लाकडी ठसे मुद्दाम पैसे खर्च करून कलकत्त्याहून मागविले. या पुस्तकाची पहिली आवृत्ती चार वर्षांत संपली. दुसऱ्या आवृत्तीसाठी पंधरा आणि तिसरीसाठी सोळा नवी चित्रे इंग्लंडमधून तयार करून आणविली. त्याचबरोबर संशोधन करून काही नवी प्रकरणे लिहिली. सध्या या पुस्तकाची चौथी आवृत्ती चालू आहे.

१८९५ मध्ये सचित्र 'ज्योतिषशास्त्र संग्रह' प्रसिद्ध केले. अत्यंत प्राचीन अशा गर्ग तत्त्वज्ञानात असे लिहिले आहे की, "म्लेंछाहियन नास्तेषु सम्यक शास्त्रमिद स्थितम् ऋषिवत्रेपि पूरव्यंते किंपुनः दैवकद्विजाः" आजकालचे लोक स्वतःला सर्वज्ञ मानतात. परंतु त्याच्या उलट पूर्वीचे लोक अतिशय कष्ट करून आपले शास्त्रीय ज्ञान वाढवीत आणि ज्या गोष्टी त्यांना माहीत नसत, त्या परकीयांकडून शिकून घेत व आपला विकास करून घेत. जे लोक स्वतःला संपूर्ण ज्ञानी मानतात आणि दुसऱ्याचे म्हणणे समजून घेत नाहीत त्यांचा कधीच विकास होत नाही. उलट अधःपात होतो. आपण सर्वज्ञ आहोत अशी समजूत आपल्या देशात सर्वत्र पसरलेली आहे. सर्व गोष्टी आपल्या शास्त्रांत सांगितलेल्याच आहेत, आम्हांस इतरांकडून शिकण्याजोगी अशी एकही गोष्ट राहिलेली नाही असा विचार आपल्या देशात वाढत चालला आहे. अशामुळे आमचे शास्त्रज्ञान हळूहळू नष्ट होत गेले आणि आजच्या अवस्थेप्रत आम्ही पोचलो.

'ज्योतिषशास्त्र संग्रह' हे पुस्तक लिहिण्यासाठी इंग्रजीतील ज्योतिषग्रंथांव्यतिरिक्त संस्कृतातील सूर्यसिद्धान्त, सिद्धान्त शिरोमणि, पंचसिद्धान्तिका इत्यादि ग्रंथही वाचले. विद्वानांच्या सहाय्याने रात्रीच्या वेळी ग्रह, नक्षत्रे, इत्यादि प्रत्यक्ष पाहून त्यांचे स्वरूप आणि स्थान यांचेही ज्ञान प्राप्त करून घेतले. मी मद्रासला गेलो असता वेध तसेच

शनिग्रहाची वलये (रिंग्ज ऑफ सॅटर्न) दुर्बिणीतून अवलोकन केली. ग्रह, धुमकेतू, नक्षत्र, सूर्य, चंद्र इत्यादींचा परिचय करून देणारी पन्नासहून अधिक चित्रे इंग्लंडहून मागविली आणि पुस्तकात योग्य जागी ती समाविष्ट केली.

निसर्गशास्त्राचे माझे तिसरे पुस्तक 'जंतुस्वभाव चरित्रमु' आहे. साठ प्राण्यांची चित्रे असलेला त्याचा पहिला भाग १८६९ मध्ये प्रसिद्ध झाला. पुस्तक अतिशय सुबक आणि आकर्षक व्हावे यासाठी पानोपानी प्राण्यांसंबंधीच्या कथा आणि त्यांच्याबद्दलची माणसाची धारणा यांचाही समावेश केला.

अनेक शास्त्रांशी संबंधित अशी संग्रह व्याकरण, काव्यसंग्रह, अलंकार संग्रह, आंध्रतर्क संग्रह इत्यादी पुस्तकेही मी लिहिली. हे ग्रंथ प्राकृतिक शास्त्राविषयीचे नाहीत.

'आंध्र कवुलचरित्रमु' या पुस्तकाला माझ्या सर्व कृतींपैकी सर्वोत्तम कृती म्हणता येईल. या पुस्तकाचा पहिला भाग १८८७ मध्ये प्रकाशित झाला. त्यांत प्राचीन कवींचा परिचय आहे. १४५० पर्यंतचे कवी हे प्राचीन कवी, १४५० ते १६५० मधील कवी हे मध्यकालीन कवी आणि १६५० नंतरचे कवी हे आधुनिक कवी असे या पुस्तकात वर्गीकरण केले आहे. दुसरा भाग मध्यकालांतील कवींसंबंधी आहे. तिसरा भाग आधुनिक कवींविषयी आहे. तिन्ही भागांत मिळून दोनशेहून अधिक कवींचा परिचय करून दिला आहे.

आपल्या देशात पूर्वी कवींची चरित्रे लिहिण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे कवींची चरित्रे लिहिणे अतिशय कठिण आहे. अनेक कवींनी आपली काव्ये त्यांच्या आश्रयदात्या राजांना अर्पण केली आहेत. त्यामुळे त्या राजांच्या कालखंडाच्या आधाराने काही कवींचा जीवनकाळ सुलभपणे समजू शकला. तसेच राजांचा कालखंड शोधण्यासाठी आपल्या येथे वस्तुनिष्ठ इतिहास उपलब्ध नाही. जमिनीचे दान करताना किंवा मंदिर बांधताना राजेलोक शिलालेख लिहवीत आणि त्यांत दान दिलेल्या कालखंडाचा उल्लेख करीत. त्यामुळे राजांच्या कालखंडावरून, त्यांना आपली काव्यकृती अर्पण करणाऱ्या कवींचा कालनिर्णय करता आला. अनेक कवींनी आपली काव्ये आपल्या आराध्य देवतांना अर्पण केली आहेत. अशा कवींचा कालनिर्णय करणे कठिण होते. त्या कवींनी आपल्या काव्यांत आपल्या आधीच्या कवींची स्तुती केलेली असते. त्यामुळे अगोदरच्या कवींची फक्त नावे समजत. अन्य कुठलीही माहिती मिळत नसे. एक मात्र खरे, कवींचा काळ ठरविताना लक्षणग्रंथ काही प्रमाणात उपयुक्त ठरले. पूर्वकवींच्या काव्यांतून रीतिग्रंथकारांनी आपली लक्ष्ये घेऊन उद्धरणांच्या स्वरूपात ती दिलेली आहेत. अशाप्रकारे अनेक अडचणी होत्या तरीही मी अत्यंत मेहनत घेऊन काही मर्यादेपर्यंत कालनिर्णय करण्यात यश मिळविले.

या पुस्तकासाठी सरकारने प्रसिद्ध केलेल्या दक्षिण हिंदुस्थान संबंधीच्या पुस्तकांव्यतिरिक्त मद्रास, म्हैसूर इत्यादी ठिकाणांहून प्रसिद्ध होणारे ताम्रपट तसेच शिलालेख

इत्यादींशी संबंधित पत्रिका, पुस्तके आणि इतिहासग्रंथ मागवून घेऊन वाचले. मद्रासच्या वस्तुसंग्रहालयांतील ताम्रपटही वाचले. ताडपत्रांवरील असंख्य हस्तलिखिते गोळा केली. तंजावरच्या सरस्वती पुस्तक भांडारात जतन केलेली तेलुगू पुस्तके वाचून आवश्यक ती माहिती लिहून घेतली. सतत तीन वर्षे उन्हाळ्याच्या सुट्टीत मद्रासला जाऊन प्राच्य-लिखित पुस्तकांलयात (ओरिएन्टल मॅन्युस्क्रिप्टस् लायब्ररी) दररोज दहा वाजल्या-पासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत बसून ताडपत्रांवरची हस्तलिखिते वाचली आणि आवश्यक विषयांची टिपणे काढली.

एक दिवस ट्राममध्ये बसून समुद्रकिनाऱ्याजवळ उतरलो. तेथून फोर्टपर्यंत पायी चालत गेलो. फोर्टमधील पुस्तकालयांतून आवश्यक ती पुस्तके काढली आणि नोटस् काढण्या-साठी नोटबुक खिशात पाहिले तर ते सापडेना. मी ते ट्रामगाडीत विसरलो होतो. तसाच समुद्रकिनाऱ्यावर गेलो व दुसऱ्या ट्रामगाडीने जाऊन ज्या गाडीने मी आलो होतो ती पकडली आणि कंडक्टरला विचारले. बाकावर एक नोटबुक पडले होते पण आपण ते फेकून दिले असे त्याने सांगितले. नोटबुक फेकले होते ती जागा विचारून घेतली आणि तेथे गेलो. आसपासच्या लोकांजवळ चौकशी केली. नोटबुक आणून देणाऱ्याला पैसे देईन असे प्रलोभनही दाखवले. त्यानंतर नोटबुक आणून देणाऱ्याला २५ रु. इनाम दिले जाईल अशी वृत्तपत्रात जाहिरातही दिली. तरी देखील काहीं उपयोग झाला नाही. महिनाभर मेहनत करून लिहिलेले सारे फुकट गेले. त्यामुळे मला पुन्हा ती पुस्तके वाचून नोटस् काढाव्या लागल्या. अशाप्रकारे अत्यंत कष्ट घेऊन मी कविचरित्रे लिहून संपविली. पुन्हा संशोधन करून पुढच्या आवृत्तीत ती जास्त विस्तृतपणे लिहिता येतील पण मी आता वृद्ध आणि दुर्बल झालो आहे. त्यामुळे माझ्यात तेवढे कष्ट करण्याची शक्ती नाही.

इ. स. १६५० नंतरच्या कवींनी प्राचीन विषयांचा पण वेगळ्या स्वरूपात उपयोग करून आणि प्राचीन गद्य काव्यांचेच अनुकरण करून गद्य साहित्य लिहिले. या कवींनी अर्थसौंदर्याकडे लक्ष न देता शब्दकोषांतून एकेक शब्द निवडून प्रास साधून कविता केल्या. कवितेचे अवयव तोडून भाषारूपी वधूला विकृत आणि मृतप्राय बनवले. या माझ्या टीकेचे स्पष्टीकरण करण्यासाठी मी 'सरस्वती नारद विलाप' नावाची एक छोटीसी पद्य पुस्तिका लिहिली. नारद आपल्या आईला—सरस्वतीला—ओळखू शकला नाही याचे कारण त्याने विचारले तेव्हा सरस्वती आपली दुर्दशा सांगून विलाप करते अशी या पद्याची कथावस्तू आहे. हे काव्य उत्तर-प्रत्युत्तर पद्धतीचे व संभाषण शैली-तील आहे.

याशिवाय इंग्रजी भाषेतील प्रहसनांसारखी पण तेलुगू समाजातील वातावरणाच्या पार्श्वभूमीवर दहा प्रहसने लिहिली. त्यापैकी चार प्रहसने मौलिक होती.

वेळोवेळी झालेल्या सभांमध्ये मी सुमारे ३० लिखित भाषणे वाचली. त्यात पुनर्जन्म, अति बाल-विवाह, ईश्वरोपासना, प्रार्थना, वर्ग, विधवाविवाहाचा इतिहास आणि शंकराचार्य व बसवराजु गवर्राजूचे चरित्र या विषयावरील भाषणे प्रमुख होत. आयत्या-वेळी केलेली भाषणे शंभराहून अधिक आहेत.

सुरुवाती सुरुवातीला माझ्या मित्रांची अशी कल्पना होती की, मी चांगले लिहू शकतो पण मला वक्तृत्व नाही, परंतु मी खरे तर तासन्तास धडाधड भाषणही करू शकतो. तथापि माझी तोंडी भाषणे लिखित भाषणाइतकी प्रभावी नसतात. माझा आवाज टिपेचा नाही. भाषण करताना मला आपले लक्ष श्रोत्यांच्यावर केंद्रित करता येत नाही. उलट माझ्याकडेच माझे लक्ष असते. हे काही चांगल्या वक्त्याचे लक्षण नव्हे. तरी देखील मी संतुलितपणे आणि मनापासून बोलतो आहे असे मात्र श्रोत्यांना निश्चितच प्रतीत होत असले पाहिजे.

१८९४–९५ मध्ये देशातील संस्थानांचा इतिहास सचित्र पुस्तकरूपाने प्रकाशित केला. १८९४ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीत येशू ख्रिस्ताचे चरित्र लिहावयास घेतले. कशी-तरी सहा प्रकरणे संपवून एप्रिल १९१३ त उरलेले पूर्ण केले.

'उत्तम नारी चरित्र'चा पहिला भाग याच काळात प्रकाशित केला. त्यात ग्रेस डार्लिंग कन्या, ऑलियन्स कन्या (जोन ऑफ आर्क) एलिझाबेथ फ्रे, लेडी जेन ग्रे, मेरी कार्पेंटर इत्यादि इंग्रज स्त्रियांच्या चरित्रांचा आणि जोडीला 'उत्तम माता' या विषया-वरील माझ्या एका भाषणाचा समावेश आहे.

राजा राममोहन रॉय यांचे चरित्र अनेक वर्षापूर्वी लिहावयास घेतले होते ते मध्येच अपुरे सोडले. देवदयेने बहुधा मी तेही पूर्ण करून प्रसिद्ध करू शकेन असे वाटते.

१८९२ मध्ये इंग्रज कवी 'गोल्डस्मिथ' लिखित 'ट्रॅव्हलर' या पद्यकाव्याचे 'पथिक विलास' या नावाचे रूपांतर प्रसिद्ध केले.

याशिवाय माझी आणखी अनेक पुस्तके आहेत. कर्नल मॅक्डोनल्डसाहेब शिक्षणा-धिकारी असताना मी सरकारसाठी दुसरे पाठ्यपुस्तक लिहिले. सरकारने पारिश्रमिक म्हणून २५० रुपये दिले. मार्सुडन साहेबांच्या इच्छेनुसार मी मॅकमिलन कंपनीसाठी चौथी, पाचवी आणि सहावी या वर्गांसाठी पुस्तके लिहून दिली. या तिन्ही पुस्तकांचे मिळून एक हजार रुपये मिळाले. या पुस्तकांपैकी एका पुस्तकाचा काही भाग छापताना हरवला. ती छापखानेवाल्यांची चूक होती. तरीही पुन्हा तो भाग मलाच लिहायला सांगण्यात आले. दुसरी प्रत ठेवण्याची मला सवय नाही. म्हणून पुन्हा पैसे देणार असाल तर लिहून देईन असे मी त्यांना म्हटले. तेव्हा प्रकाशकांनी त्या भागाबद्दल परत पैसे देऊन माझ्याकडून तो लिहून घेतला. परमेश्वरकृपेने मला द्रुतगतीने लिहिण्याची शक्ती मिळाली आहे. पद्य असो की गद्य असो एकदाच लिहितो. लिहिलेले पुन्हा बदलून

लिहिण्याची मला सवय नाही. त्यामुळेच मी लिहितो त्यातले अक्षर तितकेसे चांगले नसते असे मला वाटते. माझे हस्तलिखित एकदा हरवले की ते कायमचे असे मानणे भाग आहे.

तेलुगू भाषेचे ऐश्वर्य वाढवायची इच्छा मनात पहिल्यापासून होती. मी माझा सर्व वेळ तेलुगू भाषेच्या विकासासाठी खर्च केला असता तर कदाचित् माझी इच्छा पूर्ण करता आली असती. एकच काम करून मी कधी संतुष्ट झालो नाही. उलट अनेक कामांचा भार आपल्या डोक्यावर घेऊन तो उचलण्याचा मी प्रयत्न करीत आलो, ही गोष्ट आपल्या चांगली लक्षात आलीच असेल. एवढ्या कामांचा भार एकदम आपल्या माथ्यावर घेतल्यामुळे कुठलेच काम समाधानकारकपणे माझ्या हातून घडले नाही. तरी काही अंशी मला माझी इच्छा पूर्ण करता आली.

मी तेलुगूत गद्य लिहावयास प्रारंभ करण्यापूर्वी तेलुगूत गद्य साहित्य नव्हते म्हटले तरी चालेल. सर्व प्रकारच्या गद्य साहित्याची सुरुवात मलाच करावी लागली. तेलुगूतील प्रथम गद्यकाव्य मीच लिहिले. नाटकाचे पहिले गद्य रूपांतर मीच केले. प्राकृतिक शास्त्रावरील पहिले पुस्तक सर्वांत आधी मीच तयार केले. पहिले प्रहसन माझेच होते. पहिले चरित्रही मीच लिहिले. अर्थात पहिला प्रयत्न हा पहिला प्रयत्नच असतो. त्यात दोष असणे अगदी स्वाभाविक आहे. झालेल्या चुका सुधारूनच आपला विकास होऊ शकतो. त्या दृष्टीने माझी पुस्तके भावी पिढ्यांना उत्तम ग्रंथ निर्मितीसाठी काही प्रमाणात सहाय्यक होतील.

अशाप्रकारे मी केवळ नवीन पुस्तकेच लिहिली असे नव्हे, तर मुद्दाम कष्ट घेऊन जुनी हस्तलिखिते देखील प्रसिद्ध केली आहेत. 'शब्द रत्नाकर'चे संपादक श्री बहुजन-हिताय सीतारामाचार्युलु यांनी आपल्या कोशाच्या प्रस्तावनेत काही प्राचीन पुस्तकांच्या संदर्भात असे म्हटले आहे की, या पुस्तकांची नावे ऐकीवात आहेत, पण ती कुठे दिसत मात्र नाहीत. अशी दहाहून अधिक पुस्तके मी मिळविली आणि त्यांच्या संशोधित आवृत्त्या प्रकाशित केल्या. अशी दुर्मिळ पण महत्त्वाची पुस्तके प्रकाशित करण्याच्या मार्गांतील अडचणी या कामाचा अनुभव घेतलेल्यांनाच लक्षात येऊ शकतील.

न छापलेल्या वीसाहून अधिक हस्तलिखितांचे संशोधन करून मी ती छापली आहेत.

३. विश्रामकाल : १९०० ते १९१०

दहा वर्षांच्या या कालखंडाला विश्रांतीचा काळ म्हणता येईल. परंतु खरे म्हणजे प्रत्यक्षात मला कधीच विश्रांती मिळाली नाही. स्वस्थ न बसता सदैव काहीन्काही करीत राहण्याचा माझा स्वभावच आहे. मला तर वाटते ईश्वराने आपल्या अपार अनुकंपेने मला कायमचा श्रमजीवीच बनविले आहे.

पहिल्याप्रथम विधवाविवाह केलेले गोकुलपाटि श्रीरामुलु यांना एक मुलगा झाला. मुलगा चार महिन्यांचा असतानाच श्रीरामुलुने त्याला पालनपोषण करण्यासाठी आमच्याकडे ठेवले. श्रीरामुलुला माझ्याबद्दल अतिशय आदर वाटत असे. त्यामुळे त्याने आपल्या मुलाला माझे नाव ठेवले. त्या मुलाचे शिक्षण आम्हीच केले. तो बी. ए. ही झाला. 'अपुत्रस्य गतिर्नास्ति' या वचनावर माझा कधीच विश्वास नव्हता. एखाद्या मुलाला मुलगा म्हणून सांभाळण्याचे माझ्या कधी मनातही नव्हते. माझ्यापाशी जी काही संपत्ती होती, ती धार्मिक कार्यांत खर्च करायचे ठरविले होते. वीरेशलिंगमशी (त्या मुलाशी) आपल्या भाचीचे लग्न लावून त्याला आमच्या घरीच ठेवायचे माझ्या पत्नीच्या मनात होते. परंतु पुढे माझ्या पत्नीच्या धाकट्या भावाने आपल्या मुलीचा विवाह दुसऱ्याच एका मुलाशी केला. विवाहाच्या बाबतीतला अखेरचा निर्णय वर आणि वधू यांनी स्वतःच केला पाहिजे असे माझे स्पष्ट मत होते. अन्य लोकांचा त्याच्याशी काही संबंध नाही. एकदा वीरेशलिंगम (मुलगा)ने विधवेशी लग्न करावयाची आपली इच्छा बोलून दाखवली होती. त्याने एखाद्या तरुण विधवेशी लग्न केले तर त्याला मद्रासमधील आमच्या दोन घरांपैकी एक द्यावे असा माझ्या पत्नीचा विचार होता. मी त्याला मान्यता दिली. मुलगा विधवाविवाह करणार अशी चिन्हे दिसू लागली. त्याच सुमारास तो एकदा मद्रासला गेला होता. मित्रांबरोबर विचारविनिमय केल्यानंतर विधवाविवाह करावा असे आपणाला वाटत नाही असे तो परतल्यावर म्हणाला. त्यानंतर वीरेशलिंगमचा विवाह म्हैसूरचे चेस्कुमिल्लि वेंकटरत्नमु यांच्या कन्येबरोबर करण्याची माझी इच्छा मी बोलून दाखवली. वेंकटरत्नमु यांनी तिला मान्यता दिली आणि ते आपल्याबरोबर वराला घेऊन गेले. त्यानंतर थोड्या दिवसांनी वीरेशलिंगमने प्रायश्चित घेऊन बेंगलूरमध्ये विवाह केला. विवाहानंतर अद्याप तो आमच्याकडे आलेला नाही.

मद्रासला सातआठ वर्षे राहिल्यानंतर १९०५ मध्ये मी राजमहेंद्रवरमला परत राहावयास आलो. मला आता ते शहर काहीसे नवे वाटू लागले. पूर्वीप्रमाणे आता विद्यार्थ्यांची मदत नव्हती. विद्यार्थ्यांना समाजसुधारणेच्या कामांत गोडी नव्हती. शहरातील प्रतिष्ठितांमधील समाजसुधारणेबद्दलचा उत्साह मंद पडला होता. वकील इत्यादी सर्व नवीनच होते. तरी देखील देशिराजु बापय्यांसारख्या काही निष्ठावंत व्यक्तींशी माझी मैत्री झाली.

राजमहेंद्रवरमला परतताच प्रथम मी श्री. व्हिक्टोरिया बालिका पाठशाला नावाची एक मुलींची शाळा स्थापन केली. दुसरे म्हणजे 'सत्यवादिनी' नावाचे एक इंग्रजी आणि तेलुगु साप्ताहिक १ मार्चपासून सुरू केले. मुलींची शाळा मी माझ्या घरातच १६ जानेवारी १९०५ ला सुरू केली. दोनचार खोल्या माझ्यासाठी ठेवून घराचा उरलेला सर्व भाग शाळेसाठी ठेवला. ही मुलींची शाळा विधवाश्रमातर्फेच सुरू केली होती.

मद्रासमध्ये मी स्थापन केलेला विधवाश्रम मी मद्रास सोडताच बंद पडला. खरे तर तो माझ्याबरोबर राजमहेंद्रवरमला आला असे म्हणणे अधिक उचित होईल. महिलांना शिकता येईल असे एकही विद्यालय राजमहेंद्रवरममध्ये नव्हते. कुलीन स्त्रिया आणि मुली यांच्या शिक्षणाची योग्य सोय व्हावी या विचाराने वरील विद्यालयाची मी स्थापना केली. या विद्यालयात केवळ मुलीच शिकायला येत असत असे नाही. काही लोक आपल्या बायका देखील या शाळेत पाठवू लागले. चार मुली आणि एक वृद्ध शिक्षक यांनी या विद्यालयाचा शुभारंभ झाला. एका पंधरवाड्यात मुलींची संख्या ४९ झाली, वर्षअखेरी ९० झाली आणि पुढील वर्षी तर ही संख्या १५० पर्यंत वाढली. पहिल्या वर्षीच्या अखेरीला तीन अध्यापक आणि अध्यापिका विद्यालयात काम करीत होत्या. पहिल्या वर्षी विद्यालयासाठी मी आपल्या पदरचे १७०८ रु. ९ आणे ९ पै खर्च केले.

मद्रासहून राजमहेंद्रवरमला रहावयास आल्यानंतर ब्रह्मसमाजाचा अनुष्ठानिक ब्राह्मण व्हावे असा विचार मनात आला पण विधवाविवाहाच्या कामात विघ्न निर्माण होईल या भीतीने तसे करण्याचा धीर झाला नाही. परिणामी संकटे सोसावी लागली. पहिल्या विधवाविवाहाचे वेळी शंकराचार्यांनी मला जातिबहिष्कृत केले. त्यावेळी माझ्या बाजूला असलेल्या लोकांपैकी एक एक प्रायश्चित घेऊन माझ्यापासून अलग झाले आणि शेवटी मी एकटा राहिलो. अशा विषम परिस्थितीत मी हिंदू राहिलो तर माझ्याबरोबर कोणी देखील जेवण करायलाही तयार होणार नाही. मी जातिभेद मानीत असल्यामुळे अन्य मतसंप्रदायांतील आणि ब्राह्मणेतर जातींतील लोकांबरोबर जेवण करणे मला शक्य नव्हते. अशा स्थितीत अडचणीशिवाय माझ्या वाट्याला काय येणार ? जानवे घालायचे सोडले असते, जातीभेदाचा त्याग करून अनुष्ठानिक ब्राह्मण बनलो असतो तर शूद्रादिकांबरोबर नव्हे तर ख्रिश्चन, मुसलमान इत्यादींच्या पंक्तीत बसून भोजन करता आले असते.

हळूहळू विधवाविवाह करणाऱ्यांची संख्या वाढत गेली. सहभोजने घडवून आणणारा

एक संघही स्थापन झाला. विधवाविवाह करणाऱ्यांची संख्या वाढली होती. त्यामुळे नवा विवाह पार पाडण्यासाठी आता घराची अडचण राहिली नव्हती. विधवाविवाह एकेका घरी करावा आणि सर्वांना या कार्याचा परिचय व्हावा या उद्देशाने कौता श्रीराम शास्त्रीचा विवाह कुनूरि पुरुषोत्तम यांच्या घरी साजरा केला. दुसरा एक विवाह तुणुक वेंकटचलपतिरावच्या घरी केला.

माझ्या घराला लागून असलेला मोठ्या चुलत्याच्या घराचा हिस्सा खरेदी करून तेथेच विधवाश्रम व पाठशाळा एकत्र आणायचा माझा विचार होता. याच सुमारास १९०५ च्या मे महिन्यात मंगलूरचे रामचंद्रराव आणि त्यांची पत्नी मला भेटायला आले असता एक दिवस संध्याकाळी आम्ही फिरत फिरत एका बागेवरून चाललो होतो. बगिच्याची जागा विधवाश्रम बांधणीसाठी चांगली आहे असे रामचंद्रराव त्यावेळी मला म्हणाले. ती बाग माझे मित्र श्री चलपल्लिरंगय्या पंतुलु यांच्या मालकीची होती. त्यांना भेटून मला एकदा बाग पहावयाची आहे असे सांगितले. तेव्हा एक माणूस तीन हजार रुपयांना बाग मागतो आहे, पण तुम्ही सामाजिक कामासाठी बाग खरेदी करता आहात म्हणून तुम्हाला मी २५०० रुपयांना ती देतो असे ते म्हणाले. अर्बत्तु कंपनीत कधीतरी मी २००० रुपये ठेवले होते. बाग खरेदी करण्यासाठी दोन हजार परत मागितले. या कामात मला ईश्वराचे सहाय्य असावे कारण कंपनीकडे मी माझे पैसे परत मागितल्यानंतर थोड्याच दिवसांनी कंपनीचे दिवाळे निघाले. मद्रासमधील माझी दोन घरे विकून मिळणाऱ्या पैशांतून बागेत विधवाश्रम बांधण्याचे मी ठरवले.

'सत्यवादिनी' साप्ताहिकाच्या वर्गणीदारांकडून मिळणारी वर्गणी वगळता साप्ताहिकाचा बाकी सर्व खर्च मलाच करावा लागे. याच सुमारास पोलवरमुच्या जमीनदाराने दुसरा विवाह केला. पहिल्या पत्नीपासून मूलबाळ न झाल्याने बहुधा त्याने विवाह केला असावा. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे असा विवाह करणे निश्चितच दोषपूर्ण नसले तरी शिकलेल्या लोकांनी दुसरा विवाह करणे निश्चितच दोषास्पद होते. या विवाहाविषयी २० मार्च १९०१ च्या 'सत्यवादिनी' च्या अंकात मी लिहिले :

"पोलुवरमुच्या जमीनदाराने अलीकडेच आपल्या विवेकबुद्धीला तिलांजली देऊन, पहिल्या पत्नीला दुःखात टाकून व तिचा त्याग करून एका दहा वर्षाच्या मुलीशी दुसरा विवाह केला हे ऐकून आम्हास अतिशय दुःख झाले. पूर्वी या जमीनदार साहेबांनी समाजसुधारणेच्या कार्याविषयी आस्था दाखविली होती आणि विधवाश्रमाला मदत म्हणून एक हजार रुपयेही दिले होते. या गृहस्थांची समाजाला मोठी मदत होईल अशी माझी कल्पना होती. आपल्या शिक्षणाचा आणि विवेकबुद्धीचा त्यांना विसर पडेल आणि देशाच्या दृष्टीने अनर्थकारी असे काम ते करतील अशी कल्पनाही मनाला शिवली नव्हती. अलीकडेच हे गृहस्थ आर्य धर्माचे मोठे उद्धारकर्ते बनून 'आर्यमत बोधिनी' या पत्रिकेचे प्रमुख आश्रय-

दाते झाले आहेत. 'आर्यमतबोधिनी' या विवाहाची प्रशंसा कशी काय करते ते आता पहावयाचे ! नीतीला सोडून वागणाऱ्या मोठ्यातल्या मोठ्या सुशिक्षित व्यक्ती देखील मानव म्हणवून घेण्यास अपात्र ठरतात. हातून अपराध घडणे जगावेगळे नाही परंतु झालेल्या अपराधाबद्दल पश्चाताप होऊन आपले चारित्र्य सुधारणे हे शहाणपणाचे लक्षण असते. त्या दृष्टीने जमीनदार साहेबांनी आपल्या प्रथम पत्नीला परत घरी आणून तिच्याशी सन्मानाने वागावे हेच योग्य होय. नवीन पत्नी वयात आल्यावर घरी आली की तिलाही त्यांनी योग्य त्या मानाने वागवावे असाच उपदेश आम्ही त्यांना करू शकतो. जमीनदारांच्या प्रथम पत्नीला दुःखीकष्टी पाहून आपल्या दहा वर्षांच्या पोरीचे जमीनदाराशी लग्न लावून देण्यास जमीनदाराच्या सासऱ्याचा धीर तरी कसा झाला ? या समाजात पैशाच्या लोभाने आपल्या मुलीचा बळी देण्यास देखील लोक तयार होतात."

'आर्यमतबोधिनी' पत्रिकेचे मालक प्रामुख्याने माझी आणि सामान्यपणे सर्वच समाजसुधारकांची निंदानालस्ती करण्यासाठीच अवतरलेले पुरुष होते. माझ्या पत्रिकेत प्रसिद्ध झालेला वरील मजकूर पोलवरमुचे जमीनदार आणि 'आर्यमतबोधिनी'चे मालक या दोघांनाही झोंबला. आर्यमतबोधिनीचे वार्ताहर क्रुद्ध झाले आणि त्यांनी माझी नालस्ती करणारे लेख आपल्या पत्रिकेत प्रसिद्ध केले. मी त्या लेखांना विस्तृत प्रत्युत्तर दिले. त्यातील काही भाग मी येथे उद्धृत करतो.

"अलीकडे विधवाश्रमाला ज्यांनी एक हजार रुपये देणगी दिली अशा एका हितचिंतकाविषयी कृतघ्न होऊन मी त्याची नालस्ती केली असे म्हटले जाते. एखाद्या व्यक्तीला तिचे हित समजावून सांगणे म्हणजे निंदा आहे काय ? हिताच्या गोष्टी सांगणे ही कृतघ्नता कशी काय होते ? एखादा माणूस कोणाचा तरी मिंधा बनून चुकीच्या मार्गावरून जात असल्याचे दिसत असतानाही त्याला वाईट वाटेल या भयाने हिताच्या गोष्टी बोलण्याची हिंमत न दाखवता उलट त्याची प्रशंसा कोणी केली तर त्याला कृतघ्नता म्हणता येईल. त्या वार्ताहराने आपल्या स्वाभाविक दुष्ट बुद्धीचाच परिचय करून दिला आहे. एक हजारच काय, पण दहा हजार रुपयेही कोणी आपली भाटगिरी करण्यासाठी आणि आपल्या दुराचारावर पांघरूण घालावे म्हणून मला दिले तर मी ते पैसे घेणे तृणवत् मानून नाकारीन. मी काही श्रीमंत माणूस नव्हे. माझ्यापाशी जमीनजुमलाही नाही, तरी देखील व्यक्तीगत सुखसोयींना फाटा देऊन मी पैसा जमविला आणि धार्मिक कार्यासाठी त्याच्या दसपट अधिक देऊन टाकला ही गोष्ट सर्वांना माहीतच आहे. जमीनदारसाहेबांनी जे हजार रुपये दिले, ते विधवाश्रमासाठी, माझ्या व्यक्तिगत सुखासाठी नव्हे."

आपण बागेत रहावयास गेलो तरच बागेत सुधारणा करता येईल असे मला वाटू लागले. बागेतील अगोदरच्या घराची दुरुस्ती करून तेथे राहण्याची कल्पना मी पत्नीला

सांगितली. निव्वळ जंगल असलेल्या त्या बागेत राहणे धोक्याचे आहे असे माझ्या पत्नीचे मत पडले. तेथे चोराचिलटांची तर भीती आहेच, पण शिवाय हिवाळ्यात खूप थंडीही असेल म्हणून तेथे रहायला जाण्यात काही अर्थ नाही असे ती म्हणाली. मी नानातऱ्हांनी तिला समजावले. परमेश्वर आपले रक्षण करण्यासाठी असताना साप वगैरेंचे भय बाळगण्याचे कारण नाही, चोराचिलटांपासून रक्षण व्हावे म्हणून कुत्रे पाळू आणि थंडीच्या दिवसात शहरातल्या घरी रहावयास येऊ इत्यादी सांगून तिचे मन वळविले आणि आम्ही बागेत आमचा मुक्काम हलवला. बागेतील हवेमुळे माझा खोकला कमी झाला आणि माझ्या पत्नीची प्रकृती तर फारच सुधारली.

बागेत एक विहीर खोदायला हवी होती. मजजवळ तर केवळ शंभर रुपये होते. विहिरीला निदान एक हजार रुपये लागणार होते. देवावर हवाला ठेवून विहीर खोदण्याचे काम तर सुरू केले. एक दिवस अचानक लंडनहून मला एक पत्र आले. मिस म्यूनिंग यांनी आपल्या मृत्युपत्रात तुमच्या नावे ५० पौंड लिहून ठेवले आहेत आणि ती रक्कम लवकरच पाठविली जाईल असे त्यांत म्हटले होते. मृत्युपत्राची अंमलबजावणी करणाऱ्या कोणा गृहस्थाचे ते पत्र होते. नंतर थोड्याच दिवसांनी मद्रासमधील बेन्नी कंपनीकडून माझ्या नावे ६५९-१-० रुपये आले. त्या पैशांनी विहीरीचे काम पूर्ण झाले. केवळ परमेश्वराच्या असीम कृपेने आणि प्रेरणेनेच मला ही मदत मिळाली. अन्य कोणाच्याही नव्हे.

पूर्वी कधीतरी मॅक्डोनल्डसाहेब मी लिहिलेल्या 'राजशेखर चरित्र'च्या पुस्तकाविषयी मिस म्यूनिंगशी बोलले होते. त्यानंतर एकदा म्यूनिंगबाई मद्रासला आल्या असता माझ्या घरीही आल्या होत्या. माझ्या पत्नीला त्यांनी प्रेमाने आलिंगन दिले होते आणि माझ्या घरातच असलेला विधवाश्रम पाहून त्या अतिशय खुश झाल्या होत्या. राजा राममोहनराय आपली प्रकृती तपासून घेण्यासाठी इंग्लंडला गेले होते, तेव्हा मिस कार्पेंटर यांच्याबरोबर त्यांची सेवा करणाऱ्यांत जी बाई होती त्याच या मिस म्यूनिंग. राममोहन राय मरण पावण्यापूर्वी डॉक्टरांनी त्यांचे केस कापले. ते केस मिस म्यूनिंगने लपवून ठेवले होते. मोठ्या प्रेमाने तिने ते मला भेट म्हणून दिले. ती अमूल्य भेट अजूनपर्यंत मी माझ्याजवळ जपून ठेवली आहे.

१९०५ मध्ये ब्राह्मसमाजाचे प्रचारक बाबु हेमचंद्र सरकार राजमहेंद्रवरमला आले. मला माझ्या वडिलांचा श्राद्धविधी ब्राह्मसमाजाच्या पद्धतीप्रमाणे करावयाची आणि त्याचबरोबर अनुष्ठानही करावयाची इच्छा आहे असे मी त्यांना म्हटले. त्यानंतर दोन महिन्यांनी बापय्यानेही जानवे घालायचे सोडले आणि ब्राह्मपद्धतीप्रमाणे अनुष्ठान व आपल्या पित्याचा श्राद्धविधी करण्याचे ठरवून माझा सल्ला मागितला. मी त्याला तसे जरूर कर असे सांगितले आणि सहभोजनात मीही भाग घेईन आणि लवकरच मी

देखील अनुष्ठान करीन असे आश्वासन दिले. कलकत्त्याचे माझे मित्र पंडित शिवनाथ शास्त्री यांना मी याबाबत पत्र लिहिले. श्राद्धविधी करून सर्वांसमवेत भोजन केले. या बाबतीत त्यांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे मला अतिशय आनंद झाला. माझा मृत्युकाल जवळ आला आहे, म्हणून मी अनुष्ठानव्रत घेण्यापेक्षा कवी आणि समाजसुधारक असलेल्या तरुण बापय्याचे अनुष्ठानव्रत आणि विशुद्ध आस्तिक मत समाजसुधारणेच्या दृष्टीने विशेष उपकारक ठरेल अशी माझी दृढ श्रद्धा होती.

१५ फेब्रुवारी १९०६ रोजी मी माझ्या पित्याचा श्राद्धविधी ब्राह्मधर्मानुसार केला. आणि त्या दिवसापासून जातिभेदाचा त्याग केला. सर्वांविषयी बंधुभाव बाळगणारा अनुष्ठानिक ब्राह्मण मी झालो आहे असे जाहीर केले. तेव्हापासून ख्रिश्चन वगैरे धर्मांच्या व जातीच्या लोकांत मिसळून त्यांच्याबरोबर जेवू लागलो. त्यावेळी विधवाश्रम माझ्या घरीच होता. आश्रमातील विधवा म्हणू लागल्या, तुम्ही कोणत्याही जातीच्या माणसाबरोबर हवे तर जेवा पण जानवे काढू नका, नाहीतर आम्ही आश्रम सोडून जाऊ. मी त्यांना सांगितले, तुमच्यासाठी मी १५ दिवस जानवे घालीन. ज्यांना रहावयाचे असेल त्यांनी रहावे. वाटल्यास तुमची दुसऱ्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करीन. दोन ब्राह्मण विधवा माझे घर सोडून निघून गेल्या. एक शूद्र विधवा माझ्या घरी राहिली. १३ दिवसानंतर मी जानवे काढून फेकून दिले आणि तसे जाहीर केले.

माझ्या बागेला लागून असलेली आणखी एक बाग श्री चल्लपल्लि रामय्या यांच्याकडून ६०० रुपयांना खरेदी केली. ही बाग रस्त्यालगत होती. विधवाश्रम याच बागेत बांधण्याचे ठरवले. याच सुमारास श्री मुलुट्ल अच्युतरामय्या मला भेटायला आले. मी त्यांना दोन्ही बागा दाखवल्या आणि नव्या बागेत अनाथाश्रम आणि विधवाश्रम बांधण्याची कल्पना सांगितली. तेव्हा मी न सांगताच दोन्ही घरे बांधून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. अच्युतरामय्या राजमहेंद्रवरम कॉलेजातील माझे विद्यार्थी होते. त्यांना माझ्याविषयी विशेष आदरभाव होता. मी मद्रासला रहात असताना एकदा राजमहेंद्रवरमला आलो असता त्यांनी मला आपल्या घरी जेवायला बोलावले. माझ्या घरापासून आपल्या घरापर्यंत वाजंत्री वाजवत मला जेवायला नेण्याची त्यांची इच्छा होती. मी त्याला विरोध केला. तेव्हा घोडागाडीतून त्यांनी मला आपल्या घरी नेले आणि कित्येक मित्रांसमवेत मेजवानी दिली. जेवणानंतर स्तुतिपर भाषण केले. आणि माझ्या गळ्यात हार घालून आपल्याबरोबर माझा फोटो काढला. घरासमोर फटाके उडवले. मी परत घरी जायला निघालो तेव्हा घरापुढे वाजंत्री दिसली नाहीत. पण माझी गाडी मुख्य रस्त्यावर आली तेव्हा गाडीपुढे वाजंत्री लावण्यात आली आणि संबंध रस्ताभर दारूकाम आणि फुलझड्या लावल्या.

अच्युतरामय्याची देणगी मी कृतज्ञतापूर्वक स्वीकारली आणि त्याला धन्यवाद दिले.

त्याने तात्काळ कामाला आरंभ केला आणि नव्या बागेतील सध्याचा विधवाश्रम बांधला. विधवांना राहण्यासाठी दहा खोल्या, चार वर्णांच्या लोकांसाठी चार स्वयंपाकघरे तसेच आश्रमाच्या व्यवस्थापकासाठी तीन मोठ्या खोल्यांचे घर एवढी ही वास्तू आहे. विहीर, न्हाणीघर, संडास आणि भिंतीला कुंपण बांधण्यासाठी मी सुद्धा एक हजार रुपये त्या वास्तूवर खर्च केला. या वास्तूसाठी एकूण पाच हजार रुपये खर्च झाले असावेत.

मी अनुष्ठानिक ब्राह्मण झाल्यानंतर चार महिन्यांनी माझ्याविरुद्ध प्रचार करण्याच्या हेतूने 'हिंदूदेशभिवर्द्धनी' नावाचे एक पाक्षिक काढण्यात आले. शहरातील प्रमुख व्यक्तींच्या प्रोत्साहनाशिवाय पत्रिकेच्या मालकाला ही पत्रिका काढणे शक्यच नव्हते. तो दरमहा ७–८ रुपये मिळवणारा एक सामान्य शिक्षक होता. नव्यानेच राजमहेंद्र-वरमला आला होता. शिवाय मला तो ओळखत नव्हता की मी त्याला ओळखत नव्हतो. या पत्रिकेच्या पहिल्याच म्हणजे १ जुलै १९०६ च्या अंकात लिहिले होते, विधवाश्रमातील विधवा वाईट चालीच्या आहेत आणि खुद्द आश्रमातच व्यभिचार चालतो असे लोक सर्वत्र बोलत असल्याचे ऐकीवात आहे.

ही बातमी पाहताच पत्रिकेच्या मालकाने, क्षमा मागावी नाहीपेक्षा कायद्यानुसार त्याच्यावर आरोप दाखल करण्यात येईल अशी वकिलामार्फत नोटीस पाठवली. नोटीस घेऊन पत्रिकेचा मालक शामराव, न्यापति सुब्बाराव पंतुलु यांच्याकडे सल्ला विचारायला गेला तेव्हा त्यांनी त्याला दटावले आणि क्षमा मागण्याचा सल्ला दिला. तरी देखील शामरावच्या मागे असलेल्या लोकांनी त्याला सुब्बारावच्या सल्ल्याप्रमाणे माफी मागू दिली नाही.

मी मॅजिस्ट्रेट कोर्टात खटला दाखल केला. माझ्या विरोधकांनी सुरुवातीला माझ्या प्रतिस्पर्ध्याला १०० रु. देऊन वकिलाची व्यवस्था केली. परंतु नंतर त्या लोकांनी आपले नाव कुठे जाहीर होऊ नये म्हणून शामरावला त्या दलदलीत गुंतवून आपण स्वत: मागे हटले. मॅजिस्ट्रेटने शामरावला एक हजार रुपये दंड आणि १८ महिने तुरुंगवासाची सजा फर्मावली. पण या प्रकरणात एका निरपराध माणसाला पुढे ढकलून खरे अपराधी मात्र निसटले असे काही विचित्र घडले होते. शामरावाने वरील निकालावर विभागीय न्यायाधीशाच्या कोर्टात अपील केले. त्या कोर्टाने दंडाची रक्कम ३०० रु. कमी केली. आणि तुरुंगवासाची सजा मात्र कायम ठेवली.

१५ डिसेंबर १९०६ रोजी माझ्या कामाला पाठिंबा असणाऱ्या मित्रांचा मी एक मेळावा बोलावला. आणि त्यात माझी विविध कार्ये चालविण्यासाठी 'हितकारिणी समाजमु' नावाची एक संस्था स्थापन केली. या संस्थेचे सुरुवातीस ३६ सदस्य होते. पुढे ही संस्था रजिस्टर करण्यात आली. विधवाश्रम, अनाथ बालकाश्रम, शाळा आणि शिल्पशाळा स्थापन करून त्या चालविणे असा ह्या संस्थेचा मुख्य उद्देश होता. एकूण

साधारण सदस्यांपैकी ९ सदस्य कार्यकारिणी समितीत घेण्यात आले. १९०७ मध्ये या संस्थेचे नियम तयार करण्यात आले. नास्तिकाला या संस्थेचे सदस्य होता येणार नाही असाही एक नियम त्यात होता. त्यामुळे हंगटूरि श्रीरामुलूचे तसेच आणखी एका गृहस्थाचे सदस्यत्व रद्द झाले. संस्थेचे कार्य अखंडपणे चालावे म्हणून मी आपली सारी संपत्ती जवळजवळ ४३,५०० रु. संस्थेला अर्पण केली. या संपत्तीचे विश्वस्तपत्रही २ मे १९०८ ला रजिस्टर करून टाकले. विश्वस्तपत्रानुसार पुस्तकाच्या विक्रीचा पैसा सोडून माझ्या हयातीत माझ्या अन्य कोणत्याही मालमत्तेवर मी माझा अधिकार ठेवला नाही. मद्रासमधली घरेही विकून टाकली आणि त्याचे ३५०० रुपये ही देऊन टाकले.

याचवेळी बंगालमध्ये स्वातंत्र्य आंदोलनाचे वारे वाहू लागले आणि त्यामुळे इतर सामाजिक कामे मागे पडू लागली. बिपिनचंद्र पाल हे एक प्रमुख बंगदेशीय नेते राजमहेंद्रवरमला आले. त्यांची स्वातंत्र्यासंबंधी काही भाषणेही झाली. त्यांच्या भाषणांमुळे तरूणांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात देशभक्तीची भावना उचंबळून आली. तरूणांचे गट क्षणिक वीरावेशात केस फिस्कारून 'वंदेमातरम्'च्या घोषणा देत मन मानेल तसा धिंगाणा घालू लागले. शाळांतील विद्यार्थी देखील या आंदोलनात वहात गेले. अभ्यासाची हेळसांड आणि अध्यापकांची हेटाळणी केली म्हणून अनेक विद्यार्थ्यांना शाळेतून हाकलण्यात आले.

मी आणि माझ्याबरोबर बागेत राहणारांच्यात राजकारणावरून वारंवार वादविवाद होऊ लागले. त्यांचे माझे विचार जुळत नसत. इंग्रजांच्या राज्यामुळे हिंदुस्थानला अनेक फायदे होत आहेत असे मी सांगत असे. माझ्या या अपराधाखातर कारुमूरि कामराजुने तर माझ्याशी बोलणेच टाकले. बागेत राहणाऱ्या आमच्या समाजातील लोकांची ही कथा! मग अन्य तरूणांबद्दल बोलायलाच नको. मला देशाचे प्रेमच नाही आणि त्यांच्या संगतीत उठायबसायलाही मी अयोग्य आहे असे त्यांना वाटे. त्यामुळे ते मला भेटायचेही टाळीत.

स्वराज्याच्या ध्येयाविषयी मला आस्था किंवा आदर नव्हता असा याचा अर्थ नाही. ७४ वर्षे 'विवेकवर्धनी'चा संपादक म्हणून काम करीत असताना मी त्यात राज्यशासनासंबंधी अनेक लेख लिहले आहेत. १८८७ मध्ये हैंदव देशीय महासभेचे अधिवेशन मद्रासमध्ये भरले तेव्हा प्रतिनिधी म्हणूनही माझी निवड झाली होती. धर्म, नीती, आचार इत्यादींत सुधारणा झाल्याशिवाय केवळ राज्यशासनाचे अधिकार मिळाल्याने देशाची प्रगती होईल, असे मला कधीच वाटले नाही. देशाची उन्नती सर्व क्षेत्रांत समान स्वरूपात झाली पाहिजे असे माझे मत आहे. इंग्रजांच्या राज्यात उणीवा नाहीत असे मला म्हणावयाचे नाही. त्यांच्या राज्यात देखील अनेक दोष आहेत.

बिपिनचंद्र पाल यांच्या भाषणाने लोकांमध्ये जागृत झालेले देशप्रेम केवळ एकांगी

होते. कोणी इंग्रजी राजवटीच्या बाबतीत एखादी चांगली गोष्ट बोलला तर त्याची नालस्ती होऊ लागली, येथवर त्यांच्या भाषणाचा प्रभाव पडला. इंग्रजांची निंदा करणाऱ्या अशिक्षित आणि चरित्रहीन माणसालादेखील देशभक्त मानले जाऊ लागले. प्रार्थना समाजाचा एक प्रमुख सभासद नाळमु कृष्णाराव याने राजद्रोही आणि खुनी खुदीराम बोसचा फोटो आणून माझे नाव असलेल्या नगरभवनात लटकावला. तो काढून टाक म्हणून नानाप्रकारांनी आम्ही सांगितले. पण त्याने ऐकले नाही. या घटनेवरून माझ्या विरोधकांनी मी राजद्रोही मंडळींचे नेतृत्व करीत आहे अशी कलेक्टर वगैरे युरोपीय अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. तेव्हा खुदीरामचा फोटो वाचनालयात का लावला त्याचा खुलासा करा असे जिल्हा कलेक्टरने मला पत्र पाठवले. नाळमु कृष्णारावने मूर्खपणाने ते चित्र वाचनालयात टांगले होते, पण नंतर ते काढण्यात आले आहे आणि वाचनालयाला माझे नाव असले तरी त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही असे मी कलेक्टरला स्पष्टपणे कळवून टाकले.

प्रार्थना समाजाच्या काही सदस्यांना समाजाच्या मूलभूत धार्मिक सिद्धान्ताचाही विसर पडू लागला होता. सर्व लोकांबद्दल सहोदरभाव हा त्यापैकी एक सिद्धान्त होय. या सिद्धांतानुसार इंग्रज लोक देखील आमचे भाऊच होत म्हणून जो इंग्रजांची योग्य किंवा अयोग्य नालस्ती करतो, त्यांना ठार मारतो त्याला देशभक्त महात्मा म्हणणे दुःखद होय.

१८ एप्रिल १९०८ मध्ये मी आंध्र परिशुद्धास्तिक सभेतील भाषणात म्हणालो होतो, "खऱ्या देशप्रेमाऐवजी अनेकांना एकप्रकारच्या दुरहंकाराने व्यापले आहे. आमच्या देशात दुराचाराची देखील सदाचार म्हणून प्रशंसा केली जात आहे. यामुळे देशाच्या खऱ्या प्रगतीला खीळ बसत आहे. स्वार्थत्यागाची वेळ आली की, दुरहंकारी बडबडे अदृश्य होतात, स्वतःला परिशुद्धास्तिक मनाचे म्हणवणाऱ्यांनी देशभक्तीच्या किंवा अन्य सत्कार्याच्या नावाखाली इतरांचा द्वेष करता कामा नये."

वरील विधानाबद्दल अनुष्ठानिक ब्राह्मणांपैकी एकाने त्याच सभेत मला 'भेकड' ही नवीन पदवी दिली.

मी अनुष्ठानिक ब्राह्मण झालो या गोष्टीचा फायदा घेऊन मोठेपणा मिळवावा असे विधवाविवाह केलेल्या राजमहेंद्रवरममधील काहींना वाटले. या उद्देशाने त्यांनी एक कार्यक्रम ठरविला. त्यांनी माझ्या सन्मानार्थ विविध प्रांतांतील विधवाविवाह करणाऱ्या लोकांची राजमहेंद्रवरम येथे २७ डिसेंबर १९०७ रोजी एका थिएटरात सभा बोलावली. सभेला आलेल्या लोकांशी तिरूमेल्ल वेंकट सुब्बाराव आणि पुल्लाभट्ल गवरय्याशास्त्री यांनी चर्चा करून आणखी एक नवा समाज स्थापन करण्यासाठी त्यांना राजी केले.

या सभेसाठी मच्छलीपट्टणमहून आलेले काही लोक माझ्या घरी उतरले होते. सभेला

आलेल्या इतर लोकांबरोबर ते जेवायला बसले तेव्हा त्यांना पंक्तीत बसू न देता घरी परत पाठवले. कारण ते माझ्या, म्हणजे अनुष्ठानिक ब्राह्मणाकडे उतरले होते. माझ्या सन्मानाचे निमित्त करून बोलावलेल्या सभेला आलेल्यापैकी काहींना अशाप्रकारे अपमानित करण्यात आल्यामुळे मी अतिशय संतापलो. तेव्हा दुसऱ्या दिवशी या लोकांनी मला जेवणाचे निमंत्रण दिले. आपणासह सर्वांचा फोटो काढावयाची आमची इच्छा आहे, तेव्हा कृपया आपण हजर रहावे असे निमंत्रण पाठविले. माझे रक्त तापले. मी त्यांना तोंडावर सांगितले, अशा लोकांसमवेत फोटो काढून घेणे मी अपमानास्पद समजतो. अशा लोकांच्या पंक्तीत बसून जेवण्याऐवजी चांडाळांच्या पंक्तीत भोजन करणे अधिक सन्माननीय आहे असे मला वाटते.

या लोकांनी आणखी एक नवा विधवाविवाह समाज स्थापन केला याचा मला राग नाही. या कामासाठी जितक्या जास्तीत जास्त संस्था निघतील, जितके अधिक विवाह होतील तितका मला अधिक आनंदच होईल. या समाजाच्या स्थापने आधी तिरूमेल्ल वेंकट सुब्बाराव आणि आणखी एका व्यक्तीने मला त्याबाबत सल्ला विचारला होता. त्यावेळी मी त्यांना सुचविले होते की तुम्ही हितकारिणी समाजाचेच सदस्य व्हा. विधवाविवाह करणाऱ्यांची, समाजाचीच एक वेगळी उपसमिती बनवून तिच्यामार्फत यापुढील विधवाविवाह पार पाडा. माझ्याकडून पैसे घेऊन आपला मतलब साधण्याचा त्यांचा उद्देश होता. हितकारिणी समाजाच्या देखरेखीखाली अधिक संख्येने विधवाविवाह घडवून आणावेत असा हेतूच नव्हता. म्हणून हितकारिणी समाजात सामील न होता त्यांनी एका समाजाची स्थापना करून वर्गणी जमा केली. पुढे त्या समाजाचे आणि त्या पैशाचे काय झाले हे कोणालाच माहीत नाही. या मंडळींनी अजूनपर्यंत एकही विधवाविवाह घडवलेला नाही. आमच्या विधवाश्रमात विधवा स्त्रिया अखंडपणे आश्रयासाठी येत असतात आणि दरवर्षी पाचसहा विवाह तरी होतात.

मुलींच्या शाळेतील चार शिक्षिका आणि एक शिक्षक यांच्या पगारावर प्रामुख्याने खर्च होत होता. पण एवढे करूनही जेवढे काम व्हायला हवे तेवढे होत नव्हते. मोठ्या मुष्किलीने दोन मुली सातव्या इयत्तेत आल्या. त्यांत एक कुमारी होती व दुसरी बालविधवा. पुढे कुमारी मुलीचे लग्न होऊन ती सासरी गेली. सुनेला शिकवतो म्हणून आपले नातेवाईक आपली बदनामी करतात म्हणून तिच्या सासऱ्याने तिचे शिक्षण बंद केले. या दोघी मुलींना माध्यमिक परीक्षेपर्यंत शिकवावे असा माझा प्रयत्न होता. पण तो व्यर्थ ठरला. मुलींची ही प्राथमिक शाळा हळुहळू हायस्कूलपर्यंत करण्याचा मी निश्चय केला होता. पण सुरुवातीलाच विकल्प निर्माण झाला. केलेला सारा खर्च व्यर्थ गेला असे माझ्या मनात आले. आपल्या समाजात मुलींचे शिक्षणाचे वय झाले तरी त्यांचे आईबाप त्यांना कधी शाळेत घालीत नाहीत. खरे तर प्राथमिक शिक्षणासाठी

सरकारचे बालिका विद्यालय आणि ख्रिश्चन बालिका पाठशाळा अशा दोन शाळा शहरात असताना या शाळेची काहीच आवश्यकता नव्हती. पुढे कधी मुलींचे हायस्कूल काढायचे झाले तर ते अनाथाश्रम स्थापन करून त्यातील मुलींना घेऊनच काढता येईल, अन्यथा नाही या विचाराने मी एक अनाथ मुलींसाठी आश्रम स्थापन करावयाचे ठरवले. उत्तम चारित्र्याच्या शिक्षिका मिळणे एकंदर कठीणच. आमच्या मुलींच्या शाळेतील शिक्षिका सदैव एकमेकींशी भांडणतंटा करीत. एकमेकींच्या चोरट्या संबंधांविषयी कागदावर लिहून ते कागद शाळेच्या किंवा घराच्या भिंतीवर अथवा रस्त्यावरच्या कंदीलाच्या खांबावर चिकटवीत. त्यामुळे मी आमची मुलींची शाळा १९०८ च्या उन्हाळ्याच्या सुटीनंतर आमच्या बागेतील रामचंद्ररावांच्या घरात हालविली. भांडणे करणाऱ्या शिक्षिकांना कामावरून काढून टाकले. विधवाश्रम याच घरात होता. तेथील विधवांना शिकविण्यासाठी वृद्ध शिक्षकांना नेमले. अनाथ मुलींसाठी आश्रम काढण्याची कल्पना मात्र मी सोडून दिली. कारण पीठापुरमचे राजे असा आश्रम स्थापन करणार होते.

मद्रासहून परत आल्यानंतर माझ्या मनात पुन्हा आस्तिक पाठशाळा स्थापन करावी असा विचार उद्भवला. श्री. चिनकर्मि लक्ष्मीनरसिंहम हे गेली काही वर्षे शहरात एक माध्यमिक शाळा चालवीत होते. ही शाळा त्यांनी हितकारिणी समाजाला देऊन टाकावी अशी मी त्यांना विनंती केली. त्यांनीही मोठ्या आनंदाने तिचा स्वीकार केला. आणि टेबले, बाके, नकाशे, चित्रे इत्यादी साहित्यासह त्यांनी १९०७ मध्ये ती शाळा आमच्या स्वाधीन केली. या शाळेचे हायस्कूलात रूपांतर करावयाची माझी इच्छा होती. शाळा तपासनीस येटस्साहेब आणि सरकारी कॉलेजचे प्रिन्सिपल हंटरसाहेब यांच्याशी मी याबाबत बोललो आणि त्यांचे मन वळविले. शाळेची इमारत बांधण्यासाठी किल्ल्याजवळच्या एका घराची जागा खरेदी केली. आणखी जागेसाठी या घराच्या आजूबाजूच्या घरांच्या किंमतीची चौकशी केली.

आमच्या शहरात जुनी दोन हायस्कुले होतीच. एक ख्रिश्चनांचे आणि दुसरे सरकारी. आमचे हायस्कूल निघाले की आपल्या शाळेला स्पर्धा निर्माण होईल या विचाराने प्रशिक्षण विद्यालयाचे (टीचर्स ट्रेनिंग) उपमुख्याध्यापक मल्लादि वेंकटरत्नमु घाबरले. आणि त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यामार्फत आमच्या पाठशाळेला मान्यता देऊ नये अशी हंटरसाहेबांना विनंती केली. हंटरसाहेब सरकारी प्रशिक्षण विद्यालयाचे प्रिन्सिपलही होते. आमच्या शाळेला कृपया हायस्कूलचा दर्जा द्यावा अशी आम्ही पत्रद्वारे शिक्षणाधिकाऱ्याला विनंती केली तेव्हा हंटरसाहेबांनी आमच्या शाळेला हायस्कूल म्हणून मान्यता देण्यास आपला विरोध व्यक्त केला. त्यामुळे सरकारची मान्यता मिळाली नाही.

तेव्हा मी मद्रासला जाऊन हायस्कूल स्थापनेमागील उद्देश हंटरसाहेबांना समजावून

सांगितला. आम्ही दाखवू त्या उणीवा दूर करण्याच्या अटीवर त्यांनी हायस्कूल काढण्यास मान्यता दिली. मधल्या काळात शहरातील काही लोकांनी, मी पैसा कमावण्याच्या हेतूने हायस्कूल स्थापन करीत आहे आणि आपल्या नातेवाईकांना व मित्रांना नोकऱ्या देणार आहे सबब शिक्षणखात्याने हायस्कूलला मान्यता देऊ नये, दिली तर विद्यार्थी संतापतील असे सांगून हंटरसाहेबांचे कान भरले. मी हंटरसाहेबांशी समक्ष बोललो व त्यांच्या मनातील माझ्याविषयीचा किंतू दूर केला. हायस्कूलचा कारभार पाहण्यासाठी एक उपसमिती स्थापून तीत आपणाला घेणार आहोत असे मी हंटरसाहेबांना सांगितले. शेवटी साहेब उपसमितीचे सदस्यत्व स्वीकारण्यास तयार झाले. एक उपसमिती नेमली. कॉलेजचे प्रिन्सिपल, शाळांचे सहाय्यक तपासनीस, मुख्याध्यापक, मी व हितकारिणी समाजाचे आणखी दोन सदस्य तसेच काकिनाडा कॉलेजचे प्रिन्सिपल वेंकटरत्नमु नायुडु एवढे त्या समितीचे सदस्य होते. त्यानंतर वेंकटरत्नमु नायुडु यांनी संस्थेची नियमावली तयार केली आणि ती हंटरसाहेबांना दाखवून मी त्यांची मान्यता घेतली. पुढे दुसऱ्या वर्षी अनुक्रमे दहाव्या व अकराव्या इयत्तांना देखील मान्यता दिली आणि अशारीतीने आमच्या शाळेचे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले.

शाळेच्या जागेबाबत थोडेसे सांगायचे आहे. पिठापुरम संस्थानाचे अधिपती श्री राजाकुमार महिपति सूर्याराव बहादुर यांनी प्रारंभीच शाळेची इमारत बांधण्यासाठी साठ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या या आर्थिक मदतीने इमारत बांधण्याच्या कामाला प्रारंभ केला. इमारतीची रूपरेखा तयार करून तिला शाळातपासनीस येटस्-साहेब यांची मंजुरी घेतली आणि सर्व प्रकरण शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठविले. त्यांची मान्यता मिळेल असे वाटले पण पुन्हा त्याही बाबतीत अडचणी येऊ लागल्या.

त्यावेळी 'वंदेमातरम्'चे आंदोलन साऱ्या देशात पसरले होते. अजाण विद्यार्थी तसेच मवाली लोक युरोपियन लोक बाजारातून जाताना दिसले की 'वंदेमातरम्'च्या घोषणा देत. त्यांच्या दृष्टीने इंग्रजांबद्दलची आपल्या मनांतील चीड प्रगट करण्याचा तो मार्ग होता. शाळेची इमारत युरोपियन वस्ती असलेल्या भागात बांधण्याची परवानगी दिलीत तर विद्यार्थीवर्ग तेथे जमा होऊन युरोपवासियांची टर उडवतील असे सांगून माझ्या काही विरोधकांनीं डेप्युटी कलेक्टर ब्रेइड वुडसाहेब यांचे कान भरले. तेव्हा युरोपियन लोकांच्या घराजवळील जागेत शाळेची इमारत बांधण्यात येऊ नये असे मला सांगण्यात आले. इमारतीसाठी नेमलेल्या उपसमितीचे आपण सदस्य म्हणून यावे अशी मी वुड-साहेबांना अगोदरच विनंती केली होती. त्यावर शाळेची इमारत उपरोक्त भागात बांधणार नसाल तरच आपण उपसमितीचे सदस्यत्व स्वीकारू असे त्यांनी सांगितले. आपण खुशाल उपसमितीचे सदस्य झाला नाहीत तरी हरकत नाही, उपरोक्त भागातच मी शाळेची इमारत बांधणार असे मी उत्तर दिले. शेवटचा उपाय म्हणून शाळेची

इमारत इंग्रजांच्या वस्तीजवळ बांधण्याची परवानगी देता येणार नाही असे वुडसाहेबांनी कळविले आणि तसे पत्र जिल्हा कलेक्टरमार्फत शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठवले. वुडसाहेबांनी सांगितलेल्या कारणासाठी इंग्रज वसाहतीजवळ शाळा बांधता येणार नाही असे न म्हणता मुलांना खेळण्यास पुरेशी जागा नसल्याचे निमित्त सांगून शिक्षणाधिकाऱ्याने शाळा बांधण्यास परवानगी नाकारली आणि खेळण्यासाठी मोठे मैदान असेल अशा जागी शाळा बांधावी असे सुचविले.

आता शाळेसाठी नवी जागा शोधणे जरूर होते. इन्नीसपेट भागात सहा एकर शेत-जमीन विकत मिळत होती. मी ती १२०० रुपयात खरेदी केली. त्या शेतजमिनीच्या मधून रेल्वेमार्ग जात होता. त्यामुळे रेल्वेमार्गाच्या फक्त एका बाजूची जमीन शाळा बांधण्याच्या दृष्टीने उपयुक्त होती. रेल्वेमार्गाच्या दुसऱ्या बाजूची साडेचार एकर जमीन, दोन्ही बाजूंना जोडणारा रस्ता नसल्याने खेळाच्या मैदानासाठी उपयोगी नव्हती. त्या-नंतर रेल्वे मार्गाच्या एका बाजूच्या जमिनीला लागून असलेली दुसरी दीड एकर जमीन शाळेसाठी १५० रुपयांना घेतली.

शाळेची इमारत आपणच बांधायची असे मी ठरवले. विटा, चुना, दगड, लाकूड इत्यादी साहित्य शक्य तेवढे स्वस्तात खरेदी केले आणि कामाला आरंभ केला. शाळेची इमारत २० हजार रुपयांत बांधावी असा प्रथम विचार होता, परंतु ४० हजार रुपयांत अधिक सुंदर इमारत बांधता येईल असे मागाहून मनात आले. माझी ही इच्छा फलद्रुप व्हावी म्हणूनच की काय कल्पतरूप्रमाणे पिठापुरमच्या राजाने ४० हजार रुपये देणगी देण्याची तयारी दाखवली. त्यामुळे आम्ही ४० हजारांऐवजी ६० हजारांची इमारत बांधली. खरोखरच देवाच्या असीम कृपेमुळे आणि राजाच्या मदतीमुळेच आमच्या शाळेची इमारत साऱ्या शहराला एखाद्या अलंकाराप्रमाणे ललामभूत ठरेल अशी बांधता आली. ही इमारत पाहण्यासाठी एक एक्झिक्युटिव्ह इंजीनियर आले असता त्यांनी विचारले, "ही इमारत बांधण्यासाठी १। लाख रुपये तरी लागले असतील नाही ?"

शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर हजार माणसे बसतील असे दोन विशाल हॉल आहेत. विश्रांतीच्या वेळी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आणखी एक मोठा हॉल आहे. या शाळेची दोन वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे मुलांबरोबर मुलींनाही या शाळेत मॅट्रिकपर्यंत शिक्षण दिले जाते. मुलांच्या शाळेत मुलींना प्रवेश देण्याच्या आमच्या या निर्णयाच्या औचित्या-बद्दल काही लोकांनी संशय व्यक्त केला. या संशयात थोडेसे तथ्य आहे. पण स्त्रियांचा आदर करण्याची वृत्ती पुरुषांत लहानपणीच बाणवली पाहिजे, या विचाराने मुलांबरोबर मुलींनाही शाळेत प्रवेश देण्याचे ठरवले. साधारणपणे आठव्या इयत्तापर्यंत मुली मुलांबरोबर शिक्षण घेऊ शकतात. आमच्या शाळेत मुलींना फुकट शिक्षण दिले जाते. आमचे पाहून काकिनाडा कॉलेजनेही आपल्या कॉलेजांत मुलींना प्रवेश द्यायला सुरुवात केली.

अस्पृश्य मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो हे आमच्या शाळेचे दुसरे वैशिष्ट्य. म्हणजे गेली काही वर्षे ५–६ अस्पृश्य मुले आमच्या शाळेतील वरच्या वर्गात शिकत आहेत. स्पृश्य जातीची मुले अस्पृश्य मुलांबरोबर बंधुभावाने वागत असतात. मुलींप्रमाणेच अस्पृश्य मुलांनाही फुकट शिक्षण दिले जाते. ख्रिश्चनधर्मीय लोकांनी चालविलेल्या विद्यालयांमध्ये ख्रिश्चनेतर अस्पृश्य मुलांना प्रवेश दिला जात नाही असे काही दिवसांपूर्वी कळले तेव्हा मला आश्चर्य वाटले.

२७ नोव्हेंबर १९११ रोजी शाळेच्या इमारतीचा गृहप्रवेश समारंभ मोठ्या थाटामाटात साजरा झाला. कलकत्त्याच्या सिटी कॉलेजचे प्रिन्सिपल श्री. हेरंब चंद्रमैत्र हे प्रमुख पाहुणे होते. या प्रकरणी त्यांनी एक सुंदर भाषणही केले. त्या दिवशी सायंकाळी झालेल्या या समारंभात शहरातील जवळपास सर्व प्रमुख व्यक्तींनी भाग घेऊन आनंद व्यक्त केला. 'हितकारिणी-पाठशाला' या ऐवजी माझे नाव शाळेला देऊन माझ्या नकळत पिठापुरमच्या राजाने शिक्षणाधिकाऱ्याला तसे कळवले आणि त्यांना मला तशी तार करावयास सांगितले. समारंभाचे वेळी ती तार तसेच राजेसाहेबांचे पत्र वाचून दाखविण्यात आले. माझा नाइलाज झाला. मी गप्प बसलो. शाळेला नवे नाव द्यावयाचे होतेच तर ते माझे न देता शाळेच्या खर्चाचा सर्व भार उचलणाऱ्या राजेसाहेबांचे नाव शाळेला दिले असते तर मला मनापासून समाधान वाटले असते. सध्या शाळेत ५०० विद्यार्थी आहेत. आणि तिला 'आस्तिकोन्नत शाळा' म्हणतात. आस्तिक प्रार्थनेने शाळेचे काम सुरू होते. या व्यतिरिक्त शाळेत कोणतीही अन्य आस्तिक शिकवण दिली जात नाही.

विधवाश्रमात दाखल होणाऱ्या तरुणी सामान्यपणे आपला विवाह व्हावा ही अपेक्षा बाळगून येत. त्यामुळे सहाजिकच त्यांच्यात शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसे. विधवाश्रमाच्या कामात विशेष लक्ष घालणाऱ्या विधवा स्त्रियांपैकी एका विधवा स्त्रीला चांगले शिकवून तयार करण्याचा मी प्रयत्न करीत होतो. त्या सुमारास म्हणजे १९०७ मध्ये माझे बालमित्र श्री. कनुपति योगानंद यांची १६ वर्षांची बालविधवा मुलगी सुंदरम्मा विधवाश्रमात आली. तिची माझ्या घरी रहावयाची इच्छा होती. म्हणून आम्ही तिला आमच्या घरीच ठेवून घेतले आणि स्वतःच्या मुलीप्रमाणे सांभाळू लागलो. शिक्षण संपल्यानंतर लग्न न करता विधवाश्रमाचे काम पाहणे वगैरेसारख्या लोकोपयोगी कार्यांतच मी माझे जीवन घालवीन असे बालवयातील उत्साहाच्या भरात ती मला एकदा म्हणाली. मी स्वतः तिला इंग्रजी शिकवण्यास सुरुवात केली. एका वर्षात मी तिला सातव्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण दिले.

विधवाश्रमातील प्रत्येक विधवेचा जेवणाचा दरमहा पाच रुपये खर्च शिवाय कपडे, पुस्तके इत्यादी तसेच औषधपाण्याचा खर्च आम्हीच करत होतो. विधवाश्रम चालविण्यात असंख्य अडचणी होत्या. आश्रमात अनेक प्रांतांतील विभिन्न स्वभावाच्या विधवा येत.

त्यांचे पूर्वचरित्र तर आम्हाला मुळीच माहीत नसे. या विधवा बहुधा अशिक्षित असत. त्यामुळे आपसांत भांडणे करीत. आश्रमात आल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवसापासून आपले लवकर लग्न जमवा असा लकडा लावीत. आपापसातल्या भांडणात एखादीची बाजू घेतली नाही की रूसून उपवास करू लागत.

एकदा हनुमायम्मा नावाची एक विधवा विधवाश्रमात आली. तिला डोळ्यांचा त्रास होता. १९०८ मध्ये बेंगलूरला जाण्याचे रद्द करून आम्ही पतिपत्नी डोळे दाखवण्यासाठी त्या विधवेला बरोबर घेऊन मद्रासला गेलो. तिच्यावर इलाज सुरू होता. वाऱ्यात आणि उन्हात फिरू नको असे डॉक्टरांनी सांगितले. एक दिवस तिला एकटीच घरी ठेवून आम्ही शहरात गेलो. त्या दिवशी तिने जो गोंधळ केला आणि ती जी रडली ते वर्णनापलिकडचे आहे. रडूनरडून तिचे डोळे सुजले आणि तिचे डोळे मूळपदावर आले. नाहक तिला एवढ्या दूर का घेऊन आलो असे वाटले. शेवटी तिच्या डोळ्यांवर इलाज करून राजमहेंद्रवरमला परत आलो. एक दिवस हनुमायम्मा आणि आणखी दोन विधवा रोजच्या जेवणासाठी भाताऐवजी पोळ्या करू लागल्या तेव्हा आश्रमाची व्यवस्थापिका सुंदरम्मा हिने आज तुम्ही भातच करा असे सांगितले. पण त्यांनी ऐकले नाही, उलट व्यवस्थापिकेशी भांडण केले. आमची तात्काळ लग्ने केली नाहीत तर आम्ही कोणाहीबरोबर पळून जाऊ अशी त्या तिन्ही विधवांनी मला धमकी दिली. या बायांना काही करून आश्रमातून घालवणेच शहाणपणाचे आहे असा मी विचार केला. मध्यंतरी दंडपाणीचे खरगपूरहून हनुमायम्मासाठी वर सुचविणारे पत्र आले होते. मी ताबडतोब हनुमायम्माला खरगपुरला पाठविले. उरलेल्या दोघींचाही विवाह दुसऱ्या दोन मुलांशी लावून देऊन मी मुक्त झालो. त्या घाईला आल्या नसत्या तर कदाचित त्यांना त्यापेक्षाही चांगली स्थळे मिळाली असती. विधवाविवाह केलेल्यांपैकी एकाने एकदा एका विधवेला विधवाश्रमात पाठवले. ती गरोदर असल्याचे लवकरच आमच्या लक्षात आले. मागे एकदा मद्रासला जाण्यापूर्वी अशीच एक विधवा माझ्या घरी आली होती. ती गरोदर असल्याचे लक्षात येताच आम्ही तिला आमच्या घरातून बाहेर काढले. ती तिच्या गावी गेली नाही. तिने गर्भपात करण्यासाठी औषध घेतले आणि त्यातच मरण पावली. तिच्या मृत्यूची बातमी ऐकून आम्हाला अतिशय दुःख झाले. आता आलेल्या विधवेलाही हाकलले तर काय होईल असे मनात आले. गरोदर विधवेला आश्रमात ठेवणे अनैतिक होते पण तिला हाकलायलाही मन होईना.

अशा स्त्रियांसाठी 'पतित स्त्री रक्षण गृह' (रेस्क्यू होम) स्थापन करण्याचे ठरवले. त्या तरुणीला वेगळ्या खोलीत ठेवले आणि तिला आश्रय दिला. माझ्या पत्नीने तिचे बाळंतपण केले. तिला मुलगा झाला पण जन्मतःच तो मरण पावला. पुढे त्या तरुणीचे गुंटुरच्या एका विधुर पुरोहिताशी लग्न करून तिची पाठवणी केली.

काही दिवसांनी पतित स्त्रीरक्षणगृहात एक वैश्य विधवा आली. ती काकिनाड्याची होती. माहेराहून काही दागिने घेऊन ती एका शूद्राबरोबर पळून आली होती. तिच्या नातेवाईकांनी कोर्टात तक्रार दाखल केली. मॅजिस्ट्रेटने दोघांनाही दोषी ठरविले आणि तरुणाला ६ महिन्यांची आणि तरुणीला ४ महिन्याची तुरुंगवासाची सजा ठोठावली. ती जेलमधून सुटल्यानंतर तिचे काका वगैरे तिला भेटायला आले. त्यांनी तिला माझ्या घरी आणून माझ्या पत्नीच्या पायावर घातली. भविष्यकाळात अशी चूक करणार नाही असे त्या तरुणीने आश्वासन दिले तेव्हा आम्ही तिला पतित स्त्री रक्षणगृहात ठेवून घेतले. त्या तरुणीचे नाव कनकरत्नमु होते. काही महिन्यांनी काकिनाड्याच्या. सैलादि कृष्णमूर्ति यांनी कनकरत्नमुबरोबर विवाह करायची इच्छा व्यक्त केली. विवाहानंतरही मी त्या दोघांना पतित स्त्रीरक्षणगृहातच ठेवले. या दोन तरुणींशिवाय आणखी चार तरुणींना रक्षणगृहात आश्रय मिळाला. त्यापैकी एकीचा विवाह केला. बाकीच्या तरुणी बाळंतपणानंतर मुले टाकून न सांगताच पळून गेल्या.

श्री राजमहेंद्रपूर व्हिक्टोरिया हिंदू विधवाश्रमासाठी पुढीलप्रमाणे नियम बनवले :

(१) समाजातील काही स्त्रिया थोडेसे शिक्षण मिळाले की गर्विष्ठ बनतात आणि काम करणे कमीपणाचे समजतात. त्या आळशी बनतात व शेवटी त्यांचा अधःपात होतो. या विधवाश्रमात अशा विचारांना जागा नाही. येथे प्रवेश करणाऱ्या स्त्रियांनी परिश्रम करण्याची सवय केली पाहिजे. स्वयंपाक करणे, सामानसुमान व्यवस्थित ठेवणे, हिशेब ठेवणे, लहानमोठी कामे करणे इत्यादी कामे आळीपाळीने त्यांनी केली तर त्यांना संसारातील माहिती होईल. येथे राहणाऱ्या प्रत्येक स्त्रीने रोज आपले कपडे आपणच धुतले पाहिजेत, आपली अंथरुणे स्वतः घालून सकाळी उठल्यावर ती परत व्यवस्थित ठेवली पाहिजेत.

(२) आजारी स्त्रीवर डॉक्टरी इलाज करण्याची व्यवस्था आश्रम करील, पण रुग्ण स्त्रीची सेवा इत्यादी करण्याचे काम येथील विधवांनी केले पाहिजे.

(३) गरीब बालविधवांना शिक्षण आणि जेवण, कपडे, पुस्तके इत्यादी मोफत मिळेल. सहा महिन्यांतून एकदा दोन-दोन कपडे दिले जातील.

(४) अन्य स्त्रियांशी झगडा करणाऱ्या किंवा आपल्या कर्तव्यपालनात चुकारपणा करणाऱ्या अथवा शिक्षणात लक्ष नसलेल्या स्त्रीला आश्रमातून काढून टाकण्यात येईल.

श्री. मुलुकुट्ल अच्युतरामय्या यांनी मोठ्या उदार मनाने विधवाश्रमासाठी नवी जागा बांधून दिली. तिचा गृहप्रवेशसमारंभ १५ नोव्हेंबर १९०८ ला झाला.

१९०८ मध्ये सरकारने माझी गोदावरी जिल्ह्याचा "रजिस्ट्रार ऑफ मॅरेजेस" म्हणून नियुक्ती केली. या जागेवर आल्यानंतर माझ्यापुढे होणारा पहिला विवाह कामराजु हनुमंतराव याचा होता. सुंदरम्माचा विवाह हनुमंतरावाशी करण्याचे मी ठरविले होते. कनुपर्ति सुंदरम्माला मी मुलीसारखी मानून सांभाळली होती. ब्राह्म-

समाजात सामील होऊन माझ्याबरोबर समाजाचे काम करण्याची आणि ब्राह्मण मुलाबरोबर लग्न करण्याची तिची तयारी होती. पुलपर्ति वेंकट सुब्बाराव याचा विवाहही या विवाहाबरोबरच होणार होता. विवाहांची सारी तयारी झाली, पण तेवढ्यात विवाहाच्या दिवशी सर्व स्त्री-पुरुषांना हरिजनांबरोबर भोजन करावे लागेल असा हनुमंतरावाने आग्रह धरला. माझी पत्नी वगैरे स्त्रिया या गोष्टीला तयार नव्हत्या. मी हरतऱ्हेने हनुमंतरावाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पुढे कधी तरी एक दिवस स्त्रियांना वगळून आपण सर्व हरिजनांबरोबर जेवण करू असे म्हटले. परंतु हनुमंतराव ऐकेना, शेवटी ठरलेले लग्न मोडले.

त्यामुळे १८ ऑक्टोबर १९०८ ला होणारा हनुमंतरावाचा विवाह स्थगित झाला. पण पुलपर्ति वेंकट सुब्बाराव याचा विवाह मात्र ठरल्याप्रमाणे त्या दिवशी झाला. हनुमंतरावसाठी आहेर म्हणून पिठापुरमच्या राजांनी पाठवलेली अंगठी, घड्याळ इत्यादी भेट वस्तू सुब्बारावलाच दिल्या. पुढे हनुमंतराव स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेण्यासाठी विधवाश्रमातील नोकरी सोडून वृंदावनपुरला गेला आणि तेथे काम करू लागला. त्यानंतर काही दिवसांनी हनुमंतरावाने राजकीय कार्य सोडून दिले आणि सामाजिक व धार्मिक क्षेत्रात काम करायचे ठरविले. तो पुढे राजमहेंद्रवरमला रहावयास आला. काही दिवसांनी म्हणजे २५ जुलै १९०९ रोजी पूर्वी ठरलेले सुंदरम्मा आणि हनुमंतराव यांचे लग्न झाले. विवाहानंतर सुंदरम्मा विधवाश्रमाची व्यवस्थापिका म्हणून आणि हनुमंतराव हितकारिणी समाजाचा दुय्यम चिटणीस म्हणून काम पाहू लागले. दोघांना मिळून २५ रुपये पगार मिळत होता.

१९०७ मध्ये एका रात्री अकस्मात मी बेशुद्ध झालो आणि पडलो. त्यानंतर अशक्त होऊन आजारी झालो. पंडित शिवनाथशास्त्री मला भेटावयास आले. कलकत्ता पहावयाची माझी इच्छा आहे असे मी त्यांना सांगितले. शिवनाथशास्त्रींबरोबर ४ एप्रिल रोजी पत्नीसह मी कलकत्त्याला जायला निघालो. वाटेत भुवनेश्वरचे मंदिर आणि त्याच्या आसपासचे बौद्ध मंडप वगैरे पाहिले आणि कलकत्त्याला पोचलो. कलकत्त्याला आम्ही पंडित शिवनाथशास्त्री यांच्या घरीच उतरलो.

कलकत्त्याच्या बऱ्याच लोकांना आधीपासून माझे नाव आणि कार्य माहीत होते. साधारण ब्राह्मसमाजाने तसेच आदी ब्राह्मसमाज आणि नवविधान समाज संस्थांनी माझा सन्मान केला. आम्ही कलकत्त्याला एक आठवडा राहिलो. शहरातील प्रेक्षणीय स्थळे पाहिली आणि राजमहेंद्रवरमला सुखरूप परत आलो. या प्रवासाचा मला काहीसा लाभच झाला.

त्याच वर्षी उन्हाळ्यात मी प्रथम बेंगलूरला गेलो. म्हैसूरच्या सर्व वृत्तपत्रांनी माझा गौरव करणारे लेख प्रसिद्ध केले. बेंगलूरच्या वर्धमान समाजाने (प्रोग्रेसिव्ह युनियनने)

माझा सत्कार केला. काही दिवस बेंगलूरला राहून म्हैसूर पहावयास गेलो. महाराणी कॉलेजात माझा सत्कार झाला. तेथून शिवसमुद्रमुला गेलो आणि कावेरी नदीचा धबधबा पाहिला. धबधब्याच्या पाण्यावर वीज तयार करण्याची पद्धत पाहिली. कोलारला जाऊन सोन्याच्या खाणी पाहिल्या. पुन्हा बेंगलूरला परत आलो. बेंगलूरच्या नागरिकांनी १५ जून रोजी जाहीर सभा घेऊन माझा सत्कार केला. चार भाषात मानपत्र होते. इंग्रजी मानपत्र असे होते : "आम्ही बेंगलूरचे नागरिक आपल्या व्यक्तिगत जीवनातील साधना आणि आपली साहित्यसेवा यामुळे अतिशय प्रभावित झालो आहोत. आपल्याबद्दल गाढ आदर आणि श्रद्धा व्यक्त करताना आम्हाला आनंद होत आहे.

"आपण तेलुगूत साहित्य निर्मिती तर केलीतच पण तेलुगू साहित्याचे स्वरूप अधिक सुंदर आणि अलंकृत केलेत. आपल्या साहित्यकृती भारतातील तेलुगूभाषी बहुसंख्य समाजाला प्रेरणादायी आणि जीवनदायी ठरल्या आहेत."

"इतरांना कार्य करायचा उपदेश करणाऱ्यांचीच संख्या जगात जास्त आहे. परंतु शांती, सहनशीलता आणि स्वार्थत्याग याद्वारे स्वत: सदैव निमग्न होऊन कर्तव्य करणारे आपल्यासारखे आदर्श लोक फारच कमी आहेत."

त्यानंतर लवकरच मी बरंपुरला एका विधवेचे लग्न करण्यासाठी गेलो होतो. तेथील नागरिकांनी ७ जुलै १९०७ रोजी माझा सत्कार करून मानपत्र दिले. १९०८ मध्ये मी मच्छलीपट्टणमला गेलो होतो. त्यावेळीही स्थानिक नागरिकांनी माझे भव्य स्वागत केले आणि मानपत्र दिले. त्याचप्रमाणे बापट्ला इत्यादी ठिकाणी मी गेलो असता तेथील नागरिकांनीही माझे स्वागत केले आणि मानपत्र दिले. पूर्वी परिस्थिती अशी होती की मी जेथे जाई तेथे माझी नालस्ती केली जाई, मला दगड मारीत. आता मी गेलो की लोक माझा सत्कार करीत आणि फुले उधळीत. तरी देखील मला तो जुना काळच आवडे. माझे विरोधक माझी जितकी अधिक निंदानालस्ती करीत, तितका माझा रूबाब वाढे; शौर्य आणि उत्साह द्विगुणित होई. त्यामुळे खूप निष्ठेने आणि चिकाटीने मला काम करता येई.

मद्रास इलाख्याचे गव्हर्नर लालीसाहेब १९०९ मध्ये राजमहेंद्रवरमला आले. त्यावेळी त्यांनी मला भेटावयास बोलाविले आणि अतिशय आदराने आणि स्नेहभावाने माझ्याशी ते बोलले. त्यांनी आमचा विधवाश्रम पाहण्याचीही इच्छा व्यक्त केली. विधवाश्रमाकडे जायचा रस्ता चांगला नाही असे निमित्त सांगून मी निसटण्याचा प्रयत्न केला. पण रस्ता नसला तर काही बिघडत नाही, आपण पायी चालत जाऊ असे लगेच ते म्हणाले. तेव्हा मी ४० मजूर दिवसरात्र कामाला लावून रस्ता तयार केला. त्यानंतर रविवारच्या सुटीच्या दिवशी गव्हर्नरसाहेब सकाळी ७ वाजता विधवाश्रम पहावयास आले आणि संतुष्ट होऊन परत गेले.

१४ एप्रिल १९०८ रोजी मी साठ वर्षांचा झालो. माझ्या पत्नीच्या आग्रहाखातर षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ करण्याचे मी ठरविले. मित्रांना व परिचितांना निमंत्रणे पाठवली. विधवाविवाह करणारे मित्र लांबून लांबून माझ्याविषयी आदर व्यक्त करण्यासाठी आले होते. त्या दिवसाचा षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ यशस्वीपणे पार पडला.

१९०९ च्या उन्हाळ्यात बेंगलूरला जायचे ठरले. माझी पत्नी तसेच सुंदरम्मा आणि जनकम्मा यांनाही बरोबर घेतले. परंतु वाटेत मद्रासला समर्थि रंगय्याशेट्टीच्या आग्रहामुळे एक दिवस राहावे लागले. मी मद्रासला असताना हे रंगय्या शेट्टी विधवाश्रमासाठी दरमहा दहा रुपये देत असत. त्यानंतर मी त्यांना भेटून दरमहा दहा रुपये देण्याऐवजी एकदम मोठी रक्कम दिलीत तर अधिक चांगले होईल असे म्हणालो. त्यांनी तात्काळ माझ्या इच्छेनुसार एक हजार रुपये हितकारिणी समाजाला दिले. माझ्या या मित्राचे लवकरच निधन होणार आहे असे त्यावेळी चुकूनही माझ्या मनात आले नाही. विजयवाड्याहून परत जात असता ९ जूनला रेल्वे अपघातात माझ्या या मित्राचा अकाली मृत्यू झाला.

राजमहेंद्रवरमच्या विधवाश्रम इत्यादी संस्थांसाठी मला वारंवार उसने पैसे घ्यावे लागत. हितकारिणी समाजाच्या सदस्यांची वर्गणी, निधी गोळा करणाऱ्या नोकरांचा पगार भागवण्यासाठी देखील पुरी पडत नसे. घरभाड्यांतून मिळणाऱ्या पैशाने केल्या जाणाऱ्या खर्चाव्यक्तिरिक्त उरलेला सर्व खर्च मलाच उचलावा लागे. मी हितकारिणी समाजाला दिलेल्या रकमेतील शिल्लक असलेले ३५०० रुपये आतापर्यंत सर्व खर्च करून झाले होते.

ही परिस्थिती लक्षात घेऊन हितकारिणी समाजाच्या सदस्यांनी जास्तीत जास्त निधी गोळा करण्याचे ठरवले. त्यांनी आर्थिक मदतीसाठी एक विनंतिपत्र छापले. दौरे काढून निधी गोळा करणे जरूर होते. मी पत्नीसह हनुमंतरावांना बरोबर घेऊन मुंबईस जावे आणि निधी गोळा करावा असे हितकारिणी समाजाच्या सदस्यांनी ठरविले.

आम्ही प्रथम सिकंदराबादला गेलो. त्या दिवशी तेथेच राहिलो. डॉक्टर नयुडु यांनी माझ्या दौऱ्याचा उद्देश लक्षात घेऊन पहिला हप्ता म्हणून १५ रु. दिले. मी डॉ. नायुडूंच्या घरी गेलो त्यावेळी कवयित्री सरोजिनी नायुडु आजारी असल्याने पलंगावर पहुडल्या होत्या. त्यांनी आपल्या मुलांना जवळ बोलावून "तुमचे आजोबा आले आहेत बघा," या शब्दांत मुलांना माझी ओळख करून दिली. सरोजिनी नायुडूंचा विवाह मद्रासला असताना मीच लावला होता. त्यामुळे त्यांनी मला आजोबा म्हटले असावे. खरे म्हणजे सरोजिनीदेवींच्या वडिलांनी आपल्या मुलीचा विवाह तुम्ही आपल्या घरीच करावा असे मला सुचविले होते. परंतु मी तसे न करता ब्रह्मसमाज मंदिरातच लग्न लावले.

सिकंदराबादला एक दिवस राहून मुंबईला गेलो. माझे मित्र आणि हैदव सांघिक

संस्कार पत्रिकेचे मालक नटराज अय्यर स्टेशनवर घ्यायला आले होते. ते आम्हाला आपल्या घरी घेऊन गेले. मुंबईच्या सुशिक्षित समाजाला तसेच सुधारक आणि प्रार्थना समाजाच्या सदस्यांना माझ्या नावाचा बराच परिचय होता. त्यामुळे मुंबईतही माझा स्वागत सत्कार झाला. जस्टिस चंदावरकर यांनी सत्कारसभेत माझा गौरव केला. माझा शिष्य गंटि लक्ष्मीनरसिंहम तसेच मित्र गणेश नारायण चंदावरकर यांनी माझ्या सन्मानार्थ मेजवान्या दिल्या.

मी काही मेजवान्या झोडायला मुंबईला आलो नव्हतो, निधी गोळा करायला आलो होतो. म्हणून मेजवानीसाठी दुसऱ्या काही मित्रांनी दिलेली निमंत्रणे मी नम्रतापूर्वक नाकारली आणि मित्रांच्या सहकार्याने निधीचे काम सुरू केले. एका आठवड्यात ९०० रुपये जमा केले. या कामी आंध्र पत्रिकेचे मालक श्री काशीनाथराव नागेश्वरराव पंतुलु आणि नटराज अय्यर यांनी मला खूप मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे. नंतर मी पुण्याला गेलो. पुण्यात दोन दिवस होतो. आमचे मित्र आणि पुण्याच्या विधवाश्रमाचे संस्थापक कर्वे यांच्याकडे आमचा मुक्काम होता. या मुक्कामात कर्वे यांच्या विधवाश्रमाच्या कामाचे निरीक्षण केले.

माझे मित्र श्री बेंकटराव यांनी मला बल्लारीला येण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार मी पत्नीसमवेत बल्लारीला गेलो. त्यांनी आपल्या घरी आमची उतरण्याची व्यवस्था केली. जाताना प्रवासखर्चासाठी म्हणून १०० रु. दिले. हितकारिणी समाजासाठी त्यांनी त्याआधी ३००० रुपयांचे शेअर्स दिले होते. त्याशिवाय 'सभापति यंत्रा'साठी आणखी दोन हजार रुपयांचे शेअर्स दिले. त्यांचा निरोप घेऊन आम्ही गुंतकल्लुमार्गे राजमहेंद्र-वरमला परत आलो. काही दिवसांनी काकिनाडयाला गेलो आणि १३३२ रुपये निधी जमविला. अशाप्रकारे जमा केलेल्या पैशांतून हितकारिणी समाजाला असलेले कर्ज काही अंशी फिटले.

१९१० च्या उन्हाळ्यात आम्ही पुन्हा बेंगलूरला गेलो. या खेपेला आम्ही आमच्या बरोबर न्यापति जानकम्मा आणि कामिराजुगडु मंगम्मा यांनाही नेले होते. यावेळी आम्ही आमच्या स्वतःच्या घरात मुक्काम केला. आम्ही येण्यापूर्वी माझ्या मित्रांनी घर आवरून राहण्यायोग्य केले होते. बेंगलूरमधील मुक्कामात आम्हा उभयतांच्या तब्येती कधी नव्हत्या इतक्या सुधारल्या त्यामुळे माझ्या पत्नीने वर्षातून सहा महिने बेंगलूरला येऊन मजेत राहावे असा बेत केला. मीही त्याला संमती दिली.

या मुक्कामात आम्ही आमच्या समवेत आणलेल्या न्यापति जानकम्माचे लग्न उरकले. बंगलोरमधील तो पहिला पुनर्विवाह होय. म्हैसूर राज्यात विधवाविवाह कायद्याने संमत नव्हता. त्यामुळे आम्हास हा विवाह इंग्रजी राज्यातील दंडुपट्ट या गावी करावा लागला. असा विवाह म्हैसूर राज्यातील लोकांना नवीनच असल्यामुळे बेंगलूरचे अनेक

प्रतिष्ठित नागरिक विवाहाला आले आणि पानसुपारी इत्यादि सत्कार झाल्यामुळे अतिशय संतुष्ट झाले.

विधवाश्रमातील सर्व स्त्रियांत आमच्याबरोबर आलेली मंगम्मा माझ्या पत्नीची अत्यंत लाडकी होती. मंगम्माही माझ्या पत्नीला आई मानीत असे. मंगम्मा विधवाश्रमात राहात असली तरी नेहमी आमच्या घरी येत असे आणि माझ्या पत्नीला सर्वप्रकारे मदत करीत असे. माझी पत्नी नेहमी मला म्हणे, "मंगम्माचे लग्न केलेत तरी तिला सासरी पाठवू नका, लग्न झाले तरी मी तिला आपल्याच घरी ठेवून घेईन."

४. असहाय दशा : १९१० ते १९१३

१९१० मध्ये बेंगलूरहून परतल्यानंतर दोन महिने होतात न होतात तोच संकटाचा डोंगर कोसळला आणि माझी स्थिती असहाय्य झाली.

बेंगलूरहून राजमहेंद्रवरमला परत आलो तेव्हा माझ्या पत्नीची प्रकृती चांगली सुधारलेली होती. नंतर देखील काही दिवस तिच्यात कोणत्याही रोगाचे लक्षण दिसत नव्हते. ११ ऑगस्टला सकाळी तसेच संध्याकाळी तिने स्वत: स्वयंपाक केला आणि मला वाढले. त्या आधी दोन दिवस आमच्या गायीला वासरू झाले. तेव्हा तिच्या दुधाचा खरवस करून तिने मला खाऊ घातला. इतरांना थोडासा दिला आणि स्वत:ही थोडा खाल्ला. ११ ऑगस्टला रात्री मी जेवण केले आणि दुसऱ्या मजल्यावर झोपायला गेलो. ती घरातले सर्व कामकाज आटपून, जनावरांना चारापाणी घालून रात्री १० वाजायच्या सुमारास वर आली आणि व्हरांड्यातील खाटेवर झोपली. ती येण्याआधी मी झोपलो होतो.

माझ्या पत्नीला पहाटे चारला उठायची सवय होती. उठली की तासभर माझ्याशी बोलत बसे. पांच वाजले की प्रार्थना करी आणि मग खाली जाई. त्या रात्री मी पहाटे तीनच्या आधीच खाली गेलो. मी दरवाजा उघडल्याची चाहूल लागताच ती रोज विचारायची 'खाली जाताय का ? दिवा आहे ना? सावकाश नीट पाहून उतरा' पण त्यादिवशी माझी पत्नी काहीच बोलली नाही. मी खालून परत वर आलो. पत्नीच्या खाटेपाशी जाऊन विचारले, 'अजून झोप झाली नाही का तुझी ?' तिने काहीच उत्तर दिले नाही. तिची झोपमोड करू नये असे वाटले म्हणून खुर्चीत स्वस्थ बसलो. घड्याळात पाच वाजले तरीही माझी पत्नी उठेना. जवळ जाऊन मी हाक मारली, काही उत्तर मिळाले नाही. तिला हलवून पाहिले. तरीही ती उठली नाही. तिचे शरीर एकदम थंड वाटले. मला काहीच सुचेना. कसातरी जिना उतरून खाली आलो. डॉक्टरना बोलवायला निघालो. विधवाश्रमावरून जाताना तिथे राहणाऱ्या पलवर्ति सुब्बारावला जागे करून म्हटले 'माझे पाय लटपटत आहेत, तू पळत जा आणि बागेतल्या डॉक्टरांना घेऊन ये.' असे म्हणून त्याला डॉक्टरांकडे पाठविले आणि मीही त्याच्या पाठोपाठ गेलो. मी डॉक्टरांच्या घराजवळ पोचतो न पोचतो तेवढ्यात स्वत: डॉक्टरच बाहेर आले. मी त्यांना

म्हटले, 'माझी पत्नी बेशुद्ध झाली आहे तुम्ही ताबडतोब चला.' औषधे वगैरे घेऊन डॉक्टरसाहेब माझ्याबरोबर निघाले.

डॉक्टरांनी पत्नीला तपासून पाहिले आणि मग हलकेच माझ्या कानात सांगितले, 'प्राण पाखरू उडून गेले आहे!' माझा विश्वास बसेना. पुन्हा नीट तपासा असे मी डॉक्टरांना विनवले. प्राण गेल्याला तीनचार तास होऊन गेले आहेत असे म्हणून ते उठले उंबरठ्यावर उभे राहून माझे सांत्वन करू लागले; मला धीर देऊ लागले आणि मग जिना उतरून निघून गेले. मी भिंतीला टेकून उभा राह्यलो. पोटात काहीतरी ढवळून आले आणि पाय थरथरू लागले. तोंडातून शब्द बाहेर पडले, "हे ईश्वरा, या म्हातारपणी मला अशा संकटात का टाकलेस?" त्यावर मला हे शब्द स्पष्टपणे ऐकू आले, "दुःख करू नकोस. जे झाले ते दोघांच्या भल्यासाठीच आहे." मला वाटले मला कुणीतरी धीर देत आहे. मी डोळे उघडून पाहिले. ही ईश्वरी वाणीच असेल असे मला वाटले. माझ्या हृदयातील दुःख आणि शोकावेग अचानक लुप्त झाला आणि मन एकदम शांत आणि निर्मल झाले.

मी आपल्या पत्नीजवळ जाऊन पाहिले; तिच्या मुखावर नेहमीचे तेज झळकत होते. जणू ती सुखनिद्रा घेत आहे असे भासत होते. चादरीला एकही सुरकुती पडली नव्हती. वेणीतले गुलाबाचे फूल सुकले नव्हते. साडीच्या निऱ्या जशाच्या तशा होत्या. माझ्या पत्नीला मृत्युपूर्वीच्या वेदना झाल्या नसाव्या की शीणही जाणवला नसावा! रात्री एक किंवा दोन वाजता झोपेंतच तिचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले असावेत.

माझ्या पत्नीच्या मृत्यूची वार्ता शहरभर वणव्यासारखी पसरली. तीर्थक्षेत्रावर येणाऱ्या लोकांप्रमाणे मी राहात होतो त्या बागेत लोक जमू लागले. काही लोक तर इतके विव्हळ झाले होते की जणू त्यांच्या परिवारातीलच कुणीतरी मृत्युमुखी पडले आहे. काही लोक मला धीर देऊन माझे सांत्वन करण्यासाठी आले होते पण मला पाहून ते स्वतःच रडू लागले तेव्हा मलाच त्यांची समजूत काढावी लागली. वरवर पाहता मी स्वतःला सावरले होते. सहनशीलतेचा बांध फोडून दुःख बाहेर उसळून येई तेव्हा गच्चीवर जाऊन देवाची प्रार्थना करी आणि स्वतःला काहीसे शांत करण्याचा प्रयत्न करी.

माझ्या पत्नीविषयीचा आदर व्यक्त करण्याच्या हेतूने त्या दिवशी ख्रिश्चन शाळा आणि हितकारिणी शाळा बंद ठेवण्यात आल्या. एक इंग्रजी पाक्षिक वगळल्यास बाकीच्या सर्व पत्रांनी माझ्या पत्नीच्या मृत्युनिमित्त पुरवण्या काढल्या. या सर्व पत्रिकांची मुद्रणालये देखील बंद होती. डिस्ट्रिक्ट मुन्सफाने आपले कोर्ट बंद ठेवले आणि अनेक वकिलांसमवेत ते मला भेटायला आले. अशाप्रकारे सर्व नागरिकांनी माझ्यावर कोसळलेल्या प्रसंगाविषयी दुःख व्यक्त केले आणि माझ्याविषयी सहानुभूती दाखवली त्याबद्दल मी अतिशय कृतज्ञ आहे.

तीन वाजायच्या सुमारास शव आनंदाश्रमात नेण्यात आले. प्रथम प्रार्थना झाली. आणि मग बागेतील एका कोपऱ्यात दाह संस्कार करण्यात आला. माझ्या पत्नीच्या मृत्यूची बातमी कोणीतरी तारेने माझ्या मित्रांना कळवली. दुखवय्याच्या अनेक तारा तसेच पत्रे देखील येऊ लागली.

माझ्या पत्नीने ज्याचे पालनपोषण करून वाढवले होते तो गोगुलपाटि वीरेशलिंगम बातमी समजताच ताबडतोब आला. मी पत्नीची पेटी उघडून वीरेशलिंगमच्या बायकोला देण्यासाठी तिची बनारसी साडी काढली. तेव्हा मात्र मला अश्रू आवरता आले नाहीत. आम्ही सांभाळ केलेला तो मुलगाही रडू लागला. पत्नीची बनारसी साडी त्याला दिली आणि उरलेल्या साड्यांपैकी एक पुलवर्ति सुब्बारावच्या पत्नीला आणि दुसरी रेशमी साडी माझ्या पत्नीच्या भावजयीला दिली. बाकी साड्या–चोळ्या विधवाश्रमातील विधवांना देऊन टाकल्या.

माझ्या पत्नीच्या अस्थींची पुढेमागे समाधी बांधावी या विचाराने मी एका पेटीत त्या जपून ठेवल्या होत्या. पण विधवा-विवाहितांनी फार आग्रह धरला तेव्हा मी त्या त्यांना देऊन टाकल्या. गोगुलपाटि वीरेशलिंगमनेही अस्थी मागितल्या म्हणून थोड्या त्यालाही दिल्या. सुरुवातीच्या काळात ज्या मुलांचे आम्ही पालनपोषण केले त्यापैकी गोगुलपाटि वीरेशलिंगम हा एक व दुसरा पुलवर्ति सुब्बाराव हा आहे. चार महिन्यांचा असताना वीरेशलिंगमला आमच्या घरी आणले. आमच्याच शिस्तीत तो वाढला. माझ्या पत्नीवर तो आपल्या आईसारखे प्रेम करी, तिची प्रत्येक आज्ञा शिरसावंद्य मानी. त्यामुळे माझी पत्नी वीरेशलिंगमला पोटच्या मुलापेक्षा अधिक मानी. आपल्या भाचीचे त्याच्याशी लग्न लावून आपल्याजवळ त्याला ठेवायची तिची इच्छा होती. म्हातारपणी त्याचा आधार होईल असे तिला वाटे. जेव्हा त्याने म्हैसूरच्या मुलीशी लग्न करावयाचे निश्चित केले तेव्हाही वीरेशलिंगम प्रायश्चित घेऊन आपल्याला सोडून जाईल असे तिच्या मनात आले नाही. ती बातमी तिला कळली तेव्हा तिला कमालीचा मनस्ताप झाला. कित्येक दिवस तिचे मन ठिकाणावर नव्हते.

आनंदाश्रमाजवळील बागेत एक घर बांधून त्यात मी आपल्या पत्नीच्या अस्थी ठेवल्या आणि त्या जागेला 'राजलक्ष्मी–निवास' असे नाव दिले. संगमरवराची ही अत्यंत सुंदर समाधी कलकत्त्यात बनवलेली आहे. माझ्या पत्नीला फुले फार आवडत म्हणून समाधीच्या अवतीभोवती एक पुष्पोद्यान केले. त्याचे नाव 'राजलक्ष्मी प्रमदावन'. पत्नीच्या नावाने लोकांच्या उपयोगासाठी एक विहीर बांधली.

श्रीमती राजलक्ष्मीचा जन्म कातेरू या गावी श्री. अद्दंकि पट्टाभिरामय्या आणि कोंडमांबा यांच्या पोटी नोव्हेंबर १८५१ मध्ये झाला आणि १२ ऑगस्ट १९१० च्या प्रातःकाळी तिचे निधन झाले. मृत्युसमयी तिचे वय ५८ वर्षे ८ महिने आणि २५ दिवस

होते. ती पट्टाभिरामय्यांची दुसरी मुलगी. बालवयातच ती मातृसुखाला वंचित झाली म्हणून कातेरूचे पटवारी, तिचे मामा श्री. वेन्नेटि वेंकटरत्नमु आणि त्यांची पत्नी यांनी तिचे पालनपोषण करून तिला वाढविले. आईवडिलांनी तिचे नाव 'बापम्मा' ठेवले होते. म्हणून माहेरची मंडळी तिच्या मृत्युपर्यंत तिला 'बापायी' या नावाने हाक मारीत.

त्या काळात स्त्रीशिक्षणाची निंदा होत असे. शिवाय पत्नीचे मामा एका लहानशा खेड्यात रहात होते. तरी देखील त्यांनी तिला शाळेत पाठवून शिकवले. विवाहाच्या-वेळी माझे वय १२ व माझ्या पत्नीचे वय ८ वर्षांचे होते. तिच्यावर पूजापाठ वगैरेचे संस्कार झालेले होते. त्यामुळे कोणी पुरुषमाणूस घरात नसेल तेव्हा तीच देवपूजा करी. ती १२ वर्षांची झाली तेव्हा तिला माझ्या घरी पाठविण्यात आले. माझ्या आईने माझ्या पत्नीचे नाव बदलले आणि राजलक्ष्मी या आपल्या आईच्या नावाने ती तिला हाक मारू लागली.

संसाराच्या प्रारंभापासूनच आम्हा पतीपत्नीतील प्रेम वाढत होते. सर्व बाबतीत आमचे एकमत असे. तिचा माझ्यावर अतिशय विश्वास होता आणि सुखात तसेच दुःखातही माझी साथ करीत ती माझ्याबरहुकुम बदलत गेली. मी एखादे धाडसी काम हाती घेतले की मला मागे न खेचता खांद्याला खांदा लावून मला प्रोत्साहन देऊन पुढे जाण्याची प्रेरणा देत असे. माझा स्वभाव संतापी आहे तर माझी पत्नी शांत स्वभावाची होती. भडकलो म्हणजे मी कोणाचीही पर्वा करीत नाही. उतावीळपणाने मस्तवाल हत्तीप्रमाणे वागत असे. अशावेळी ती अंकुश होऊन मला काबूत आणी आणि मला शांत करी. मला वाटते, 'षट्कर्म युक्ताखलु धर्मपत्नी' ही उक्ती माझ्या पत्नीसाठीच असावी. माझ्यातील श्रद्धेचे प्रबळ मूळ माझ्याविषयीच्या तिच्या गाढ प्रेमात होते असेही असू शकेल.

माझ्याशी विवाह केल्यामुळे माझ्या पत्नीला असंख्य संकटांना तोंड द्यावे लागले. तरी देखील तिने धैर्याने त्यांचा मुकाबला केला. तिच्या चेहऱ्यावर सदा प्रसन्नता आणि हास्य विलसत असे. मी विधवाविवाहाची चळवळ सुरू केली तेव्हापासून तिला सतत अडचणींशी झगडावे लागले. माझे नातेवाईक, मित्र, गावातील लोक आणि सनातन मंडळी यांनी माझे मतपरिवर्तन व्हावे म्हणून सर्व तऱ्हेने प्रयत्न करून पाहिले. अखेरीला ते जमले नाही तेव्हा त्यांनी माझ्या पत्नीवर दडपण आणायला सुरुवात केली. त्यातही त्यांना यश आले नाही. पालनपोषण करून वाढविणारे तिचे मामा आणि तिच्या इतर नातेवाईकांनी येऊन जणू तिच्यावर वज्राघात झाला आहे, अशाप्रकारे तिच्यापुढे रडारड केली आणि तू आपल्या नवऱ्याला या कामापासून परावृत्त कर असे केविलवाणेपणाने विनवले. पण माझी पत्नी त्यांच्या त्या दीन विलापामुळे डगमगली नाही. "माझ्या पतींनी हाती घेतलेले कार्य उत्तम कार्य आहे असे मी मानते. कितीही संकटांशी सामना

करावा लागो, मी त्यांची साथ सोडणार नाही" असे निर्धारपूर्वक सांगून तिने त्यांना परत पाठविले.

"तर मग तू आम्हा सर्वांना सोडणार ?" असे म्हणून सर्व रडू लागले. माझ्या पत्नीने उत्तर दिले, "मी तुम्हाला कधीच सोडणार नाही. कदाचित् तुम्हीच मला सोडाल." मी तिचा हात हातात घेतला एवढ्यामुळे माझी पत्नी माझ्या कार्यांत सहभागी झाली असे नाही तर तिला स्वतःला स्वभावतःच अनाथ मुलींच्या दयनीय स्थितीविषयी अतिशय करुणा वाटे. मी घरी नसताना कोणी विधवा आपला विवाह करा असे सांगायला आली, तर तिला घरात नेऊन जणू जुनी ओळख असावी अशा प्रकारे तिला चार उपदेशाचे शब्द सांगून ती तिला धीर देई. अशिक्षित विधवा स्त्रियांना मूळाक्षरे शिकवी. रोज पाटीवर शब्द आणि वाक्ये लिहायला सांगे. त्यांना शिकायला उत्तेजन देई. "विवाह करून आपल्या पतीच्या घरी जाण्यापूर्वी तुम्ही मुलींनी लिहायला वाचायला शिकून घेतले पाहिजे आणि आपल्या अडचणी पत्र लिहून आम्हाला कळविता येतील इतके शिकले पाहिजे" असे सांगे. कोणी विधवा अज्ञानाने किंवा स्वाभाविक प्रवृत्तीमुळे चुकीच्या मार्गाने जाऊ लागली तर तिची चूक पोटात घालून आईप्रमाणे तिची कान-उघाडणी करून ती तिला योग्य मार्गावर आणी.

मी शाळेत गेलो असताना घरी कोणी विधवा आली तर तिला घरी ठेऊन घेई आणि मी घरी आल्यावर कपडे बदलत असताना माझ्याजवळ येऊन, "मी तुम्हाला एक चांगली बातमी सांगणार आहे" असे म्हणून मला आत नेऊन नव्याने घरात आलेली विधवा दाखवी. विवाहाची अपेक्षा बाळगून आमच्या घरी आलेल्या विधवांना माझी पत्नी मुलीप्रमाणे वागवी. त्यांना शिक्षणाची देणगी देई, चांगल्या वागणुकीचे धडे शिकवी. त्यांचा विवाह झाल्यानंतर त्यांना पत्रे पाठवून त्यांचे क्षेमकुशल विचारून घेई. जरूर तेव्हा त्यांचे बाळंतपणही करी. आजारपणात त्यांची सेवा करी. अशाप्रकारे विधवांशी ती अत्यंत सहानुभूतीने वागे. स्वाभाविक विकारवशतेमुळे किंवा धूर्त पुरुषांच्या हातात सापडून ज्या विधवांचे वाकडे पाऊल पडले असेल, अशा अनाथ तरुणींविषयी तिला सहानुभूती वाटे. अशा स्त्रियांसाठी आमच्या समोरील घरातच तिने 'पतित स्त्री रक्षण-गृह' काढले. ते चालविण्याची जबाबदारी तिने आपणावर घेतली आणि पतित स्त्रियांना कुप्रवृत्तीपासून परावृत्त करून सुधारण्याचा प्रयत्न केला. अशा पांच स्त्रियांना तिने आश्रय दिला. त्यापैकी तिघींचे विवाह करण्यात आले. उरलेल्या दोघी मुलांना जन्म देऊन बालहत्येच्या पापापासून मुक्त होऊन आपल्या घरी निघून गेल्या.

शेवटी आलेली ब्राह्मण विधवा गर्भवती होती. तिला माझ्या पत्नीने ख्रिश्चन लोकांनी चालविलेल्या प्रसूतिगृहात पाठविले. ती विधवा आपल्या मुलाला प्रसूति-गृहाच्या अधिकाऱ्यांच्या हाती सोपवून पळून जाण्याच्या विचारात आहे असे पत्नीला

कळताच ती तात्काळ घोडागाडी करून प्रसूतिगृहात गेली आणि बाळबाळंतिणीला घरी घेऊन आली. पुढे ती विधवा आपल्या मुलीला आमच्या घरी टाकून आपल्या वृद्ध मातेसह गावी निघून गेली. माझ्या पत्नीने त्या मुलीचे नाव 'प्रेमावती' ठेवले. मोठ्या प्रेमाने ती तिचा सांभाळ करू लागली. पण नंतर पत्नी अकस्मात मृत्यू पावली. त्या मुलीला सांभाळणारे कोणी उरले नाही. म्हणून नाइलाजापोटी त्या मुलीला प्रसूतिगृहाच्या अधिकाऱ्यांच्या हाती सोपवणे भाग पडले, सध्या ती मुलगी त्यांच्यापाशी सुखरूप आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत एक दिवस मी शाळेत गेलो असता आमच्या गल्लीत एक अस्पृश्य माणूस बेशुद्ध होऊन पडलेला माझ्या पत्नीला दिसला. त्या कडक उन्हात व गरम वाळू असलेल्या रस्त्यावर बेशुद्ध पडलेल्या त्या अस्पृश्याची दया येऊन माझी पत्नी आसपासच्यांना आणि रस्त्याने जाणाऱ्यांना बोलावून त्या माणसाला आमच्या ओट्यावर सावलीत आणून ठेवायला जरा मदत करा असे सांगू लागली. पण तो माणूस अस्पृश्य होता. त्यामुळे शूद्र देखील त्याला स्पर्श करण्यास तयार झाले नाहीत. आपापल्या रस्त्याने ते निघून गेले. काही वेळाने त्या रस्त्याने कनुपति श्रीरामुलु जात असताना दिसला, पत्नीने त्यालाही विनविले. तो मदतीला आला आणि मग दोघांनी मिळून त्या अस्पृश्य माणसाला आमच्या ओट्यावर आणून ठेवले. माझ्या पत्नीने घरात जाऊन स्नान केले आणि परत येऊन त्याची शुश्रूषा केली. स्त्री आणि पुरुष बहिण-भावासारखे आहेत; परोपकार हाच परम धर्म आहे अशी तिची श्रद्धा असल्यामुळे ती देहभान विसरून दुसऱ्याला सहाय्य करी.

माझी पत्नी खरीखुरी देशभक्त होती. फार पूर्वीपासून मूर्तिपूजेवरून तिचे मन उडाले होते. ती आसपासच्या स्त्रियांना घरी जमवी आणि एकेश्वरी उपासनेसाठी त्यांना प्रेरित करी. तिने स्त्रियांसाठी प्रार्थना समाज स्थापन केला. विशुद्ध आस्तिक श्रद्धेला उत्तेजन देणारी कीर्तने रचली. दर आठवड्यास नियमितपणे स्त्रियांच्या प्रार्थना समाजात ती संगीत कीर्तने करीत असे. स्त्रियांचा वेगळा प्रार्थना समाज आणि प्रार्थना मंदिर राजमहेंद्रवरम वगळल्यास मद्रास राज्यात अन्यत्र कोठेही नाही. माझी पत्नी दरवर्षी समाजातर्फे उत्सव साजरा करी आणि त्यावेळी पैसे गोळा करून लुळे-पांगळे, आंधळे-बहिरे व वृद्धांना अन्नदान करी.

माझ्या पत्नीत काही नैसर्गिक मानवी दोषही असले तरी उत्तम गुणांची संख्या जास्त असल्याने तिला एक 'स्त्री रत्न' म्हणता येईल. अशा स्त्रीरत्नाची शेवटपर्यंत मला साथ मिळाली नाही त्यामुळे मी अत्यंत दुःखांत दिवस काढतो आहे.

पत्नीच्या देहावसानानंतर दुसऱ्या दिवसापासूनच मला स्वयंपाक करून जेऊ घालणारे आणि माझी वास्तपुस्त करणारे कोणी उरले नाही. माझी अडचण पाहून व माझी दया

येऊन विधवाविवाह परंपरेतील राचर्ल रत्नम्मा माझी देखभाल करण्यासाठी आपल्या पतीसह माझ्या बागेत येऊन राहिली. काही दिवसांनी रत्नम्माच्या पतीचा देहांत झाला. त्यानंतरही काही वर्ष माझ्या घरी राहून तिने मला स्वयंपाक करून जेऊ घातले आणि माझा मोठ्या श्रद्धेने सांभाळ केला. त्यामुळे पत्नीच्या मृत्यूचे दुःख हलके होऊ लागले. रत्नम्मा विधवाश्रमाचेही काम करील अशी माझी अपेक्षा होती. परंतु रत्नम्मा जास्त काळ माझ्या घरी राहू शकली नाही. तिची आई अचानक आजारी पडली. आईला खाऊ पिऊ घालणारे आणि सांभाळणारे दुसरे कोणी नव्हते. त्यामुळे आईने बोलाविले तेव्हा नाईलाजाने तिला आईची सेवा करण्यासाठी जावे लागले. त्यानंतर त्या म्हातारीने रत्नम्माला माझ्याकडे येऊ दिले नाही. तुम्ही दोघी माझ्या बागेत वेगळे बिऱ्हाड करून रहा, तुझी मुलगी तुझीच सेवा करील असे नाना तऱ्हांनी मी तिला समजावले पण तिने ऐकले नाही.

त्यामुळे नाईलाजाने मला पुलवर्ति सुब्बारावच्या घरी जाऊन राहणे भाग पडले. त्याच्याकडे असताना मी माझ्या भोजनखर्चासाठी दरमहा दहा रुपये देत असे. माझ्या बागेतील लाकडे पाठवीत असे. भाजीही घेऊन देत असे. भाजी असलेले गरम जेवण वेळेवर मिळावे एवढीच माझी अपेक्षा असे पण दुर्दैवाने तेही जमू शकले नाही. एकही दिवस दहा वाजण्यापूर्वी कधी जेवण मिळत नसे. भात कधी जास्त शिजलेला असे तर कधी कच्चा. एक दिवस रात्रीच्या जेवणात भाजी कमी वाढली होती. मी थोडीशी आणखी मागितली तशी सुब्बारावची पत्नी संपली म्हणाली. शेजारच्या खोलीतून सुब्बाराव हे ऐकत होता. नंतर तो स्वतः जेवायला बसला तेव्हा त्याच्या बायकोने त्याला भाजी वाढली. तेव्हा त्याने विचारले, "पंडितजींनी भाजी मागितली तेव्हा तू त्यांना भाजी का वाढली नाहीस ?" शब्दाने शब्द वाढले आणि सुब्बारावने आपल्या बायकोला मारले. स्त्रीने आपण होऊन वात्सल्याने आणि प्रेमभावाने वागले पाहिजे. पुरुष जबरदस्तीने तिला असे किती काळ वागावयास लावू शकेल ?

एक दिवस मी आंघोळीला निघालो असता विधवाश्रमातील दुर्गम्मा आणि मंगम्मा यांनी डोक्याला तेल चोळून घेण्याचा आग्रह केला. मी नको नको म्हणत असता मला तेल चोळून घ्यावे लागले. माझ्या केसांच्या अगदी जटा झाल्या होत्या. कंगवा फिरविणेही शक्य नव्हते. पत्नी गेल्यानंतर चार महिन्यांनी घडलेले हेच पहिले अभ्यंगस्नान होय.

विधवाश्रमातील विधवांवर मी कधीकधी काही निमित्ताने रागावत असलो तरी त्या माझी आईसारखी काळजी घेत. मला त्या काकाजी म्हणत. त्यांना काही कमी पडू नये याची मी देखील काळजी घेई आणि त्यांना मुलीसारखे मानी. पत्नी अचानक मृत्यू पावल्यामुळे आश्रमातील मुली काही काळ इतक्या उदास दिसत होत्या का जणू आईच्या मायेलाच त्या पारख्या झाल्या आहेत. त्यातील मंगम्मा पत्नीची फार लाडकी होती.

माझ्या पत्नीच्या दुःखाने झुरून झुरून ती आजारी पडली. बरेच दिवस औषधे घेतल्यानंतरच ती बरी झाली.

म्हातारपणात आपली कायम सेवा करील असे कोणीतरी पाहिले पाहिजे असे मला वाटू लागले. सुब्बारावकडे यापुढे जास्त काळ राहणे योग्य नव्हते. विधवाश्रमातील जी विधवा लग्न झाल्यानंतरही आयुष्यभर पतीसह माझ्याकडे राहील आणि मला सांभाळील तिला एक हजार रुपये देईन असे सांगितले. तेव्हा दुर्गम्मा, मंगम्मा आणि वेंकटसुबम्मा या तिघींनी तयारी दाखविली. पैशाच्या लोभाने नव्हे तर माझ्याविषयीच्या आदराने आणि माझी असहाय अवस्था पाहून सहानुभूतीपोटी त्या मला सांभाळावयास तयार झाल्या होत्या.

बरंपुरमचा एक मध्यमवयस्क नियोगीवंशी विधुर ब्राह्मण गेले कित्येक दिवस आपणाला एका विधवेशी लग्न करावयाचे आहे असे म्हणत होता. विधवाश्रमातील विधवांपैकी मंगम्मा हीच एकटी नियोगीवंशी होती. मी त्या विधुराला मंगम्माविषयी लिहिले. तो कबूल झाला. मी मंगम्माला ते सांगितले. तेव्हा लग्न झाल्यावर माझी देखभाल करावयाचे काम सोडून जावे लागेल म्हणून मंगम्माने लग्न करायला नकार दिला. तेव्हा मंगम्माला खरोखरच मला सांभाळायची इच्छा आहे हे मी ओळखले. तेव्हा मीही माझे उरलेले आयुष्य तिच्या मायेखाली घालवावयाचे ठरविले.

१९११ मध्ये बेंगलूरला जाण्याच्या एक महिना आधी श्री. तेन्नेटि वेंकट दीक्षित यांचे एक पत्र आले. त्यात त्यांनी आपला आचंदच्या शाळेत व्यायामशिक्षक असलेल्या एका मित्राला विधवेशी विवाह करावयाचा आहे असे लिहिले होते. त्या गृहस्थाला राजमहेंद्रवरमध्येच शिक्षकाची नोकरी मिळवून दिली तर तो येथे रहावयास तयार होईल काय असे मी दीक्षितांना उलट विचारले. तो निश्चितच तेथे रहावयास तयार होईल असे दीक्षितांनी कळवले. त्यावर तो गृहस्थ मंगम्माशी लग्न करावयास व लग्नानंतर माझ्यापाशी रहावयास तयार असेल तर मी त्याला नोकरी देईन, घर बांधून देईन, मंगम्माला ३०० रुपयांचे दागिने तसेच २०० रुपये रोख देईन असे मी दीक्षितांना कळविले. दीक्षितांनी आपल्या त्या मित्राला राजमहेंद्रवरमला पाठविले. त्याचे नाव पोतुराजु सूर्यप्रकाशराव असे होते. मी मंगम्मा व पोतुराजु यांची भेट घडवून आणली. त्यांच्या संमतीने विवाह ठरविला. मी बेंगलूरहून परत आल्यानंतर विवाह करण्याचे ठरविले.

२७ मार्च १९११ ला मी मंगम्माला घेऊन बेंगलूरला गेलो आणि स्वतःच्या घरी उतरलो. माझ्या घरात सर्व प्रकारच्या सुखसोयी होत्या तरी तेथे रहावयास माझे मन होईना. तेथील प्रत्येक गोष्ट गतवर्षी पत्नीबरोबर घालवलेल्या दिवसांची आठवण करून देई आणि मन व्यथित होई. त्या घरात राहणे मला नरकतुल्य वाटू लागले. तेव्हा ते

विकायचे ठरविले. त्याप्रमाणे लवकरच घर विकून मी राजमहेंद्रवरमला परत आलो. मंगम्माचे लग्न ८ ऑक्टोबरला झाले. मी दोन बनारसी साडया घेतल्या होत्या. त्यापैकी एक विवाहाच्यावेळी नेसण्यासाठी म्हणून मंगम्माला दिली आणि दुसरी सुब्बारावच्या बायकोला दिली. तसेच विधवाश्रमातील सर्व स्त्रियांनाही चोळीचे कापड घेऊन दिले.

मी बेंगलूरला असताना विधवाश्रमातील स्त्रियांशी अतिशय कठोरपणे वागत असे. त्यामुळे नाराज होऊन आम्हाला पळून जावेसे वाटते असा एक सामूहिक अर्ज सर्व विधवांनी माझ्याकडे दिला.मी त्यांची समजूत काढणारे एक पत्र लिहिले. माझ्या पत्राने त्या शांत झाल्या आणि त्यांनी पळून जाण्याचा विचार सोडून दिला. मंगम्माच्या विवाहानंतर हितकारिणी समाजाने तिला विधवाश्रमाचे काम पाहण्यासाठी दरमहा सहा रुपये आणि बागेचे काम पाहण्यासाठी म्हणून तिच्या नवऱ्याला सहा रुपये पगार सुरू केला. शाळेच्या उपसमितीने सूर्यप्रकाशरावालाही सहाय्यक व्यायामशिक्षक म्हणून मासिक बारा रुपये पगारावर नेमले. त्यामुळे माझी खाण्यापिण्याची व्यवस्था तर झालीच पण शिवाय मला सांभाळणाऱ्यांबरोबर मला शांतपणे राहता येऊ लागले.

१९११ डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयात एक दिवस मला ताप आला. तो सारखा चढत चालला. १३ जानेवारी १९१२ ला दुपारी सर्वश्री रेब्बाप्रगड बापय्या, जयंति गंगन्ना आणि कुंदूरि वेंकटरत्नम मला भेटायला आले. थोडयावेळाने आतून कॉफी आली. मी थोडीशी कॉफी घेतली नाही तोच बेशुद्ध होऊन लटपटत खाली कोसळलो. त्या प्रसंगी माझे ओठ काळे पडले होते. श्वासोच्छ्वास थांबला होता आणि नाडी लागत नव्हती असे म्हणतात. माझा प्राण गेला असेच तेथे बसलेल्या लोकांना वाटले. तशा स्थितीत पंधरा मिनिटे होतो. मग देवदयेने शुद्धीवर आलो. माझ्या अवयवांवर माझा ताबा नव्हता. डोळे उघडून पाहिले. दुसऱ्याच्या मदतीशिवाय या कुशीवरून त्या कुशीवर वळता पण येईना. २४ जानेवारीपर्यंत मंगम्मा व तिचा पती दोघेही दुसऱ्या मजल्यावरील माझ्याच खोलीत झोपत होते. १५ दिवसानंतर मी धाब्यावर थोडा हिंडू फिरू लागलो. १४ फेब्रुवारीपर्यंत जराशी ताकद आली आणि हिंडून फिरून थोडेबहुत काम करण्याएवढी प्रकृती सुधारली.

बेंगलूरला जाण्याआधी मित्रमंडळींना घरी बोलाविले आणि प्रकृतीला आराम पडल्याबद्दल देवापाशी कृतज्ञता व्यक्त केली. विधवाश्रमातील आणि शहरातील इतर लोक प्रार्थनेला आले. त्याआधीही आजारपणात माझ्या समाचारासाठी आले होते. परंतु १३ वर्षे मी जिचे पालनपोषण केले ती सुब्बारावची पत्नी मात्र माझ्या बागेतच राहात असून एकदा देखील मला भेटायला आली नाही. सुब्बारावने देखील मला भेटायला जा असे तिला सांगितले नाही. केवढी आश्चर्याची गोष्ट ही !

पत्नीच्या मृत्यूनंतर वर्षभरात मी तिची समाधी बांधली. श्री. देशिराजु पेद्दबापय्या

पत्नीच्या दोन वर्षे आधी मरण पावले. त्यावेळी आम्ही एक बैठक बोलावली. त्यांचे नाव चिरंतन राहावे यासाठी स्मारकाच्या स्वरूपात काही करण्याचे ठरवले आणि निधीही गोळा केला. परंतु प्रत्यक्षात काही झाले नाही. एखादे कार्य करायचे म्हटले की ते एकट्यालाच करावे लागते. समाजावर सोडून काही होत नाही. सर्वांनी मिळून सामूहिकपणे काम करण्याची वृत्ती आपल्या लोकांत रुजविण्याची नितांत गरज आहे. चार वर्षे होऊन गेली तरी काही प्रयत्न झाला नाही म्हणून १९१२ च्या शेवटी समाधीसाठी लागणारे दगड वगैरे सामान कलकत्त्याहून मागवून घेतले. ते येताच ताबडतोब समाधीबांधून बापप्यांच्या अस्थी तिच्यात ठेवल्या.

हितकारिणी समाज आणि विधवाश्रम यांच्यासाठी होणाऱ्या खर्चातला अधिकांश पैसा मलाच या संस्थांना कर्ज देऊन खर्च करावा लागे. समाजासाठी सहा हजाराहून जास्त खर्च केला होता. माझे कर्ज फेडता येईल असे कोणतेच साधन समाजापाशी नव्हते. उलट समाजासाठी मलाच दरमहा शंभर रुपये खर्च करावे लागत. माझ्यापुढे पैसे मिळवण्याचे दोन मार्ग होते. एक माझ्या पुस्तकांची विक्री आणि दुसरा विश्वविद्यालयाचा परीक्षक या नात्याने मिळणारे पारिश्रमिक. शारीरिक दौर्बल्यामुळे मी नवीनवी पुस्तके लिहू शकत नव्हतो. त्याचप्रमाणे प्रखर बुद्धीच्या तरुण लेखकांची पुस्तके प्रसिद्ध होऊ लागल्याने माझ्या पुस्तकांची विक्री कमी झाली होती.

मी १८८७ पासून २५ वर्षे सतत विश्वविद्यालयाचा परीक्षक होतो. त्यातून मला २० हजार रुपये मिळाले होते. हा सारा पैसा मी परोपकारातच खर्च केला. पत्नीच्या मृत्यूनंतर १९११ पासून मी परीक्षकाचे काम करावयाचे सोडून दिले. त्यामुळे मिळकतीचा एक स्रोत बंद झाला. उत्पन्न कमी झाल्याने विधवाश्रम इत्यादीसाठी पैसे खर्च करणे जड जाऊ लागले. जिवात जीव असेपर्यंत विधवाश्रम बंद करणे मला शक्य नव्हते. मी माझे सारे आयुष्य देशोन्नतीच्या कामात व्यतीत केले. आता असहाय्य, दुर्बल आणि निर्धन होऊन पडून आहे. माझे देशबांधव मला मदत करायला आणि विधवाश्रमाचा भार आपल्या खांद्यावर घ्यायला पुढे येतील असा मला विश्वास आहे. माझ्या पोटासांठी मी कधीच दुसऱ्याकडे याचना करणार नाही. त्यासाठी अल्पसा व आवश्यक तेवढा पैसा पेन्शनरूपाने परमेश्वर मला देत आहे.

निवेदन

माझ्या आंध्रदेशीय सज्जनांनो आणि रामहेंद्रवरमच्या नागरिक बंधूंनो !

आपणास एक अखेरचे निवेदन करावयाचे आहे. आंध्र देशाच्या विकासासाठी अतिशय समर्थपणे जे सज्जन आज काम करीत आहेत त्यांच्यात माझी गणना भले न होऊ दे, पण सामाजिक कार्यांचा शुभारंभ करणाऱ्यांपैकी मी एक आहे असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही. मी धनवान नाही की बलवान नाही. बडा अधिकारी नाही की खूप शिकलेला नाही. महान कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले गुण देखील माझ्या ठायी नाहीत. थोडीबहुत देशभक्तीची भावना माझ्यात आहे इतके मात्र खरे. त्या प्रेरणेनेच यशापयशाचा विचार न करता समाजसुधारणेच्या आंदोलनात पाऊल टाकण्याचे मी साहस केले. या कामात मला कितपत यश मिळाले हे मला सांगता येणार नाही. पण मी माझी सर्व संपत्ती, तारुण्य, बळ, बुद्धी आणि शिक्षण हे कार्य यशस्वी व्हावे म्हणून वेचले आणि आपणा सर्वांच्या स्नेहास पात्र ठरलो एवढे मात्र सांगू शकतो. आंध्र देशातील लोकांनी मला खूप मोठेपणा दिला. राजमहेंद्रवरमला आंध्र देशातील सुधारणा चळवळीचे जन्मस्थान म्हणता येईल. आजवर सुधारणा आंदोलन-रूपी लतेला मी प्राण पणाला लावून उभे केले. आता तिला चारी दिशांना पसरवून यशस्वी बनविण्याची जबाबदारी आपण सर्वांनी उचलली पाहिजे. ही जबाबदारी आनंदाने हाती घेऊन आजपर्यंत राजमहेंद्रवरमला मिळालेली ख्याती देशभर पसरवावी अशी आपणास मी, तुमचा वृद्ध भाऊ नम्र विनंती करतो.

ही ख्याती केवळ राजमहेंद्रवरमची नव्हे तर साऱ्या आंध्र देशाची आहे. मी तामिळ-नाडू आणि कर्नाटकात दौरा केला, तेव्हा समाजसुधारणेच्या कार्यांत आंध्र देश त्या प्रांतापेक्षा जास्त पुढारलेला आहे असे तेथील लोक म्हणताना ऐकले. आंध्रदेशाच्या प्रगतीचा मनोमन मला अभिमान वाटला. आंध्रवासीय सज्जनांनो, अनंत सत्फले देणाऱ्या या सुधारणारूपी वेलीच्या पोषणाचा भार आता आपण उचलावा. आपण सर्वांनी हा भार उचलावात अशी आपल्या प्रिय बालकांना आंध्रमाता अनेक तऱ्हेने विनवीत आहे.

देशाच्या समग्र प्रगतीसाठी सर्वच क्षेत्रांत सुधारणा व्हावयास हवी. एकाच क्षेत्रात उन्नती होणे पुरेसे नाही. ती खरी किंवा सर्वांगीण उन्नती नव्हे. शरीराच्या सर्व अवयवांचा सारख्या प्रमाणात विकास न होता, एखाद्या अंगाचीच जास्त वाढ झाली तर तिला आपण व्याधी आणि रोगाचे चिन्ह मानतो. त्याचप्रमाणे धार्मिक आणि सामाजिक अभ्युन्नतीकडे दुर्लक्ष करून केवळ राजकीय दृष्टया पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करूनही, गलिच्छ कुळाचाररूपी भूताचे दास बनून आपण आपल्या मुलांनाही स्वातंत्र्य देणार नसलो आणि अनाथ मुली वैधव्याचे दुःख भोगत असल्याचे पाहावे लागणार असेल तर त्या स्वातंत्र्यात सुख कुठून आणि कसे मिळणार? त्याचप्रमाणे घरात सुखदायक व चांगले कुळाचार अनुसरण्याचे स्वातंत्र्य असूनही बाहेर मात्र संपत्तीचे व प्राणांचे रक्षण करण्यास असमर्थ असलेल्या निर्दय व नृशंस राजसत्तेची निरंतर सलामी पत्करावी लागणार असेल तर आपणाला सुख कसे मिळू शकेल? म्हणून घरी तसेच बाहेर त्याज्य अशा गुलामीतून मुक्त होऊन दोन्ही प्रकारचे स्वातंत्र्य मिळविल्यानंतरच आपण खऱ्या अर्थाने निर्मळ सुख भोगू शकू. म्हणून आपणास खऱ्या अर्थाने सुखी व्हावयाचे असेल तर सर्व तऱ्हेच्या स्वातंत्र्यासाठी आणि सर्वांगीण सामाजिक उन्नतीसाठी आपण सारखेच प्रयत्न केले पाहिजेत.

आंध्र देश आता जागृत झाला आहे आणि देशोन्नतीच्या विविध क्षेत्रात अत्यंत उत्साहाने कार्यरत आहे याचे मला मनापासून समाधान वाटते. आपल्या मातृभूमीची अशीच उन्नती व्हावी अशी इच्छा मी गेल्या ३०–४० वर्षांपूर्वीपासून बाळगून आहे. त्या काळात माझी ही इच्छा एखाद्या स्वप्नासारखी वाटत होती, त्यावेळी राजमहेंद्रवरमसारख्या शहरात तरुणांची सभा घेणे हा देखील सामान्य जनतेच्या दृष्टीने अपराध होता. सांप्रत लहानातल्या लहान गावात देखील सतत सभा होत असतात. त्या काळात बहुसंख्य जनतेला स्त्रियांनी शिक्षण घेणे गर्हणीय वाटे. आज जागोजागी मुलींच्या शाळा आहेत; स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले जात आहे. स्त्रिया सभा आयोजित करीत आहेत. व्याख्याने देत आहेत; पुस्तके लिहीत आहेत. समाजात स्त्रियांना आदर मिळतो आहे. त्या काळात पुरुषांना देखील वाचण्याजोगी पुस्तके देशी भाषात नव्हती. आज केवळ पुरुषांनाच उपयुक्त अशी मोठी पुस्तके लिहिली जात नाहीत तर स्त्रियोपयोगी पुस्तके देखील मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होत आहेत. त्या काळात शिक्षणाची आस्था असणाऱ्या श्रीमंत व्यक्तींना देखील पुस्तके मिळवणे कष्टसाध्य आणि खर्चिक होते. आता गावोगावी वाचनालये निघाली आहेत. गरीबांना देखील सहजासहजी पुस्तके मिळू शकतात. पूर्वी तेलुगूमध्ये फारच थोडी वृत्तपत्रे होती, जी दोन-चार होती तीही फारशी वाचली जात नसत. आज देशी भाषांतील वृत्तपत्रांची संख्या खूप आहे. वाचकांची संख्याही हजारोंनी वाढली आहे. त्या काळात कोणी शिक्षणासाठी म्हणून जहाजाने मद्रासला

गेला तर त्याला परतल्यावर प्रायश्चित घ्यावे लागे. आता शिक्षण, वाणिज्य, शिल्प, चिकित्सा इत्यादी शास्त्रांच्या अध्ययनासाठी परदेशात जाऊन परतलेल्यांना देखील प्रायश्चित घेण्याची आवश्यकता उरलेली नाही. अशी अनेक उदाहरणे देता येतील. तरी देखील सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात आमच्या बोलण्यात जेवढे शौर्य आढळते तेवढे प्रत्यक्ष कामात दिसत नाही. चळवळी देखील दोन प्रकारच्या असतात. एकीत बोलणे जास्त काम कमी असते, तर दुसऱ्यात बोलणे कमी आणि कार्य अधिक करावे लागते. राजकीय सुधारणेचा प्रयत्न हा यापैकी पहिल्या कोटीतील आहे आणि समाज-सुधारणेचा प्रयत्न हा दुसऱ्या कोटीतील आहे. समाजसुधारणा आमच्या हाती आहे, तर राजकीय सुधारणा सरकारच्या हाती आहेत. जोवर आमची सामाजिक स्थिती सुधारणार नाही तोपर्यंत सरकारने दिलेल्या राजकीय स्वातंत्र्याचे फळ आम्ही खचितच चाखू शकणार नाही. हे सत्य ओळखून सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही तितक्याच आस्थेने काम करा. या कामात अनेक अडचणींशी झगडावे लागेल यात शंका नाही. पण त्याचे काय ? अधिक फळासाठी अधिक संकटे सोसावीच लागतात.

एखाद्या क्षेत्रात काम करताना एखाद्या व्यक्तीला यश मिळाले की काही मत्सरी व्यक्ती तिच्यावर नानाप्रकारचे आरोप करतात आणि तिच्या कीर्तीला कलंक लावण्याचा प्रयत्न करतात. काही लोक अशा व्यक्तीला खाली ओढून स्वतः वर येण्याची इच्छा धरतात. समाजकार्य तसेच राजकीय कार्य करणाऱ्या नेत्यांनाही अशा लोकांपासून धोका निर्माण होऊ शकतो. दूरदूरच्या प्रदेशात आणि शहरात अशा देशसेवकांची प्रशंसा करण्यात येते आणि त्यांना मानपत्रे दिली जातात. तेव्हा तेथेही त्यांचे काही विरोधक मूर्खपणाने स्थानिक पत्रांतून त्यांच्यावर टीकास्त्र चालवीत असतात. परंतु हे विरोधक स्वतः मात्र जनतेसाठी काही करीत नाहीत. सरकारी अधिकारीवर्ग उघड-उघड लाच खातात. त्यांच्यावर टीका करण्यासाठी हे विरोधक कधी आपली लेखणी उचलत नाहीत की आपले तोंड उघडत नाहीत. परंतु रात्रंदिवस राबून सत्याने कार्य करणाऱ्यांवर टीकास्त्र चालवण्यासाठी ते सदैव टपलेले असतात.

आपल्या देशाच्या उत्थानासाठी कार्य करण्याची गरज आहे, व्याख्यानांची नाही. आपल्या आंध्र देशात सामाजिक आणि धार्मिक अभ्युन्नतीसाठी कार्य करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यात हितकारिणी समाज ही प्रमुख संस्था आहे असे म्हणता येईल. या समाजासाठी मी आपले सर्वस्व अर्पण केले. या समाजासाठी मी जो पैसा खर्च केला, तो समाजाच्या अर्ध्या कामाला पुरेल एवढाही नव्हता. धनाभावामुळे हितकारिणी समाज नवी कामे हाती घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे विधवाश्रम चालविण्याची देखील समाजाची शक्ती नाही. देशसेवेत मी आपले सर्व जीवन व्यतीत केले. आज मी असहाय होऊन हात जोडून नम्रतापूर्वक आपणांपाशी माझी अंतिम विनंती करतो की आपण

सर्वजण हितकारिणी समाजाचे सदस्य व्हा आणि सदैव त्याच्या प्रगतीचा विचार करा. परमेश्वर आपणां सर्वांचे भले करो. हे भक्तवत्सला, हे दीनरक्षका ! आंध्र देशाला सदैव विकासोन्मुख ठेव अशी माझी तुला कळकळीची प्रार्थना आहे. कृपावंत होऊन माझी प्रार्थना फलद्रुप कर.

आपणा सर्वांचा विनम्र सेवक,
कंदुकूरि वीरेशलिंगमु